05-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

PPD/ 10:00

05-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

PPD/ ST/ AKN/ 10:00

(अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री. सुभाष साबणे)

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. संजय कदम यांनी नियम 293 च्या प्रस्तावावर चर्चा सुरू करावी.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरूवात करावी तोपर्यंत मंत्री महोदय येत आहेत.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, कॅबिनेट मंत्री जोपर्यंत उपस्थित राहत नाहीत तोपर्यंत आपल्याला चर्चा करता येणार नाही.

तालिका सभाध्यक्ष : कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता तहकूब करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी 10 वाजून 05 मिनिटांनी 5 मिनिटांकरिता स्थगित करण्यात आली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री. सुभाष साबणे)

श्री. संजय कदम (दापोली) : अध्यक्ष महोदय, माजी मंत्री या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी नियम 293 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे त्यावर मी बोलण्यासाठी उभा आहे. कोकणामध्ये प्रामुख्याने सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर असे एकूण 7 जिल्हे येतात. या 7 जिल्ह्यांमधून एकूण 75 आमदार आहेत. त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याचे 3, रत्नागिरीचे 5, रायगडचे 6 आणि उर्वरित ठाणे, पालघर आणि मुंबईचे मिळून 75 आमदार आहेत. या 75 आमदारांपैकी 60 आमदार मुंबई-ठाण्यामध्ये राहतात. इतर 15 आमदार हे कोकणामधून येतात. कोकण विकासाची चर्चा होत असताना कोकणातील शेतीबाबत आपण बोलतो त्यावेळी या 15 आमदारांपुरताच शेतीचा विषय मर्यादित असतो. त्यामुळे शासनाकडून जे नियम करण्यात येतात ते सर्व कोकणामध्ये सर्वात जास्त प्रमाणात पाळले जातात. कोकणामध्ये पर्यटन विकास करताना प्रत्येकवेळी सीआरझेडमुळे अडचणी येतात. कोकणात तालुक्याच्या या ठिकाणी ज्या नगरपंचायती आहेत त्यांचे अंतर समुद्र किनाऱ्यापासून 25-30 किलोमिटर अंतरावर आहेत. त्यांचा आणि सीआरझेडचा काहीही संबंध नसतो. पण त्या प्रत्येक नगरपंचायतीला सीआरझेडची परवानगी घ्यायला पाहिजे अशा जाचक अटी ठेवल्या आहेत. केरळ आणि गोवा राज्याचे पर्यटन होत असताना केरळला सीआरझेडची अडचण येत नाही. गोव्याला प्रचंड प्रमाणात पर्यटन होते त्यामुळे तेथे सीआरझेडची अट नाही. मुंबईतील मंत्रालयाची इमारत आणि समुद्र किनारा पाहिला तर जवळ जवळ समुद्राचे पाणी आपल्या मंत्रालयाच्या जवळच्या इमारतीपर्यंत येते आणि त्या ठिकाणी बांध घालून काम करण्यात येत आहे. त्यामुळे मुंबईला सीआरझेड नाही. परंतु या ठिकाणी कोकणासारख्या रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथे एखादे काम करावयाचे असेल किंवा अगदी बांबूवरील हॉटेल्स तयार करावयाचे असतील तरी त्या ठिकाणी तहसिलदार आणि प्रांत यांचा सीआरझेडच्या अनुषंगाने तेथील लोकांना सातत्याने त्रास

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

होत आहे. या सीआरझेडची अट इतर राज्यांप्रमाणे आमच्या राज्यासाठी देखील रद्द व्हावी, अशी माझी प्रामुख्याने मागणी आहे.

3.....

05-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-3

PPD/ ST/ AKN/ 10:00

श्री. संजय कदम.....

अध्यक्ष महोदय, पूर्वी राष्ट्रीय पेयजल योजना होती. कोकणामध्ये या योजनेच्या माध्यमातून 25 ते 50 लोकसंख्येच्या ज्या ज्या वाड्या-वस्त्या होत्या त्यांचा समावेश असलेल्या वाड्या वस्त्यांना सुध्दा पूर्वीच्या आघाडी सरकारने स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना दिल्या आहेत. परंतु आता नवीन सरकार आले आणि या नवीन सरकारने आता मुख्यमंत्री पेयजल योजना आणली असून त्यासाठी 1000 लोकसंख्येचे निकष ठेवले आहेत. आमच्या कोकणामध्ये जर 1 हजार लोकसंख्येची गावे आणि वाड्या जमा करण्यास गेलो तर जवळ जवळ 5-5, 6-6 गावे त्या ठिकाणी करावे लागतील. त्यामुळे या योजनेचा कोणताही फायदा त्या लोकांना होणार नाही. म्हणून आम्ही जिल्हा परिषदेमध्ये पाणी पुरवठ्याचा आढावा घेतला असता माझ्या संपूर्ण मतदार संघामध्ये मुख्यमंत्री पेयजल योजनेच्या निकषामध्ये बसते. त्यामुळे कोकणासाठी मुख्यमंत्री पेयजल योजनेचे टँकरने पाणी पुरवठा कराव्या लागणाऱ्या तहानलेल्या वाड्या-वस्त्यांसाठी हे 1 हजार लोकसंख्येचे निकष बाजूला करुन ते रद्द केले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, रत्नागिरी जिल्हा परिषदेमध्ये अंतर्गत 67 पीएचसी बांधून ठेवल्या आहेत. या पीएचसीमध्ये 2-2, 3-3 डॉक्टर्स आहेत. यापैकी काही डॉक्टर्स पोस्ट ग्रॅज्युएशनच्या शिक्षणासाठी जाऊन दोन-दोन वर्षे पगार घेत आहेत. परंतु असा पगार घेत असताना ही पदे पटावर दिसतात, मात्र प्रत्यक्षात ती रिक्त पदे पर्यायी डॉक्टर देऊन भरली जात नाहीत. त्यामुळे ज्या डॉक्टरांना पोस्ट ग्रॅज्यूएशन करावयाचे असेल त्यांच्या बाबतीत रिक्त पदांवर पर्यायी डॉक्टर्सची व्यवस्था करुन वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन द्यावी. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये एक सिव्हील सर्जन आहे आणि एक भूलतज्ज्ञ आहे. आज जवळ जवळ संपूर्ण जिल्ह्यात 10 रुग्णालये आहेत. या जिल्ह्यामध्ये सातत्याने गोवा मुंबई हाय-वेला अपघात होतात. अपघातग्रस्ताला टाके मारायचे असतील तर हॉस्पिटल्स त्या ठिकाणी करोडो रुपयांची बांधलेली आहेत. पण तेथे भूलतज्ज्ञ असलेले डॉक्टर्स नाहीत. त्यामुळे जखमी झालेला पेशन्ट कसाबसा जीव मुठीत घेऊन जगला तर जगला नाही तर तशातच त्याचा मृत्यू होतो. त्यामुळे आमच्या जिल्ह्यासाठी भूलतज्ज्ञ देण्यात यावेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय कदम.....

अध्यक्ष महोदय, पर्यटनाच्या माध्यमातून 670 कोटी रुपयांचा एका जिल्ह्याचा आराखडा झालेला आहे. राज्याचे बजेट वाचले तर राज्याला 295 कोटींची तरतूद आहे. जिल्ह्यामध्ये गेल्यावर्षी क-वर्ग पर्यटनासाठी जिल्हा नियोजनामध्ये तरतूद झाली. यामध्ये क-वर्ग पर्यटनाला 1 कोटी 30 लाख रुपये तरतूद करण्यात आली. माननीय पालक मंत्र्यांनी 670 कोटी रुपयांचा आराखडा राज्याला सादर केलेला आहे. म्हणजे एका पर्यटन केंद्राला फक्त 5 लाख रुपये म्हणजे 200 किलोमीटरचे डांबरीकरण करु शकतो. पर्यटनासाठी फार मोठ्या घोषणा करण्यात येतात. पर्यटक कोकणात आल्यानंतर गोव्याला जात असतात. कोकणातील निसर्ग बघून पर्यटक कोकणामध्ये येत असतात. पाटबंधाऱ्याच्या माध्यमातून कोकणात जवळ जवळ 90 टक्के काम पूर्ण झालेले आहे. 100 टक्के काम पूर्ण करण्यासाठी 2-5 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. असे असताना बजेटमध्ये तुटपूंजी तरतूद दिली जाते.

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये पाटबंधारे असताना सुध्दा 5 हजार मिलीमीटर पाऊस पडतो. गेल्या वर्षी निसर्गाचे वातावरण बदलल्यामुळे कोकणात फक्त 2200 मिलीमीटर पाऊस पडलेला आहे. पडलेले पाणी अडविण्यासंदर्भात काहीतरी उपाययोजना करायला पाहिजे. गेल्या 25 वर्षामध्ये पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी फक्त खोदाई करुन ठेवलेली आहे. यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. एका बाजूला धरणे मंजूर असताना दुसऱ्या बाजूला कालव्यांच्या कामांचे टेंडर निघत असताना भूसंपादन करणाऱ्या जागा आहेत. चार वर्षापूर्वी भूसंपादनासाठी जागा मिळालेल्या आहेत याचे काम सुध्दा मार्गी लागावे. याठिकाणी मोठ्या प्रमाणात माईनिंग होत आहे. माईनिंगच्या माध्यमातून शासनाला उत्पन्न मिळत आहे. मागच्या वेळेस माननीय कृषी मंत्र्यांना प्रश्न विचारण्यात आला होता की, प्रत्येक जिल्ह्याचे माईनिंगचे पैसे असतील ते खर्च करण्याचे अधिकार देण्यात यावेत. माननीय महसूल मंत्र्यांनी अधिकार देण्याचा निर्णय केला. परंतु आजपर्यंत जिल्ह्याला पैसे मिळालेले नाहीत. आमच्या जिल्ह्यातील माईनिंगचे सर्व पैसे नागपूर येथे जातात आणि त्याठिकाणचे मंत्री त्याच ठिकाणी ते पैसे खर्च करतात. म्हणून आमच्या जिल्ह्याचे पैसे हे आमच्याकडेच खर्च व्हायला पाहिजेत. मागच्या वेळेस महसूल विभागाने निर्णय घेतला होता तो अंमलात आणावा.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय कदम.....

कोकण कृषी विद्यापीठासाठी अनेक जमीन मालकांनी मोठ्या प्रमाणात जमिनी दिलेल्या आहेत. या प्रकल्पग्रस्तांना दाखले मिळाले पाहिजेत. जागा संपादित केली म्हणून संपादित केल्याचे दाखले देतो. इतर भागामध्ये जशा जमिनी गेल्यानंतर प्रकल्पाचे दाखले देतो. याठिकाणी सुध्दा ज्यांच्या जमिनी विद्यापीठासाठी गेलेल्या आहेत त्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून दाखले मिळायला पाहिजे. जेणेकरुन त्यांना नोकरीमध्ये त्याचा फायदा होईल.

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये आंबा हे एकमेव पीक आहे. नागपूरला संत्रा पीक जास्त आले तर भाव पडला म्हणून ओरड होते. संत्री आली नाही तर शेतकरी आत्महत्या करतो. म्हणून आपण मदत मागतो. कोकणामध्ये पाऊस पडल्याने आंबा बागायतदारांचा फोन आला की, आज कोकणावर चर्चा आहे तेव्हा आंबा नुकसानीच्या विषयावर बोलावे. आम्ही कधीही याठिकाणी जास्त नुकसान भरपाई मागितली नाही. मुळात कोकणातील शेतकरी कधी कर्जच काढत नाही. आंबा बागायतदारांना प्रत्येक झाडामागे 100 रुपये नुकसान भरपाई दिली. आज बाजारामध्ये एका फळाची किंमत 50 रुपये आहे. दोन आंब्याची नुकसान भरपाई म्हणजे शेंडीला राहिलेले आंबे पक्षी खातात. एवढी चेष्टा कोकणवासियांची केलेली आहे. एवढी तुटपूंजी मदत न देता हेक्टरी मदत जाहीर करावी अशी मी याठिकाणी विनंती करतो. त्याचबरोबर शेतकऱ्यांची कर्जमाफी सुध्दा करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये एमआयडीसीचे रासायनिक प्रकल्प आहेत. कोकणामध्ये रासायनिक प्रकल्प होऊ नयेत म्हणून जनता सातत्याने मागणी करीत आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणावर काजू, आंबा, कोकम याप्रकारची फळे पिकतात. म्हणून रासायनिक कारखान्यांबरोबर कोळशाचे प्रकल्प येऊ नयेत. लोटे एमआयडीसीबाबत मागच्या अधिवेशनामध्ये माननीय मंत्र्यांना निवेदन दिले होते. कोकणावर नियम 293 अन्वये चर्चा होत असताना मुंबईतील आमदारांना शेतीचा प्रश्न नाही. संपूर्ण कोकणातील 75 आमदार आहेत. रासायनिक कारखान्यांमुळे याठिकाणच्या नद्या प्रदूषित झालेल्या आहेत. खारवी, कोळी समाजाची पूर्वी मत्स्य शेती होती. आज आमची मागणी आहे की, फिशरीजच्या अधिकाऱ्यांना याठिकाणी पाठविण्यात यावे. मत्स्य शेतीच्या माध्यमातून भोई, खारवी, कोळी समाज मच्छी विकायचा. 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी आली तर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय कदम.....

आपण त्याठिकाण्ी दुष्काळ जाहीर करतो आणि त्याला मदत करतो. त्याचप्रमाणे कोकणातील मत्स्य शेती आहे ती एमआयडीसीच्या प्रदूषणामुळे बाधित झालेली आहे. याठिकाणी मच्छी राहिलेली नाही आणि तो मच्छीमार राहिलेली मच्छी विकायला गेला तर लोक त्याच्याकडे वेगळ्या नजरेने बघतात की हा बाधित क्षेत्रातील मच्छी घेऊन आलेला आहे. याच्याकडची मच्छी खाल्ली तर आपल्याला सुध्दा तशाच पध्दतीचे रोग होतील. म्हणून फिशरीजच्या अधिकाऱ्यांनी याठिकाणी पाहणी करून 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी असेल तर त्याठिकाणच्या शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी अशी मी यानिमित्ताने विनंती करतो.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाच्या वतीने नियम 293 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी कोकणाबद्दलच्या भावना येथे मांडलेल्या आहेत. या भावनांशी आपण कोकणवासीय सहमत असलो तरी प्रस्तावामध्ये मुंबईसकट सर्व गोष्टी दिलेल्या आहेत. त्या पाहताना सभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या प्रस्तावावर बोलायला सुरुवात करताना एकच विनंती आहे की आजच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये 10.45 पर्यंतची वेळ दिलेली आहे. मुळात कोकण या विषयावर स्वतंत्र चर्चा व्हावी अशी आमच्या सर्व सदस्यांची विनंती आहे आणि ती नियम 293 मध्ये ॲड करुन मुंबईसकट कोकण अशी चर्चा याठिकाणी घेण्यात आलेली आहे. वेळ खूप कमी पडणार आहे त्यामुळे हा वेळ वाढविण्यात यावा अशी आमच्या सर्वांची विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाच्या माध्यमातून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न चालू आहे. गेली अनेक वर्षे ज्यांनी कोकणाचा कॅलिफोर्निया करु अशा पध्दतीची स्वप्ने दाखविली तेच आज या प्रस्तावाच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करीत आहेत की गेल्या दीड वर्षामध्ये सरकारने काय केले. मुंबईचा सिंगापूर करता करता ते मुंबईचे सिंगापूर करणार होते ही घोषणा विसरुन गेले. त्यानंतर शांघाई नावाचे एक स्वप्न द्यायला सुरुवात केली आणि आज सिंगापूर झाले ना शांघाय झाले अशी परिस्थिती आहे. मुंबई, मुंबई राहण्यासाठी शासनाने त्या काळात मदत केली नाही. आज भरघोस मदत राज्य सरकारच्यावतीने मुंबईसाठी होत आहे. त्यावेळेला प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष करीत आहेत. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी अनेक गोष्टी याठिकाणी मांडल्या त्यामुळे त्या गोष्टींच्या रिपीटेशनमध्ये मी जात नाही.

अध्यक्ष महोदय, परंतु मुंबई महानगरपालिकेच्या गैरकारभाराची घोषणा करणारी मंडळी महानगरपालिकेच्या स्टँडिंग कमिटीमध्ये तुमचे सदस्य काही बोलत नाहीत. मी सन्माननीय सदस्यांना आठवण करुन देतो की, आदरणीय स्व. विलासराव देशमुख यांनी एक खंत व्यक्त केली होती की, स्टँडींग ही अंडरस्टँडीक झालेली आहे असे काँग्रेस पक्षाच्या बैठकीमध्ये सांगितले होते. सन्माननीय सदस्य त्याठिकाणी बोलत नाहीत आणि याठिकाणी मात्र संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करतात की गैरकारभार चालू आहे. ज्या-ज्या गोष्टी करणे आवश्यक असेल त्या गोष्टी राज्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.पराग अळवणी.....

शासन निश्तिपणे करेल. महानगरपालिकेमध्ये तुमचे सदस्य काही बोलणार नाही. तुमचे शासन असताना तुम्ही महानगरपालिकेला कधी योग्य निर्देश दिलेत काय? महानगरपालिकेच्या आयुक्तांची एक नजर मंत्रालयाकडे असते की, मंत्रालयाकडून मला काय डायरेक्शन मिळतात. 20 वर्षाच्या गैरकारभाराच्या गोष्टी आपण करता तर मंत्रालयाकडून कधी डायरेक्शन का आल्या नाहीत. आज मात्र आमच्या मित्र पक्षाला सातत्याने टोमणे मारण्याचा प्रयत्न करीत असतात की, बघा चौकशी चालू आहे. प्रस्तावामध्ये मात्र विचारले की शासन काहीच करीत नाही. त्यामुळे ही दुटप्पी भूमिका केवळ संभ्रम निर्माण करण्यासाठी आहे.

C-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. पराग अळवणी.....

त्यामुळे ही दुटप्पी भूमिका केवळ संभ्रम निर्माण करण्यासाठी आहे. मुंबईसाठीचे अनेक चांगले, धाडसी सुयोग्य वेळेला निर्णय घेतले जात आहेत. अनेक वर्षांमध्ये एस.आर.ए.चे अध्यक्ष असलेले तत्कालीन मुख्यमंत्री कधी एस.आर.ए. च्या कार्यालयात गेले नाहीत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अध्यक्ष हे मुख्यमंत्री महोदय असतात याचा विसर त्यांना पडल होता. पहिल्यांदा माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये गेले, तेथे त्यांनी बैठक लावली. आता अनुभव असा येतो की, वेगवेगळया सोसायटयांना विचारले जाते की, तुमचे प्रकल्प का प्रलंबित आहेत ? काय अडचणी आहेत ? त्या सांगाव्यात. मला वाटते की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील प्रशासन गतिमान करण्याचा प्रयत्न निश्चिपणाने झालेला आहे. हा मागच्या 10 ते 15 वर्षामध्ये कोणी केला नाही. परंतु आज संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. मेट्रोबाबतच्या गैरकारभाराबाबतच्या अनेक गोष्टी सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी सांगितल्या. मेट्रो-1 असो किंवा मुंबईचे एअरपोर्ट असो किंवा महाराष्ट्रामध्ये अनेक पी.पी.पी. प्रोजेक्ट झाले त्याचे मॉडेल तुम्ही अशा पध्दतीने केले की, कॉस्ट ॲक्सलेशनच्या नावाने हजारो कोटीं रुपयांचा भ्रष्टाचाराबाबत सी.ए.जी.ने मेट्रोबद्दल बोलले, सी.ए.जी.ने एअरपोर्टच्या खाजगीकरणाबद्दल सुध्दा बोलले. त्यामुळे गैरकारभाराच्या गोष्टी कोणी कराव्यात याचा सुध्दा प्रश्न पडतो.

अध्यक्ष महोदय, परंतु मेट्रो-1 आणि मेट्रो-3 याच्यामधील एक बेसिक फरक सांगतो. मेट्रो-1 मध्ये वर्सेवा ते घाटकोपर प्रपोझ केली तेव्हा मेट्रो रूटच्या दुतर्फा 50-50 मीटरच्या जमिनीच्या ॲक्वीझिशनची प्रोव्हीजन ठेवली होती. आम्ही त्याला विरोध केलेला आहे. आम्ही जेव्हा विरोध केला तेव्हा वर्सेवा ते घाटकोपर सगळया मंडळींची सुनावणी एकाच दिवशी आयनॉक्समध्ये एम.एम. आर.डी.ए.चे कार्यालय आहे, तेथे एकाच ठिकाणी सर्वांना बोलावल्यामुळे गर्दी झाली, प्रत्येकाने दोन दोन मिनिटात बोलावे अशा पध्दतीने मेट्रोच्यावेळी सुनावण्या घेतल्या. मेट्रो-3 चा गतिमान कारभार दिसतो आहे. यांच्याकाळामध्ये एका-एका इन्फ्रास्ट्रक्चरचे डी.पी.आर. बनवायला जेवढा वेळ लागला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. पराग आळवणी.....

तेवढया वेळामध्ये आम्ही प्रोजेक्ट पूर्ण करणार आहोत. साधे डी.पी.आर. वेळेत बनविले नाहीत. मेट्रो-3 मध्ये अत्यंत गतिमान पध्दतीने डी.पी.आर. बनला, सर्व परवानग्या आल्या कामाला सुरुवात होते आहे. परंतु त्यातील मानवी चेहरा लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. मेट्रो-3 च्या प्रत्येक स्टेशनवाईज पब्लिक सुनावण्या घेतल्या गेल्या. जे लोक बाधीत होणार आहेत. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले गेले. 100 टक्के जे जे प्रकल्प बाधीत होत आहेत मग ते इमारतीमधील असोत की झोपडपट्टयांतील असोत त्यांच्या स्थानिक पुनर्वसनाची प्रोव्हीजन यामध्ये केली. यांना मेट्रोमध्ये कुठला घोटाळा दिसते मला माहित नाही. विकास आराखडयाचा कुठला घोटाळा यांना दिसतो. विकास आराखडयांमध्ये वर्षानुवर्षे आम्ही या स्टोऱ्या ऐकतो आहोत. वर्षानुवर्षे महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांतील शहरांचे विकास आराखडे प्रलंबित असतात. वेळेवर पूर्ण होत नाही. मुंबईच्या विकास आराखडयाच्या संदर्भात सर्व राजकीय पक्षांनी चर्चा केली. जनतेने त्याबद्दल उहापोह केला, विकास आराखडयामध्ये काही तरी चुकी असे वातावरण निर्माण तयार झाले. वास्तविक पाहता राज्य शासनाकडे हा विकास आराखडा फार नंतर आला असता एम.आर.टी.पी. ॲक्टमध्ये कलम 26 (ए) ची प्रोव्हीजन पूर्वलक्षी प्रभावाने आणली जाते. अध्यादेश काढला. शासनाने त्यातमध्ये हस्तक्षेप केला. ज्या लोकांचे म्हणणे आहे ते समजून घेऊन प्रॉपर डायरेक्शन दिले पुन्हा एकदा विकास आराखडा राज्य शासनाने ताब्यात घेतला नाही. तो महानगरपालिकेलाच तयार करुन आणण्यासाठी परत पाठवला. त्यामुळे विकास आराखडयांचा घोटाळा मागील 20 ते 25 वर्षांपासून चालू होता. एकही विकास आराखडा वेळेवर होत नसे. 50-50 हजार लोकांच्या सूचना असायच्या, त्याला उत्तर नाही, हेअरिंग नसायची, यामुळे लोकांना काय वाटते ते लक्षात घेऊन आता अत्यंत चांगल्या पध्दतीने काम चालू आहे. या निमित्ताने माननीय मुख्यत्र्यांना एकच विनंती करणार आहे. हे सर्व प्रोजेक्ट करतो आहोत. त्याच्यामध्ये जे प्रकल्प बाधीत होणार आहेत.

अध्यक्ष महोदय, माहूलच्या ठिकाणी ज्या इमारती आहेत. त्याचा एवढा धसका मुंबईकरांनी घेतलेला आहे. यानिमित्ताने एवढीच विनंती करेन की, गृहनिर्माण मंत्री या ठिकाणी आलेले आहेत. त्यांनी आणि मुख्यमंत्री महोदयांनी स्वतः हया माहुलच्या इमारती पहाव्यात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.पराग आळवणी.....

अध्यक्ष महोदय, मी कोकणाविषयी बोलणार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आमचे मतदार सर्व कोकणी आहेत. आम्ही सुध्दा कोकणातून आलेलो आहोत. आमचे आजोबा सुध्दा कोकणातून आलेले आहेत. त्यामुळे आता आम्ही मुंबईकर आहोत. परंतु मुंबईतील कोकणी माणसाचे मूळ आणि त्याचा स्वभाव कोकणी आहे. त्यामुळे कोकणाच्या संदर्भात फक्त तीन सूचना मांडतो. पर्यटनाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. इन्फ्रास्ट्रक्चरचे काम मोठ्या प्रमाणावर चालू आहे. त्याचबरोबर शेतीला जोड म्हणून काही तरी व्यवसाय, स्वयंरोजगार हा निर्माण होण्याची आवश्यकता आहे. कोकणचा पर्यटन हे सतत आपण बोलत असतो. परंतु कोकणाच्या पर्यटनामध्ये नेमकी अडचण काय होते. एका बाजूला मुंबईला लागलेला कोकण, एका बाजूने गोवा राज्य हया मुंबई आणि गोव्याच्या स्पर्धेमध्ये कोकणाचा विचार केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीलाच म्हटले की, आम्हाला कोकणावर स्वतंत्र चर्चा पाहिजे होती. मुंबईवर स्वतंत्र चर्चा पाहिजे होती. जेव्हा आपण केरळची कोकणाशी तुलना करतो, केरळच्या पर्यटनाची तुलना करतो, जेव्हा मुंबईच्या पर्यटनाची तुलना करतो, जेव्हा गोवा राज्याशी तुलना करतो तेव्हा समजून घ्यायला पाहिजे की, आपल्याकडे अडचण काय आहे ? हे समजून घेतले पाहिजे. आजपर्यंत महाराष्ट्रामध्ये टुरिझम ॲक्ट नाही. पर्यटनाच्या संदर्भामध्ये कायदे केरळमध्ये आहेत. पर्यटनासाठी वेगळा कायदा गोवा राज्यात आहे. गोव्यामध्ये पर्यटनासाठी दोन वेगवेगळे कायदे आहेत. रजिस्ट्रेशन ऑफ टूरिस्ट ट्रेड ॲक्ट व दि गोवा टुरिस्ट प्लेसेस (प्रोक्टेक्शन ॲण्ड मेंटेनन्स) ॲक्ट आहे. कोकणासाठी महाराष्ट्राने टूरिझम ॲक्ट बविण्याची गरज आहे. हा ॲक्ट तयार झाल्यानंतर कोकणाच्या पर्यटनासाठी आराखडा तयार होईल. तो आराखडा तयार होत असताना त्या कायद्याच्या माध्यमातून अनेक प्रकारातून पर्यटनासाठी निधी येतो. परंतु त्या निधीचा वापर कोण करणार, त्याची जबाबदारी फिक्स होईल. मी एक उदाहरण देऊ इच्छितो, सन 2012 साली टुरिझमने 50 कोटी रुपये कोकणच्या पर्यटनासाठी दिले. एम.टी.डी.सी. ला न देता ग्रामविकास विभागाला दिले. आज ग्रामविकास विभागाचे माननीय राज्यमंत्री सक्रीय असून सुध्दा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.पराग आळवणी.....

त्या 50 कोटी रुपयांचा खर्च होत नाही. कारण ते एम.टी.डी.सी.कडे आले असते तर टूरिझमच्या कुठल्या आवश्यकता आहेत. हे एम.टी.डी.सी.ला माहिती आहे की, ग्रामविकासकडे पैसे दिले. ही सन 2012 सालची गोष्ट सांगत आहे.

अध्यक्ष महोदय, वॉटर स्पोर्टस् हा सध्याचा सर्वात चलनी प्रकार आहे. वॉटर स्पोर्टसचे शुटींग सिनेमासाठी करावयाचे असेल तरी विदेशात जावे लागते. आमच्या तारकर्लीला शुटींग होऊ शकत नाही काय ? संपूर्ण कोकण किना-यावर वॉटर स्पोर्टस् होऊ शकत नाही काय ? परंतु अध्यक्ष महोदय, वॉटर स्पोर्टस्ची जबाबदारी पर्यटन विभाग घेणार, एम.टी.डी.सी. घेणार किंवा मेरी टाईम बोर्ड घेणार या संभ्रमामध्ये कोकणचे पर्यटन मार खाते. त्यामुळे पर्यटन कायद्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई गोवा हायवेची चर्चा या ठिकाणी झाली. सागरी किना-याचा जो महामार्ग आहे. तो नॅशनल हायवे म्हणून घोषित झाला. त्या रस्त्याला केंद्राकडून निधी येतो आहे. खूप चांगले काम चालू आहे याची चर्चा झाली. याबाबत मी काही सूचना करु इच्छितो, संपूर्ण कोकणामध्ये हायवे निर्माण झाल्यानंतर टुरिझम, टुरिस्टचा ओघ आणखी मोठया संख्येने येण्याची शक्यता आहे. स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून घनकचरा व्यवस्थापनासाठी निधीची आवश्यकता आहे. सांडपाणी व्यवस्थापनाची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, शेतीच्या माध्यमातून जलयुक्त शिवाराचे नॉर्मस् कोकणासाठी बदलण्याची आवश्यकता आहे. कोकणाचा डोंगराळ व समुद्र किना-याचा भाग आहे. यामध्ये हे नॉर्मस् बसत नाहीत. त्यामुळे पाझर तलावांची कोकणाला अधिक प्रमाणात आवश्यकता आहे. त्या दृष्टीकोनातून हे नार्मस् बदलण्याची आवश्यकता आहे. तलावातील गाळ काढण्यात येतो असे सांगितले जाते. त्याच्यामध्ये बराच भ्रष्टाचार होतो. तवालाच्या गाळांच्या खर्चाच्या सोबत विहिरीतील गाळ साफ करण्याचे जर का एक अभियान राबविले गेले तर त्याची कोकणात त्याची अधिक आवश्यकता आहे. कोकणामध्ये केवळ काजू आंबा व फुड प्रोसेसिंगचे काम होते.

D-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.पराग अळवणी .....

अध्यक्ष महोदय, केळीचा सुंदर प्रकल्प कोकणात सुरु झालेला आहे. असे लक्षात आले आहे की, कोकणातील केळीचा दर्जा जळगावपेक्षाही चांगला आहे. त्यामुळे कोकणात फुड प्रोसेसिंगची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, फुड प्रोसेसिंग, केळी, बेबीकॉर्न हे चांगले प्रकल्प तेथे सुरु झालेले आहेत पण शासनाकडून फुड प्रोसेसिंगकरिता आणखी चालना मिळण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सांगितले की, कोकणामध्ये दुग्धव्यवसाय नाही. अनेकदा पश्चिम महाराष्ट्रातील लोक विचारतात की, तुमचा व दुधाचा काय संबंध आहे. आता रत्नागिरीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी क्लस्टर डेव्हलपमेंटचा चांगला प्रकल्प सुरु केलेला आहे. गायी उपलब्ध होण्याची आवश्यकता आहे. मी पुन्हा एकदा गोव्याचे उदाहरण देतो. गोव्यामध्ये शासनातर्फे गायी मिळतात. आज कोकणातील माणूस जेव्हा गायी विकत घेतो तेव्हा फसतो. त्या गायीचे मिल्कींग लाईफ किती आहे हे त्याला खोटे सांगितले जाते. जर कृषी उपकेंद्राच्या माध्यमातून गायी उपलब्ध केल्या, डीएनए टेस्ट करुन त्यांची मिल्कींग लाईफ काढले गेले, डेअरीसाठी शासनाची मदत आली तर तर विकास होईल. त्यासाठी कृषी उपकेंद्रांना व व्हेटर्नरी डॉक्टरांना ॲक्टीव्ह करण्यात यावे. कोकणातील व्हेटर्नरी डॉक्टरांना फार काम दिसत नाहीत. त्यामुळे त्यांच्या माध्यमातून काम करण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, कोकणातील मराठी माणूस मुंबईमध्ये राहात आहे. त्याच्याकडे कोकणामध्ये 5-10 एकर जमीन आहे. परंतु मुंबई शहरात 50-100 स्क्वेअरफुटाच्या झोपडपट्टीमध्ये कोकणी माणूस राहतो. कोकणात रोजगार व स्वयंरोजगाराची, पर्यटन कायदा करुन पर्यटन आराखडयाची अंमलबजावणी झाली तर 5-10 एकर जमिनीच्या मालकाला मुंबई शहरात 50-100 स्क्वेअरफुटाच्या झोपडपट्टीमध्ये रहावे लागणार नाही. तो मुंबईतून बाहेर फेकला जाणार नाही, त्याचे कोकणातील स्थान भक्कम होईल. त्या दृष्टीकोनातून शासनाने मदत करावी अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा) : अध्यक्ष महोदय, नियम 293 प्रस्तावामध्ये कोकण व मुंबई हे अत्यंत दोन महत्वाचे विषय आहेत. मुंबईच्या गृहनिर्माणाबाबत चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. मी अनेक वर्षे पोलीस हौसिंगबाबत विषय मांडत आहे. पोलिसांना मुंबई शहरात हक्काची घरे देण्याबाबत मी अनेकदा विषय मांडला आहे. आघाडी सरकारच्या काळात कै.आर.आर.पाटील गृहमंत्री होते. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री होते. मी त्यांच्याकडे एक चांगले प्रपोजल घेऊन गेलो होतो. नायगावमध्ये 20,961 चौरसमीटरमध्ये 336 पोलीस कुटूंबे व 32 अधिकारी राहात आहेत. हा भूखंड आपण नियम 33.9 मध्ये डेव्हलप केला तर 9 लाख एफएसआय मिळतो. मंत्री महोदय श्री.प्रकाश महेता यांना मी हा विषय समजावून सांगितला आहे. सध्या तेथे राहणारे पोलीस कर्मचारी व अधिकारी यांचे पुनर्वसन करायचे ठरले तर 330 व 600 स्क्वेअरफुट म्हणजे 1.5 लाखाचा एफएसआय तेथे खर्च केला जाऊ शकतो. यानंतर 7.5 लाखाचा एफएसआय बाकी राहतो. यामध्ये 450 स्क्वेअरफुट प्युअर कारपेट व 600 अधिकाऱ्यांना देता येऊ शकेल. त्यांना बँक कर्जाचे हप्ते परवडू शकतात. अशा प्रकारे 600 अधिकारी तेथे ॲडजेस्ट होऊ व 2219 पोलीस कुटूंबांचे तेथे पुनर्वसन होऊ शकते. नायगाव हेड क्वॉर्टर, भोईवाडा पोलीस स्टेशनच्या बाजूचे पोलीस क्वॉटर, माटुंगा येथील पोलीस क्वॉटर्सकरिता माननीय मुख्यमंत्री यांची एफएसआय दिला तर येथे 3000 क्वॉटर्स होऊ शकतात. यामुळे नायगावचा संपूर्ण एरिया तेथे एकाच ठिकाणी येऊ शकतो. त्यांना शासकीय भावाने द्यावे, मोफत देऊ नका असे मी सांगत आहे. मोफत द्यायचे असेल तर शासनाने देण्यास काही हरकत नाही. बीडीडी चाळीचा प्रश्नही तसाच आहे. त्याबाबत सांगितले जाते की, मोफत घरे देऊ. पण नंतर सांगितले जाते की, कोर्टाचा प्रॉब्लेम आहे. यामध्ये काही प्रॉब्लेम असेल तर त्यांना शासकीय भावाने द्या असे माझे म्हणणे आहे. ही माणसे शासकीय भावाने घेण्यास तयार आहे.

अध्यक्ष महोदय, आज पोलीस हौसिंग पनवेलमध्ये केले जात आहे. आजपर्यंत पोलीस गुंडांना पनवेलच्या पुढे तडीपार करीत होते. आज शासन पोलीसांना पनवेलच्या पुढे तडीपार करीत आहे. पण मी सांगितल्याप्रमाणे मुंबईमध्ये पोलिसांची हजारो घरे होऊ शकतात. नायगावमध्ये 6 प्लॉट आहेत. हे रिकामे प्लॉट शासनाला मिळू शकतात. शासनाची कोटयावधी रुपयांची प्रॉपर्टी होऊ शकते. पोलिसांना शासकीय भावाने घरे दिली तर त्याच पैशावर याचा विकास होऊ शकतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कालिदास कोळंबकर.....

यातून 500 कोटीचा फायदा शासनाला मिळेल. अशा प्रकारे डेव्हलपमेंट व्हावे या मताचा मी आहे. आघाडी सरकारच्या काळात श्री.आर.आर.पाटील हे गृहमंत्री असताना हे प्रपोजल मी समजावून सांगितले होते. त्यावेळी त्यांनी मला समजावून सांगितले की, आयपीएस ऑफीसर ऐकत नाहीत. मी विचारले की, तुम्ही असे का सांगता. आतापर्यंत आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांनी किती भूखंड घेतले आहेत, त्यांना भूखंड मिळू द्या त्याबाबत दु:ख नाही. हे अधिकारी भूखंड घेऊ शकतात तर आमच्या पोलीस बांधवांना 450 स्क्वेअरफूट कारपेट एरिया तुम्ही का देऊ शकत नाही ? डी.जी. सांगत होते की, आमची गृह विभागाची जागा आहे. शासनाकडून तो भूखंड घेतला तरी ती जागा शासनाची असते. मी सांगितलेली सूचना अत्यंत उत्तम आहे. त्यामध्ये शासनाचा फायदाही आहे. माननीय गृहनिर्माण मंत्री श्री.प्रकाश महेता यांनी याबाबत विचार करावा व मुख्यमंत्री महोदयांना समजावून सांगावे. आतापर्यंत मी याकरिता भांडत राहिलो आहे. म्हाडामध्ये बीडीडी चाळीबाबत झालेल्या बैठकीला मीसुध्दा होतो. तसेच माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस त्या बैठकीला हजर होते. या मिटींगमध्ये मी बीडीडी चाळीचा विषय मांडत असताना त्यांनीही सांगितले की, मागील 15-20 वर्षांपासून मी हा विषय सभागृहात मांडत आहे पण प्रश्न सुटत नाहीत. त्यावेळी आघाडी सरकारने हा प्रश्न सोडविला नाही, मुंबईतील प्रश्न सुटले नाहीत म्हणून आज आम्ही विरोधी पक्षामध्ये बसलो आहे. आज परमेश्वर कृपेने, जनतेच्या आर्शीवादाने तुम्ही सत्तेवर आहात. शासनाने हा प्रश्न सोडविण्याची माझी विनंती आहे. मुंबईतील बीडीडी चाळीचाही प्रश्न आहे. 93 एकर 32 गुंठे वर एकूण 207 बिल्डींग तेथे आहेत. नायगावमध्ये 26 एकरच्या प्लॉटवर 42 बिल्डींग आहेत. आमच्याकडील शिवडी भागात 5 एकर 32 गुंठे जमीन असून तेथे 12 बिल्डींग आहेत.

यानंतर ई-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कालिदास कोळंबकर.....

नामजोशी मार्ग येथील लोकप्रतिनिधी सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे हे आहेत. त्या भागामध्ये 62 एकर जमीन आहे. या भागामधील लोकांना संक्रमण शिबिरामध्ये पाठवून भविष्यात या भागाचा विकास करण्यात येईल, असे माननीय गृहनिर्माण मंत्री महोदय यांनी म्हटले होते. बीडीडी चाळींचा विकास शांततेने झाला पाहिजे. या बीडीडी इमारती शंभर वर्षे जुन्या आहेत. या इमारतींचा विकास विथआऊट शिफ्टिंग करण्यात यावा. या भागामध्ये ओपन प्लॉट जास्त आहे. या भागाचा 33/5 अंतर्गत विकास केला तर तेथील रहिवाशांना 550 कार्पेट एरिया देता येऊ शकतो. या रहिवाशांच्या विकासाकरिता असलेल्या मागण्या केवळ झिरो मेंटेनन्स आणि अंडरग्राऊंड पार्किंग इतक्याच आहेत. मी मुख्यमंत्री महोदयांना याबाबत विनंती केली होती. हा निर्णय कॅबिनेटमध्ये पास झालेला आहे. परंतु त्यांना किती कार्पेट एरिया आणि किती कॉर्पस फंड द्यावयाचा, हे निश्चित होणे बाकी आहे. यासंदर्भातील पार्किंगचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. नमुना तत्वावर 20-22 माळयाची इमारतीचे कामही विथआऊट शिफ्टींग करण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, बीडीडी चाळीच्या संदर्भात शासकीय कमिटीवर लोकप्रतिनिधींना घेतले असते तर त्यांनी ग्रासरूटचे प्रॉब्लेम्स सोडविण्याकरिता मदत केली असती. या कमिटीवर चीफ सेक्रेटरी आणि इतर दहा अधिकारी नेमलेले आहेत. अधिकारी ग्रासरूटच्या समस्या सोडवू शकत नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.अजय चौधरी, सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे आणि मी असे आम्ही तीन लोकप्रतिनिधी या संदर्भात जाणकार असून आमचा समावेश या संदर्भातील शासकीय कमिटीमध्ये करणे आवश्यक होते. माननीय गृहनिर्माण मंत्री यांनाही या कमिटीवर घेण्यात आलेले नाही. नवा काळ या वृत्तपत्रामध्ये या कमिटीसंदर्भातील बातमी आलेली नाही. यामध्ये लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतलेले नाही.

अध्यक्ष महोदय, मी माननीय मुख्यमंत्री यांचे आभार मानतो. ज्याप्रमाणे शिवसेनाप्रमुख यांनी हुतात्मा स्मारकाजवळ ज्योत प्रज्वलित केलेली आहे. त्याचप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती निमित्त चैत्यभूमी येथे अशोक स्तंभाजवळ भीमज्योत प्रज्वलित करण्यासंबंधीची माझी मागणी माननीय मुख्यमंत्री यांनी सभागृहात मान्य केलेली आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

05-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) E-2

JN/ AKN/ ST/ 10:40

श्री.वैभव नाईक (कुडाळ) : अध्यक्ष महोदय,नियम 293 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, युती शासनाचे सरकार सत्तेवर येऊन 18 महिने पूर्ण झालेले आहेत. अठरा महिन्यांमध्ये युती शासनाने अनेक क्रांतिकारी निर्णय घेतलेले आहेत. सिंधुदूर्ग जिल्हयातील पर्ससीननेटवर बंदी आणून 25,000 पारंपारिक मच्छिमारांकरिता युती शासनाने क्रांतिकारी निर्णय घेतलेला आहे. सिंधुदूर्ग जिल्हयातील आंबा व काजू नुकसान भरपाई देण्याकरिता 38 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. त्या अंतर्गत हमी पत्राअंतर्गत एक अटही ठेवण्यात आलेली आहे. माझ्या मतदारसंघातील छत्रपती शिवरायांच्या पावनस्पर्शाने पावन झालेला सिंधुदूर्ग किल्ला आहे. या किल्ल्याला 22 एप्रिल,2016 रोजी 350 वर्षे पूर्ण होत आहेत. त्याकरिता शासनाने 5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. शासनाने सुक्ष्म नियोजनामध्ये 55 कोटी रुपये दिलेले आहेत. ग्रामविकास राज्यमंत्री श्री.दिपक केसरकर यांच्या प्रयत्नांनी ग्रामीण पर्यटनाकरिता जवळ जवळ 100 कोटी रुपये निधी देण्यात आलेला आहे. मागील पंधरा वर्षातील आमच्या विविध मागण्या लोकशाही आघाडी शासनाने पूर्ण केलेल्या नाहीत. युती शासनाने त्या मागण्या पूर्ण केलेल्या आहेत, त्यांना धन्यवाद देणे हे आमचे काम आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या पंधरा वर्षात सिंधुदूर्ग जिल्हयातील विविध प्रकल्प अपूर्ण राहिलेले आहेत. माझ्या मतदारसंघात काळंबाचा पाटबंधारे प्रकल्प आहे. या प्रकल्पाला ज्यावेळी प्रशासकीय मान्यता मिळाली तेव्हा हा प्रकल्प केवळ 82 कोटी रुपयांचा होता आणि आज हा प्रकल्प 800 कोटी रुपयांचा झालेला आहे. दुर्देवाने या वर्षी या प्रकल्पाकरिता केवळ एक कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद वाढविली पाहिजे, जेणेकरुन हे प्रकल्प पूर्ण् झाले पाहिजेत. काही प्रकल्पांना मागील काळात पायाभूत सुविधा न दिल्यामुळे ते पूर्ण होऊ शकलेले नाहीत. जमीन वनसंज्ञेत आहे, असे सांगून सिंधुदूर्ग जिल्हयातील अनेक प्रकल्प अपूर्ण आहेत. साधे उदाहरण द्यायचे म्हटले तर वनसंज्ञेचा प्रश्न आहे. 1997 मध्ये शासनाने एक आदेश काढून जवळ जवळ आमच्या सिंधुदूर्ग जिल्हयातील 82,000 हेक्टर जमिनीपैकी 42,200 हेक्टर जमीन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

वनसंज्ञेमध्ये खाजगी जमीन म्हणून जाहीर करण्यात आलेली आहे. 2003 मध्ये याकरिता सर्वे कमिटी नेमली होती. ..3

05-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) E-3

JN/ AKN/ ST/ 10:40

श्री.वैभव नाईक.....

त्यापैकी केवळ 1800 हेक्टर जमीन वनसंज्ञेमध्ये देण्याचे शासनाने कबूल केलेले आहे. परंतु हे ॲफिडेव्हिट मात्र अजून सरकारने सुप्रिम कोर्टामध्ये केलेले नाही. जर ते केले तर सिंधुदूर्ग जिल्हयातील 1800 हेक्टर जमीन वनसंज्ञेमध्ये राहील आणि 40,000 हेक्टर जमीन वन संज्ञेमधून वगळली जाईल. यामुळे कोकणातील शेतक-यांना ख-या अर्थाने दिलासा मिळेल. ही भूमिका नवीन सरकारने पाहिजे. मागील सरकारने आंबा काजू बोर्ड स्थापन केले होते. परंतु त्याकरिता आर्थिक तरतूद केली नाही, त्यामुळे आंबा काजू बोर्डाचे काम ठप्प आहे. इको झ्सेन्सिटिव्हची गावे असू देत.....(अडथळा)

तालिका सभाध्यक्ष (श्री.सुभाष साबणे) : सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ सन्माननीय सदस्यांचे भाषण संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.वैभव नाईक : अध्यक्ष महोदय, या जिल्हयामध्ये काही गावे ही इको-सेन्सिटिव्हमध्ये पुन्हा घेतलेली आहेत. इको-सेन्सेटिव्हमधून काही गावे वगळली पाहिजेत, त्यामुळे कोकणातील शेतक-यांना व नागरिकांना दिलासा मिळेल. पर्यटन धोरण जाहीर झालेले आहे. आज वॉटरस्पोर्टसारख्या साहसी खेळाशी संबंधित उद्योगामध्ये तरूण उद्योजकाने आपले पैसे गुंतविलेले आहेत. स्थानिक तरूणांना रोजगार द्यावयाचा असेल तर त्यातील अडचणी दूर केल्या पाहिजेत. त्याकरिता सोपे कायदे निर्माण केले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, सन 2009 मध्ये आघाडी शासनाने कोकण पॅकेज जाहीर केले होते. त्याकरिता 500 कोटी रूपयंची तरतूद केली होती. सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये अंडी उबवणी केंद्र आहे, त्याकरिता 10.5 कोटी रूपये तरतूद केली होती. परंतु या केंद्रासाठी सहा हेक्टर जागा नाही म्हणून याकरिता असलेले पैसे मागे गेले. एखादी घोषणा जाहीर करून त्यानंतर त्याला पायभूत सुविधा द्यायच्या नाहीत, अशी भूमिका मागील सरकारने घेतली होती. नवीन सरकारने या अंडी उबवणी केंद्राचे काम मार्गी लावले पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष महोदय, आमच्याकडे कोकण कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून कुडाळ तालुक्यामध्ये उद्यान विद्यालय सुरु झाले. या उद्यान विद्यालयाकरिता जवळ जवळ 30 कोटी रुपयांची तरतूद केलेली होती. 4

05-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) E-4

JN/ AKN/ ST/ 10:40

श्री.वैभव नाईक

परंतु 2013-2016 या तीनही वर्षात 9 कोटी रुपयांची मागणी सातत्याने केली जात असतानाही ती मागणी पूर्ण होत नसल्यामुळे त्या ठिकणी उद्यान विद्यालयाचे कामकाज ठप्प आहे. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांना विनंती करतो की, त्यांनी या उद्यान महाविद्यालयाकरिता वेगळा निधी जाहीर करावा. वेगवेगळे प्रश्न आहेत, आपला जास्त वेळ घेत नाही. परंतु ख-या अर्थाने जर कोकणातील जनतेला न्याय द्यावयाचा असेल तर आंबा व काजू प्रक्रिया करणारे उद्योग सुरु झाले पाहिजेत. या प्रक्रिया उद्योगांना शासनाने मदत केली पाहिजे. 3-3 वर्ष प्रक्रिया उद्योगांना शासनाने अनुदान दिले नाही तर ते प्रकल्प सुरु होणार नाही, कोकणातील शेतक-यांना दिलासा द्यावयाचा असेल तर आंबा, काजू व इतर फळप्रक्रिया उद्योगांना शासनाने भरीव मदत केली पाहिजे. कोकणात छोटे प्रकल्प, छोटे पाटंधारे प्रकल्प आहेत, जलसंधारणाचे प्रकल्प आहेत. त्यांच्या कामांचा वेग वाढविला पहिजे. कोकणातील अनेक प्रकल्पांची पुर्नमांडणी करण्याकरिता सर्वेक्षण केले पाहिजे. निश्चितपणे प्रलंबित व अपूर्ण प्रकल्प पूर्ण झाले तर कोकणाचा विकास होईल, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील (अलिबाग) :अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी जो प्रस्ताव सभागृहामध्ये मांडलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना मांडलेल्या आहेत, त्यामुळे मी सर्व मुद्दयांची पुनरावृत्ती करणार नाही. कोकणामध्ये अनेक दिग्गज लोक होऊन गेलेले आहेत. बॅ.नाथ पै, कोकणचा कॅलिफोर्निया करणारे श्री.सावंत ही मंडळी कोकणाच्या मातीतून होऊन गेलेली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना त्यावेळी मदत करणारे तानाजी मालुसरे हे आमच्या महडचे आहेत. नेताजी पालकर हे खालापूरचे आहेत. माननीय श्री.मनोहर जोशी हे देखील कोकणातीलच आहेत. त्यांनी लोकसभेचे अध्यक्षपदही भुषविले होते.

एफ-1/--

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष पाटील.....

अशी अनेक दिग्गज मंडळी आहेत.

तालिका सभाध्यक्ष (श्री. सुभाष साबणे) : मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता सुरु असलेली म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्तावासंदर्भातील चर्चा थांबविली जात आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष पाटील यांचे भाषण सुरु असल्यामुळे ते ऑन लेग राहतील.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.00 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10 वाजून 50 मिनिटांनी सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

G-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

अध्यक्ष : प्रश्नोत्तरे

आजरोजी तारांकित प्रश्नांची संख्या कमी असल्याबाबत

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. गेल्या काही दिवसात 22 मार्च, 2016 रोजी जी प्रश्नोत्तरे झाली, त्यामध्ये प्रश्नोत्तरांची एकूण संख्या 71 होती. त्यानंतर दिनांक 30 मार्च, 2016 रोजी 111 प्रश्न सभागृहासमोर लिखित स्वरूपात आले. त्यातील किती प्रश्नांवर चर्चा करण्यात आली हा भाग वेगळा आहे. या ठिकाणी सर्वच सन्माननीय सभासद आपापले प्रश्न टाकत असतात. पहिले चार, दहा, बारा प्रश्नांवर चर्चा होऊ शकते. आपल्या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या किती प्रश्नांना लिखित स्वरूपात उत्तरे दिली आहेत, काय दिली आहेत, किंबहूना महाराष्ट्रासमोर यातून बरीच माहिती जाऊ शकते. ..(अडथळा).. मला आपला जास्त वेळ घ्यावयाचा नाही म्हणून मी अगदी संक्षित स्वरूपात माझा मुद्दा मांडतो. आज प्रश्नोत्तराच्या तासाला मुख्यमंत्री महोदयांचा गट आहे. मुख्यमंत्री महोदय, गृहनिर्माण, खनिकर्म आणि कामगार हे मंत्री प्रश्नांना उत्तरे देणार आहेत. आज तारांकित प्रश्नांची संख्या रोडाविलेली आहे. आज फक्त पंधरा तारांकित प्रश्न आलेले आहेत. अध्यक्ष महाराज, किती तारांकित प्रश्न घ्यायचे, हा मुख्यमंत्री महोदयांचा अधिकार आहे. परंतु आम्हाला अशी अपेक्षा असते की, पहिले चार प्रश्न चर्चेला येतात आणि उरलेल्या प्रश्नांची माहिती आमच्या मतदारसंघात, महाराष्ट्रातील जनतेला तसेच प्रसार माध्यमांपर्यंत जाऊ शकते. आज विशेषत: मुख्यमंत्री महोदयांच्या दबावाखाली कोठली यंत्रणा काम करीत आहे काय?

अध्यक्ष : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, प्रश्न बॅलटमार्फत निवडले जातात.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, मला माहिती आहे. बॅलटमार्फत निवडलेल्या तारांकित प्रश्नांची संख्या कमी होण्याची आवश्यकता नाही. अध्यक्ष महाराज, आपला तो अधिकार आहे. आपण निर्णय घ्यावयाचा आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : तारांकित प्रश्न बॅलटमार्फत कमी का आले, याची मी माहिती घेतो.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, मुख्यमंत्री महोदयांवर बाहेरून काही दबाव येतो आहे काय? मुख्यमंत्री महोदयांच्या गट ज्या दिवशी असतो, त्या दिवशी त्यांना विचारलेल्या प्रश्नांवर, त्यांच्यावर सरबत्ती होऊ नये, ते अडचणीत येऊ नयेत म्हणून कोणीतरी प्रयत्न करतो आहे, असे मला वाटते.

अध्यक्ष : मी पुन्हा एकदा सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, बॅलटला कोणी काही करु शकते काय? नियमाप्रमाणे तारांकित प्रश्न बॅलटमार्फत स्वीकारले जातात.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महाराज, प्रश्नोत्तराच्या तासानंतर आपण हा विषय चर्चेला घेऊ. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. या सभागृहाचे कामकाज कसे चालते, याची त्यांना संपूर्ण माहिती आहे. हा माझ्यावर आरोप नसून आपल्यावर आरोप आहे. या सभागृहामध्ये प्रश्न येणे, प्रश्न स्वीकारणे, त्याचे बॅलट होणे हे सर्वस्वी माननीय अध्यक्षांच्या देखरेखेखाली होती. आपण इतके वर्षे असे करीत होता का? सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील साहेब आपण अध्यक्ष होता. यामध्ये काहीतरी मंत्र्यांचा "से" तरी आहे काय ? सर्व सन्माननीय सदस्य ज्यावेळी प्रश्न सादर करतात त्यावेळी त्यांचा गट क्रमांक टाकतात. त्या गटाप्रमाणे तुम्ही त्याची विभागवारी करतात. एखाद्याने गट क्रमांक टाकला नाही तरी आपण त्यांना गटामध्ये टाकतो. आलेल्या प्रश्नांची यादी तयार करून आपण त्या ठिकाणी बॅलट काढतो. मला असे वाटते की, कारण नसताना सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील सारख्या ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारचा आरोप करणे, हा विधानसभेवर आरोप आहे. माझ्यावर आरोप नाही. माझा काही संबंध नाही, हे मी स्पष्टपणे सांगतो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी विधानसभेच्या कामकाजावर आरोप करणे, खरोखर मला या गोष्टीचे दु:ख आहे. माझी सन्माननीय सस्यांना विनंती आहे की, आपण अशाप्रकारचा आरोप परत घेतला पाहिजे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, असा आरोप मी आपणावर केला नाही. हा आरोप कोणाला लागला, हे सहजच सभागृहाला समजले आहे. एवढे मनाला लावून घेण्याची आवश्यकता मुख्यमंत्री महोदयांना नाही. मुख्यमंत्री महोदयांनी प्रोसिजरचा चांगला अभ्यास केलेला आहे. मी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील...

आपल्यावर असा आरोप केलेला नाही. आपल्या भावना जागृत करून त्या माझ्या विरोधी घालण्याचे काम जर या सभागृहात कोणी करीत असेल तर अध्यक्ष महाराज, आपण मला संरक्षण द्यावे. आम्ही विचारलेल्या प्रश्नांची किमान.... मुख्यमंत्री महोदय फार लोकप्रिय असल्यामुळे लोक प्रश्न कमी विचारत असतील, असा कदाचित यातून अर्थ निघू शकतो. मला मुख्यमंत्री महोदयांबद्दल असे म्हणावयाचे नाही, पण संख्या कमी होत आहे. आम्ही विचारलेले अनेक प्रश्न आज का आले नाहीत, असे मला आपणाला विचारावयाचे नाही. आपला उपमर्द करण्याची माझी भूमिका कधीच नव्हती आणि मुख्यमंत्री महोदयांनी आपल्याबद्दल माझे असे मत करून देणे याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी मागे घ्यावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महाराज, आजच या सभागृहामध्ये आपल्यामार्फत याचा खुलासा झाला पाहिजे. माझे तर असे मत आहे की, याची चौकशी करा. हा खुलासा झाल्यानंतर तुमच्यावर या सभागृहाची क्षमा मागण्याची वेळ येईल. मला असे वाटते की, किमान या सभागृहाच्या प्रोसिजरवर या ठिकाणी अशा प्रकारे आक्षेप घेणे, हे अतिशय अयोग्य आहे. हे मला लागूच होत नाही. आपल्या अखत्यारित हे होते. जावेळेस असा आरोप लावला जातो की मुख्यमंत्र्यांनी आपल्यावर दबाव टाकला, हा अरोप माझ्यावर नसून आपल्यावर आहे, त्यामुळे याचे उत्तर आपणच दिले पाहिजे.

अध्यक्ष : मी चौकशी करून तसा निर्णय देतो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी आजच्या तारांकित प्रश्नांच्या संदर्भात आणि गेल्या काही दिवसातील तारांकित प्रश्नांच्या संदर्भात या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केल्या. मुख्यमंत्री महोदय बोलता बोलता त्यांनी थोडी गंमत केली असेल, काही चिमटे काढायचा प्रयत्न केला असेल तर तो विषय एवढा महत्वाचा ठरू नये, असे मला वाटते. सन्माननीय सदस्य ज्यावेळेला प्रश्न विधिमंडळाकडे देतात, तो सर्व अधिकार माननीय अध्यक्ष तसेच विधानमंडळ कार्यालयाचा असतो, हे त्यांना मान्य आहे. अध्यक्ष महाराज, आपले लक्ष वेधण्याचा सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचा प्रयत्न एवढाच होता की, काही दिवस प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये एका दिवशी 100 प्रश्न तर एका दिवशी 70

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील...

प्रश्न आले. गेल्या काही दिवसामध्ये दहा, पंधरा प्रश्न दिसत आहेत. आपण यासंदर्भातील सिस्टीम बदलली असेल तर ते सभागृहाला सांगावे. आमची भावना एवढीच आहे की, प्रश्न ॲडमिट झाल्यानंतर पहिल्या पाच, सहा प्रश्नावर चर्चा होते व त्यापुढील बाकीच्या प्रश्नांना लेखी स्वरुपात ज्यावेळेला उत्तरे मिळतात, त्याचा पाठपुरवा, त्या कामाची सोडवणुक करण्याच्या दृष्टीने होतो. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांची एवढीच भावना आहे. यापेक्षा वेगळी भावना नाही. तेही ज्येष्ठ सदस्य आहेत. आपणही ज्येष्ठ सदस्य आहात. आपणही माफी मागू नये आणि त्यांनीही माफी मागू नये. काहीच करायची गरज नाही. आमचे प्रश्न यादीत कसे येतील, एवढे आपण पहावे. आपण ही बाब आपण स्वत: समजून घेऊन सभागृहाला सांगितले तर बरे होईल.

अध्यक्ष : कोणाचेही प्रश्न जाणुनबुजून अस्विकृत केलेले नाहीत. जे प्रश्न बॅलटमार्फत स्वीकृत केले ते पुस्तकात छापून येतात. मी याची चौकशी करतो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, आपला गैरसमज झाला. आम्ही कोणीही असे म्हटलेले नाही की, आपण जाणीवपूर्वक अस्विकृत केलेले आहेत. स्वीकृत केलेल्या तारांकित प्रश्नाच्या बाबतीत चर्चा चालू आहे.

अध्यक्ष : प्रश्न तेवढेच असतील तर काय करणार, तरीही मी चौकशी करतो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, त्यापेक्षा जास्त प्रश्न असतील तर का आले नाही, एवढेच का आले?

अध्यक्ष : किती प्रश्न आले होते, किती बॅलटमध्ये आले, याची चौकशी करुन मी सभागृहाला यासंबंधीची माहिती अवगत करतो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, ॲडमिट झालेले प्रश्न आणि नाकारलेले प्रश्न कळविण्याची पध्दत आहे. आम्हा सन्माननीय सदस्यांचे कोठले प्रश्न स्वीकारले आणि कोठले नाकारले, याबाबत आम्हाला काहीच कळविले जात नाही. आपण पुन्हा ती पध्दत सुरु करावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर H-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : आपण आवश्यकता असेल तर त्याबाबतचे एस.एम.एस. करायला लावू. पेपरलेस पार्लमेंट सुरु झाल्यापासून बरीच कागदपत्रे कमी होत आहेत.

पॉईंट ऑफ प्रोसिजर

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. या सभागृहामध्ये मागच्या टर्ममध्ये तत्कालीन अध्यक्षांनी निर्देश दिले होते की, सभागृहात जे प्रश्न उपस्थित केले जातात, त्यावर सन्माननीय सदस्यांची स्वतःची स्वाक्षरी नसते. ही गोष्ट त्या काळात खरी होती आणि खरी आहे. त्यानंतर त्यावर थोडासा कंट्रोल करण्यात आला. ही बाब तपासण्यात आली, वेगळे फॉर्म छापण्यात आले, त्यावर सन्माननीय सदस्यांनी ॲडव्हान्समध्ये स्वाक्षरी करुन प्रश्न दिले तर ते येतात. आपण तपासून पहावे, आजही परिस्थिती अशी आहे की, लक्षवेधी सूचना, प्रश्न यांचे पेपर्स तपासले तर, त्यावर सन्माननीय सदस्यांच्या स्वतःच्या स्वाक्षऱ्या नसतात. तसे प्रश्न कृपया स्वीकारु नका. यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांवर अन्याय होतो. काही ठरावीक प्रश्न लागतात.

अध्यक्ष : मी याबाबतची चौकशी करुन सांगतो. आता सन्माननीय सदस्य ॲड. संजय धोटे यांनी प्रश्न विचारावेत.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय,

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य आपण खाली बसावे, यावर चर्चा कशी काय करता येईल, त्यांनी हेत्वारोप केलेला नाही. त्यांनी दिलेल्या स्पलिंगबाबत सांगितलेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./ मु.शी. : तोंडी उत्तरे

बल्लारपूर व राजूरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गोवरी व पवणी कोळसा खाणीत दारुगोळ्यांचा वापर करुन करण्यात येत असलेल्या स्फोटामुळे घरांना तडे गेल्याबाबत

(१) * ४६३८२ ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय खनिकर्म मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर व राजूरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील वे.को.ली. क्षेत्रांतर्गत येत असलेल्या गोवरी व पवनी कोळसा खाणीत नियमांपेक्षा जास्त प्रमाणात दारुगोळ्यांचा वापर स्फोट घडविण्यासाठी करण्यात येत असल्यामुळे या गावातील शिवाजी महाविद्यालयाच्या इमारतीला व अनेक घरांना स्फोटाच्या तीव्रतेमुळे तडे गेल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय काय आढळून आले व त्यानुषंगाने राजूरा तालुक्यातील गावांना स्फोटामुळे

झालेल्या नुकसानाची भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

ॲड. संजय धोटे : अध्यक्ष महोदय, राजुरा विभागातील गोवरी भागात कोळसा खाणीद्वारे होणाऱ्या स्फोटामुळे गावकऱ्यांच्या घरांना, तसेच तेथील शाळांना भेगा जात आहेत, तसेच लोकांच्या जीवितास हानी पोहोचत आहे. बारुदाद्वारे स्फोट करताना ते प्रमाणाच्या बाहेर बारुद वापरतात. अशाप्रकारे डब्ल्युसीएल कोळसा खाणीने निकषाच्या बाहेर जाऊन बारुद वापरल्याने तेथील लोकांच्या घरांना भेगा जात आहेत तसेच, लोकांच्या जीवितास हानी पोहोचत आहे. या संदर्भात मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराने मी समाधानी नाही. मंत्री महोदयांनी या संदर्भात मला पूर्वी एक उत्तर दिलेले आहे. एसडीओ आणि जिल्हाधिकारी यांनी दिलेला रिपोर्ट व डब्ल्युसीएल कोळसा खाणीने दिलेला रिपोर्ट यामध्ये तफावत आहे. एसडीओ आणि जिल्हाधिकारी यांच्याकडून आलेली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 46382 ...

ॲड संजय धोटे ....

माहिती आणि कोळसा खाणीद्वारे आलेली माहिती यामध्ये तफावत आहे काय ? मंत्री महोदय या संदर्भात स्थानिक सरपंच, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि कोळसा खाणीचे अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्यामार्फत फेरचौकशीची एखादी बैठक घेणार काय ?

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, या साक्री, गोवरी परिसराबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडून आलेल्या अहवालामध्ये मौजा पवनी येथील कराना व गोवारी येथील शिवाजी महाविद्यालयाच्या भिंतीला कोलफिल्डच्या खाणीतील काही स्फोटामुळे नुकसान झाले आहे असे नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. कारण ही मायनिंग आणि शाळा व घरे 1200 मीटरच्या अंतरावर आहेत. खाणीपासून 2 कि.मी. दूर आहेत. खनिज विभाग व जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालामध्ये फरक असेल तर, माननीय आमदार व स्थानिक सर्व अधिकाऱ्यांबरोबर मी माझ्या चेंबरमध्ये या अधिवेशनच्या काळातच बैठक घेईन आणि याची पूर्ण चौकशी करुन यासंबंधात समाधान करीन.

श्री. हरिष पिंपळे : अध्यक्ष महोदय, या खाणींमध्ये स्फोटकांचा सर्रास वापर करुनच कोळसा काढला जातो. याबाबत प्रश्न विचारला असता मंत्री महोदयांनी हे खरे नाही असे उत्तर दिलेले आहे. एखाद्या भागातील लोकप्रतिनिधी प्रश्न मांडत असेल, त्याबाबतची सत्यता सांगत असेल तर ते सत्य गृहीत धरुन त्याबाबतची चौकशी केली गेली पाहिजे. आता मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले आहे की, मी चौकशी लावीन. सन्माननीय सदस्यांनी अहवालाबाबतचा जो प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, एसडीओ कलेक्टरच्या अहवालाविरोधात अहवाल देऊ शकत नाहीत. याकरिता या संपूर्ण प्रकरणाची चौकशी एका निवृत्त न्यायाधिशांमार्फत करुन किंवा पोलीस खात्यामार्फत करुन या प्रश्नाला न्याय दिला जाईल काय ? हा जो कोळसा उचलला जातो, त्याचे मोजमाप करण्यासाठी कोणती यंत्रणा आहे, याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे, अशी माझी विनंती आहे.

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना मी माझ्या उत्तरात आधीच सांगितले आहे की, सभागृहात सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या विषयाला गृहीत धरुनच आपण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 46382 ...

श्री. प्रकाश महेता.....

त्यासंबधी बैठक लावणार आहोत. आपण चौकशीचे आदेश दिलेले नाहीत. परंतु, त्यांनी आता न्यायाधिशामार्फत चौकशी करणार का, असे विचारलेले आहे. याबाबतीत विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांबरोबर एकदा बैठक झाल्यानंतर आवश्यकता भासली तर आपण पोलीस विभागालासुध्दा त्या बैठकीस निमंत्रित करुन त्यांच्याकडूनही अहवाल घेऊ. यामध्ये खाणीच्या किंवा अधिकाऱ्यांच्या माध्यमातून काही खोटे उत्तर दिले गेले असेल तर, त्याबाबतीत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. विजय औटी : अध्यक्ष महोदय, या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये पहिल्या प्रश्नामध्ये मंत्री महोदयांनी सरळसरळ असे नमूद केले आहे की, 'हे खरे नाही.' प्रश्न असा आहे की, हे खरे नाही असे उत्तर एकदा दिल्यानंतर आता सन्माननीय सदस्य सांगत आहेत म्हणून हे खरे आहे, या गृहितावर आधारित चौकशीचेही आश्वासन मंत्री महोदयांनी दिलेले आहे. या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये व मंत्री महोदय सभागृहात देत असलेल्या उत्तरामध्ये थोडी विसंगती आहे, ती मंत्री महोदय दूर करतील काय ?

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, तारांकित प्रश्न उपस्थित केल्यानंतर शासनाकडे जो अहवाल येतो, त्याप्रमाणे उत्तर दिले जाते. परंतु, या सभागृहाची अशी प्रथा व परंपरा आहे की, सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, माझे या उत्तराने समाधान झालेले नाही तर, सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी समजून आपण त्यासंबंधी पुढची चौकशी करुन त्याची दखल घेत असतो, त्यासंबधी मी सांगितलेले आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, वेस्टर्न कोल फिल्ड ही केंद्र सरकारची संस्था आहे. या खाणीमध्ये काम करताना बऱ्याच मोठ्या प्रमाणात दारुगोळ्याचा वापर होतो त्यामुळे तेथील घरांना तडे जातात. मंत्री महोदयांनी आता बैठक घेण्याचे व चौकशी करण्याचे मान्य केलेले आहे. परंतु, याबाबत धोरणात्मक निर्णय केला पाहिजे. कारण एक तर या केंद्र सरकारच्या संस्थांकडे दाद मागता येत नाही. आज सुदैवाने याबाबतचा प्रश्न सभागृहात विचारण्यात आल्याने किमान आपण मान्य केले आहे. मला असे वाटते की, याबाबतीत काही मार्गदर्शक तत्वे तयार केली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 46382 ...

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

पाहिजेत. तेथील लोक घराच्या नुकसानीची भरपाई मागतात, परंतु ती मिळत नाही. प्रदुषणामुळे त्या परिसरातील लोकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. त्यांना आरोग्याच्या सुविधा पुरविताना त्यांचा खर्च कोण करणार हे निश्चित नाही. त्यांना आरोग्यसेवा पुरविण्यास येणारा खर्च कोण करणार, तसेच घरांच्या दुरुस्तीचा खर्च कोण करणार आहे, याबाबतीत निश्चित धोरण असले पाहिजे. चंद्रपूर जिल्ह्यातील विशेषत: वेस्टर्न कोलफिल्डच्या बाबतीत अनेकवेळा चर्चा झालेली आहे. राज्य सरकारचे त्यावर किती नियंत्रण आहे हे माहीत नाही. मंत्री महोदय म्हणाले आहेत की, याबाबतीत बैठक घेऊ. परंतु, आपल्याला याबाबतीत निश्चितपणे काही प्रोटोकॉल तयार करावा लागेल. त्याबाबतीत आपण काही धोरणात्मक निर्णय करणार काय ?

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, ज्या घर व शाळांचे नुकसान झाले आहे ते या स्फोटामुळे झाले असल्याचा निष्कर्ष आला तर आणि तसही खाणीपासून 2 कि.मी. अंतरावर जे काही असेल त्याचे रिपेअर त्या विभागाच्या खनिज निधीतून करण्याबाबत नॉर्म्समध्ये ... आपण माझे म्हणणे ऐकावे, या स्फोटामुळे जर घरांचे आणि शाळांचे नुकसान झाले असेल तर त्याची डागडुजी, रिपेअर कोण करणार असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. आपल्या खनिज निधीतून आपण ते काम करु

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (बसून) : याबाबतीत वेस्टर्न कोलफिल्डची काही जबाबदारी नाही काय ?

श्री. प्रकाश महेता : ती जबाबदारी केव्हा सिध्द होईल तर, आता आपण एक बैठक घेणार आहोत. त्या बैठकीस पोलीस, खनिज अधिकारी, जिल्हाधिकारी यांना बोलावून आपण त्याची चौकशी करु स्थळाची पाहणी करु , त्या आधारावर आपण ठरवणार. आज सभागृहाच्या समोर जो प्रश्न आहे, त्या प्रश्नामध्ये शासनाचे उत्तर व तेथील अधिकाऱ्यांचा फिडबॅक आहे. परंतु, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले आहे ते आपण गृहीत धरुन पुढची कारवाई करणार आहोत आणि त्यांची जबाबदारी असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

माहिमच्या (मुंबई) शीतलादेवी येथील बेस्टच्या विद्युत संग्रही केंद्राकरीता राखीव असलेल्या भूखंडाबाबत

(2) * 44087 श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) माहिमच्या (मुंबई) कॅप्टन प्रकाश कोटणीस मार्ग जंक्शन अर्थात शीतलादेवी येथील बेस्टच्या विद्युत संग्रही केंद्राकरीता राखीव असलेला बेस्ट मालकीचा भूखंड क्र. 16 बी (600 चौ.मीटर) येथील जागेवर खाजगी विकासकाने एसआरए प्रकल्प उभारुन बेस्टची फसवणूक केल्याची घटना माहे डिसेंबर, 2015 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, खाजगी विकासकाने नऊ वर्षाचा कालावधी उलटूनही बेस्टला जमीन हस्तांतरीत केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(4) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने दोषी विरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची ीकारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (1) हे खरे नाही.
जी/उत्तर विभाग माहिम येथील बृहन्मुबई महानगरपालिकेच्या मालकीच्या । अंतिम भूखंड क्र. 95 (भाग,)ग 96 अ (भाग), 96(ब) व 97 नगर रचना योजना-II या 5528.77 चौ.मी. भूखंडावर श्री. गणसिध्दीविनायक सह.गृह. संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना मेसर्स, घरंदाज बिल्डर्सस या विकासकामार्फत राबविण्यात येत आहे. मंजूर विकास नियोजन आराखड्यानुसार सदरहू योजनेत समाविष्ट भूखंडावर Fire Brigadeu Stationu वव BEST Receivingu Station चे बांधकाम सापेक्ष आरक्षण अंतर्भूत आहे. तथापि, सदरचे` बांधकाम अद्याप विकासकाने केलेले नाही.
(2) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली 1991 मधील तरतुदीनुसार उपरोक्त आरक्षणापोटी Fire BrigadeuStation साठी 829.32 चौ.मी व BEST ReceivinguStation साठी 352.73 चौ.मी. इतक्या बांधकाम क्षेत्राच्या इमारतींची तरतूद अभिन्यासात करण्यात आलेली आहे. तथापि सदर इमारती विकासकाने अद्याप बांधलेल्या नाहीत.
(3) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या विकासकाने योजनेत केलेल्या विनापरवाना बांधकामाच्या अनुषंगाने तसेच योजनेतील PAP परस्पर विकल्याचे आढळून आल्याने विकासकावर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, 1966 मधील तरतूदीनुसार माहिम पोलिस ठाणे येथे अनुक्रमे एफ.आय.आर क्रमांकक 41/2009 व 450/2015 नोंदविण्यात आले आहेत. पहिल्या एफ.आय.आर. संदर्भात प्रकरण 41-महानगर दंडाधिकारी न्यायालय येथे सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे. दुसऱ्या प्रकरणाबाबत पोलिसांकडून कार्यवाही सुरु आहे.
(4) व (5) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या विकासकाने केलेल्या ।उपरोक्ततअनियमिततेच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसननप्राधिकरण यांचेकडे दि. 23/2/2016 रोजी सुनावणी घेऊन विकासक मेसर्स, घरंदाज बिल्डर्स यांची नेमणूक रद्द केली आहे. संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेस नवीन विकासक नेमण्याची परवानगी देण्यात आली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44087.....

श्री. संजय पोतनीस : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर आणि सत्य परिस्थितीमध्ये फरक आहे. बेस्टचा प्लॉट महानगरपालिकेच्या मालकीचा असल्याचे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. परंतु महानगरपालिकेकडून बेस्टने 1984 साली प्लॉटचा ताबा घेतला होता व तेथे 1989 रोजी संग्रही केंद्र आणि कामगारांसाठी घरे बांधण्यात आलेली आहे. उर्वरित भूखंडावर 2003 साली प्रोजेक्ट राबविण्यासाठी एसआरएने एनओसी दिलेली आहे. परंतु या जागेचा मालक आणि ज्यांचे रिझर्व्हेशन आहे, त्यांच्या एनओसीशिवाय हा प्रस्ताव 2003 साली कसा मंजूर करण्यात आला. म्हणजेच बेस्टने 2006 साली एनओसी दिलेली आहे. परंतु प्रस्ताव 2003 साली मंजूर झालेला आहे. माझा असा प्रश्न आहे की, एसआरएच्या प्रोजेक्टमध्ये मालक किंवा आरक्षण असलेल्यांच्या एनओसीची आवश्यकता आहे किंवा कसे, एनओसी लागत असेल तर एनओसीशिवाय 2003 साली मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली जाणार आहे, असा माझा पहीला प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, 2016 साली म्हणजेच 23 तारखेला या विकासकाची नेमणूक रद्द करण्यात आलेली आहे. परंतु 2 फेब्रुवारी रोजी एसआरएने त्या ठिकाणी विकासकाबरोबर व्हिजीट केली. तेव्हा बेस्टचे चेअरमन व जीएम देखील होते. त्यावेळी तेथे विकासक 15 दिवस होता. परंतु या 15 दिवसामध्ये विकासकाची बदली का करण्यात आली, त्याला मोकळे सोडण्याचे कारण काय आहे. या विकासकाला काळ्या यादीत टाकण्यात येणार आहे काय, असा माझा दुसरा प्रश्न आहे.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय पोतनीस यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो. जी/उत्तर विभाग माहिम येथील भूखंड क्र. 95, 96-अ, 96-ब, व 97 ही योजना होती. त्यावेळी श्री. गणसिद्धीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत विकासक मे. घरंदाज बिल्डर्स व वास्तुविशारद के. आर. रेगे यांनी हे प्रपोजल टाकले होते. त्या ठिकाणची जागा जवळजवळ 5528.87 चौरसी फुटाची होती. या जागेवर त्याने एसआरएचे प्रपोजल टाकले होते. ॲनेकश्चर-II झाले होते. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला त्यामध्ये फायर ब्रिगेडचे स्टेशन व बेस्टचे रिसिव्हींग स्टेशनचे होते. जे प्रपोजल एसआरकडे आले, कारण ती झोपडपट्टी झाली होती. म्हणून ते एसआरएच्या माध्यमातून पास केले गेले होते. त्यांनी केलेल्या व्हायलेशनबद्दल त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात आलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44087.....

श्री. अतूल भातखळकर : अध्यक्ष महोदय, प्रश्नाच्या उत्तरात म्हटलेले आहे की, 450/2015 असा एक एफआयआर नोंदविलेला आहे. या दुसऱ्या एफआयआरच्या संदर्भात पोलिसांकडून कार्यवाही चालू आहे. याचे कुठलेही स्पष्टीकरण नाही. हा एफआयआर 2015 मधील असून आता 2016 मधील एप्रिल महिना चालू आहे. अद्यापपर्यंत पोलिसांनी या विकासकाच्या विरोधात कुठली ठोस कारवाई केली, याची माहिती मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे. तसेच वारंवार एसआरएच्या संदर्भात आढळून येते की, विकासक चुकीची कामे करतो, त्याला रिहॅबच्या कामानंतर सेल बांधण्याची परमीशन तातडीने दिली जाते. तो सेलबांधून व विकून मोकळा होतो, रिहॅबचे काम अर्धवट असते, तेथील आरक्षणाचे काम अर्धवट रहाते आणि विकासक पूर्णपणे मोकळा होतो. त्यामुळे यासंदर्भातील नियमात बदल करुन यासंदर्भात विकासकांवर बंधन घालणार आहात काय असा माझा दुसरा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदार संघातील बानडोंगरी एसआरएमध्ये अशाच प्रकारचे प्रकरण घडले असून यासंदर्भात मंत्री महोदयांच्या दालनात बैठक बोलवून यासंदर्भातील चौकशी केली जाणार आहे काय, असे माझे आपल्या मार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अतूल भातखळकर यांच्या मतदार संघातील बानडोगरी एसआरएसंर्भातील बैठक माझ्या दालनामध्ये घेण्यात येईल. तसेच पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या एफआयआरसंदर्भातील त्यांनी दुसरा प्रश्न विचारला. याप्रकरणामध्ये व्हायलेशन झालेले आहे. त्या विकासकाने प्रपोजल टाकल्यानंतर रिहॅबचे बांधकाम दोन बिल्डींग्समध्ये केले होते. त्या ठिकाणी पीएपी देखील होत्या. पीएपी दिल्यानंतर त्याला दहाव्या मजल्यापासून, अकराव्या मजल्यापासून चौदाव्या मजल्यापर्यंत बांधकाम करण्यास मिळणार होते. परंतु त्याने पीएपी न देता तसेच बांधकाम केले, त्यामुळे व्हायलेशन झाले आणि त्यामुळे त्याच्यावर पहिला एफआयआर दाखल करण्यात आला आहे. पहिला एफआयआर 14/2009 हा होता व दुसरा एफआयआर माहिम पोलीस स्टेशमध्ये दिनांक 08.12.2015 रोजी दाखल केलेला आहे. पहिल्या एफआयआरच्या माध्यमातून त्यांना अटक देखील करण्यात आली होती. दुसऱ्या एफआरआयच्या माध्यमातून त्यांनी अटकपूर्व जामीन घेतलेला आहे. यासंदर्भात शासनाच्या माध्यमातून दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, बेस्टच्या अशा किती भूखंडाचा गैरवापर करण्यात आलेला आहे आणि बेस्टच्या किती भूखंडांवर अतिक्रमण करण्यात आले आहे. यासंदर्भातील अनियमिततेबाबत बेस्टच्या कोणत्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आली, असा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच माझा दुसरा प्रश्न आहे की, यासंदर्भात पॉलिसी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आपण सांगत आहात की, यामध्ये व्हायलेशन झालेले आहे. त्याच्यावर कारवाई झाली, एफआयआर दाखल केलेला आहे, त्याने अटकपूर्व जामीन घेतलेला आहे. परंतु मुंबईमधील सर्वच सोसायट्यांमध्ये अशा प्रकारचे प्रकार कमी, जास्त प्रमाणात आढळतात. त्यामुळे भविष्यामध्ये असे प्रकार घडू नये, याकरिता आपण कोणता पॉलिसी निर्णय घेणार आहात किंवा कोणती काळजी घेणार आहात, असा माझा आपल्या मार्फत मंत्री महोदयांना दुसरा प्रश्न आहे.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी उचित प्रश्न विचारलेला आहे. बेस्ट रिझर्व्हेशन सेंटरकरिता 350.73 चौ.मी.चा प्लॉट त्याने कन्स्ट्रक्ट करुन द्यायचा होता. तेथे प्लॉट ओपनच आहे. बेस्टच्या माध्यमातून अशा पद्धतीची मागणी देखील संबंधित खात्याकडे आली होती आणि त्यासंदर्भात बेस्टने कोणतीही हयगय केली नाही. त्यांना त्यांचा प्लॉट आहे. जे विकासक अशा पद्धतीने कुठलाही एसआरए पूर्ण करीत नाही, एसआरए पूर्ण न करता सेलचे बांधकाम करतात. त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली पाहीजे. यामध्ये रिहॅब आणि सेल याच्या क्वॉलिटीसंदर्भात मागे प्रश्न आला होता. याची क्वॉलिटीदेखील चांगली झाली पाहीजे. परंतु याठिकाणी त्या विकासकाने पीएपी विकलेले आहेत. व्हायलेशन केलेले आहे. आता पीएपीच्या बाबतीत काय करायचे हा देखील प्रश्न आहे. त्यानी बँक गॅरंटी ठेवलेली असून ती शासन आपल्या हातामध्ये घेईल. तसेच बेस्टचा प्लॉट हा बेस्टने किंवा फायर ब्रिगेडने ते बांधल्यास त्या बँक गॅरंटीच्या माध्यमातून तो पैसा तिकडे रिइम्बर्स करण्यात येईल, त्यांना तो पैसा देण्यात येईल. या विकासकाला ब्लॅक लिस्टेड करण्यात येईल. त्याचे मुंबई शहरामध्ये कोणतेही बांधकाम असेल, तर ते यापुढे करता येणार नाही, अशी खबरदारी शासनाच्या माध्यमातून घेण्यात येईल.

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय पोतनीस यांनी स्पेसीफीक प्रश्न विचारला होता. ज्या अधिकाऱ्याने चूक केलेली आहे, त्याला बिलकूल संरक्षण न देण्याच्या भूमिकेवर ठाम रहाण्याची गरज आहे. हा सर्व विषय पाहिल्यास 2003 मध्ये ही स्कीम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44087.....

ॲड. आशिष शेलार.....

सादर केली. सदरहू भूखंडाची मालकी असलेल्या बेस्टची एनओसी घेतली नाही. 2003 ला स्कीम सादर झाली व बेस्टने 2006 मध्ये एनओसी दिली. 2004 मध्ये बेस्टने सांगितले की, आपण आमची एनओसी घेतली नाही. तरी त्या अधिकाऱ्याने काहीच केले नाही. तसेच हा भूखंड पहाता तो अंतिम भूखंड क्रमांक आहे. याचाच अर्थ ही टाऊन प्लॅनिंग स्कीम आहे. टाऊन प्लॅनिंग स्कीमच्या फायनल प्लॉटमधील रिझर्व्हेशनचे रिलोकेशन हा चौथा गुन्हा करण्यात आला. पाचवी बाब अशी आहे की, स्वतः असिस्टंट इंजिनिअरने सतत, जेथे बिल्डींगचे काम चालू असते तेथे व्हिजीट करणे अभिप्रेत आहे. पीएपी बांधल्या, त्याचे व्हायलेशन झाले, त्या विकल्या, रेकॉर्डवर काही नाही. म्हणजेच रिझर्व्हेशनमध्ये घोळ, पीएपी विकण्यामध्ये घोळ, एनओसी घेतली नाही त्यामध्ये घोळ, तीन वर्षे दखल न दिल्यामुळे त्यात घोळ करण्यात आला. बिल्डरवर कारवाई केली, ही बाब चांगली आहे. परंतु ज्या अधिकाऱ्यांनी एवढा घोळ केला, त्याची चौकशी करणार आहात काय, असा माझा आपल्या मार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे. त्या अधिकाऱ्याची चौकशी केलीच पाहीजे, अशी आमची मागणी आहे.

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी केली जाईल.

...J/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, ज्या योजना टेंडर प्रक्रियेपर्यंत आल्या परंतु त्यावर निधी खर्च झाला नाही, अशा योजनांचा समावेश आपण मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेत टप्प्याटप्प्याने का होईना कराल का ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, ज्या पाणी पुरवठा योजनेवर केंद्र सरकार व राज्य सरकार मॅचिंग ग्रँट करुन खर्च झालेला आहे त्याच योजना पूर्ण करण्यात येतील. नवीन योजना रद्द करण्यात आल्या नसून त्यांना तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. सदरहू प्रकरणी केंद्र शासनाला राज्य शासनाच्यावतीने पुन्हा एकदा विनंती करण्यात येईल व नवीन योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

श्री.चंद्रदीप नरके : अध्यक्ष महोदय, ज्या योजनांचे टी.एस. झाले त्यांची वर्क ऑर्डर झाली परंतु काम चालू झालेले नाही अशा सर्व योजना थांबविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. टी.एस. व वर्क ऑर्डर झालेल्या योजना सुरु करण्यासाठी अर्थसंकल्पातून निधी उपलब्ध करुन देऊन त्यांची कामे सुरु करण्यात येतील काय ?

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांच्या सूचनांचा विचार करु एवढे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री.बबनराव लोणीकरण : अध्यक्ष महोदय, मी अगोदर सांगितले की, मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठा योजनांना मान्यता देण्यात आली होती. ज्या योजना अपूर्ण आहेत त्या पूर्ण करण्यात येतील व ज्या योजनांचे टेंडर पूर्ण झालेले आहे, वर्क ऑर्डर झालेली आहे त्या केंद्र शासनाने थांबविलेल्या आहेत. राज्य सरकारच्यावतीने केंद्र शासनाला विनंती करुन निधी उपलब्ध करण्यासंदर्भात पुन्हा एकदा विनंती करण्यात येईल.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, सभागृहातील आमदारांची एकच इच्छा असते. सातरा जिल्ह्यातील 134 कोटी रुपयांचे प्रस्ताव मंत्री महोदयांकडे सादर करण्यात आले आहेत, ही बाब मी उदाहरणार्थ सांगत आहे. अशा प्रकारे प्रत्येक जिल्ह्यातून प्रस्ताव सादर करण्यात आले असतील. राज्य शासनाला केंद्र शासनाने सदरहू योजनेकरिता निधी देण्याकरिता नकार देऊन दीड वर्षाचा कालावधी झालेला आहे. मागील दीड वर्षामध्ये आमदार महोदयांनी शिफरस केलेली एकही नवीन योजना आली नाही. यावर्षी प्रथमच मुख्यमंत्री पेयजल योजनेच्या माध्यमातून प्रथमच निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे तो 500 कोटी रुपये एवढा असून तो कमी प्रमाणात आहे. मागच्या अपूर्ण कामे व सदरहू योजनेकरिता करण्यात आलेली तरतूद अतिशय अल्प असल्याने कामे पूर्ण करणे ही कसोटी आहे. केंद्र शासनाकडून ग्रामीण पाणी पुरवठा योजनेकरिता मागील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दीड वर्षापासून निधी उपलब्ध करुन देण्यात येत नाही. मंत्री महोदयांनी सांगितलेल्या चुकीच्या माहितीची नोंद होऊ नये, याकारणास्तव मी ही बाब सांगत आहे. मागील योजना पूर्ण करणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे व नवीन योजनांसाठी किती तरतूद करणार हे सरकारने सांगण्याची आवश्यकता आहे. मागील दीड वर्षात एकही योजना मंजूर करण्यात आली नाही. पुढील वर्षात 5-50 योजना मंजूर होती इतर एकही योजना मंजूर होणार नाही.

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने नवीन योजना हाती घेऊ नये अशा प्रकारचे आदेश दिले असून राज्य सरकारची स्वतंत्र योजना नाही. यावर्षी मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना सुरु करण्यात आली असून त्याकरिता 500 कोटी रुपये निधी दिला आहे. या योजनेकरिता मुख्यमंत्री महोदय व अर्थ मंत्री महोदयांनी पुरवणी बजेटमध्ये निधी देण्याचे मान्य केले आहे. सदरहू योजनेस आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

अध्यक्ष : या योजनेकरिता केंद्र शासनाने निधी बंद केले असले तरी राज्यातील नळ पाणी पुरवठा योजना सरकारला कराव्या लागतील. निधीच्या उपलब्धेनुसार त्या योजना पूर्ण कराव्या लागतील. मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजनेमध्ये अशा प्रकरच्या योजनांचा समावेश करुन त्या पूर्ण कराव्या लागतील.

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, राज्यातील जिल्हा परिषदांनी जो आराखडा तयार केला आहे त्यांचा समावेश मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजनेमध्ये करण्यात आला आहे. याप्रकरणी ज्या सन्माननीय आमदारांनी पत्र दिले आहे त्यासर्व योजनांचा समावेश सदरहू योजनेत करण्यात आला आहे.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.सत्यजित पाटील यांना सांगू इच्छितो की, मंत्री महोदयांनी सर्व योजना घेण्याचे मान्य केले आहे.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : आता मी सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक आर-1, आर-2, आर-3, आर-4, वाय-2, वाय-3, वाय-4, वाय-5, वाय-6, वाय-7 आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : आता विधेयके घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपण आज एक बिल घेण्याचे मान्य केले आहे.

श्री.जयंत पाटील : सन्माननीय सदस्यांचा माझ्यावर दबाव आहे की त्यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा कधी घेण्यात येईल ?

अध्यक्ष : शासकीय विधेयकावरील चर्चा आपण लवकर पूर्ण केली तर आपण अर्धा-तास चर्चा घेऊ.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सदरहू शासकीय विधेयक फार महत्वाचे असून त्यावरील चर्चा किती तरी तास चालले. आता सव्वा आठ वाजे आहेत.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी कृपया शासकीय विधेयकास सुरुवात करावी. मागील दोन आठवड्यामध्ये एकही बिल काढले नाही, ही चांगली बाब नाही. या आठवड्यामध्ये आपण किमान बिलासाठी सरुवात तरी करु, असे मला वाटते. शासकीय बिलावर थोडा वेळ चर्चा नंतर अर्धा-तास चर्चेबाबत विचार करु.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहाचा आजच्या कामकाज पत्रिकेवरील क्रम कशा पध्दतीने आहे ?

अध्यक्ष : सभागृहाचे कामकाज हे कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या क्रमानुसार सुरु आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे कामकाज हे कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या क्रमानुसार सुरु आहे, हे बरोबर आहे. परंतु आता एक बिल काढण्यात येणार की दोन बिले काढण्यात येणार आहेत काय, अर्धा-तास चर्चा घेण्यात येणार आहे काय, मराठवाड्यातील प्रश्नावर चर्चा घेण्यात येणार आहे काय ?

अध्यक्ष : सभागृहाचे मत विचारात घेऊन पुढील कामकाज घेण्यात येईल.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझी अशी विनंती आहे की, सर्व सन्माननीय सदस्यांना सकाळी 9 वाजता सभागृहामध्ये यावे लागते. आता रात्रीचे साडे आठ वाजत आले आहेत. विधेयकावरील चर्चा लवकर संपेल असे हे विधेयक नाही. कामकाज पत्रिकेवर खूप कार्यक्रम दाखविण्यात आला आहे. आज घेण्यात येणाऱ्या कामकाजच्या वेळेबाबतचा अंदाज सन्माननीय सदस्य व माननीय मंत्री यांना असला पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : माननीय मंत्री यांना कामाचा अंदाज आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, तो आम्हाला सांगावा.

अध्यक्ष : कामकाज पत्रिकेवर कार्यक्रम छापलेला असल्याने सभागृहात घ्यावयाचे कामकाज सन्माननीय सदस्यांना समजते.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, कामकाज पत्रिकेवरील सर्व कामकाज आज घ्यावयाचे आहे काय ?

अध्यक्ष : पुढील कामकाजाबाबत तासाभरानंतर निर्णय घेऊ त्याकरिता जास्त वेळ लागणार असेल तर कामकाज थांबविण्यात येईल. परंतु सुरुवातच करावयाची नाही, असे होणार नाही. आपण बिलावरील चर्चा सुरु करावी, असे मला वाटते.

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, कामकाज पत्रिकेमध्ये 5 अर्धा-तास चर्चा दर्शविण्यात आला आहे व त्यावर 15 मिनिटे याप्रमाणे चर्चा घेतली तर त्या कामकाजास एक ते दीड तास कालावधी लागेल.

अध्यक्ष : आपण विधेयकावरील चर्चेस सुरुवात करु व आवश्यक वाटले तर अर्धा-तास चर्चा पुढे ढकलल्या तरी हरकत नाही. परंतु आता आपण विधेयकावरील चर्चेस सुरुवात करु. सन्माननीय सदस्यांनी बिलावरील चर्चेस सुरुवात करावी. मंत्री महोदयांनी बिल मांडावे.

श्री.धैर्यशील पाटील : अध्यक्ष महोदय, आज सकाळी 10 वाजता सर्व सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये आले आहेत. उद्या 9 किंवा 10 वाजता अध्यक्ष महोदय सांगतील त्यानुसार सभागृहात उपस्थित रहावयाचे आहे. आठ तास कामकाजाच्या वेळेत जेवणाची सुट्टी व विश्रांतीची सुट्टी अधिकाऱ्यांना असते. आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविलेले कामकाज करावयाचे असेल... आता जरी आपण सभागृहाची बैठक समाप्त केली तरी सभागृहाचे कामकाज आज 11 तास चालले आहे. मला असे वाटते की आम्हालाही प्रामाणिकपणे काम करावयाचे असते, आमच्या भूमिका मांडावयाच्या असतात.

.....ll-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.49344.....

ॲड. आशिष शेलार.....

कारण जनता आरक्षणावाचून राहिली, पण याला ओ.सी. मिळाली आहे. याचे फाईव्ह स्ट्रार हॉटेल सुरू झाले. नवीन डी.पी.मध्ये येईल तेव्हा येईल, पण चौकशीची भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली, त्या सेंट रेजिस हॉटेलच्या ओ.सी.ची चौकशी आणि ओ.सी.वर आपण कार्यवाही करणार आहात काय? सरकारची त्यासंबंधी सकारात्मक भूमिका राहणार आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी जी मागणी केली आहे, त्याची जरुर तपासणी केली जाईल आणि जो मुद्दा त्यांनी मांडला आहे की, अशा प्रकारे आरक्षणे समर्पित न करता मान्यता का देण्यात आली आहे हे तपासून पाहण्यात येईल आणि अशा प्रकारच्या काही तरतूदी असतील तर त्याही बदलण्यात येतील. कारण आपण एकदा बांधकामे मंजूर करुन टाकली तर आरक्षणे समर्पित करण्यासाठी त्यांच्याकडे काही इन्सेन्टिव्ह राहत नाही किंवा काही शास्ती राहत नाही. म्हणून या संपूर्ण प्रक्रियेचे पुनर्विलोकन केले जाईल आणि ते पुनर्विलोकन केल्यानंतर आरक्षणे समर्पित झाली पाहिजेत किंवा त्याबद्दलची शाश्वती तयार झाली पाहिजे अशा प्रकारच्या तरतूदी करण्यात येईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, या भूखंडाच्या बाबतीत विशेष करुन बंद पडलेल्या गिरण्यांच्या बाबतीत विकासक आणि महापालिकेच्या स्तरावर संगनमताने त्याचे एकत्रिकरण करायचे आणि त्या भूखंडाचे श्रीखंड खायचे अशा प्रकारची प्रक्रिया सुरू आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी चौकशी करण्याचे मान्य केले आहे. आपल्याला कल्पना आहे की, गिरणी कामगारांची किती हलाखीची स्थिती आहे. ते मोर्चे काढतात, हक्काची घरे मिळावीत म्हणून वणवण फिरतात. किती किंमत ठरवायची ही प्रक्रिया सुरू आहे. दुसऱ्या बाजूला मिल मालकांनी जी लूट केलेली आहे. त्या भागातून जाताना मला व्यक्तिशः इतक्या वेदना होतात की, ते चित्र पाहिल्यानंतर हे सर्व ऐश्वर्य एका बाजूला आहे आणि दुसऱ्या बाजूला ज्यांच्या जीवावर आपले हे ऐश्वर्य उभे राहिले आहे, त्यांची अवस्था काय आहे. मला असे वाटते की, या संपूर्ण प्रकारामध्ये अतिशय उच्चस्तरीय चौकशी होण्याची गरज आहे. आपण वन थर्ड, वन थर्ड केले आहे. यामध्ये विकासकाचे भले झाले. पण गिरणी कामगार अजूनही त्या दहा बाय दहाच्या बंद खोलीमध्येच राहत आहे. विधानसभेचे माजी अध्यक्ष कै. दत्ताजी नलावडे यांनी संपूर्ण आयुष्य गिरणी कामगारांसाठी लढा दिला आणि

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.49344.....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

त्यांचे जीवन गिरणी कामगारांसाठी समर्पित केले होते. या विषयामध्ये सातत्याने चर्चा होत आहे. पण गिरणी कामगाराच्या बाबतीत ही प्रक्रिया पूर्ण होत असताना त्यांना यामध्ये ताबडतोब प्राधान्य देताना विकासकाकडून भूखंड हस्तांतरीत करुन कामगारांची घरे बांधण्याची योजना आपण ताबडतोब सुरू करणार आहात काय ? या संपूर्ण प्रक्रियेमध्ये ज्यांनी ज्यांनी भूखंडाचे श्रीखंड घेतले आहे, मग त्यात नुसता विकासकच नव्हता तर महापालिकेचे अधिकारी सुध्दा होते. म्हणून आपण या संपूर्ण प्रकरणाच्या बाबतीत एखादी एस.आय.टी नेमून चौकशी करणार आहात काय ? यासंबंधी शासन काही निर्णय घेईल काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी जो मुद्दा निदर्शनास आणला, ती वस्तुस्थिती आहे. हा डीसीआर आपण 58 अमेंड केल्यामुळे जास्तीचे क्षेत्र म्हाडाला आणि त्या माध्यमातून गिरणी कामगारांना मिळाले असते किंवा अमेनिटीजकरिता आणि वेगवेगळ्या आरक्षणाच्या माध्यमातून मुंबई शहराला मिळाले असते. त्यातला मोठा भाग हा विकासकाला गेला ही वस्तुस्थिती आहे. म्हणून आपण या ठिकाणी जी मागणी केली आहे. त्यानुसार जरुर डीसीआर 58 ची चौकशी निश्चितपणे केली जाईल. त्यामध्ये काही मालाफाईड किंवा चुकीचे झाले आहे काय, या सर्व बाबी तपासून पाहिल्या जातील आणि हे सर्व करीत असताना दुसरी अपेक्षा अशी होती की, गिरणी कामगारांना घरे मिळाली पाहिजेत तर त्याची कार्यवाही वेगाने केली जाईल.

श्री. वैभव नाईक : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले आहे की, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न लवकरात लवकर सुटेल. परंतु अजूनही अनेक गिरणी कामगारांना घरे मिळालेली नाहीत. त्या गिरणी कामगारांना कधीपर्यंत घरे मिळतील हा मुख्य प्रश्न आहे.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी फार आग्रह करु नये. प्रश्न सभागृहाची प्रॉपर्टी असली तरी कोणत्याही सदस्यावर अन्याय होऊ नये. मला कोणावरही अन्याय होऊ द्यायचा नाही. त्यामुळे प्रश्नोत्तरे लवकर संपविली पाहिजेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.49344.....

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, या संदर्भात मी सभागृहात त्याची घोषणा केली आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी आपण त्याची किंमत घोषित करणार आहोत आणि त्याच्या लॉटरीच्या दोन्ही तारखा म्हणजे महिने माननीय मंत्री महोदयांनी घोषित केले आहेत. त्यामुळे तातडीने ही कार्यवाही केली जाईल.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, आता हे नाही म्हणतील. कारण 58 एकचे अमेंडमेंट करण्यासाठी हे सर्व महानुभाव सहमत होते. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, मुंबई शहरामध्ये म्हाडाची 56 ले-आऊट्स आहेत. इंटिग्रेटेड डेव्हलपमेंटसाठी डीसीआरचे कलम 58 अमेंड केले आहे ते जर कायम ठेवले तर सर्व ओपन स्पेसमधील जागांवर वन थर्ड, वन थर्ड अशा प्रकारचे विभाजन होणार आहे. हा विषय मिलसाठी असला तरी तो प्रिसिडेन्ट म्हणून वापरला जाईल. माननीय मुख्यमंत्र्यांनी फार सकारात्मक भूमिका या ठिकाणी घेतली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना माझा प्रश्न आहे की, 58 (1) जो डीसीआर अमेंड केला होता तो इंटिग्रेटेड मिल डेव्हलपमेंटसाठीचा होता. अशा पध्दतीने म्हाडा किंवा शासनाच्या जेवढ्या जमिनी असतील तेव्हा त्या ओपन स्पेसचे विभाजन होईल. मग त्यावेळी केवळ ओपन स्पेसचे विभाजन न होता एकूण जागेचे विभाजन होईल याची दक्षता घेऊन कायद्यामध्ये बदल करुन किंवा प्रावधान करुन घेणार आहात काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना दिली आहे, तिचा निश्चित विचार केला जाईल आणि त्या अनुरुप कार्यवाही केली जाईल.

श्री. सुनिल शिंदे : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी मी मघाशी प्रश्न विचारला होता, त्याचे उत्तर मिळालेले नाही. मिलच्या जागेवर गिरणी असल्यामुळे गिरणी कामगारांच्या मुलांना नोकऱ्या दिलेल्या आहेत काय, नसल्यास अशा नोकऱ्या दिल्या जातील काय, सेंच्यूरी मिलच्या जागेवर सध्या जी चाळ अस्तित्वात आहे आणि त्यावर जे आरक्षण दाखविले आहे, त्या संदर्भात माझी विनंती अशी आहे की, तेथील लोकांसाठी मैदाने फार कमी आहेत. आरजी, पीजी त्या ठिकाणी फार कमी आहे म्हणून या बाबतीत स्वतंत्र आदेश काढून त्या चाळीवरील आरक्षण रद्द करुन त्याच कंपाऊंडमध्ये ते आरक्षण अन्य ठिकाणी टाकण्यासंबंधी आदेश देण्यात येतील काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.49344.....

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला आहे त्यासंबंधी आता माझ्याकडे नीट माहिती नाही. जरुर ती माहिती घेतली जाईल की, त्या ठिकाणी किती मिल कामगारांच्या मुलांना नोकऱ्या मिळाल्या आहेत आणि त्यासंबंधी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. दुसरा मुद्यासंबंधी तातडीने तपासून पाहण्यात येईल की, चाळीचा विकास करता येईल काय, असा प्रयत्न केला जाईल किंवा आपण जे सूचविले आहे ते जर व्यवहार्य असेल तर त्याही संदर्भात शासन सकारात्मक असेल.

5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र परिसरात कार्यरत कंत्राटी सुरक्षा रक्षकांची विदर्भ प्रहार कामगार संघटनेने केलेली फसवणूक

(4) *50218 श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र परिसरात कार्यरत कंत्राटी सुरक्षा रक्षकांना, सुरक्षा रक्षक मंडळात नोंदणी करण्याचे आमिष दाखवून विदर्भ प्रहार कामगार संघटनेने सुरक्षा रक्षकांकडून प्रत्येकी 2,500 रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी कामगार आयुक्तांनी, जिल्हा पोलिस अधिक्षकांकडे दिनांक 9 जानेवारी, 2016 रोजी वा त्यासुमारास तक्रार नोंदविली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (1) अंशत: खरे आहे. कारण अशा आशयाची प्राप्त झालेली तक्रार सरकारी कामगार अधिकारी तथा सचिव, चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चंद्रपूर यांनी पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचेकडे पाठविल्यानंतर पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांनी तक्रार नोंदवून घेतली आहे.

(2) होय, विदर्भ प्रहार संघटनेमार्फत केलेल्या फसवणूकी प्रकरणी भारतीय मजदूर संघाने केलेली तक्रार चंद्रपूर सुरक्षा रक्षक मंडळाने पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचेकडे पाठविल्यानंतर पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांनी सदरहू संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती हर्षल चिपळूणकर यांचे विरोधात एफआयआर क्र. 338/2016 अन्वये तक्रार नोंदविली असून फसवणूकीच्या प्रकरणाबाबत पोलीस यंत्रणेकडून पुढील चौकशी करण्यात येत आहे. दरम्यान चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र ही आस्थापना चंद्रपूर सुरक्षा रक्षक मंडळात नोंदित न झाल्याने मंडळाने त्यांचे विरोधात मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग. चंद्रपूर येथे दि. 30/11/2015 रोजी खटला दाखल केला असून त्याची पुढील सुनावणीची तारीख दि.10/5/2016 अशी आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव) : अध्यक्ष महोदय, मागच्या आठवड्यामध्ये विद्युत मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, या कंत्राटी कामगारांना कायद्यानुसार आपण त्या ठिकाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.50218.....

श्री. शशिकांत शिंदे.....

समाविष्ट करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करु. त्यांना मिनिमम वेजेस ॲक्टनुसार कंत्राटी कामगारांना जे फायदे असतील ते मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. या ठिकाणी कामगार मंत्री बसलेले आहेत. शासकीय कामकाजामध्ये हा कायदा लागू करण्यासाठी आपल्याला काय अडचण आहे. आपण उत्तरामध्ये असे दिले आहे की, या संदर्भात न्यायालयामध्ये केस दाखल केलेली आहे की, महामंडळाची नोंदणी करुन घ्यावी. शासनाच्या भागात असलेल्या या लोकांना कोर्टात जाण्याची गरज का भासते, शासन आपल्याच खात्यातील विभागाला आदेश देऊ शकत नाही काय, आणि असे असेल तर शासनाचा कायदा पाळण्यासाठी जे अधिकारी टाळाटाळ करीत असतील त्यांच्यावर आपण कार्यवाही करणार आहात काय ?

श्री. विजय देशमुख (कामगार राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, चंद्रपूर सुरक्षा मंडळाच्या वतीने चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रावर गुन्हा दाखल केलेला आहे. कारण त्यांची स्वतःची नोंदणी नाही. मालक म्हणून महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या वतीने नोंदणी करण्याचे काम चालू आहे.

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, मी जो प्रश्न विचारला आहे तो असा आहे की, या लोकांना न्याय मिळावा म्हणून आपण आपल्या दोन्ही विभागांना बोलावून बैठक घेऊन आपण जो सिक्युरिटी ॲक्ट मंजूर केलेला आहे, त्या मंडळामध्ये असलेल्या या कंपनीला नोंदीत करुन या लोकांना पुन्हा एकदा न्याय देण्याच्या बाबतीत भूमिका घेणार आहात काय ? ज्यांनी फसवणूक केली त्यांच्यावर आपण गुन्हा दाखल केला आहे. पण शासकीय कंपनीने तो कायदा मान्य केला नाही त्याबद्दल काय निर्णय घेणार आहात, एवढेच आमचे म्हणणे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.50218.....

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, मुळ प्रश्न वेगळाच आहे. या उत्तरामध्ये दिलेले आहे. परंतु कंत्राटी कामगारांसंबंधी मागच्या रेफरन्सने आजच्या प्रश्नाच्या उत्तराच्या माध्यमाने कंत्राटी कामगारांसंबंधी विचार करावा. ज्या संघटनांनी आमिष दाखवून लोकांकडून पैसे घेऊन रक्षक मंडळामध्ये नोंदणी करायला लावली त्यांची तक्रार आहे. याबाबतची कारवाई चालू आहे. आता आपण जे सूचित केले त्याप्रमाणे कंत्राटी कामगारांसंबंधी विभागाची बैठक घेऊन या अधिवेशनामध्ये संबंधित कंत्राटी कामगारांचे नेते आणि संबंधित मंत्री यांची विभागीय बैठक घेऊन यामधून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, चंद्रपूर महाऔष्णीक केंद्र हे सुरक्षा रक्षकांसाठी शासनाकडे नोंदीत आहे काय? नोंदीत असेल तर त्याठिकाणी सुरक्षा रक्षका का नेमले नाहीत.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, शासनाच्या नोंदीत सुरक्षा रक्षक आहेत.

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मूळ नोंदीत जे व्हायला पाहिजे होते ते झालेले नाही. म्हणून हा बोगस कारभार झालेला आहे. हे जर नोंदीत असते तर सुरक्षा रक्षक सरकारने नेमले असते आणि मग हा प्रश्न आला नसता. नोंदीत आहे तेवढेच मी विचारलेले आहे.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, यामुळेच नोंदीत वाद झाला आणि प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे या कामगारांना बाधित केलेले नाही. परंतु ज्या संघटनांनी संगनमत करुन कामगारांना फसविले आहे यासंबंधी प्रश्न आहे. म्हणून याबाबतची कारवाई सुरु आहे. यामुळे सुरक्षा रक्षकांना कुठल्याही प्रकारची बाधा येणार नाही याची दक्षता शासन घेणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यातील इमारत व इतर बांधकाम मजूरांना

आरोग्य विम्याचे संरक्षण देण्याबाबत

(5) *47466 uuश्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील इमारत व इतर बांधकाम मजुरांची माहे ऑगस्ट, 2015 पासून बंद झालेली समुह आरोग्य विमा योजना पुन्हा सुरु करण्याची मागणी अहमदनगर व नाशिकच्या कामगार संघाच्या शिष्टमंडळाने दिनांक 25 जानेवारी, 2016 रोजी वा त्या सुमारास इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळाच्या आयुक्तांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्यात सुमारे चार लाख नोंदणीकृत बांधकाम कामगार असून बांधकाम मजुरांच्या आरोग्य विमा योजनेचा हप्ता शासनाने न भरल्याने ही योजना पाच महिन्यांपासून बंद पडली आहे, अशा स्वरुपाच्या अनेक तक्रारी, कामगार मंडळाचे आयुक्त श्री. होनाजी जावळे यांच्याकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, चार हजार कोटींपेक्षा जास्त रक्कम ठेवीद्वारे गुंतविणाऱ्या उक्त महामंडळाने, कामगारांकरीता करावयाच्या विविध उपाययोजना व विविध सोयी सवलती अद्यापी उपलब्ध करुन न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(4) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (1) होय, हे खरे आहे.

(2) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील एक लाख नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्यावर अवलंबित पाच कुटुंबियांसाठी रु. दोन लाख पर्यंतचा आरोग्य विमा दि. 21.08.2014 रोजी काढण्यात आला होता. या योजनेचा कालावधी दि. 20.08.2015 रोजी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47466.....

संपलेला आहे. तथापि, सदर विमा योजना यावर्षीही लागू करण्यासाठी कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(3) मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी विविध 18 कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. तसेच सदर योजनांच्या माध्यमातून त्यांना अनेक सोयी-सवलती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही मंडळाकडून करण्यात येत आहे.

(4) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांबरोबरच एक लाख नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्यावर अवलंबित पाच कुटुंबियांसाठी गतवर्षी रुपये दोन लाख पर्यंतचा आरोग्य विमा एक वर्षाकरिता काढण्यात आला होता. सदर योजनेचा कालावधी दि. 20.08.2015 रोजी संपुष्टात आलेला आहे.

तथापि, प्रस्तुतची विमा योजना यावर्षीही लागू करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, या प्रश्नामध्ये इमारत व इतर बांधकाम करणारे कामगार आहेत आणि त्यांच्यावर अवलंबून असणारी 5 कुटूंबे आहेत. त्यांच्यासाठी दोन लाखापर्यंतचा विमा काढण्यासंदर्भातील प्रश्न आहे. माझे माननीय मंत्र्यांना प्रश्न आहेत की, उत्तराच्या दुसऱ्या भागामध्ये म्हटलेले आहे की, सन 2015 पर्यंत ही योजना होती. त्यानंतर दिनांक 20.8.2016 पासून ती बंद झालेली आहे. आपण सांगितले की, काम प्रगतीपथावर सुरु आहे. परंतु उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, सदर विमा योजना लागू करण्याचे काम प्रगती पथावर चालू आहे. हे काम कधी सुरु करणार हा पहिला प्रश्न आहे आणि दुसरा प्रश्न असा आहे की, उत्तर 4 मध्ये सांगितलेले आहे की 1 लाख नोंदी बांधकाम कामगारांच्या झालेल्या आहेत. त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या 5 कुटूंबासाठी दोन लाख रुपयांपर्यंतचा विमा एक वर्षाकरिता काढण्यात आला होता. याचा फायदा किती लोकांना मिळणार आहे याची माहिती देण्यात यावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47466.....

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, सदर विमा योजना दिनांक 20 ऑगस्ट, 2016 रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यानंतर त्यावर टेंडरिंग काढण्यात आहे. टेंडरिंगमध्ये विसंगती असल्यामुळे टेंडर रद्द करण्यात आलेले आहे. आता नवीन ई-टेंडरिंगच्या माध्यमातून विमा योजनेसाठी आमंत्रित केलेले आहे. एक महिन्याच्या आत या सर्व कामगारांच्या विम्याचे काम सुरु होईल.

डॉ.अनिल बोंडे : अध्यक्ष महोदय, इमारत बांधकाम कामगारांची नोंदी करण्याची प्रक्रिया ग्रामीण भागामध्ये फार कमी प्रमाणात आहे. त्यामध्ये आरोग्य विमा आणि विमा काढण्याची प्रक्रिया फार कमी प्रमाणात आहे. दिनांक 21.8.2014 ला जो दोन लाखापर्यंतचा विमा काढण्यात आला होता त्याची मुदत दिनांक 20.8.2015 रोजी संपलेली आहे. या एक वर्षाच्या कालावधीमध्ये किती कामगारांना याचा लाभ झाला हा माझा प्रश्न आहे आणि सन 2015 नंतर संपलेली मुदत आता परत कधी सुरु होणार हा माझा दुसरा प्रश्न आहे.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, जेवढे कामगार इमारत बांधकाम नोंदीत होते त्यांना याचा लाभ दिलेला आहे. एक महिन्याच्या आत ही विमा योजना लागू करण्यात येईल.

श्री.पतंगराव कदम : अध्यक्ष महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये हा प्रश्न आलेला होता. त्यावेळेस मंत्री महोदयांनी असे आश्वासन दिले होते की, ज्या कामगारांची नोंदणी झालेली नाही त्या सर्वांची नोंदणी केली जाईल. या महामंडळाकडे प्रचंड पैसा शिल्लक आहे. सर्वांची नोंदणी केली जाईल हे कबूल केलेले होते आणि सहा महिन्यात केली जाईल त्याची नेमकी अवस्था काय आहे. जे नोंदणीकृत झालेले नाहीत यांची संख्या किती आहे? या महामंडळाकडे पैसे किती आहेत आणि याचा फायदा या लोकांना किती होतो.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, गेल्या अधिवेशनानंतर जवळ जवळ 1 लाख 98 हजार नवीन कामगारांची नोंदणी करण्यात आलेली आहे. नोंदणी राहिलेल्यांची सीमा फार मोठी आहे. जवळ जवळ 50 लाखाच्या वर जाईल. याबाबत काल सन्माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांच्यासमवेत विस्तृत बैठक घेतली. याचे काम सुरु केलेले आहे. या योजनेचा आराखडा 15-20 दिवसाच्या आत तयार करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47466.....

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मेरा स्पेसिफिक प्रश्न है. हेल्थ इन्शुरन्स खत्म होने के दिन पर वापस हेल्थ इन्शुरन्स निकाल लिया जाता है. यह इन्शुरन्स दिनांक 20.8.2015 को खत्म हो रहा था तो इसके पहले ही इस बारे में कार्यवाही क्यों नहीं की गई ? जिस अधिकारी ने इस बारे में कार्यवाही नहीं की उसके ऊपर आप क्या कार्रवाई करेंगे ? आठ महीने से कामगार, मजदूर परिवारों का हेल्थ इन्शुरन्स नहीं है. जिस परिस्थिति में वे लोग काम करते है, उनको डेंग्यू और मलेरिया जैसी बिमारी होती है. उनका इलाज नहीं हो पाता है. दि.20.8.2015 को इन्शुरन्स खत्म हो रहा था तो इसके पहले ही निविदा बुलाकर काम क्यों नहीं किया गया ?

श्री प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, दि.20.8.2015 के बाद तुरंत ही....उसके पहले ही इसकी प्रक्रिया शुरु की थी. लेकिन उसमें जो टेंडरींग सिस्टिम हुई थी, उस टेंडरींग सिस्टिम में विसंगति थी. इसीलिए हमने उसको रद्द करके पारदर्शकता से नई टेंडरींग सिस्टिम के माध्यम से ये टेंडर को इनव्हाईट किया. इसलिए उतना समय गया. अभी हमारी कार्यवाही हो रही है. एक महीने के अंदर ये कार्यवाही प्रारंभ हो जाएगी.

श्री.प्रकाश आबिटकर : अध्यक्ष महोदय, या योजनेच्या माध्यमातून बांधकाम मजूरांना अत्यंत चांगल्या प्रकारची मदत होते. पण दुर्दैवाने याचे काम बरोबर होत नाही. माझा अनुभव असा आहे की, या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्याकडे स्टाफ खूप अपूरा आहे. पैसा भरपूर आहे, पण लोकांसाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा दिल्या पाहिजेत. कारण बांधकाम मजूरांचे सातत्याने कामगार कार्यालयासमोर मोर्चे सुरु असतात. योग्य लाभार्थ्यांना योग्य पध्दतीने लाभ देण्याच्या दृष्टीने तात्काळ इन्फ्रास्ट्रक्चर आणि स्टाफ देणार आहात काय? आणि दुसरा प्रश्न असा की, वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी सुध्दा एखादे महामंडळ नेमावे अशी विनंती केली होती. यासाठी जर एखादा निर्णय घेतला तर जे पेपर टाकणारे लोक असतात ते सकाळी खूप चांगल्या पध्दतीने पेपर वाचायला देतात. यांच्यासाठी एक अभिनव आणि महत्वपूर्ण भूमिका शासन घेणार काय?

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी निश्चितपणे सकारात्मक विचार करुन यासंबंधी भूमिका घेऊ. पहिला प्रश्नात इमारत

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47466.....

श्री.प्रकाश महेता.....

बांधकामाच्या कामगारांसंबंधी विचारण्यात आले. हे लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी कामगार मंत्री असताना ही योजना सुरु झाली. एक महिन्याच्या आत विम्याचे काम सुरु होईल असे सांगितले. 5 हजार रुपये अनुदान देण्याची घोषणा झालेली आहे ती कधीपासून कामगारांच्या नावावर जाईल.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, ही विमा योजना ताबडतोब सुरु केलेली आहे.

अध्यक्ष : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

M-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : शोक प्रस्ताव

मु. शी. : श्री.अंकुशराव रावसाहेब टोपे यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, श्री.अंकुशराव रावसाहेब टोपे, माजी विधानसभा सदस्य यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, कै.अंकुशराव रावसाहेब टोपे यांचा जन्म दिनांक 18 सप्टेंबर 1942 रोजी जालना जिल्हयातील अंबड तालुक्यातील पाथरवाळा येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.एस.सी., एल.एल.बी. पर्यंत झाले होते. कै.टोपे यांनी औरंगाबाद येथील मराठा शिक्षण संस्थेचे सचिव, जालना येथील मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, खोलेश्वर ग्रामीण बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेचे संस्थापक, यशवंतराव चव्हाण साहित्यिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष, अंबड येथील समर्थ दुध उत्पादक संस्था, समर्थ सहकारी पाणी वाटप संस्था, यशवंत सहकारी जिनिंग व प्रेसिंग, यशवंत सहकारी सूत गिरणीचे संस्थापक अध्यक्ष, समर्थ सहकारी बँकेचे संस्थेचे संस्थापक, जालना मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष, समर्थ सहकारी साखर कारखाना तसेच सागर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी उत्तम कार्य केले होते. जालना जिल्हयातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांना निकटचा संबंध होता. कैलासवासी अंकुशराव टोपे महाराष्ट्र स्टेट हौसिंग फायनान्स कार्पोरेशनचे अध्यक्ष होते. नॅशनल हेवी इंजिनिअरींगचे संचालक, महाराष्ट्र राज्य साखर संघाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य दुध उत्पादक महासंघाचे संचालक, तसेच सन 1967 ते 1972 या कालावधीत औरंगाबाद जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष, सन 1998-99 मध्ये जालना जिल्हयाचे काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष, त्यांनी सन 1999 ते 2013 मध्ये जालना जिल्हयाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून उत्तम कार्य केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. कैलासवासी टोपे सन 1972 मध्ये जालना जिल्हयातील अंबड मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर तर 1991 मध्ये जालना मतदार संघातून लोकसभेवरही निर्वाचित झाले होते. एक अत्यंत अभ्यासू लोकप्रतिनिधी अशी त्यांची प्रतिमा होती. गेल्या महिन्यातच मी ज्यावेळी जालनाला गेलो होतो. त्यावेळी त्यांचे सुपूत्र आणि या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.राजेश टोपेजी यांनी मला घरी निमंत्रित केले होते. तेव्हा मी चहा घ्यायला गेलो होते. त्यावेळी आदरणीय अंकुशरावजी सविस्तर भेट झाली होती. यापूर्वीही भेट

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस .....

झाली होती. त्यादिवशी खरे म्हणजे अतिशय प्रसन्न चित्त अशा प्रकारचे त्यांचे व्यक्तिमत्व होते. कुठला गंधही असा नव्हता की, इतक्या तातडीने त्यांची तब्येत अशा प्रकारे खराब होईल. बऱ्याच चर्चा झाल्या त्यांनी मला चांगल्या प्रकारचा सल्ला दिला. अचानक मध्यंत्तरी जेव्हा मला श्री.राजेश भैयांचा फोन आला आणि त्यांनी सांगितले की, वडीलांना तातडीने हलवायचे आहे. चेन्नईमध्ये त्यांच्या प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करायची आहे. त्यावेळी मला एक प्रकारचा धक्का बसला. ज्या व्यक्तिला नुकतेच भेटलो होतो. त्यांच्याकडे पाहून वाटत नव्हते की, त्यांची तब्येत इतक्या लवकर खराब होईल. त्या ठिकाणी टोपे कुटुंबियांनी आणि श्री.राजेश भैयांनी प्रयत्न केले. दुर्दैवाने म्हणा किंवा इश्वराच्या मनात वेगळे असल्यामुळे एक ज्येष्ठ सहकार महर्षी आपण त्यांना म्हणू शकू अशा व्यक्तिमत्वाचा दिनांक 3 एप्रिल, 2016 रोजी दु:खद निधन झाले. अशा या ज्येष्ठ समाज सेवकाला मी सभागृहाच्या वतीने तसेच वैयक्तिकरित्या भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (विरोधी पक्ष नेते) : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी कै.अंकुशराव रावसाहेब टोपे, माजी विधानसभा सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे. त्याला पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे. कै.अंकुशराव टोपे हे मराठवाडयातील एक अग्रगण्य असे नेतृत्व होते. संपूर्ण राजकीय सामाजिक जीवनाच्या वाटचालित ग्रामीण भागातील जनतेच्या प्रश्नाशी आणि जनतेशी बांधिलकीचे नाते त्यांनी जोपासले. उच्चशिक्षा विभूषित असलेल्या या व्यक्तिमत्वाने सदैव ग्रामीण भागातील प्रश्नाला आपले मानले. 1967 ते 72 या कार्यकाळात औरंगाबाद जिल्हापरिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. अंबड मतदार संघातून विधानसभेत 1972 साली तर 1991 साली जालना लोकसभा मतदार संघातून लोकसभेवर ते निवडून गेले. एक अभ्यासू लोकप्रतिनिधी अशी त्यांची प्रतिमा होती. औरंगाबाद, जालना जिल्हयातील अनेक सहकारी संस्थांच्या उभारणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहीला. समर्थ आणि सागर अशा दोन कारखान्यांची उभारणी करताना जालना दुध संघ, यशवंत सहकारी सूत गिरणी तसेच अनेक सहकारी संस्थांच्या उभारणीमध्ये त्यांची प्रमुख भूमिका राहायची. मराठी शिक्षण संस्थेचे सचिव आणि जालना मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष या नात्याने ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा निर्माण करण्याचे प्रभावी कार्य त्यांनी केले. काँग्रेस पक्षाचे जालना जिल्हयाचे अध्यक्ष म्हणून मोठे काम केले होते. कै.अंकुशराव टोपे आमच्या नगर जिल्हयातील कै.माजी मंत्री आबासाहेब निंबाळकर यांचे ते जवळचे पाहुणे होते.

अध्यक्ष महोदय, सहकारी चळवळीच्या, सहकारी कारखानदारीच्या निमित्ताने राज्य साखर संघाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. वसंत दादा शुगर इंन्स्टिटयुटचे मंडळाचे सदस्य म्हणून काम केले. मराठवाडयातील सहकारी चळवळीला, सरकारी कारखानदारीला कशा पध्दतीने मदत करता येईल याबाबतचा त्यांचा सातत्याने प्रयत्न राहिला. अभ्यासू, हसतमूख अशा प्रकारचे व्यक्तिमत्व होते. अनेक वेळा त्यांचा व्यक्तिश: संबंध आला. सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष म्हणून सहकारी चळवळीत काम करताना नेहमी शेतक-यांच्या प्रती आस्था असणारा आणि दुष्काळी भागातील लोकांकरिता त्यांचे प्रश्न सोडविण्याकरिता नेहमीच त्यांची अग्रभागी भूमिका राहिली. जालना जिल्हा दुष्काळात होरपळत असताना त्या जिल्हयाच्या दौ-यावर मी गेलो त्यावेळी सुध्दा मोसंबी उत्पादक शेतकरी आहेत किंवा त्या भागातील सर्व शेतक-यांच्या प्रती त्या प्रश्नाची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील .....

कशी मदत होईल या दुष्काळामध्ये त्यांना कशा पध्दतीने शासनाचा हातभार लागेल या पध्दतीने सातत्याने त्या प्रश्नाकरिता त्यांचा पाठपुरवा राहिला. आपल्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.राजेश भैया यांचे ते वडील होते. म्हणून राजेश भैया आणि आमचे अतूट नाते राहिले. कै.अंकुशराव टोपेंच्या जाण्याचे व्यक्तिशः आमच्या कुटुंबियांची हानी झालेली आहे. मी त्यांच्या दु:खद निधनाबद्दल विधिमंडळ काँग्रेस पक्षाच्या वतीने आणि व्यक्तिशः माझ्या कुटुंबियांच्या वतीने त्यांना मी भावपूर्ण श्रध्दांजी अर्पण करतो.

.....

..5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अजित पवार (बारामती) : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांनी जो आता शोक प्रस्ताव येथे मांडलेला आहे. त्याला पाठींबा देण्याकरिता मी उभा आहे. मराठवाडयातील राष्ट्रवादीचे नेते आणि माजी खासदार श्री.अंकुशराव टोपे यांचा रविवार दिनांक 3 एप्रिल, 2016 रोजी पहाटे चेन्नईला उपचारादरम्यान दु:खद निधन झाले. कै.अंकुशराव टोपे हे जालना जिल्हयाच्या विकासाचे जनक व लोकनेते म्हणून त्यांची संपूर्ण मराठवाडयामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये ओळख आहे. त्यांच्या मत्स्योदरी शिक्षण संस्थेची स्थापना त्यांनी केली. त्याद्वारे त्यांनी 50 पेक्षा जास्त शाळा आणि महाविद्यालये यांच्याशी संबंधित शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय आणि महान कार्य केले आहे. समर्थ सहकारी साखर कारखाना, सागर सहकारी साखर कारखाना, यशवंत सहकारी सूत गिरणी, यशवंत जिनिंग प्रेसिंग, समर्थ सागर पाणी वाटप संस्था, समर्थ सहकारी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशा अनेक त्या परिसरातल्या संस्था नावारूपाला आणल्या. परंतु एक गोष्ट सभागृहाला मान्य करावी लागेल की, मराठवाडयामध्ये अनेक मान्यवरांनी अनेक सहकारी संस्था काढल्या त्यामध्ये ठराविक सहकारी संस्था चांगल्या चालल्या.

N-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अजित पवार .....

चांगल्या चाललेल्या सहकारी संस्थांच्या प्रमुखांची नावे घ्यावी लागली तर कै.अंकुशराव टोपे यांचे नाव प्राधान्याने घ्यावे लागेल. त्यांच्याकडे एक प्रकारची शिस्त होती, त्यांच्यातील प्रशासनामधील एक चुणूक सर्वांनी जवळून पाहिली आहे. ते 1967 ते 1972 या काळात औरंगाबाद जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष होते. 1972 मध्ये त्यांनी अंबड मतदारसंघातून विधानसभेचे प्रतिनिधीत्व केले होते. 1991 मध्ये आम्हाला खासदार होण्याची संधी मिळाली. मी बारामती लोकसभा मतदारसंघातून व त्याच काळात त्यांनी जालना लोकसभा मतदारसंघाचे त्यांनी प्रतिनिधीत्व केले होते. मला त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी सहा महिनेच मिळाली. परंतु नॅशनल हेवी इंजिनिअरींग व साखर कारखाना संघ अशा सहकार क्षेत्रात त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. ते मुंबई व दिल्लीमध्ये असले तरी त्यांचे लक्ष सारखे जालना जिल्हा व परिसरावर असायचे. तालुक्यातील स्थानिक लोकांना ते कधी विसरले नाही. त्यांचा सर्वांशी जवळचा संबंध शेवटपर्यत होता. ते आजारी पडण्यापूर्वी एक महिन्यापूर्वी त्यांनी त्यांच्या सर्व संस्थांची मिटींग घेतली होती. सतत आढावा घेणे व बैठका घेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. जालना जिल्हयातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्राशी गेल्या 50 वर्षापेक्षा जास्त त्यांचा घनिष्ठ संबंध होता. त्यांनी त्या क्षेत्रात आपल्या कामाची मोहोर उमटवली होती. त्यांच्या दु:खद निधनाने सहकार व शिक्षण क्षेत्रातील महत्वाचा दुवा निखळला आहे. यापुढील काळात त्यांचे मार्गदर्शन आपणास लाभणार नाही याची खंत सर्वच कार्यकर्त्यांना बोचत राहील. त्यांना व्यक्तीश: माझ्या वतीने व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ.देशमुख (सांगोला) : अध्यक्ष महोदय, या सभागृहाचे दिवंगत सदस्य कै.अंकुशराव रावसाहेब टोपे यांच्या दु:खद निधनाबाबत या सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी शोक प्रस्ताव मांडला. माननीय विरोधी पक्ष नेते व गट नेते यांनी यास अनुमोदन दिलेले आहे. मी अनुमोदन देण्यासाठी उभा आहे.

माननीय मुख्यमंत्री यांनी व विरोधी पक्ष नेत्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. कै.अंकुशराव टोपे यांचे शिक्षण बी.एस्सी. एलएल.बी. पर्यंत झाले होते. सन 1967 ते 1972 या काळात औरंगाबाद जिल्हा परिषेदेचे ते अध्यक्ष होते. 1972 मध्ये ते विधानसभेवर निवडून आले होते. तसेच 1991 मध्ये ते लोकसभेवर निवडून गेले होते. त्यांनी त्यांच्या भागात 2 साखर कारखाने, 1 सुतगिरणीची उभारणी केली. अनेक शैक्षणिक संस्थांची स्थापना केली. तसेच त्यांच्या भागात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने मोलाची कामगिरी केलेली आहे. त्यांनी जालना जिल्हा सहकारी बँकचे अध्यक्ष म्हणूनही काम केलेले आहे. राज्य व देश पातळीवर अनेक सहकारी संस्थेत त्यांनी संचालक व चेअरमन म्हणून काम केलेले आहे. अभ्यासू लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने मराठवाडा व या राज्यातील एक अभ्यासू नेता हरपला आहे. त्यांच्या स्मृतीला शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने व माझ्या वतीने मी आदरांजली वाहतो व माझे दोन शब्द संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथ शिंदे (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री) : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय मुख्यमंत्री यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाला मी पाठींबा देत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात जन्मलेले कै.अंकुशराव टोपे हे स्वातंत्र्यानंतरच्या राजकारणातील पहिल्या फळीतील नेते होते. महाराष्ट्रात सहकार चळचळ रुजविणाऱ्या अग्रगण्य नेत्यांपैकी ते एक होते. 1972 मध्ये ते जालना जिल्हयातील अंबड मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले. 1991 मध्ये जालना मतदारसंघातून ते लोकसभेवर निवडून गेले होते. 1967 ते 1972 या काळात औरंगाबाद जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष, सन 1989 ते 1999 या दहा वर्षाच्या प्रदीर्घ काळ ते जालना जिल्हा काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेनंतर ते काँग्रेस पक्षातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये गेले. 1999-2013 या कालावधीत त्यांनी जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणूनही उत्तम काम केले आहे. महाराष्ट्राच्या राजकीय कारकिर्दीत असंख्य सहकारी संस्थांच्या माध्यमातून सहकार चळवळ त्यांनी समृध्द केली व ग्रामीण भागातील हजारो लोकांना आर्थिक आधार दिला. औरंगाबाद येथील मराठा शिक्षण संस्थेचे सचिव, जालना येथील मत्सोदरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, खोलेश्वर ग्रामीण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक, यशवंतराव चव्हाण साहित्यिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष, अंबड येथील समर्थ दूध उत्पादक संस्था, समर्थ सहकारीपाणी वाटप संस्था, यशवंत सहकारी जिनिंग व प्रेसिंग, यशवंत सहकारी सुतगिरणीचे संस्थापक-अध्यक्ष, समर्थ सहकारी बँकेचे संस्थापक, जालना मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष, समर्थ सहकारी साखर कारखाना तसेच सागर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष असे अनेक संस्थांचे ते आधारस्तंभ होते. महाराष्ट्र स्टेट हौसिंग फायनान्स कार्पोरेशनचे अध्यक्ष, नॅशनल हेवी इंजिनिअरींगचे संचालक, महाराष्ट्र राज्य साखर संघाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य दूध उत्पादक महासंघाचे संचालक म्हणून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटाविला. जालना जिल्हयातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. सहकार चळवळीचे महर्षी म्हणून त्यांची ओळख होती. अशा ज्येष्ठ व्यक्तिमत्वाचे दिनांक 3 एप्रिल, 2016 रोजी दु:खद निधन झालेले आहे. त्यांना मी व माझ्या पक्षाच्या वतीने भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी शोक प्रस्ताव मांडलेला आहे. विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे पाटील व सर्व गटनेत्यांनी पाठींबा दिलेला आहे. कै.अंकुशराव टोपे हे खऱ्या अर्थाने सहकार व शैक्षणिक संस्था अतिशय आदर्शपणे चालवित होते. मी जालना जिल्हयाचा संपर्कमंत्री असताना तेथे गेलो असताना पक्षाचे सर्व कार्यकर्ते विश्रामगृहावर थांबले होते. त्यावेळी मला कै.अंकुशराव टोपे म्हणाले की, आपणाकरिता माझ्या घरी जेवणाची व्यवस्था केलेली आहे. त्यांनी सांगितले की, कलेक्टर ऑफीसची मिटींग झाल्यावर काँग्रेसची मिटींग जरूर घ्यावी. अशा प्रकारचे त्यांचे व माझे संबंध होते. जालना जिल्हयामध्ये आम्ही फार मोठे योगदान केलेले आहे. मी उद्योगमंत्री असताना एमआयडीसीमधून जालन्यापर्यंत पाईपलाईन नेली होती व तेथे पाणी दिले होते. मला तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण व उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना धन्यवाद द्यायचे आहेत की, मी मदत व पुनर्वसन मंत्री असताना जालन्याच्या पाणीपुरवठयासाठी 80 कोटी रूपये दिले होते. अशा प्रकारचा घनिष्ट कार्यकर्ता व नेता होता. सहकार व शैक्षणिक क्षेत्रात अनेक संस्था स्थापन केलेला हा नेता होता. त्यांचा मुलगा राज्यमंत्री झाला तेव्हा ते पहिल्यांदा माझ्याकडे आले व त्यांनी सांगितले की, तुम्ही जे खाते घेणार आहोत त्या खात्याला राज्यमंत्री म्हणून माझ्या मुलाला घ्या.

यानंतर ओ-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.पंतगराव कदम.....

त्यांनी त्यांच्या आयुष्यात कन्स्ट्रक्टीव्ह अशा प्रकारचे काम केलेले आहे. आपला मुलगा राजकारणामध्ये आल्यानंतर कोणाचेही गुण दोष न लागता कशा पध्दतीने योग्य तयार होईल, याकरिता त्यांनी मला विनंती केली की, आपण ज्या खात्याला मंत्री आहात त्या खात्यालाच माझ्या मुलाला राज्यमंत्री म्हणून नेमण्यात यावे. जुन्या पिढीतील जुनी माणसे म्हणजे महाराष्ट्राला लाभलेली नररत्नांची खाणच होय. सहकारामध्ये काम करणारे, मंत्रिमंडळात काम करणारे, विधानसभेत काम करणारे लोक आपल्या राज्यामध्ये होऊन गेलेले आहेत. अशा अनेक दिग्गज नेत्यांची परंपरा आपल्या राज्याला लाभलेली आहे. कै.अंकुशराव टोपे यांना नेतृत्वाची संधी विद्यार्थी दशेपासून प्राप्त झाली. ते आमदार, खासदार विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी होते. मागील आठवडयात मी व सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार त्यांना पाहण्याकरिता मुंबईतील रुग्णालयात गेलो होतो. एका दिवसानंतर त्यांना चेन्नईला हलविण्यात आले. लवकरच असे काही होईल, असे वाटले नव्हते. अशा प्रकारे सहकार क्षेत्रातील एक दिग्गज नेता व कार्यकर्ता याचे दु:खद निधन झालेले आहे. कै.अंकुशराव टोपे यांच्या स्मृतीस मी विनम्रपणे श्रध्दांजली अर्पण करतो.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नारायण कुचे (बदनापूर): अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देऊन त्यावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, अंबड तालुक्याचे कै.अंकुशराव टोपे हे आमदार होते. आता बदनापूर विधानसभा मतदारसंघालगत असलेला अंबड तालुका अर्धा माझ्या मतदारसंघामध्ये आहे. मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करीत आहे. कै.टोपे साहेबांबद्दलची चर्चा मी जनतेत ऐकत होतो. सहकार चळवळीच्या माध्यमातून हजारो तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे काम कै.अंकुशराव टोपे यांनी केलेले आहे. मराठवाडयातील ग्रामीण भागातील हा नेता आता आपल्यातून निघून गेलेला आहे. 40 वर्षांमध्ये त्यांनी अनेक संस्था उभ्या केलेल्या आहेत. सर्वसामान्यांशी बांधिलकी हीच भूमिका घेऊन त्यांनी काम केलेले आहे. प्रसंगी वाईटपणा घेऊन भूमिकेशी तडजोड करुन शेवटपर्यंत काम न्यावयाचे आणि जनतेची कामे करावयाची, हीच त्यांची प्रामाणिक भूमिका होती. कार्यकर्त्यांचे काम होत नसेल तर ते प्रशासनाच्या माध्यमातून करण्याची त्यांची हातोटी होती. त्या मतदारसंघातील जनतेमध्ये गेलो असता मी असे ऐकले की, कै.अंकुशराव टोपे यांचा आदर्श घेण्यात यावा. मी आमदार झालो त्यावेळी कै.अंकुशराव टोपे यांचा आशिर्वाद घेण्याकरिता गेलो होतो, त्यावेळी त्यांनी सांगितले की, जनतेशी बांधिलकी ठेवली पाहिजे. शून्यातून विश्व निर्माण करुन ग्रामीण भागामध्ये कसा नेता झाला पाहिजे, याचे एक उत्तम उदाहरण म्हणून के.अंकुशराव टोपे यांच्याकडे पाहिले पाहिजे. अशा या असामान्य नेत्याच्या निधनामुळे मराठवाडयावर शोककळा पसरलेली आहे. कै.अंकुशराव टोपे यांच्या स्मृतींना अभिवादन करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड): अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देऊन त्यावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, कै.अंकुशराव टोपे यांचे दिनांक 03 एप्रिल,2016 रोजी चेन्नई येथे हार्ट ट्रान्सप्लांटनंतर एका दिवसांमध्ये दु:खद निधन झालेले आहे. त्यांच्या निधनामुळे केवळ जालना जिल्हयातच नव्हे तर संपूर्ण मराठवाडयावर शोककळा पसरलेली आहे. गोदाकाठ आता पोरका झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, कै.अंकुशराव टोपे यांच्या 74 वर्षांच्या राजकीय, शैक्षणिक, सामाजिक प्रवासामध्ये त्यांनी अनेक संस्था उभ्या केलेल्या आहेत. कै.अंकुशराव टोपे हे व्यक्ती नव्हते तर एक संस्थाच होते. कै.अंकुशराव टोपे यांनी ज्या सहकारी किंवा शैक्षणिक संस्था उभ्या केल्या त्या उत्तम रितीने चालून त्यामध्ये पारदर्शी व्यवहार व्हावा याकरिता निर्भिड बोलणे, कोणाचीही भीड-भाड न ठेवता मत व्यक्त करणे. कर्मचारी व लोकांमध्ये त्यांच्या स्वच्छ कारभाराबद्दल आदरयुक्त भिती हीच त्यांची विलक्षण उपलब्धी होती. मच्छोदरी शैक्षणिक संस्था आणि समर सहकारी साखर कारखाना यांच्याकडे सहकार व शिक्षण क्षेत्रातील आदर्श संस्था म्हणून बोट दाखविता येईल. कै.अंकुशराव टोपे यांनी जिल्हापरिषदेचे उपाध्यक्ष, लोकसभेचे सदस्य, विधानसभा सदस्य म्हणून काम केलेले आहे. औरंगाबाद जिल्हा विभक्त झालेला नसताना विविध क्षेत्रात नेतृत्व कै.अंकुशराव टोपे यांनी केले होते. कै.टोपे यांनी महाविद्यालयीन जीवन जगत असताना विधी शाखेची पदवी घेऊन वकिली व्यवसाय केला होता. विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष म्हणून काम करीत असताना त्यांनी त्यांच्या नेतृत्वाची चुणूक दाखविली होती. विविध क्षेत्रांमध्ये काम करीत असताना विविध पातळीवर व पक्षीय पातळीवर त्यांनी आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखविलेली आहे. त्यांच्या अंत्यविधीचा शोकाकूल समुदायाची मोजदारद केली असता किंवा त्याच्याकडे दृष्टीक्षेप टाकलात तर असे लक्षात येईल की, कै.अंकुशराव टोपे हे ख-य अर्थाने लोकनेते होते. परंतु शेवटी कोणत्याही नेतृत्वाला नियती विराम देत असते. आपले आयुष्य कसे फुलवावे, जीवनातील कर्तृत्वाचा आलेख किती उंचावर न्यावा, हे त्या त्या व्यक्तीवर अवलंबून असते. आपल्या जीवनातील रांगोळीमध्ये कोणते रंग भरावेत, हेही व्यक्तींवर अवलंबून असते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर

आपल्या आयुष्यात कर्तृत्वाच्या पाऊलखूणा उमटविणे हेही त्या त्या व्यक्तीवर डिपेंड असते. कै.अंकुशराव टोपे यांच्या आयुष्याच्या रांगोळीमध्ये सहकार व शिक्षण असे अनेक रंग होते. परंतु आपल्या आयुष्याच्या रांगोळीत किती ठिपके द्यावयाचे हे मात्र नियतीच निश्चित करीत असते. कै.अंकुशराव टोपे यांच्या आयुष्याच्या रांगोळीत केवळ 74 ठिपके द्यावयाचे, हे नियतीने निश्चित केले होते. चेन्नई येथे हार्ट ट्रान्सप्लांटनंतर एका दिवस झाल्यावर ते सर्वांशी पाच - पाच मिनिटे बोलले. सर्वांना वाटले की ही शस्त्रक्रिया यशस्वी झालेली आहे. 1995 मध्ये लंडन येथे कै.अंकुशराव टोपे यांच्यावर बायपास शस्त्रक्रिया पार पडली होती. त्यानंतर ते 15 वर्षे सातत्याने प्रवाहात राहिले व कार्यक्षम राहिले होते. आता या शस्त्रक्रियेनंतरही असेच वाटले होते की, के.अंकुशराव टोपे हे पुन्हा विजयी मुद्रेने सर्वांचे नेतृत्व करतील. परंतु दुर्दैवाने नियतीला ते मान्य नव्हते. त्यांचे चिरंजीव सन्माननीय सदस्य श्री.राजेश टोपे हे आपल्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आहेत. कै.अंकुशराव टोपे यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून तो उचलण्याचे सामर्थ्य त्यांच्या कुटुंबीयास परमेश्वर देवो, अशी प्रार्थना करुन मी त्यांना विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अर्जून खोतकर (जालना): अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री यांनी सभागृहामध्ये जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या जिल्हयातील एक संघर्षशील नेतृत्व दिनांक 03 एप्रिल राजी काळाच्या पडद्याआड गेलेले आहे. राजकारणात गेल्या तीस वर्षांपासून प्रचंड इच्छाशक्ती असलेला हा नेता मी जवळून पाहिलेला आहे. या संघर्षशील नेत्याचे सहकार व शिक्षणावर प्रचंड प्रेम होते. शिक्षण महर्षी व सहकार महर्षी ही सर्व बिरुदे या नेत्याला योग्य त-हेने पूर्णपणे लाभत आहेत. जालना जिल्हयामध्ये त्यांनी अनेक संस्था उभ्या केलेल्या आहेत. संस्था उभ्या करणे आपल्या राजकीय जीवनात सहज शक्य असले तरीही त्या नीटनेटक्या व गुणवत्तापूर्ण पध्दतीने चालविणे हे जिकिरीचे व अवघड काम आहे. ते काम कै.अंकुशराव टोपे यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने केलेले आहे. जालना जिल्हयातील काही संस्था मोडकळीस येऊन डबघाईस आलेल्या होत्या. डीसीसी बँकेसारखी शेतक-यांची संस्था डबघाईस आली होती व अवसायनात निघाली होती. ही संस्था ज्यावेळी कै.अंकुशराव टोपे यांच्या ताब्यात गेली त्यावेळी ती पुनरुज्जीवित झाली. पुन्हा ही शेतक-यांची संस्था कै.अंकुशराव टोपे यांनी नव्याने उभी केली होती.

पी-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अर्जुन खोतकर.....

माझ्या जिल्ह्यतील इंजिनिअर कॉलेज, लॉ कॉलेज, सैनिकी शाळा आणि शैक्षणिक संस्था कुशल नेतृत्वामुळे उभ्या राहिलेल्या आहेत. या माध्यमातून हजारो शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण देण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला होता. त्यांचा कोणत्याही कर्मचाऱ्यांवर नैतिकतेचा धाक होता. त्यांच्या एकूण 5 हजार वैयक्तिक संस्था होत्या. आपल्याकडे 100 ते 150 कर्मचारी असतील तर आपण प्रत्येक कर्मचाऱ्यांची नावे लक्षात ठेऊ शकत नाही. परंतु, त्यांना 5 हजार कर्मचाऱ्यांची नावे तोंडपाठ होती. रस्त्याच्या बाजूला एखादा कर्मचारी उभा असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर एचओडीला फोन करुन संबंधित कर्मचाऱ्याचे नाव घेऊन तो रस्त्यावर कोणत्या कारणासाठी उभा आहे, याची माहिती घेत असे. जालना जिल्ह्यात त्यांचा नैतिक दरारा होता. त्यांचा नैतिक दरारा कसा होता हे आम्ही स्वतः अनुभवलेले आहे. त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत बैठका घेऊन संबंधितांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मी मुख्यमंत्री महोदयांना श्री. अंकुशराव टोपे यांचे हार्ट प्रत्यापर्ण करण्यासाठी चेन्नईल घेऊन जावे लागणार असल्यामुळे बॉम्बे हॉस्पिटल ते एअर पोर्ट असा ग्रीन कोरिडोअर उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्यानंतर तातडीने ग्रीन कोरिडोअर उपलब्ध करुन दिला आणि आम्ही तातडीने त्यांना हॉस्पिटलमध्ये नेले होते. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आम्हाला दोन टक्के चान्स घेता येईल असे सांगितले होते. माननीय श्री. राजेश टोपे यांनी हा चान्स घेतलेला होता. त्यानंतर त्यांच्यावरील शस्त्रक्रिया यशस्वी झाली होती. परंतु, त्याच वेळी त्यांना दुसरे विकार उद्भवल्यामुळे त्यातच त्यांचा अंत झाला होता. 1995 मध्ये ते खासदार होते आणि 1990 मध्ये मी आमदार होतो. ते खासदार असताना मला विधानसभेची निवडणुक लढवायची आहे अशी इच्छा त्यांनी माझ्याकडे बोलून दाखविली होती. त्यावेळी त्यांनी मी तुझ्या विरोधात विधानसभेची निवडणुक लढवणार असे मला सांगितले होते. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, तुम्ही खासदार आहात त्यामुळे तुम्ही माझ्याविरुद्ध निवडणुकीला उभे राहू नका अशी विनंती केली होती. परंतु, त्यांनी माझ्या विनंतीला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अर्जुन खोतकर.....

मान न देता ते जालन्यातून माझ्या विरोधात निवडणुकीसाठी उभे राहिले. 1995 च्या विधानसभेच्या निवडणुकीत 45 हजार मतांनी माझा विजय झालेला होता. मतदानाच्या वेळी एक ते दोन पेट्यांची मतमोजणी होण्याचे बाकी होते. त्यावेळी त्यांच्या सहकाऱ्यांनी आपण या ठिकाणाहून निघाले पाहिजे, मतदानात कोणताही बदल होणार नाही, असे त्यांना सांगितले होते. परंतु, त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यांनी सहकाऱ्यांचे ऐकले नाही. मी शेवटपर्यंत मतमोजणी केल्यानंतरच या ठिकाणाहून निघणार आहे. त्यावेळी शेवटचे बॅलेट होते. त्यावेळी एका मतावरून दोन तास आमच्यामध्ये वाद निर्माण झालेला होता. त्यांना असा मेसेज द्यावयाचा होता की, मी जरी निवडणुकीत हरलेलो असलो तरी, एका-एका मतासाठी भांडले पाहिजे आणि कार्यकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण करून दिला पाहिजे. अशा प्रकारचा एक गुण आम्ही त्यांच्यामध्ये पाहिलेला आहे. ते कोणताही निर्णय कठोरपणे घेत असे. त्यांनी कधीही कोणाचा मुलायजा केलेला नाही. त्यांनी आयुष्यभर कठोरपणे निर्णय घेतलेले आहेत. अशा प्रकारे त्यांच्या अंगातील एक वेगळा दरारा आम्हाला पहायला मिळालेला आहे. त्यांचे हृदय बदलायचे होते. त्यांनी स्वत: निर्णय घेतला की, मला माझे हृदय बदलावे लागणार आहे. ही बाब त्यांनी आपल्या कुटुंबीयांना बोलून दाखविली आणि पुढील उपचार करण्यासाठी मला चेन्नईला घेऊन जाण्याबाबत सूचना केली. अशा प्रकारे मृत्यूला न घाबरता ते कुटुंबीयांना गंमतीने सांगत होते. मला 28 वर्षीय तरुण मुलाचे हृदय मिळाले तर आपले कसे होईल असे ते गंमतीने आपल्या कुटुंबीयांना बोलून दाखवित होते. त्यांनी शेवटच्या क्षणी कारखान्यावर बैठक घेऊन सांगितले की, माझे जर काही बरे वाईट झाले तर माझा अंत्यविधी या ठिकाणी करावा अशी इच्छा बोलून दाखविली होती. एखाद्या माणूस मृत्यूच्या जवळ असताना माझा अंत्यविधी अमुक ठिकाणी करावा, अशी त्यांनी इच्छा बोलून दाखविली होती. अशा या थोर नेत्याचे रविवार दिनांक 3 एप्रिल, 2016 रोजी दु:खद निधन झालेले आहे. त्यांच्या निधनामुळे आमचा जिल्हा पारखा झालेला आहे. अशा या थोर नेत्याला मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी श्री. अंकुशराव रावसाहेब टोपे, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे. शोक प्रस्तावासंबंधी माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, माननीय गटनेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

कै. अंकुशराव रावसाहेब टोपे यांनी अनेक संस्था काढलेल्या आहेत आणि त्या अतिशय चांगल्या आणि प्रभावी पध्दतीने चालविलेल्या आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांनी शोक प्रस्तावासंबंधी त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मराठवाड्यात अनेक सहकारी संस्था नावारूपाला आलेल्या आहेत. अशा संस्था अनेक वर्षे नफ्यामध्ये चालविलेल्या आहेत आणि त्याचे श्रेय श्री. अंकुशराव रावसाहेब टोपे यांना जात आहे.

कै. अंकुशराव रावसाहेब टोपे यांचा सर्व कर्मचाऱ्यांवर आणि सभासदांवर कंट्रोल होता. कोणत्याही सर्वसाधारण सभेत एखादा कर्मचारी विरोध करेल अशी कोणतीही जागा नसायची. त्यांचा कर्मचारी आणि सभासदांवर नेहमीच धाक असायचा. अशा पध्दतीने ते शेवटपर्यंत वागलेले आहेत. कोणत्याही संस्थेत गडबड होणार नाही, अशा प्रकारची त्यांनी नेहमीच दक्षता घेतलेली होती. आज देखील अनेक संस्था उत्तमरित्या सुरु आहेत.

आम्ही दोघांनी पूर्वी जिल्ह्यात एकत्रिपणे कामे केलेली आहेत. 1978 मध्ये जिल्हा परिषदेतील अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवडणुक होती. त्यावेळी अंकुशराव रावसाहेब टोपे हे आमदार होते. त्यांचे औरंगाबाद येथील खोकटपुरामध्ये निवावस्थान आहे. त्यांच्या निवासस्थानात अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडणुकीच्या संदर्भातील चर्चा आयोजित केलेली होती. सदर चर्चेच्या वेळी मी उपस्थित होतो. त्यावेळी कॉंग्रेस पक्षातील श्री. साहेबराव पाटील-दोंडगावकर यांना अध्यक्ष केले होते आणि जनता पार्टी या पक्षातून आलेले श्री. रावसाहेब दांडगे-पाटील यांना उपाध्यक्ष केले होते. यासंदर्भातील चर्चा त्यांच्या निवासस्थाना झालेली होती आणि ती माझ्या स्मरणात आहे. एकमेकांच्या सहकार्याने संस्था चांगल्या पध्दतीने चालविण्याबाबत त्यांचा सिंहाचा वाटा होता.

.....4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष.....

कै. अंकुशराव रावसाहेब टोपे हे महानंदामध्ये डायरेक्टर होते. आमच्याकडे दुधाचे वाटप कमी होत आहे, असे त्यांच्या बोलण्यातून आम्हाला नेहमीच लक्षात येत होते. महानंदामधील एक ते दोन सर्वसाधारण सभेसाठी मी उपस्थित होतो. त्यावेळी ते महानंदामधील दुधाचा खप कमी होत आहे, असे मला बोलून दाखवित होते.

कै. अंकुशराव रावसाहेब टोपे यांनी ग्रामीण भागातील शेतकरी आणि कामगारांना न्याय देण्यासाठी नेहमीच मोलाची भूमिका बजावलेली आहे. त्यांच्या तालुक्याला ज्वारीचे आगार म्हणून संबोधले जात होते. शाळू ज्वारी कोठार म्हणून अंबड तालुका नावारूपाला आलेला होता. सदर तालुक्यात ज्वारी आणि दुसरे एक पीक घेतले जात होते. त्यांनी 1980 मध्ये त्या ठिकाणी एक साखर कारखाना उभा केलेला होता आणि तो चांगल्याप्रकारे चालविला होता. त्या कारखान्यामुळे हजारो लोकांना रोजगार मिळाला होता. त्यामुळे तेथील लोकांच्या जीवनात समृध्दी आल्याचे दिसून येत होते.

अंबड तालुक्यामध्ये एकूण 3 कारखाने आहेत. आता अंबड तालुक्याचे दोन तालुके झालेले आहेत. घनसावंगी हा एक वेगळा तालुका झालेला आह. अंबड तालुका खूप मोठा होता. आता अंबड तालुक्याचे दोन तालुके झालेले आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष ....

कै.अंकुशराव टोपे हे सन 1972 मध्ये जालना जिल्ह्यातील अंबड मतदारसंघातून सभागृहाचे सदस्य झाले होते. त्यानंतर ते सन 1991 मध्ये जालना मतदारसंघातून लोकसभेवर निर्वाचित झाले होते. कै.टोपे हे एक अभ्यासु लोकप्रतिनिधी अशी त्यांची प्रतिमा होती. या ज्येष्ठ सदस्यांचे दिनांक 3 एप्रिल, 2016 रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मृतीस मी अभिवादन करतो.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.दिलीप कांबळे (अल्पसंख्यांक विकास व वक्फ राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2008-2009 या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.अमिन पटेल : अध्यक्ष महाराज,...

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महाराज,....

अध्यक्ष : अहवाल सादर करण्यास उशीर का झाला, त्याचे कारण काय आहे, एवढेच आपल्याला म्हणावयाचे आहे. मंत्री महोदय अहवाल सादर करण्यास उशीर का झाला, त्याची कारणे कृपया सभागृहाला सांगावी आणि बाकीचे अहवाल केव्हा सादर केले जातील, याबाबतही खुलासा करावा.

श्री.दिलीप कांबळे : अध्यक्ष महाराज, सदरचा अहवाल सादर करण्यास उशीर होण्याचे कारण असे की, भारताचे नियंत्रक तथा महालेखा परिक्षक यांचा अहवाल दिनांक 24/8/2015 रोजी प्राप्त झाला असून सदरील खर्चाचे लेखे दिनांक 22/11/2015 रोजी महामंडळाच्या सर्वसाधारण सभेत स्वीकारलेले आहेत. महामंडळाचे लेखे दिनांक 20/11/2015 रोजी स्वीकृत केले असल्याने व नंतर होणाऱ्या डिसेंबर, 2015 च्या अधिवेशनात अहवाल ठेवणे आवश्यक होते. परंतु महामंडळामध्ये लेखा अधिकारी हे पद काही अल्प काळ वगळता दीर्घकाळपासून रिक्त आहे. तेथे प्रतिनियुक्तीने अधिकारी उपलब्ध करुन देण्यास शासनास विनंती करण्यात आली होती. महामंडळास शासनाने वेळोवेळी पदे मंजूर केली आहेत, त्यापैकी व्यवस्थापकीय संचालक या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्यात आले आहे...(अडथळा)..... पुढील अहवाल लवकरात लवकर सदनास सादर करण्यात येतील.

प्रा.वर्षा गायकवाड : अध्यक्ष महाराज, माझा पाईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. मला मुंबईवर चर्चा करावयाची होती. आज सकाळी चर्चा सुरु झाली...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, चर्चा अजून चालू आहे. या प्रस्तावावर मंत्री महोदयांनी उत्तर द्यायला सुरुवात केली आहे काय, आपण विनाकारण सभागृहाचा वेळ घेत आहात.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

चर्चा पुढे सुरू...)

श्रीमती विद्या ठाकूर (अन्न आणि औषधी प्रशासन राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन 2010-2011 या वर्षाचा सदतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते. पटलावर ठेवण्यास झालेल्या विलंबाची कारण सोबत जोडली आहेत.

अध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर सादर करण्यात आला आहे.

श्री.गिरीश बापट (संसदीय कार्य मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2014-2015 या वर्षाचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

अध्यक्ष : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महाराज, मंत्री महोदयांनी आता जो अहवाल सभागृहास सादर केला आहे, त्याची प्रत आम्हाला दाखवावी.

अध्यक्ष : संबंधित खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर संसदीय कार्य मंत्र्यांना अहवाल मांडण्याचा अधिकार आहे, परंतु त्यासंबंधीची कागदपत्रे यापुढे बरोबर घेऊन यावीत.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

श्री.गोपालदास अग्रवाल (समिती प्रमुख) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा अहवाल सभागृहास सादर करतो :-

अध्यक्ष महाराज, भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या सन 2009-2010 या वर्षीच्या विनियोजन लेखा अहवालाच्या संदर्भात सातव्या तसेच सन 2009-2010 या वर्षाच्या स्थानिक अहवालाच्या संदर्भातील आठवा अहवाल असे एकूण दोन अहवाल सभागृहास सादर करीत आहे. सदरहू अहवालातील महत्वाच्या शिफारशींकडे सभागृहाचे लक्ष वेधण्यापूर्वी लोकलेखा समितीने अकराव्या, बाराव्या व तेराव्या विधानसभेमध्ये आजपर्यंत सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुषंगाने विभागाकडे प्रलंबित असलेल्या कार्यवाहीसंदर्भात सभागृहाचे लक्ष वेधतो. लोकलेखा समितीने विविध विभागासंदर्भात अकराव्या, बाराव्या व तेराव्या विधानसभेमध्ये एकूण 1164 शिफारशी केल्या होत्या. त्यापैकी 834 शिफारशींवर शासनाकडून कार्यवाही करण्यात आली असून अद्याप 330 शिफारशी प्रलंबित आहेत.

दिनांक 31 मार्च, 2016 पर्यंत समितीच्या एकूण 68 बैठका झाल्या असून सन्माननीय सदस्यांची उपस्थिती सरासरी 60 टक्के ते 70 टक्के आहे. समितीच्या या पूर्ण एका वर्षाच्या कार्यकालामध्ये एकूण 75 पेक्षा जास्त बैठका घेण्याचा उच्चांक गाठण्याचे नियोजन केले आहे. अनेक आवश्यक महत्वाच्या तात्कालीन विषयावर समिती चर्चा करणार आहे.

दिनांक 15 जानेवारी, 2016 रोजी संसदेच्या लोकलेखा समितीसमवेत आपल्या उपस्थितीत लोकलेखा समितीने बैठक घेतली. सदरहू बैठकीत समितीच्या कामकाजाबाबत महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली. अशाप्रकारे संसदीय लोकलेखा समितीसमवेत बैठक घेण्याचा बहुमान देशात आपल्या राज्याला सर्वप्रथम मिळाला, याचा मला अभिमान आहे. यासाठी मी आपले व माझ्या सहकाऱ्यांचे आभार व्यक्त करतो.

समितीने सातव्या अहवालामध्ये 12 विभागाची साक्ष घेवून त्यासंदर्भात शिफारशी केल्या आहेत. त्यातील महत्वाच्या शिफारशीकडे मी सभागृहाचे लक्ष वेधतो. समितीने आठव्या अहवालामध्ये ग्रामविकास, शालेय शिक्षण व नगर विकास विभागासंदर्भात शिफारशी केल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल...

त्यातील महत्वाच्या शिफारशींकडे मी सभागृहाचे लक्ष वेधतो. सातव्या अहवालातील महत्वाच्या विषयावर विदर्भ व मराठवाड्यामध्ये दळणवळणाची पर्याप्त साधने उपलब्ध नाहीत. केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या वर्धा-यवतमाळ-नांदेड या रेल्वे मार्गाचे काम निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे. जेएनएनयुआरएम, एआयबीपी या योजनांतर्गत मागील दोन ते तीन वर्षात केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाला आहे. केंद्र शासनाकडून जास्त पैसा मिळविणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. राज्य शासनाच्या हिश्याची रक्कम उपलब्ध न केल्याने केंद्राचा निधी अखर्चित राहतो. केंद्र शासनाने निधी उपलब्ध करुन दिला, त्या योजनेकरिता राज्य शासनाने त्याच्या हिश्याच्या रक्कमेची तरतूद प्राधान्याने करावी, अशी समितीची शिफारस आहे.

सामान्य प्रशासन विभागातंर्गत नांदेड व गोंदिया येथे नाईट लॅण्डींगची व्यवस्था असून प्रवाशांसाठी वाणिज्यिक विमानसेवा सुरु करण्याबाबत शासनाने पुढाकार घ्यावा. मराठवाडा व विदर्भाचा विकासाच्या दृष्टीकोनातून या विभागामध्ये विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने शासनाने इंधन करामध्ये सूट देण्याचा विचार करावा, अशी समितीची शिफारस आहे.

समितीच्या आठव्या अहवात ग्रामविकास विभागातंर्गत राज्यातील 14 जिल्हा परिषदांनी 4 टक्के सादिल फंडातून 8572 अग्निशम यंत्र प्रतिनग रुपये 4516/- या दराने खरेदीचा करारनामा एमएसएसआयडीसी सोबत करुन पुरवठा आदेश दिले होते.

यानंतर R-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गोपालदास अग्रवाल .....

पुरवठा झाल्यानंतर एकाही युनिटचे पुर्नभरण झाले नाही. शाळेमध्ये अग्निशमन यंत्र बसविणे हा विषय मुलांच्या सुरक्षिततेबाबत अत्यंत महत्त्वाचा विषय असल्यामुळे या यंत्रांचे पुनर्भरण करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही व्हावी, अशी समितीने शिफारस केली आहे.

अग्निशमन यंत्र बसविण्याचा हेतू सफल झाला नाही व जिल्हा परिषदेने अदा केलेली 85 टक्के रक्कम निरुपयोगी ठरली. कराराप्रमाणे कार्यवाही न करणाऱ्या जिल्हापरिषद व MSSIDC च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कार्यवाही करावी, अशी समितीने शिफारस केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, नगर विकास विभागांतर्गत अकोला महानगरपालिकेने जकात वसुलीचे काम अभिकर्त्यास कमी दराने दिल्यामुळे महानगरपालिकेस रुपये 2.60 कोटी रुपयांचा महसुली तोटा झाला. शासनाच्या निर्देशाविरुध्द केलेल्या कारवाईमुळे नगरपालिकेच्या झालेल्या नुकसानाबाबत तत्कालीन आयुक्त, अधिकारी, कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन नुकसानीची रक्कम वसूल करण्यात यावी, तसेच दोषींवर दंड निश्चिती व्हावी, अशी समितीची शिफारस आहे.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल आपण फार चांगले काम या समितीमध्ये करीत आहात.

श्री. गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, मला दोन मिनिटे द्यावीत, या शिफारशी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

अध्यक्ष महोदय, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दित 2702 अनधिकृत मोबाईल टॉवर्स आहेत. टॉवर्सच्या घातक लहरींमुळे आजुबाजूचे नागरिक आजारी पडत आहेत. असे अनधिकृत मोबाईल टॉवर्स शोधून त्यावर कारवाई करावी, अशी समितीने शिफारस केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, बृहन्मुंबई महानगरलिकेमध्ये फिडीक पध्दतीने टेंडर काढल्यामुळे 3.43 कोटी रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणी परिस्थितीचा विचार न करता फिडीक पध्दतीने निविदा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गोपालदास अग्रवाल ....

करण्याचा निर्णय घेणाऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व दोषी अधिकाऱ्यांकडून वसुलीची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्याच्या आत द्यावी, अशी समितीने शिफारस केलेली आहे.

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेने फेब्रुवारी, 2004 मध्ये रामनगर चौक, सांगली येथील 2784 चौ.मी. जमीन एफबीटी तत्वावर वाचनालय, कलादालन व दुकाने बांधण्यासाठी 75 वर्षांसाठी दिली होती. कराराच्या कालावधीस 3 वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच मे, 2005 मध्ये विकासकाने केलेल्या विनंतीनुसार सन 2006 मध्ये भाडेतत्वावर गाळे हस्तांतरण करण्याऐवजी मालकी तत्वावर गाळे विकण्यास मान्यता दिली. मालकी तत्वावर गाळे देण्यास कोणतीही जाहीरात अथवा फेरनिविदा दिलेली नाही, यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. ही अतिशय गंभीर बाब असून सदरहू प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

अध्यक्ष महोदय, मूल, तिरोडा, चांदूर रेल्वे, पांढरकवडा, भुसावळ नगरपरिषदे अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनामध्ये 4 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करण्यात आला. परंतु, तो खर्च निष्फळ झाला आणि अशाप्रकारच्या अनेक चुका या घनकचरा व्यवस्थापनामध्ये झालेल्या आहेत, याबाबत सुध्दा संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी करण्याची शिफारस समितीने केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, मूल नगरपरिषद, चंद्रपूर येथे् शहरविकास योजनेसाठी राखीव असलेली जमीन शासनाच्या परवानगीशिवाय 14 दुकानांचे शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधण्यासाठी वापरली. सदरहू जमीन झुडपी जंगल यात मोडणारे असल्याने वन विभागाची परवानगी घेणे आवश्यक होते.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य आपण जवळपास संपूर्ण अहवाल वाचून दाखविला आहे.

श्री. गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, मी शेवटची शिफारस सांगत आहे, वन विभागाच्या परवानगी शिवाय तसेच जमिनीच्या आरक्षणातील बदलाशिवाय बांधकाम करण्यात आले. शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील दुकानांचे वाटप न केल्यामुळे 15 लाख रुपयांपेक्षा जास्त महसुली तोटा सहन करावा लागला. या प्रकरणात दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस समितीने केली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गोपालदास अग्रवाल ....

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा सातवा व आठवा सभागृहाच्या पटलावर ठेवतो. आपण मला पूर्ण वेळ दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय हिंद. जय महाराष्ट्र.

अध्यक्ष : लोकलेखा समितीचे अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

.....

..4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./ मु.शी. : स्थगन प्रस्तावाच्या सूचना

अध्यक्ष : आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

.....

पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फोर्मेमेशन है. एक बहुत ही गंभीर बात है. तीन दिन से जे.जे.हॉस्पिटल के रेसिडेन्शियल डॉक्टर्स हड़ताल पर गए है. इस कारण से हजारों मरीज वापस जा रहे है. मेरा सरकार से निवेदन है कि उनकी जो समस्या है उस बारे में माननीय मुख्यमंत्री जी ने डीन और डॉक्टर्स को अपने ऑफिस में बुलाकर फैसला करना चाहिए, ताकि मुंबई और महाराष्ट्र के मरीजों को दवा मिल सके, उनका इलाज हो सके. तीन दिन से डॉक्टर्स हड़ताल पर है इसके बारे में मंत्री महोदय ने जवाब देना चाहिए.

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमीन पटेल यांनी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनद्वारे जी माहिती दिलेली आहे, त्याची नोंद मी घेतलेली आहे. जे.जे. मधील स्ट्राईक लवकरात लवकर मिटविण्यासाठी आपण प्रयत्न करू.

.....

पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, कालही या सभागृहात एका अतिशय महत्त्वपूर्ण व गंभीर विषयाकडे मी लक्ष वेधले होते. कालसुध्दा मी आपल्याला सांगितले की, या सभागृहामध्ये काही सन्माननीय सदस्यांनी भारताच्या ध्वजाचा, तिरंग्याचा अपमान केला. त्यानंतर मी आपल्याला सांगितले की, एक क्लिप आपल्या व्हिडिओ रेकॉर्डिंगच्या माध्यमातून असेल बाहेर सगळीकडे फिरत आहे. हे अतिशय आक्षेपार्ह, अतिशय किळसवाणे म्हटले तरी गैर ठरणार नाही. एका क्लिपमध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

ॲड. आशिष शेलार ....

सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड हे डाव्या हातात भारताचा झेंडा जशी काही हातात पिशवी पकडावी अशाप्रकारे हलवत आहेत. दुसऱ्या क्लिपमध्ये त्या तिरंग्याने जणू काही तोंड पुसले जावे अशा पध्दतीने सारखे दिसत होते. अशा पध्दतीच्या क्लिप्स बाहेर फिरत आहेत.

अध्यक्ष महोदय, या सभागृहामध्ये जेव्हा सभागृह सुरु नव्हते त्यावेळेस जे सन्माननीय सदस्य भारत माता की जय म्हणणार नाहीत त्यांच्यावर आपण कारवाई केली. परंतु, ज्यावेळेस सभागृहामध्ये भारताच्या तिरंग्याने जणू काही तोंड पुसले जावे, असे चित्रीकरण समोर येत आहे. ज्यावेळेस तिरंगा डाव्या हातात घेऊन हातात पिशवी घेतल्यासारखे चालले जाते... (अडथळा) ... एक सन्माननीय सदस्य दिसतात ... आपल्याकडून कारवाईची अपेक्षा आहे अध्यक्ष महोदय, आपण हे सहन करणार आहोत काय, या सभागृहात हे कधीपर्यंत चालणार आहे ? अध्यक्ष महोदय, आपल्याकडून कारवाईची अपेक्षा आहे. ... (अडथळा) ....

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे. मी आपल्या सर्वांचे म्हणणे ऐकणार आहे, आपण जागेवर बसावे. मी आपल्याला बोलण्याची संधी देईन. मी आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे ऐकत आहे, आपण जरा शांतता राखावी. ... (अडथळा) ....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, या संपूर्ण विषयाच्या बाबतीत सरकारी पक्षाकडून विनाकारण राजकारण करण्याचा प्रयत्न होत आहे. ... (अडथळा) ....

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य आपण जागेवर बसावे, आपण घोषणा देऊ नका. मला माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे ऐकू द्या. मी आपल्याला नंतर बोलण्याकरिता संधी देईन, आपले पूर्ण म्हणणे ऐकून घेईन परंतु, आपण कृपया जागेवर बसावे. ... (अडथळा) ....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आज राज्यापुढे अनेक गंभीर प्रश्न आहेत ...(अडथळा) ....

अध्यक्ष : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 59 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

(दोन्ही बाजूकडील अनेक सन्माननीय सदस्य आपली जागा सोडून उभे असतात)

अध्यक्ष : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. संसदीय कार्य मंत्री माननीय श्री. गिरीश बापट हे बोलणार आहे. मी त्यांना परवानगी देत असून कृपया सर्वांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. राज पुरोहित व इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये महत्वाचा विषय निर्माण झालेला आहे. याठिकाणी राष्ट्रध्वजाचा अपमान झालेला आहे. माझी विनंती आहे की, आपण सभागृह चालू ठेवावे. माननीय विरोधी पक्षनेते, सर्व पक्षांचे सन्माननीय गटनेते यांच्यासोबत सदरहू क्लीप पहावी...(अडथळा)...माझी विनंती आहे की, मला बोलू द्यावे. आपण सन्माननीय विरोधी पक्षनेते व सर्व पक्षाच्या सन्माननीय गटनेत्यांना आपल्या दालनामध्ये बोलावून सर्वांनी क्लीप पहावी व यासंदर्भात सभागृहाचे प्रमुख म्हणून आपण सभागृहामध्ये निर्णय सांगावा, अशी माझी विनंती आहे.

...T/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आपल्या जागेवर उभे असतात.)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, या विषयासंबंधिची चित्रफित आपण पाहावी, असे काल सभागृहामध्ये चर्चेच्या माध्यमातून ठरविण्यात आले होते. त्यानंतर हा प्रश्न संपला होता. याविषयावर पुन्हा चर्चा करीत असताना, यापूर्वी घडलेल्या घटना लक्षात घेणे आवश्यक आहे. माननीय प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वज उलटा फडकाविला गेला, हे आपण मांडावयाचे का ? रशिया भेटीच्या वेळी राष्ट्रगीत सुरु असताना माननीय प्रधानमंत्री चालू लागले .... (अडथळा) .... त्यावेळी त्यांना थांबावे लागले होते. या विषयाबाबतचे राजकारण सरकारी पक्षाकडून थांबविले गेले पाहिजे.

अध्यक्ष : मला हा विषय लांबवावयाचा नाही. कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. याप्रकरणी मी नंतर निर्णय देणार आहे. कृपया सन्माननीय सदस्यांनी सभागृहाचे कामकाज चालवू द्यावे. चित्रफित पाहून त्यावर मी निर्णय देईन. या प्रकरणी निर्णय देताना राष्ट्रध्वजासंबंधिची आचार संहिता देखील पाहण्यात येईल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, ही क्लीप कशी काढली गेली ? सभागृहातील...

अध्यक्ष : सदरहू प्रकरणाची चित्रफित माननीय संसदिय कार्य मंत्री, माननीय गट नेते व माननीय विरोधी पक्ष नेते यांना दाखविण्यात येईल, त्यानंतर याप्रकरणी निर्णय करण्यात येईल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपल्याकडे कॅमेरे आहेत, सीसीटीव्ही आहेत. अशा पध्दतीने खाजगीरित्या क्लिपींग निघू लागल्या तर सभागृहाची सुरक्षितता राहणार आहे काय ? मेंबर्स प्रायव्हसी संदर्भात विचार करण्यात येईल काय ?

अध्यक्ष : याप्रकरणीचा निर्णय मी नंतर सांगणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना बोलण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयदत्त क्षीरसागर यांनी कृपया खाली बसावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आपण क्लीप पाहणार आहात. सभागृहामध्ये मोबाईल घेऊन सभागृहामध्ये काय सुरु आहे याचे शुटींग करणारे सदस्य कोण आहेत, ही क्लीप कोणाकडे आहे ? सर्वात ऑब्जेक्शनेबल काय असेल तर क्लीप काढण्याचे काम आहे. ते ज्या सन्माननीय सदस्यांनी केले त्यांची अगोदर चौकशी केली पाहिजे. अशा प्रकारची क्लीप काढण्याची सूचना त्यांना कोणी दिली, त्यांचीही चौकशी करण्याची गरज आहे. आपण क्लीप पाहताना सभागृहातील समोरच्या कॅमेरॅतून काही दृष्ये कॅप्चर झालेली असतील तर ती ऑथेंटिक समजण्यात यावीत. समोरील कॅमेऱ्यामध्ये घेण्यात आलेली चलचित्रे पाहताना आम्हाला व काही प्रमुख सदस्यांना निमंत्रित करण्यात यावे. याप्रकरणी आपण विचार करु. राष्ट्रध्वजाचा अपमान करण्याचा कोणाचाही हेतू नव्हता. त्यामुळे अशा प्रकारची कोणतीही घटना झाली असेल यावर माझा स्वतःचा विश्वास नाही.

अध्यक्ष महोदय, याप्रकरणी माननीय विरोधी पक्ष नेते यांनी काही उदाहरणे दिली आहेत. ती उदाहरणे देऊन मी आपला वेळ घेणार नाही. परंतु श्री.नरेंद्र मोदी यांचेकडून देखील काही गोष्टी अनवधानाने घडलेल्या आहेत..... (अडथळा) ....

अध्यक्ष : मी याप्रकरणी सर्व तपासून निर्णय करतो. आता लक्षवेधी क्रमांक 1 घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार यांनी लक्षवेधी सूचना मांडावी.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यचा प्रयत्न करीत असतात.)

अध्यक्ष : मी अगोदर औचित्याचे मुद्दे घेतो. सन्माननीय सदस्य श्री.विलासराव जगताप यांचा औचित्याचा मुद्दा आहे, त्यांनी तो मांडावा. सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर बसावे. मी क्लीप पाहून निर्णय देतो, असे सांगितले आहे.

प्रा.मेधा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, राष्ट्रध्वजाचा सभागृहामध्ये अवमान होत असताना, एका सन्माननीय सदस्यांनी या सदनाचे लक्षवेधले असताना, त्यावर माझ्या विरोधी बांधवांनी ज्यांच्याकडून चूक झाली त्यांचेकडून माफी मागवावयास पाहिजे होती. परंतु माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सांगितले की, राजकारण केले जात आहे. माझी आपणाला विनंती आहे की, सदरचे वाक्य पटलावरुन ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आता आपण कामकाज करु या. सन्माननीय सदस्य श्री.विलासराव जगताप यांचा औचित्याचा..... सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे. मी सभागृहाचे .....

श्री प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, माननीय श्री नरेंद्र मोदी जी का नाम लेकर और पिक्चर दिखाकर राष्ट्रध्वज के बारे में बात कर रहे है. यह भारतीय जनता पार्टी का मसला है. मेरा कहना है कि माननीय श्री नरेंद्र मोदी जी और राष्ट्रध्वज के बारे में जो बात कही गई है वह रेकॉर्ड में से निकाल देनी चाहिए, ऐसी मेरी विनती है.

अध्यक्ष : मी सभागृहाचे कामकाज अर्ध्या तासासाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 48 मिनिटांनी अर्ध्या तासाकरिता स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

अध्यक्ष : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. आता मी औचित्याचे मुद्दे पुकारतो. मघाशी मी यावर निर्णय दिला आहे. मी क्लिप पाहून उद्या त्यावर निर्णय देईल. आता हा विषय कोणीही काढायचा नाही.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपण स्थगन प्रस्ताव स्वीकारणार नव्हता म्हणून आम्ही स्थगन प्रस्ताव मांडला नाही. परंतु मुद्दा अतिशय गंभीर आहे. काल परभणीला पिण्याच्या पाण्याच्या संबंधामध्ये 144 कलम लावावे लागले आहे. तत्पूर्वी लातूर शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी 144 कलमाचा वापर करावा लागला आहे. राज्यामध्ये एवढी कठीण परिस्थिती आहे की, दुष्काळाची दाहकता, पाणी टंचाईची स्थिती आहे. राज्य सरकारला 144 कलम लागू करावे लागते यापेक्षा या दुष्काळाच्या भीषणतेचे वर्णन काय विशद करावे लागेल ? आम्ही राज्य शासनाला सातत्याने सांगण्याचा प्रयत्न करतो की, या दुष्काळाची स्थिती किंवा गांभीर्य विचारात घेता त्यावर केवळ घोषणा करुन दुष्काळ किंवा पाणी टंचाईचे निवारण होणार नाही. 144 कलम लागू करावे लागते म्हणजे यामध्ये सरकारचे अपयश नाही काय ?

अध्यक्ष : कुठे लागू केले आहे ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, परभणीला लागू करावे लागले आहे. पूर्वी लातूरला लागू करावे लागले तर आता परभणीला लागू करावे लागले आहे. आपण आता रेल्वेने पाणी देणार अशा प्रकारची घोषणा आम्ही 7-8 महिन्यांपूर्वी ऐकली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

रेल्वेने पाणी देणार तर रेल्वे कुठे आणि रेल्वेचे डबे कुठे आहेत हे समजत नाही. दिनांक 17 ऑगस्ट, 2015 रोजी माननीय पाणी पुरवठा मंत्र्यांनी घोषणा केली की, आपण उस्मानाबाद ते लातूर रेल्वेने पाणी देणार आहोत.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते बोलत आहेत. परंतु सभागृहामध्ये एकही कॅबीनेट मंत्री उपस्थित नाहीत.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.राज पुरोहित मंत्री महोदयांना बोलावून आणा. मी आता मंत्री महोदयांना बोलावणे पाठविलेले आहे. मंत्री जरी दोन असले तरी ते राज्यमंत्री आहेत. कॅबिनेट मंत्री नाहीत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. आपले म्हणणे 100 टक्के बरोबर आहे. मी परत मंत्र्यांना सांगेल की, सभागृहाच्या कामकाजापेक्षा दुसरे कोणतेही काम महत्वाचे नसते. त्यामुळे त्यांनी सभागृहामध्ये बसावे असे सांगण्यात येईल.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी दिलगिरी व्यक्त करावी.

आमची पहिल्यापासून सहकार्य करण्याची भूमिका आहे. परंतु आज सत्ताधारी पक्षातील मंत्री महोदय गैरहजर आहेत, तेच आम्हाला सहकार्य करीत नाहीत. यातून सभागृहाचा पदोपदी अवमान होत आहे. आम्ही असे म्हणणार नाही की, मंत्री महोदयांनी माफी मागितली पाहिजे. झालेल्या प्रकाराबद्दल मंत्री महोदय दिलगिरी व्यक्त करणार आहेत काय? हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, हे कसले सभागृह चालले आहे.

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, मी विधान परिषद सभागृहामध्ये होतो आणि जेवणाची वेळ होती. तरीही उशीर झाला म्हणून मी दिलगिरी व्यक्त करतो.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्री महोदयांची दिलगिरी व्यक्त करण्याची जी पध्दत आहे की जेवणाची वेळ होती वगैरे याचा आणि त्याचा काहीही संबंध नाही. माननीय अध्यक्षांच्या निदर्शनास ज्यावेळी राज्यातील कोणत्याही मंत्रिमंडळातीन कॅबिनेट मंत्र्यांची गैरहजेरी होती. एकही कॅबिनेट मंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार यांनी ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर, मला आठवते गेल्या 28 वर्षापासून आम्ही या सभागृहाचे सदस्य आहोत. माननीय अध्यक्ष बेल मारून सभागृहाची बैठक स्थगित केली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

जाते. मग माननीय मंत्र्यांना समज दिली जाते. माननीय मंत्र्याच्या अनुपस्थितीबाबत त्यांना समज देण्याची गरज आहे. तेवढी समज मंत्री महोदयांना देण्यात यावी. बाकीच्यांना जेवण नाही काय? हे कसे काय जेवायला जाऊ शकतात. सभागृहामध्ये येण्यासाठी एवढा वेळ का लागतो.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, पिण्याच्या पाण्यासाठी कलम 144 लागू करावा लागतो, ही सरकारची नामुष्की आहे. या नामुष्कीपासून मंत्री महोदय पळून जाण्याचा प्रयत्न करीत असतील तर ते योग्य नाही. मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये यायला पाहिजे आणि राज्यातील जनतेला आश्वासित केले पाहिजे. सभागृहामध्ये गैरहजर राहून मंत्री राज्यातील जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहात. दिनांक 17 ऑगस्ट, 2015 रोजी पाणी पुरवठा मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही पाणी देऊ. दिनांक 22 ऑगस्ट, 2015 ला मदत व पुनर्वसन मंत्री महोदय सांगतात की, लातूरला पंढरहून उजनी धरणाचे पाणी देऊ. दिनांक 30 मार्च, 2016 ला सोलापूर म्हणतात आम्ही लातूरला भुसावल रेल्वेने पाणी पुरवठा करु आणि आता नव्याने दिनांक 4 एप्रिल, 2016 ला सांगण्यात आले की, मिरजेहून लातूरला पाणी पुरवठा करण्यात येईल, अशी आता आम्हाला माहिती मिळाली. दुष्काळाची तीव्रता एवढी प्रचंड असताना हा जो पोरखेळ चाललेला आहे. सन्माननीय मंत्री वेगळी घोषणा करतात, अधिकारी वेगळे बोलतात. नांदेड जिल्ह्यातील कालची घटना आहे. टँकरखाली एका मुलाचा चिरडून मृत्यू झाला आणि अनेक महिला व मुलींचा विहिरीत पडून मृत्यू झाला आहे.

अध्यक्ष : टँकर आल्यानंतर लोक धावत येतात. असे होऊ नये... (अडथळा....)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, तारीख पे तारीख असे या सरकारचे काम चाललेले आहे. या लोकांना पाणी मिळणार आहे की नाही. दुष्काळग्रस्त भागाला, तहानलेल्या परिसराला सरकार म्हणून काही गांर्भीय पाळणार आहात की नाही. या सभागृहामध्ये चर्चा झाली. काल दिल्ली येथे संसदेजवळ अमरावती येथील एका शेतकऱ्याने आत्महत्या केली.

अध्यक्ष : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील मी आपल्याला सांगू इच्छितो की, स्थगन प्रस्ताव नाकारल्यानंतर सुध्दा आपण इतका वेळ त्यावर बोलले तर याला काही अर्थ आहे काय? मी सांगतो की, स्थगन प्रस्ताव नाकारल्यानंतर अर्धा मिनिटांचे ऐकून घेणे हे मी समजू शकतो. परंतु आता 5 मिनिटांपासून आपण भाषण करीत आहात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मग काय करणार.....

(सभागृहाच्या प्रेक्षक गॅलरीतून काही व्यक्ती घोषणा देत असतात)

अध्यक्ष : या परिस्थितीमध्ये मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 57 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

W-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. थोडया वेळापूर्वी घडलेली घटना गंभीर असून सभागृहाने ती गंभीरतेने घेणे आवश्यक आहे. चार तरुण युवक वरती गॅलरीमध्ये येतात आणि सरकारचा, मुख्यमंत्र्यांचा निषेध करतात. धनगर समाजाला दिलेले आरक्षण जे आश्वासन आहे. पहिल्या कॅबिनेटला ते आरक्षण देऊ अशी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी आधीच केलेली होती. ती अद्यापही पूर्ण झाली नाही. याचा निषेध आता गॅलरीपर्यंत आला. त्यामुळे किती मोठया प्रमाणात महाराष्ट्रातल्या धनगर समाजातील युवकांची भावना सरकारच्या विरोधी गेलेली आहे. आपल्या सरकारने यांना फसवलेले आहे. फसवणूक झाल्यामुळे या ठिकाणी युवक यायला लागलेले आहेत. ही बाब अतिशय गंभीर आहे.

(काही सन्माननीय सदस्य घोषणा देण्याचा प्रयत्न करतात)

श्री.जयंत पाटील : आपण माननीय मुख्यमंत्र्यांना आणि सरकारला सांगा हा अन्याय, धनगर समाजाची फसवणूक आहे. त्यातून धनगर समाजाला त्यांच्या मागण्या लवकर मान्य करुन दिलासा देण्याचे काम सरकार करणार आहे किंवा नाही ? एकदा याच्यावर पडदा पडण्याच्या दृष्टीने आपण सरकारला आदेश द्यावा आणि या प्रकरणावर योग्य तो निर्णय घ्यावा. आज गॅलरीपर्यंत आले आहेत उद्या येथे खाली येतील.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देण्याचा प्रयत्न करतात)

श्री.ग.आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, धनसमाजाच्या चार युवकांनी येऊन सरकारचे मुख्यमंत्री आहेत आणि अन्य मंत्री आहेत. त्यांनी निवडणुकीच्या वेळेला धनगर समाजाला आश्वासन दिले त्याची आठवण करुन देण्यासाठी गॅलरीमध्ये येऊन त्या आश्वासनाची पुर्तता करा अशा त-हेची मागणी केली. दिड वर्षाच्या काळामध्ये जिल्हयातून, तालुक्यातून आंदोलने झाली. नागपूरला विधानसभेवर मोर्चा आलेला होता. पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभेवर मोर्चा आलेला होता. तरी सरकार दखल घेत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ.देशमुख .....

तरीही सरकार त्याची दखल घेत नाही. सरकारने काही तरी तांत्रिक अडचण काढून हा प्रश्न टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सकडे सोपविलेला आहे. त्यांना अहवाल देण्यासाठी दीड वर्षाची मुदत दिलेली आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. आपण याबाबत सरकारला निदेश द्यावेत. सरकारने निवडणूकीपूर्वी जी आश्वासने दिलेली होती त्याची पुर्तता माननीय मुख्यमंत्री व अन्य मंत्र्यांनी करावी, अशा प्रकारचे निदेश आपण द्यावेत. यासाठी चार युवकांनी येथे घोषणा दिलेल्या आहेत. तीच मागणी मी येथे करतो व तशा प्रकारचे निदेश आपण द्यावेत अशी विनंती करतो.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, गॅलरीमध्ये झालेला प्रसंग हा अतिशय प्राथमिक स्वरूपाचा आहे. हा असंतोष संपूर्ण राज्यात गेल्यानंतर आपणास पहावयास मिळत आहे. हा असंतोष निर्माण होण्याचे कारण काय आहे ? मुख्यमंत्री महोदय प्रदेशाध्यक्ष असताना विधानसभेच्या निवडणूकीत आश्वासन दिले होते की, आम्ही सत्तेत आलो की, धनगर समाजाला आरक्षण देण्यात येईल. आपले सरकार सत्तेवर आले आहे, दीड वर्षाच्या कालावधीत 100 पेक्षा जास्त मंत्रिमंडळाच्या बैठका झाल्या आहेत. पण आपल्याशी विश्वासघात झालेला आहे, आपली फसवणूक झालेली आहे अशी भावना धनगर समाजाच्या विशेषत: या समाजातील युवकांच्या मनात निर्माण झालेली आहे. मागील सरकारमध्ये आम्ही आरक्षण देण्याचे ठरविले होते. उच्च न्यायालयानेही मान्य केले आहे, ते आरक्षण आपण काढून घेतले आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत मागील सरकारने घेतलेल्या निर्णयासाठी उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात जाऊन पाठपुरावा करण्यासाठी सरकार गंभीर नाही. मुख्यमंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते की, मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत आम्ही धनगर आरक्षणाचा निर्णय घेऊ. सरकारच्या विश्वासर्हतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. मी थोडया वेळापूर्वी दुष्काळाच्या मुद्दयाचा संदर्भ सांगत होतो की, फक्त घोषणा सुरु आहेत पण प्रत्यक्षात कृती मात्र होत नाही. हा असंतोष दिवसेंदिवस वाढत चालला आहे. दुष्काळी भागातील जनतेचा असंतोष वेगळा आहे. धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतचे आश्वासन सरकार पाळत नाही म्हणून तो असंतोष वेगळा आहे. त्याची धगधग विधानसभेपर्यत आलेली आहे. आता तरी सरकारने दिलेल्या शब्दाप्रमाणे मुस्लीम समाजाला दिलेले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .....

आरक्षण लागू करावे. तसेच मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी. धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत आम्ही निर्णय घेऊ. असे जे सरकारने आश्वासन दिले होते त्याची आता सरकारने पुर्तता करावी. राज्यातील असंतोष आता केव्हाही भडका घेऊ शकतो. याबाबत मी मुद्दाम आपल्या माध्यमातून सरकारला इशारा देऊ इच्छितो.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, मागील 25 वर्षांपासून मी बारामती तालुक्याचे प्रतिनिधीत्व करीत आहे. विद्यमान मुख्यमंत्री व तत्कालीन प्रांताध्यक्ष श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांसमक्ष सांगितले होते की, माझे मंत्रिमंडळ आल्यावर मी पहिल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आरक्षण देण्याबाबतचा निर्णय घेतो. हे उभ्या महाराष्ट्राने पाहिले आहे, अध्यक्ष महोदयांनीही टी.व्ही. वर पाहिले असेल. त्यांनी बारामती येथे येऊन सर्वांना सरबत व ज्युस दिले व ते उपोषण सोडायला लावले. आज तरुणांच्या मनामध्ये असंतोष खदखद करीत आहे. ज्या सभागृहाचे मुख्यमंत्री नेते आहेत, त्यांच्याबाबत येथे मुर्दाबादच्या घोषणा दिल्या गेल्या व आमदारांसमोर ते युवक घोषणा देऊन चालले गेले. कोणी काही बोलू शकले नाही. हे काय चालले आहे. अशा पध्दतीने सरकार चालणार आहे का ? सभागृहात उपस्थित माननीय राज्यमंत्री प्रा.राम शिंदे यांना या प्रश्नाची चांगली जाण आहे. त्यांनी याबाबत अभ्यास केलेला आहे. माझी सूचना आहे की, याबाबतचा निर्णय तातडीने घेण्यात यावा. आता त्यांनी सभागृहात येऊन गोंधळ घालण्यास सुरुवात केली. उद्या तुम्हाला महाराष्ट्रामध्ये कोणी फिरू देणार नाही. भाजपा म्हटले तर लोक म्हणतील की, चला आपापल्या घरी जा. अशा प्रकारची वेळ आल्यावर काय करायचे, आम्ही कोणाकडे बघायचे ? जर मुख्यमंत्री महोदय व मंत्रिमंडळावर ही वेळ आली तर काय करायचे ? उपस्थित मंत्री महोदय श्री.दिवाकर रावते त्यातून वेगळा काही तरी मार्ग काढतील की मी आश्वासन दिलेले नव्हते. परंतु भाजपाने काय करायचे याबाबतचा ठोस निर्णय येथे झाला पाहिजे. अध्यक्ष महोदयांनी त्यामध्ये हस्तक्षेप केला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षिरसागर : अध्यक्ष महोदय, आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे 125 वे जयंती वर्ष साजरे करीत आहोत. ही राज्यासाठी अतिशय चांगली बाब आहे. या राज्यामध्ये जाती विरहीत समाजव्यवस्था निर्माण व्हावी हे या मागील प्रधान उद्दिष्ट आहे.

अध्यक्ष महोदय, मी अतिशय गांर्भीयपूर्वक बोलत आहे. भाजपाचे नाशिकला दिनांक 2 व 3 तारखेला अधिवेशन झाले, त्याच्या समारोपाच्या गंगाघाटावरील कार्यक्रमात जाहीर सभेमध्ये नाशिक जिल्हयाचे पालकमंत्री श्री.गिरीश महाजन यांनी एका जातीला उद्देशून इतिहासातील म्हणीचा तेथे उल्लेख केला. त्यांनी म्हटले आहे की, "कहाँ राजा भोज और कहाँ गंगू तेली." अशा प्रकारे एका जातीला दुषण दिलेले आहे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

अध्यक्ष महोदय, त्यांना विसर कसा पडला की, कोणत्याही जातीमध्ये जन्माला आल्यामुळे माणसाचे कर्तव्य सिध्द होत नाही. आज योगायोगाने देशाचे पंतप्रधान श्री.नरेंद मोदी हे सुध्दा तेली समाजाशी संबंधित आहेत. मंत्री महोदयांनी या समाजाची माफी मागितली पाहिजे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

अध्यक्ष : तुम्ही ही जात माननीय पंतप्रधान श्री.नरेंद मोदी यांच्या जातीला का जोडता ? या म्हणीला माननीय पंतप्रधानाच्या जातीशी जोडण्याचा काही संबंधित नाही. हा भाग सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.

सरदार तारा सिंह : अध्यक्ष महोदय, मेरा मुद्दा यह है कि पिछले हफ्ते में भी 4-5 लड़कों ने इसी तरह का गोंधळ किया था. हम लोगों का कोई आदमी आता है तो उसके लिए 2.00 बजे तक कोई पास नहीं मिलता है. ये लोग अंदर कैसे आए ? आज ये लोग यहाँ आकर चिल्लाए. मुख्यमंत्री जी के खिलाफ बोले. आपने उस समय कहा था कि जिसकी साईन से ये लोग अंदर आएंगे वह आगे से साईन नहीं करेंगे. मैं आज आपसे निवेदन करता हूं कि यह रोज की दंगलबाजी शुरु हो गई है. कोई भी आता है, कुछ भी समझता है. जिसके हस्ताक्षर से लोग अंदर आए है उनके हस्ताक्षर इसके आगे मंजूर नहीं किए जाए, ऐसा मेरा निवेदन है.

अध्यक्ष : मी याबाबत निर्णय देणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

05-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) X-4

PNG/ AKN/ ST/ 14:10

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, आता आपण सर्वजण ज्या मुद्यावर बोलल`आहेत, त्यावरच मी बोलणार आहे. या सार्वभौम सभागृहात असे वारंवार घडायला नको आहे. अशा प्रकारची ती घटना होती. त्यांची भावना खरी होती. मी सन्माननीय सदस्यांच्या व्यक्त केलेल्या भावनेशी 100 टक्के सहमत आहे, अशी ती घटना होती. भाजपाच्या तत्कालीन प्रदेशाध्यक्षांनी आम्ही धनगरसमाजाला आरक्षणामध्ये सामावून घेऊ. मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्याची घोषणा केली होती याबाबत दुमत नाही. ते स्वत:ही हे नाकारणार नाहीत. धनगरांना आरक्षण देण्याबाबत आमच्या पक्षाचे धोरण आहे. हेच माननीय मुख्यमंत्री यांचे धोरण आहे. या सभागृहातील एकही सदस्य या विरोधात सांगणार नाही.

अध्यक्ष महोदय, सभागृहात आता झालेल्या घोषणबाजीचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला आहे. तत्कालीन प्रदेशाध्यक्षांनी ही देखील घोषणा केली होती की, जो कोणी भ्रष्टाचारी असेल, त्याला जेलमध्ये घातल्याशिवाय राहणार नाही. त्यांना जेलमध्ये घालण्यास आम्हाला दीड वर्ष लागले आहे. म्हणजे धनगर समाजाला आरक्षण देण्याची त्या काळात केलेली घोषणा अस्तित्वात येणार आहे.

यानंतर वाय-4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.योगेश सागर.....

आणि त्यामुळे या देशामध्ये व राज्यामध्ये भ्रष्टाचार केलेल्या लोकांना जेलमध्ये टाकण्यात येईल, ही घोषणाही शासनाने सार्थ करुन दाखविलेली आहे.

अध्यक्ष : हा विषय गंभीर आहे....(अडथळा)....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, धनगर समाजाच्या चार मुलांनी गॅलरीतून या सार्वभौम सभागृहामध्ये घोषणाबाजी केलेली आहे. मी त्यांच्या भावनांशी सहमत आहे. या शासनाने धनगर समाजाला आरक्षण देण्याकरिता यापूर्वी ठराव केला होता. माननीय श्री.शरद पवार हे या राज्याचे मुख्यमंत्री असताना 1993 मध्ये तो ठराव परत आणलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आता ते आरक्षण देण्याची गरज नाही, (अडथळा) अशी एक भूमिका त्या सरकारने घेतल्यामुळे दुसरी भूमिका या सरकारला घ्यावयाचे असेल तर कुठेतरी याबाबतची मते व या संदर्भातील अभ्यास याकरिता वेळ लागण्याची शक्यता आहे. या संदर्भात अभ्यास करण्याकरिता वेळ लागतो व मते तपासण्याकरिताही वेळ लागत आहे, याबाबत आमच्या मनामध्ये यत्किंचितही शंका नाही. (अडथळा) आमच्या मनामध्ये पाप नाही. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, वीज बिल माफ करावे. लगेच शासनाने काही वीज बिले माफ केलेली आहेत. ही कोणती गोष्ट आहे ? मी या धनगर समाजामध्ये जन्माला आलेलो आहे. (अडथळा) देशद्रोही तर हे लोक आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी महेश्वर 28 वर्षे राज्य केले होते. महेश्वर येथील नर्मदेच्या काठावर त्यांचा पूर्णाकृती पूतळा मी उभारलेला आहे. संताजी जगनाडे महाराजांचा पूतळा कोणी बसविला ? यांच्या नियतीमध्ये खोट आहे. (अडथळा) माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आम्हाला विश्वासात घेऊन कबूल केलेले आहे. टाटा इन्स्टिटयूटचा यासंदर्भातील अहवाल आल्यानंतर धनगर आरक्षणासंबंधीचा ठराव केंद्र शासनाकडे जाऊन त्यांच्याकडून तो मंजूर करुन आणण्यात येईल, असे त्यांनी सांगितलेले आहे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर आणि सन्माननीय सदस्य श्री.अनिल गोटे यांनी सभागृहामध्ये धनगर समाजाच्या आरक्षणासंदर्भात सरकारची बाजू मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. ते सरकारमध्ये नाहीत. या दोघांच्या हातात काही नाही. भाषण देण्यापलीकडे हे काही करु शकत नाहीत. सरकारने काहीतरी याबाबत केले पाहिजे. सरकारला याबाबत समज द्यावी. धनगर समाजाला न्याय देण्यासाठी अध्यक्ष म्हणून आपण पुढाकार घेऊन सरकारला निर्देश द्यावेत.

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, यापूर्वी गॅलरीतून चार धनगर समाजाच्या तरुणांनी घोषणा दिल्यानंतर त्या तरुणांसोबत इतर प्रेक्षकांनाही बाहेर काढण्यात आले. लोक 300-400 कि.मी.अंतराहून आमदारांची पत्रे घेऊन प्रेक्षक गॅलरीत कामकाज बघण्याकरिता येत असतात. अशा प्रकारे त्यांना गॅलरीतून बाहेर काढून देणे योग्य नाही. याबाबत माननीय अध्यक्षांनी कोणताही निर्णय अद्याप दिलेला नाही.

अध्यक्ष : सभागृहामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी धनगर समाजाच्या आरक्षणासंदर्भात मुद्दा मांडलेला आहे. गॅलरीतून काही धनगर समाजाच्या युवकांनीही धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत घोषणा दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.ग.आ.देशमुख यांनी टाटा इन्स्टिटयूटकडे हा विषय सोपविलेला असल्याची आठवण करुन दिलेली आहे. त्यांचा अहवाल लवकरात लवकर येऊन त्यावर शासनाच्या वतीने लवकर निर्णय घेतला गेला पाहिजे. आपले मतही सरकारच्या वतीने मांडले गेले पाहिजे. सरकार याबाबतचे मत मांडेल. मी पत्रकार महोदयांनाही विनंती करीत आहे की, हा प्रकार सभागृहाच्या बाहेरील म्हणजे गॅलरीतील असला तरीही याला फार प्रसिध्दी देता कामा नये. या प्रकाराला जर प्रसिध्दी मिळावयाला लागली तर असे वारंवार घडेल. ज्या आमदारांनी या युवकांना पासेस दिले असतील, त्यांना मागील वेळी मी या संदर्भात सांगितले होते की, त्यांना पुन्हा कोणाला पास देता येणार नाहीत. आता त्या आमदाराचे मी नाव घेत नाही. मी पुन्हा या मताला आलेलो आहे की, जे आमदार अशा प्रकारचे पासेस देत असतील त्यांच्यावर कारवाई करण्याचे वेळ येऊ नये, एवढीच विनंती मी या निमित्ताने करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे.

श्री.विलासराव जगताप : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, जत तालुका, जि.सांगली मध्ये मोठया प्रमाणात अवैधपणे मटका,जुगार,चंदन तस्करी, वाळू तस्करी हे धंदे चालू असणे, तसेच अवैधपणे काळया -पिवळया गाडया चालणे, ओवरलोड गाडया यांचाही गंभीर प्रश्न बनला असणे, धक्कादायक बाब म्हणजे मटका,जुगार यासारखे धंदे हे जत पोलीस स्टेशनच्या आवारात खुलेआमपणे चालू असणे, तसेच या अवैध धंदेवाईक चालकांकडून पोलीस मोठयाप्रमाणात हप्ते गोळा करत असणे, त्यामुळे अवैध धंदेचालक राजरोस बिनधास्तपणे अवैध धंदे करीत असणे व त्यांच्यावरती पोलिसांचा काही वचक नसणे, गेल्या आठवडयातच एपीआय शेख या अधिका-याने आरोपीकडून जत पोलीस स्टेशनच्या आवारातच रुपये दहा हजार लाच घेताना लाचलुचपत विभागाने पकडले असणे, त्यामुळे जत पोलीस स्टेशन मधील वरिष्ठ अधिका-यांकडूनच हे अवैध धंद्यांना अभय मिळत असल्याने तालुक्यातील जनतेमध्ये मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झाला असणे, तसेच तालुक्यातील जनता ही दुष्काळाने होरपळत असणे त्यामुळे जनतेला कोणी वाली नसल्यासारखे झाले असणे, त्यामुळे तालुक्यात मोठा उद्रेक होण्याची शक्यता निर्माण झाली असणे, त्यामुळे अवैध धंद्यांना अभय देणा-या पोलीस अधिकारी व कर्मचा-यांवर कठोर कार्यवाही होण्याची गरज निर्माण झाली असणे, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच लक्ष घालून कार्यवाही करण्याची व जत तालुक्यातील जनतेला न्याय देण्याची आवश्यकता व उपाययोजना.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये ज्याप्रमाणे धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत मुद्दे मांडले गेले, त्यावर आपण निर्णय दिला. त्याचप्रमाणे मुस्लिम व मराठा समाजाच्या आरक्षणाबाबतही प्रश्न प्रलंबित आहेत. यामध्ये शासनाने लक्ष घालणे आवश्यक आहे. त्यासंदर्भातही सरकारने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी अध्यक्ष म्हणून आपल्या मार्फत विनंती करण्यात यावी.

अध्यक्ष : आता सर्व विषय या निमित्ताने आणून त्यावर चर्चा करायची आहे का ? मी हे पण ऐकले होते की, निवडणुकीच्या वेळी दिलेल्या घोषणा व आश्वासने पाळावयाची नसतात, असे यापूर्वी या सभागृहामध्ये घडलेले आहे. यावर चर्चा झालेली आहे. निवडणुकीच्या वेळी दिलेली आश्वासने पाळायची नसतात, हे देखील यापूर्वी घडलेले आहे. पुन्हा पुन्हा ते काढण्यात येऊ नये.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील: अध्यक्ष महोदय, मराठा समाजाच्या बाबतीत सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करावयाचे ठरविलेले आहे. परंतु त्यावर गांभीर्याने विचार केला जात नाही. मुस्लिम समाजाचे आरक्षणही उच्च न्यायालयाने मान्य केलेले होते परंतु त्यावर अद्यापहि अधिसूचना काढलेली नाही. म्हणून ते आरक्षण अद्यापहि सरकार देऊ शकलेले नाही. जशी धनगर समाजाच्या आरक्षणासंदर्भात फसवणूक झालेली आहे. तशी मराठा व मुस्लिम समाजाच्या आरक्षणासंदर्भातही सरकारने आमची फसवणूक केलेली आहे, ही जी भावना आहे.....(अडथळा)

अध्यक्ष : सर्व समाजाच्या आरक्षणासंदर्भात शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

झेड-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

(चर्चा पुढे सुरु.....

श्रीमती प्रणिती शिंदे : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मी विडी कामगारांच्या न्याय हक्काच्या संदर्भात सभागृहात वारंवार मागणी करून देखील त्यांना न्याय मिळत नाही. मी विडी कामगारांच्या संदर्भात कालच पुरवणी मागण्यांवरील माझे भाषण केलेले होते. कालच सोलापूर जिल्ह्यातील दोन महिला विडी कामगारांनी आत्महत्या केलेली आहे. सरकार विडी कामगारांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत नाही. श्रीमती पद्दा पद्माकर आव्हाड आणि श्रीमती सायरा बानू नाझीर पठाण या महिला विडी कामगार कर्जबाजारी होत्या. गेल्या 5 दिवसांपासून विडी उद्योग बंद आहेत. सरकारने त्यांच्या न्याय हक्काच्या संदर्भात तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. विडी कामगारांसाठी पेंशन योजना सुरु केली पाहिजे नाही तर त्यासंदर्भातील अट तरी शिथिल करावी, अशी माझी मागणी आहे. आम्ही आज सकाळी विडी कामगारांच्या न्याय हक्कासाठी माननीय पालकमंत्री श्री. विजय देशमुख यांच्यासमवेत मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी विडी कामगारांच्या संदर्भात कोणते धोरण निश्चित केलेले आहे, याबाबतची माहिती माननीय पालकमंत्री श्री. विजय देशमुख यांनी सभागृहाला देण्याची गरज आहे. आज राज्यात तीन लाख विडी कामगार महिला आहेत. अशा महिलांवर आत्महत्या करण्याची वेळ येऊ नये म्हणून सरकारने विडी कामगारांच्या बाबतीत धोरण निश्चित करावे, अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. उल्हास पाटील : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील साखर कारखान्यांकडून चालू वर्षी गाळप झालेल्या ऊसापोटी द्यावयाच्या एफआरपीची रक्कम 15 फेब्रुवारी, अखेर 12 हजार 707 कोटी रुपये होती. त्यापैकी 9 हजार 179 कोटी रुपये कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केलेले आहेत. सद्य:स्थितीत 3 हजार 530 कोटी रुपये अद्यापही देणे बाकी आहेत. गत वर्षाच्या थकीत देय रक्कमेचा आकडा अद्यापही 241 कोटी रुपये असल्याने एकूण 3 हजार 771 कोटी रुपये देय आहे. तरी सदरची असलेली एमआरपीची रक्कम संबंधित कारखान्यांनी तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यासंदर्भात ताडीने कार्यवाही करावी, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

.....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील शिक्षण विभागातील संच मान्यतेचे निकष बदलल्यामुळे राज्यातील 1 लाख शिक्षक अतिरिक्त होत आहे. या निर्णयाच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा शिक्षक संघटनांनी दिलेला आहे. राज्यातील 20 पेक्षा कमी पट संख्या असलेल्या 13 हजार शाळा बंद होणार आहेत. त्यामुळे दुर्गम भागातील मुलांच्या शिक्षणाची मोठ्या प्रमाणात गैरसोय होणार असल्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि कर्मचाऱ्यांमध्ये चिंतेचे आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झालेले आहे. या गंभीर बाबीकडे शासनाने अक्षम्य दुर्लक्ष केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, आपण सर्वजण मानवविकास निर्देशांक वाढावा म्हणून शिक्षण आणि आरोग्याकडे विशेष लक्ष देऊन अधिक प्रमाणात खर्च करीत असतो. या वर्षी राज्यात सर्वशिक्षा अभियानावर 740 कोटी रुपये तर मागील वर्षी 1690 कोटी रुपयांची तरतूद केलेली होती. शिक्षणाच्या बाबतीत सहा ते चौदा वर्षे वयोगटातील बालकांना पहिली ते आठवीपर्यंतचे मोफत शिक्षण हे नजिकच्या शाळेतून द्यावे, अशी केंद्र शासनाची अट आहे. ही अट राज्य शासनाने स्वीकारलेली आहे. या निर्णयामुळे डोंगराळ आणि दुर्गम भागात आणि विशेषत: दुष्काळी परिस्थितीमध्ये खूप मोठा अन्याय होणार आहे. त्यामुळे आपल्यामार्फत माझी शासनाला विनंती आहे की, राज्यातील 20 पेक्षा कमी पटसंख्येच्या 13 हजार शाळा बंद न होण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश हाळवणकर : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने जून 2015 मध्ये मॅन्युअल टायपिंग बंद करून संगणक टायपिंगबाबत आदेश जारी केलेला आहे. त्यामुळे 3500 संस्था चालकांच्या उदरनिर्वाहचा प्रश्न निर्माण झालेला आहे. टायपिंगची 30 श.प्र.मी. गती असल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्याला संगणकावर काम करता येणार नाही.

अध्यक्ष महोदय, 3500 संस्था चालकांचा व्यावसायीक विचार करून मॅन्युअल टायपिंगच्या 30 श.प्र.मी.च्या परीक्षांची कॉम्प्युटर टायपिंगच्या परीक्षेस पूर्व अट (प्रि कंडीशन) करणेविषयी शासनाला योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश देण्याची विनंती करीत आहे. तसेच राज्य शासनाने जून 2015 मध्ये मॅन्युअल टायपिंग बंद करून संगणक टायपिंगबाबत दिलेला आदेश मागे घ्यावा अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

.....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयकुमार गोरे : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या तीन ते चार दिवसांपासून सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य हे भारत माता की जय अशा घोषणा देत आहेत. सर्वजण किती देशभक्त आहोत असे दाखविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, कुकडवार (मस्करवाडी) तालुका माण, जिल्हा सातारा येथील सुनील विठ्ठल सूर्यवंशी हे अतिशय शूर असलेले जवान भारताच्या सिमारेषेवर फेब्रुवारी, 2016 मध्ये शहीद झालेला आहे. त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी अनेक मान्यवारांनी भेटी दिलेल्या आहेत. माननीय पालकमंत्र्यांनी शहीद कुटुंबीयांची भेट घेतली नाही. पालकमंत्री येणार म्हणून शहीद जवानाचा अंत्यविधीच्या कार्यक्रमास दोन तासांचा उशीर झालेला होता. कर्नाटकमधील देखील एक जवान शहीद झालेला आहे. कनार्टक सरकारने शहीद जवानांच्या कुटुंबीयांना 25 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केलेली आहे. तसेच शहीद जवानाच्या कुटुंबींयाला 4 एकर भूखंड आणि शहीद जवानाच्या पत्नीला नोकरी दिलेली आहे. अशा पध्दतीचा निर्णय तामिळनाडू सरकारने घेतलेला आहे. तामिळनाडू सरकारने शहीद जवानाच्या कुटुंबींयाला भूखंड, 20 लाख रुपयांची आर्थिक मदत आणि शहीद जवानाच्या पत्नीला नोकरी दिलेली आहे. परंतु, महाराष्ट्र शासनामधील एकाही मंत्र्यांनी शहीद जवानाच्या कुटुंबीयांची भेट घेतलेली नाही. माननीय पालकमंत्र्यामुळे शहीद जवानाच्या अंत्यविधीस दोन तासाचा उशीर झालेला होता. माननीय पालकमंत्र्यांनी शहीद जवानांच्या कुटुंबीयांची भेट घेतली नाही. कर्नाटक सरकारने शहीद जवानांच्या कुटुंबीयांना विमानाने दिल्लीला नेऊन मदत दिलेली आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने शहीद कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची भूमिका घ्यावी अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करीत आहे आणि शासन तशी भूमिका घेईल अशी मी अपेक्षा व्यक्त करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय कदम : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या दापोली मतदारसघातील दाभोळ येथे जून, 2016 मध्ये 220 मिलीमिटर पाऊस पडलेला होता. अतिवृष्टीमुळे दरड कोसळून 5 लोकांचे प्राण गेलेले आहेत. शासनाने मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत दिलेली आहे. अतिवृष्टीमुळे दरड कोसळून 5 लोकांचे प्राण गेलेले आहेत. तसेच ढिगाऱ्याखाली 5 लोकांचे मृतदेह स्थानिक ठेकेदार, नागरीक व प्रशासनाच्या मदतीने बाहेर काढण्यात आले होते. परंतु, अतिवृष्टीमुळे कोसळलेल्या ढिगाऱ्याचे काम ज्या ठेकेदारांनी केले त्यांना अद्यापपर्यंत शासनाने कोणताही मोबदला दिलेला नाही. तरी संबंधित ठेकेदारांना मोबदला देण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती ज्योती कलानी : अध्यक्ष महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, आपने मुझे औचित्य का मुद्दा पेश करने के लिए अनुमति दी है उसके लिए मैं आप सभी का बहुत बहुत शुक्रिया अदा करती हूं.

अध्यक्ष महोदय, उल्हासनगर में पानी की बहुत बड़ी समस्या है. पानी के विषय पर मैंने प्रश्न, लक्षवेधी और अर्धा तास चर्चा भी डाली, दो बार आपसे भी मिली हूं. अब औचित्य का मुद्दा उपस्थित कर रही हूं. उल्हासनगर एमआईडीसी से पानी खरीदता है. 160 एमएलडी पानी शहर से और पाले टॅपिंग से 40 एमएलडी पानी मिलता है. पानी की कमी के कारण कटौती हुई. 30 प्रतिशत कटौती घोषित की गई. ऐसा लग रहा है कि उल्हासनगर के साथ सौतेली माँ जैसा व्यवहार किया जा रहा है. 55 प्रतिशत पानी की कटौती की गई है. पाले टॅपिंग से 45 एमएलडी पानी मिलता था. आज की तारीख में शहर से 20 एमएलडी पानी मिलता है. वहाँ से केवल 80 एमएलडी पानी मिलता है. पानी की समस्या को लेकर शहर की हालत बहुत खराब है. मोर्चे, धरणे और मारामारी हो रही है. मैं मुख्यमंत्री जी से भी मिलकर आयी हूं. कानून व्यवस्था की स्थिति बहुत खराब हो सकती है. 141 कलम लागू हो सकती है. मुझे ऐसा लग रहा है कि उल्हासनगर के साथ डेलिब्रेटली किया जाता है. जो ॲडिशनल कटौती हमारे यहाँ लागू की है, 30 प्रतिशत कटौती मंजूर है, 25 प्रतिशत ॲडिशनल कटौती है. ॲडिशनल कटौती जल्द से जल्द रद्द कर दिया जाए. कानून व्यवस्था की स्थिति बहुत खराब होने वाली है. इस ओर ध्यान दिया जा, धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अशोक पाटील : अध्यक्ष महाराज, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबींवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महाराज, आपण माझा औचित्याचा मुद्दा स्वीकारला, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. भांडूप (पश्चिम) येथे सोनापूर परिसरात विकासकाने महानगरपालिकेच्या सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटलसाठी 2 लाख चौ.फुट क्षेत्रफळाचा भूखंड उपलब्ध करुन दिला होता. सदर भूखंडावर पूर्व उप नगरातील रहिवाशांसाठी सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटल उभारण्याचा महानगरपालिकेने निर्णय घेतला व 150 कोटी रुपयांची तरतूद करुन त्यासाठी तज्ज्ञ सल्लागाराची नियुक्ती केली. परंतु मुंबई महानगरपलिकेने तीन वर्षात सदरहू भूखंडाचा वापर न केल्यामुळे विकासकाने दोन लाख चौ. फुट क्षेत्रफळांपैकी 80 हजार चौ.फूट जागा महानगरपालिकेने परत करावी, यासाठी न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने विकासकाला 80 हजार चौ.फुटाची जागा देण्याचे आदेश दिले. यामुळे सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटल होण्याचे स्वप्न भंग पावल्यामुळे यातून लोकांमध्ये तिव्र असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे.

अध्यक्ष महाराज, भांडूप, विक्रोळी, मुलुंड, कांजूर मार्ग या परिसरात एकही मोठे हॉस्पिटल नाही. योगायोगाने महानगरपालिकेच्या जागेत एवढी मोठी जागा आलेली आहे. म्हणून तत्काळ शासनाने सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटल बांधण्याचे आदेश महानगरपालिकेला द्यावेत, अशी माझी विनंती आहे.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती सीमा हिरे : अध्यक्ष महाराज, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबींवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महाराज, नाशिक जिल्ह्यात उत्तम नगर येथील बुध्द विहाराच्या समोरील व्यापारी श्री.अनिल शिरोडे यांच्यावर अज्ञात इसमानी घरात घुसून प्राणघातक हल्ला केल्याची घटना दिनांक 13 मार्च, 2016 रोजी घडल्याने नाशिक शहरातील सिडको व त्या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हल्लेखोरांनी श्री.शिरोडे यांच्याकडील काही ऐवजही लंपास केला असल्याचे निदर्शनास आले असून अशाप्रकारे नाशिक मध्ये सरासरी 10 दिवसाच्या अंतराने एकाची हत्या होत आहे. सन 2008 पासून शहरात 291 जणांचे विविध कारणांसाठी बळी गेला असल्याची गंभीर बाब उजेडात आली आहे. सन 2015 मध्ये खुनाच्या 40 घटना घडली असल्याची नोंद पोलिसांकडे आहे. अत: याबाबतीत सदर औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनाचे लक्ष वेधत असून नाशिक शहराला विशेष सुरक्षा पुरविण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शांताराम मोरे : अध्यक्ष महाराज, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबींवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महाराज, वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील वालईपाडा येथील बेकायदेशीर खदाणीत नालासोपारा पूर्वेकडील संतोष भुवन येथील ब्रिजेश विश्वकर्मा, वय 13, अशरफ जुबेर वय, 14 व निरज विश्वकर्मा, वय 13 या तीन निष्पाप अल्पवयीन मुले दिनांक 28 जून 2015 रोजी पोहण्यासाठी पाण्यात गेले, परंतु त्यांना पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे त्यांचा बुडून मृत्यू झाला. वसई विरार या महानगरपालिकेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खदाणी सुरु असून प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे निष्पाप बळी जात आहेत. या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करावी. निष्पाप मुलांच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या संबंधित गुन्हेगारांविरुध्द कठोर कारवाई करण्यासाठी वसई विरार महानगरपालिकेचे नगरसेवक तथा गटनेत्यांनी दिनांक 1 जुलै 2015 रोजी तहसीलदार कार्यालय, वसई यांच्याकडे मागणी केली असून याबाबतीत शासनाने तातडीने कारवाई करावी, अशी माझी विनंती आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुरेश खाडे : अध्यक्ष महाराज, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबींवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महाराज, माझ्या मिरज मतदारसंघातील सोनी, सिध्देवाडी, कळंबी, पाटगाव, मानमोडी या गावात राहणाऱ्या शेतकरी वर्गास मोकाट जनावरांचा मोठ्या प्रमाणात त्रास सोसावा लागत आहे. या परिसरात गाई व बैलाचे कळप फिरत असून शेतीचे नुकसान करीत आहेत. या कळपाने शेतात काम करणाऱ्या महिला व ग्रामस्थांवर सामुदायिक हल्ले केले आहेत. मोकाट जनावरे कळपाने शेतात शिरून संपूर्ण निकाचे नुकसान करीत आहेत. म्हणून मिरज तालुक्यातील सोनी, सिध्देवाडी, कळंबी, पाटगाव, मानमोडी या गावात मोकाट फिरणाऱ्या जनावरांचा तातडीने बंदोबस्त करण्यासाठी शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल केदार : अध्यक्ष महाराज, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबींवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महाराज, या सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी आपल्यावर आहे. आपण आमची नेहमी काळती घेत असतात, याबद्दल आमच्या कोणाच्याही मनामध्ये शंका नाही. मनोरा आमदार निवासाच्या इमारतीची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. मनोरा आमदार निवासात राहणाऱ्यांच्या अंगावर इमारतीचा काही भाग केव्हा पडेल हे सांगता येत नाही. एखाद्या वेळेस दुर्दैवाने काही घटना घडली तर एकाचवेळी श्रध्दांजली वहावी लागेल. हा विषय अतिशय महत्वाचा आहे. स्ट्रक्चरलर इंजिनिअरने या इमारतीचे ऑडिट केलेले असून मुंबई महानगरपालिकेने सुध्दा ही इमारत धोकादायक असल्याचे कळविले आहे. या मनोरा इमारतीच्या संदर्भात आपण आपल्या दालनात सर्वपक्षीय बैठक बोलावून हा विषय हे अधिवेशन संपण्यापूर्वी निकाली काढण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष : सर्वपक्षीच आमदारांची बैठक घेण्यासाठी एवढी जागा माझ्याकडे नाही.

श्री.सुनिल केदार : अध्यक्ष महाराज, ही बाब अतिशय गंभीर आहे. सन्माननीय सदस्यांच्या एखाद्या खोलीमध्ये डागडुजी करायची असेल तर पूर्ण इमारत हालते.

अध्यक्ष : आपण यावर निर्णय घेतलेला आहे.

श्री.सुनिल केदार : अध्यक्ष महाराज, आपण ही बाब गंभीरतेने घेतली पाहिजे. हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर आपण आपल्या दालनात सर्वपक्षीय आमदारांची एक बैठक बोलवावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष : मनोरा आमदार निवासाच्या इमारतीला फक्त 25 ते 30 वर्षेच झालेली आहेत.

श्री.सुनिल केदार : अध्यक्ष महाराज, कुठलीही अनुचित घटना घडू नये म्हणून आपण याबाबतीत निर्णय घ्यावा.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी मुळीच चिंता करु नये. कोणाही सन्माननीय सदस्यांना धोका पोहोचणार नाही याची काळजी घेण्यात येईल. या इमारतीचे आपण एकेक टप्पे पूर्ण करीत आहोत. आपण यासंदर्भात गटनेत्यांची बैठक घेऊ.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

05-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) AA-6

ADB/ AKN/ ST/ 14:40

श्री.जयकुमार रावल : अध्यक्ष महाराज, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबींवर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महाराज, माझ्या सिंदखेडा मतदारसंघात तापी नदीच्या काठाच्या जवळ साहुर ग्रामस्थांनी महिला पोरांसहित तापीकाठी जलसमाधी घेण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती इतकी गंभीर झाली होती की, महाराष्ट्र शासनाचे तहसीलदार, सर्व अधिकारी, पोलीस यंत्रणा यांनी तेथे जाऊन त्यांना तापी नदीमधून खेचले अन्यथा अत्यंत भयानक घटना घडली असती. त्यांना बाहेर काढल्यानंतर त्यांचे प्रश्न जाणून घेतले. जळगाव, नंदूरबार आणि धुळे परिसरात महादेव कोळी, टोकरे कोळी, मल्हार कोळी आणि ठाकूर हा समाज मोठ्या प्रमाणात राहतो. त्यांच्या गावांना अनुसूचित जातीचा दर्जा दिलेला आहे. येथील ग्रामपंचायतीमध्ये 90 टक्के आरक्षण आहे. त्या गावांमध्ये वडिलांकडे सर्टिफिकेट असेल तर मुलाकडे नसते. तेथे ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्यानंतर कोणीही फॉर्म भरु शकत नाही, अशा प्रकारच्या अनेक शिक्षणाच्या बाबतीत अडचणी येतात. यासंदर्भात तातडीने सरकारने निर्णय घ्यावा, अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : ब्राम्हणगाव, ता.जिंतूर,जि.परभणी येथे जुन्या भांडणावरुन एका कुटुंबातील तीन व्यक्तींची झालेली हत्या

मु. शी. : ब्राम्हणगाव, ता.जिंतूर,जि.परभणी येथे जुन्या भांडणावरुन एका कुटुंबातील तीन व्यक्तींची झालेली हत्या या संबंधी सर्वश्री अजित पवार, विजय भांबळे, दत्तात्रय भरणे, राहूल जगताप, वैभव पिचड वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अजित पवार (बारामती) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह राज्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ब्राम्हणगाव ता.जिंतूर जि.परभणी येथे जुन्या भांडणावरुन एका कुटुंबातील तीन व्यक्तींची दिनांक १ मार्च, २०१६ रोजी झालेली हत्या, पोलिसांनी या घटनेबाबत गुन्हा नोंद करुन घेण्यास दिलेला नकार, मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांनी मृतदेह पोलीस ठाण्यात ठेवून ठिय्या आंदोलन सुरु केल्यानंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेणे, गुन्हा नोंदवून घेण्यास प्रथम पोलिसांनी नकार दिल्याने या खून प्रकरणातील आरोपींना पोलीस पाठीशी घालत असल्याचा व्यक्त करण्यात येत असलेला संशय, मृत्युमुखी पडलेली महिला सहा माहिन्यांची गरोदर असून तिचा मृत्यु झाल्यामुळे तेथील महिलावर्गात पसरलेले भितीचे वातावरण, आरोपींना तात्काळ अटक करुन कठोर शिक्षा देण्याची तेथील ग्रामस्थांची होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.राम शिंदे (गृह राज्यमंत्री, ग्रामीण) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अध्यक्ष: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

05-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) AA-8

ADB/ AKN/ ST/ 14:40

श्री.अजित पवार : अध्यक्ष महाराज, ही लक्षवेधी सूचना परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्याची आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे.

यानंतर BB-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अजित पवार ....

परंतु, आपण खोलात गेलात तर आपल्याला माहिती मिळेल की, अवघ्या 16 वर्षांच्या मुलाने तक्रार दिली, त्यावेळेस प्रथम ती तक्रार डिपार्टमेंटने गांभीर्याने घेतली नाही. त्याला यांची नाव कशाला घेतो, त्यांची नावे कशाला घेतो असे सांगितले. पोलीस खाते जर अशा पध्दतीने वागायला लागले तर न्याय कोणाकडे मागायचा ?

अध्यक्ष महोदय, दिनांक 1 मार्च, 2016 रोजी अक्षरशः आपसातील वादातून हे तिहेरी खून प्रकरण उद्‌भवले आहे. ज्या महिलेचा खून झाला ती गरोदर होती. हे तिहेरे खून प्रकरण आहे हे खरे आहे का हे राज्यमंत्री महोदयांनी सांगावे. जर ते खरच असेल तर या प्रकरणात गुन्ह्याची नोंद करतेवेळी आरोपींना वाचविण्याकरिता चारठाणे पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांनी फिर्यादीवर दबाव आणला होता. आमच्याकडे तसे पुरावे आहेत, मी तुम्हाला ती सर्व महिती देण्यास तयार आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये कोणत्याही सदस्यांनी माहिती दिली तर आपण ती खरी मानतो, ही सभागृहाची आजपर्यंतची पध्दत आहे. पोलीस गुन्हेगारांना पाठीशी घालत असल्यामुळे तिसरी महिला मयत झाल्यानंतर आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्याकरिता तिचा मृतदेह पोलीस ठाण्यामध्ये आणलेला होता, हे देखील खरे आहे का, याची माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, गुन्ह्याची नोंद दाखल करुन घेत नव्हते म्हणून नातेवाईकांना शेवटी डेड बॉडी तेथे आणावी लागली आणि सांगावे लागले की, गुन्हा दाखल करा. गुन्ह्याची नोंद करण्यासाठी किंवा आरोपींना अटक करण्याकरिता ज्या पोलिसांनी टाळाटाळ केली किंवा पाठीशी घालण्याकरिता पोलीस निरीक्षक आणि त्या भागातील जमादार याला आपण तत्काळ निलंबित करणार काय ?

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे परभणी जिल्ह्यातील ब्राम्हणगाव, तालुका जिंतूर येथील ज्या घटनेच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे, ती घटना दिनांक 1.3.2016 रोजी घडली. याची पार्श्वभूमी सांगावयाची झाली तर, त्या कुटुंबामध्ये दिनांक 20.2.2016 रोजी एक एन.सी. दाखल होती. त्या अनुषंगाने ही दुसरी घटना घडलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

05-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) BB-2

SSG/ ST/ AKN/ AKN/ ST/ 14:50

प्रा. राम शिंदे ....

अध्यक्ष महोदय, ही घटना 1 तारखेला घडली आणि 2 तारखेला एफआयआर नोंद झाला. परंतु, घटना दुपारी 4.00 वाजता घडली. एफआयआरची नोंद रात्री 12 वाजून 15 मिनिटांनी झाली, त्यामुळे 2 तारीख आल्याने दिरंगाई झाल्याचे निदर्शनास येत आहे. या संदर्भात पोलिसांनी कोणत्याही प्रकारची हलगर्जी केली असेल, सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, मी पुरावे सादर करतो. त्यांनी पुरावे सादर केले त्यामध्ये पोलिसांकडून कोणतीही कुचराई आणि हलगर्जीपणा झाला असेल तर वरिष्ठ अधिकाऱ्याकडून त्याची स्वतंत्रपणे चौकशी करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

अध्यक्ष महोदय, त्यामध्ये तिसरी महिला दिनांक 6.3.2016 रोजी दगावली आहे. जी महिला दगावली ती गर्भवती होती का, याबाबत सांगावयाचे झाले तर, पोस्टमॉर्टेमचा या संदर्भात रिपोर्ट आलेला आहे की, ती गर्भवती नव्हती. तिच्या काकांनी हा मृतदेह डायरेक्ट पोलीस स्टेशनमध्ये आणला व त्यांनी गुन्हा नोंदवून घ्या अशी मागणी केली, त्यावेळेस तो गुन्हा नोंदवून घेण्यात आला. अगोदरची घटना आणि दुसरी जी घटना घडली, या दोन वेगवेगळ्या घटना आहेत. या संदर्भामध्ये त्या पोस्टमॉर्टेमचा रिपोर्ट व्हिसेरा अजून येणे बाकी आहे. सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार यांनी सांगितले की, ...(अडथळा) ...

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माझी या उत्तराला हरकत आहे.

प्रा. राम शिंदे : सन्माननीय सदस्य माझे म्हणणे पूर्ण होऊ द्या, माझे म्हणणे अजून पूर्ण झालेले नाही. ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे, त्यांचे समाधान अद्याप व्हायचे आहे, त्यामुळे आपल्यापर्यंत हा विषय अजून यायचा आहे.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. विजय भांबळे यांना बोलण्याकरिता संधी दिल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव मी आपणास बोलण्याकरिता संधी देईन.

प्रा. राम शिंदे : तुमच्याकडे पोस्टमॉर्टेमचा रिपोर्ट आहे काय ?

हरकतीचा मुद्दा

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी असे सांगितले की, ती महिला गरोदर नव्हती. आपणही ते ऐकले असेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : तसा पोस्टमॉर्टेमचा रिपोर्ट आहे असे त्यांनी म्हटले आहे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, परंतु या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनातील मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये काय नमूद केले आहे ते आपण पहावे. शासनाच्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, 'तसेच मृत्युमुखी पडलेली महिला 6 महिन्यांची गरोदर असल्याने तिचा मृत्यू झाल्यामुळे महिलावर्गात कसल्याही ...' याचा अर्थ शासन लेखी उत्तरामध्ये हे कबूल करीत आहे की, ती महिला गरोदर होती आणि तोंडी उत्तरामध्ये मंत्री महोदय सांगत आहेत की, ती महिला गरोदर नव्हती. याकरिता माझा हरकतीचा मुद्दा हा आहे की, यातले खरे काय आहे ? लिखित उत्तर खरे आहे की, मंत्री महोदय तोंडी उत्तर देत आहेत ते खरे आहे ?

अध्यक्ष : आपण जे उत्तर दिले आहे ते बरोबर आहे.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी असे विचारले आहे की, लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनातील जी शेवटची ओळ आहे त्यामध्ये असे नमूद केले आहे की, महिलांमध्ये घबराहटीचे वातावरण ...त्याबाबत मी हे सांगू इच्छितो की, मृत्युमुखी पडलेली महिला सहा महिन्यांची गरोदर असून तिचा मृत्यू झाल्यामुळे तेथील महिलावर्गात पसरलेले भितीचे वातावरण, हे लक्षवेधी सूचनेत नमूद केलेले वाक्य मी वाचले आहे. आता मी उत्तरातील वाक्य वाचतो ते आपण जरा नीट ऐकावे. उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, 'वर नमूद प्रकरणात पोलिसांनी वेळीच गुन्हा दाखल केला असून गुन्हा दाखल करण्यास नकार दिलेला नाही. तसेच, मृत्युमुखी पडलेली महिला सहा महिन्यांची गरोदर असल्याने तिचा मृत्यू झाल्यामुळे महिलावर्गात कसल्याही प्रकारची दहशत व भितीचे वातावरण निर्माण झालेले नाही.' मी लक्षवेधी सूचनेत आपण उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देत असताना त्याचा नकारार्थीच अर्थ आहे. आपण प्रश्न व उत्तर दोन्ही वाचले तर आपले समाधान झाल्याशिवाय राहणार नाही.

अध्यक्ष : त्यांनी खाली नाकारले आहे. महिला गरोदर नसल्याचे नाकारले आहे. महिला गरोदर असल्याने तिचा मृत्यू झाल्यामुळे महिलावर्गात कसल्याही प्रकारची दहशत व भितीचे वातावरण निर्माण झालेले नाही असे म्हटले आहे, म्हणजे ते नाकारले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

हरकतीचा मुद्दा

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, लेखी निवेदनात असे नमूद केले आहे की, 'तसेच मृत्युमुखी पडलेली महिला सहा महिन्यांची गरोदर असल्याने तिचा मृत्यू झाल्यामुळे ...' याचा अर्थ असा होतो की, ती गरोदर असल्यामुळे तिचा मृत्यू झाला...

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य आपण पुढचे वाक्यही वाचावे.

श्री. जयंत पाटील : सहा महिन्यांची गरोदर असल्याने तिचा मृत्यू झाल्यामुळे महिलावर्गात कसल्याही प्रकारची दहशत नाही, हे वाक्य तिचा खून झाला किंवा तिला विष दिले आणि तिचा मृत्यू झाला, याचा नकार करणारे वाक्य आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर आणि त्यांनी पहिल्यांदा लक्षवेधी सूचनेचे जे टेक्स्ट वाचले तेही चुकीचे वाचले. 'मृत्युमुखी पडलेली महिला सहा महिन्यांची गरोदर असून तिचा मृत्यू झाल्यामुळे' असे त्यात म्हटले आहे. त्यामुळे लक्षवेधी सूचना क्लिअर आहे त्यावरील उत्तर मात्र लोकांना संभ्रम पडेल असे आहे. त्यामुळे महिला गरोदर असल्याने मृत्यू झाला हे वाक्य आधी मागे घ्यावे. तिचा मृत्यू झाल्याचे जे कारण आहे 1 महिना उलटून गेला, तरी तुम्हाला त्या व्हिसेराचा निष्कर्ष मिळत नाही. तिचा विष पिऊन मृत्यू झाला की अजून काय याचा निष्कर्ष अद्याप आलेला नाही. एकंदरच ही केस खूप हलगर्जीपणाने हँडल करण्यात आलेली आहे. पहिल्यांदा तो लहान 16 वर्षांचा मुलगा अनेकांची नावे घेत होता, त्याला ती घेऊ दिली नाहीत. ज्यांची नावे तो घेत होता, त्यांना त्यातून बाहेर कसे ठेवायचे हा प्रयत्न तेथील पोलीस करतो, अधिकारी करतो. एका 16 वर्षांच्या मुलाला दबावाखाली ठेवून पाहिजे तशा पध्दतीने ही एफआयआरची नोंद घेतलेली आहे.

ॲड. आशिष शेलार (बसून): अध्यक्ष महोदय, ...

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, एका घरातील 3 माणसे मृत्युमुखी पडतात, त्याचे काही तरी ठेवावे. तेथे बसून दम देऊ नका, तुम्ही स्वतःला काय समजता, ही काय पध्दत आहे काय ?

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार आपण बसून बोलू नका.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, यांना जागच्या जागी सस्पेंड करा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राज पुरोहित यांना जागेवर बसण्यास सांगावे.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. राज पुरोहित आपण आपल्या जागेवर बसावे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय,सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांचा स्वभाव असा आहे की ते बोलतात एकाला आणि लागते दुसऱ्याला. काल त्यांनी आमच्याकडे बघून भाषण केले ते शिवसेनेच्या विरोधी बोलले. त्यांची ही पध्दत चुकीची आहे.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपण या लक्षवेधी सूचनेवर बोलावे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, या पध्दतीने हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर व पोलीस कॉन्स्टेबल जमादारावर सरकारने ताबडतोब कारवाई करावी, अशी मागणी आहे. सरकार ते करणार आहे काय ?

CC-1/-...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात मी पुन्हा एकदा क्लिअर करतो. यामध्ये दोन वेगवेगळी कारणे आहेत. त्या महिलेचा मृत्यू विष प्राषण करुन झाला किंवा कसे यासंदर्भात केमिकल ॲनलायझरचा रिपोर्ट प्रलंबित आहे. सदरहू रिपोर्ट आल्यानंतर योग्य ती कार्यवाही केली जाईल. परंतु सदरहू महिला गरोदर आहे किंवा नाही, यासंदर्भात संबंधित मेडीकल ऑफीसरने रिपोर्ट दिलेला असून सदर महिला गरोदर नव्हती. तो रिपोर्ट माझ्याकडे आहे. परंतु ती महिला एक्सपायर झाली. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील व इतरही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्यावर मी अगोदरच मान्य केले आहे की, आपण सांगितलेली माहिती खरी समजून याप्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्याकडून स्वतंत्रपणे चौकशी करण्यात येईल. यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचे कोणतेही कारण नाही. संबंधितांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येतील.

श्री. विजय भांबळे : ही घटना घडलेल्या कुटुंबातील मुलगा 16 वर्षाचा होता. त्या मुलाला तेथील फौजदाराने दमदाटी केल्यामुळे भीतीपोटी तो आत्महत्त्या करण्याच्या मार्गावर होता. तो स्वतः म्हणाला की, माझे आई, वडील मरण पावले आणि माझी फिर्याद घेतली जात नाही. तो पोलीस स्टेशनमध्ये दोन तास रडत बसला होता. त्याच्यासोबत कोणीही नातेवाईक नव्हते. त्याच्या कुटुंबावर एवढा मोठा आघात झाला आहे. त्याला गाडीत बसवून पोलीस स्टेशनला नेण्यात आले व तेथे दोन तास डांबून ठेवले. तु चारच नाव टाक, आठ नावे टाकू नये, असे त्याला सांगण्यात आले. ही कोणती पद्धत आहे. एवढी मोठी घटना होऊनही मंत्री महोदयांनी असमाधानकारक उत्तर दिलेले आहे. त्या कुटुंबावर मोठा आघात झालेला असून तेथील पोलिसांनी त्याला आधार देणे आवश्यक असतांना त्यांनी तसे केले नाही. त्यामुळे संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व कर्मचारी यांना तत्काळ निलंबित करण्याची सभागृहामध्ये घोषणा करावी, अशी मी आपल्या मार्फत मंत्री महोदयांकडे मागणी करतो.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य सर्वश्री. अजित पवार व जयंत पाटील यांच्या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे. दिनांक 1 मार्च 2016 रोजी हा गुन्हा घडला व दिनांक 2 मार्च रोजी त्याची नोंद करण्यात आली. 12.00 वाजेनंतर 2 तारीख सुरु झाली. हा गुन्हा 1 तारखेला 4 वाजता घडला होता. दोन मर्डर झालेल्या गुन्ह्याची प्रोसिजर पूर्ण करण्यास 4 ते 5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे.....

तासाचा कालावधी गेला. म्हणजेच 4.00 ते 12.00 च्या दरम्यानचा कालावधी प्रोसिजर पूर्ण करण्यास गेला. वेळ आल्यानंतर ही 2 तारीख पडली आहे. मी या अगोदरच मान्य केले आहे की, याप्रकरणाची 15 दिवसाच्या आत स्वतंत्ररित्या चौकशी करण्यात येईल. मर्डर झाल्याचा गुन्हा नोंदविताना असे वर्तन पोलिसांनी केले असेल तर त्यांची 15 दिवसाच्या आत वरिष्ठ अधिकाऱ्याकडून चौकशी करुन त्यांच्यावर उचित कारवाई करण्यात येईल.

अध्यक्ष : मंत्री महोदय संबंधित पीएसआय यांनी एकट्या मुलास स्वतःच्या गाडीमध्ये नेण्याचे काय कारण होते, हा प्रश्न आहे. असे झाले असेल तर सदरहू मुलगा घाबरणार नाही काय, त्याच्याबरोबर इतरांना का नेण्यात आले नाही.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, एकट्या मुलाला नेले नाही. घटना घडली त्यावेळेस तो मुलगा होता. वडिलांना आणि भावाला मोटर सायकलवरुन येत असताना अडवून कोयत्याने व काठीने मारले. त्यामुळे ते बेशुद्ध झाले, ते हातपाय हलवित होते. म्हणून त्यांना चारठाणा येथील हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले. त्यामध्ये त्याच्या वडिलांचा अंत झाला. त्यानंतर त्याच्या भावाला नांदेड येथे रेफर करण्यात आले होते. परंतु त्याचा देखील 2 तारखेला मृत्यू झाला. म्हणजेच त्याच्या वडिलांचा 1 तारेखला मृत्यू झाला तर भावाचा 2 तारखेला मृत्यू झाला. ही घटना त्याने प्रत्यक्ष पाहिली आणि पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद केला. तो मुलगा 16 वर्षाचा होता. गुन्हा नोंद करीत असताना त्यामध्ये दिरंगाई झाली नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी समजून या प्रकरणाची उच्चस्तरिय अधिकाऱ्यामार्फत संपूर्णतः सखोल चौकशी 15 दिवसाच्या आत करुन निश्चित स्वरुपामध्ये कठोर कारवाई करण्यात येईल.

अध्यक्ष : आपण दिलेली माहिती मंत्री महोदयांनी खरी मानलेली आहे. कारवाई करण्यात येईल असे त्यांनी सांगितलेले आहे. त्यामुळे आपण खाली बसावे.

श्री. विजय भांबळे : अध्यक्ष महोदय, माझा शेवटचा मुद्दा आहे. कृपया मला थोडे बोलू द्यावे. याप्रकरणाची 15 दिवसामध्ये चौकशी करण्यात येईल असे आपण सांगितले. या चौकशीमध्ये या 16 वर्षीय मुलाचा जवाब घेण्यात यावा व त्यानंतर अहवाल मागवून दोषी अधिकाऱ्यांना 15 दिवसात निलंबित करण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, होय.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, हे प्रकरण गंभीर आहे, हे आपण देखील मंत्री महोदयांच्या लक्षात आणून दिलेले आहे. मंत्री महोदयांनी लेखी स्वरुपात दिलेले उत्तर आणि घटना बघितल्यानंतर संशय वाढतो. एकट्या मुलालाच का घेऊन गेले, यासंदर्भात स्पष्टीकरण मिळत नाही. दोघांचा रस्त्यामध्ये मर्डर झाला हे माहीत असताना एकट्या मुलालाच पोलीस स्टेशनमध्ये नेले जाते. तसेच 8, 8 तास एफआयआर दाखल केला जात नाही. कै. दिक्षा व्हावळे आणि कै.मल्हारी व्हावळे यांचा देखील व्हीसीआरचा रिपोर्ट आलेला नाही. मुख्यमंत्री महोदय आपण याकडे लक्ष द्यावे, अशी मी विनंती करतो. 15 दिवसामध्ये माझी खात्री झाली तर, असे राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. 15 दिवसामध्ये कोण चौकशी करणार आहे. ज्या अधिकाऱ्याबद्दल संशय निर्माण होतो, तोच अधिकारी 15 दिवस चौकशी करणार असेल तर त्या चौकशीमधून काय निष्पन्न होणार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार आणि इतर सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे या अधिकाऱ्यास तत्काळ ससपेंड करणार आहात काय, या अधिकाऱ्यास ससपेंड करणार नसाल तर आजच्या आज त्याच्याकडील तपास काढून वरिष्ठ अधिकाऱ्याकडे देऊन हा तपास नि:पक्षपातीपणे करणार आहात काय, असा माझा आपल्यामार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव हे कन्फ्युजन करीत आहेत. मी अतिशय स्पष्ट उत्तर दिलेले आहे. या दोन्ही घटना वेगवेगळ्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विजय भांबळे यांनी त्यांच्या मतदार संघातील प्रश्न विचारलेला आहे. संबंधितांच्या मुलाने ही केस नोंदविलेली आहे. मी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या मार्फत सांगितले. ॲडीशनल एसपी यांच्या माध्यमातून ही चौकशी करण्याचे मी सांगितले...(अडथळा)...मी खात्री म्हटले नाही. त्यांनी केस लवकर नोंदविली नाही, यामध्ये दिरंगाई झाली, नावे कमी करा असे सांगत होते, मुलाचा योग्य जवाब घेतला नाही, यासंदर्भात स्वतंत्र चौकशी करण्यात येईल, असेच मी सांगितले आणि आताही तेच सांगतो. हा एक भाग वेगळा आहे. ॲडीशनल एसपी यांच्या माध्यमातून 15 दिवसाच्या आत चौकशी करण्यात येईल. केस नोंदविण्यामध्ये दिरंगाई केली असेल, हलगर्जीपणा केला असेल, कोणाला पाठीशी घातले असेल, कोणाला सोडण्याचा प्रयत्न केला असेल, कोणाला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. राम शिंदे.....

जाणिवपूर्वक त्रास देण्याचा प्रयत्न केला असेल या सर्व मुद्याचा समावेश करण्यात येईल. तसेच सन्मानीय सदस्य श्री. विजय भांबळे यांनी सांगितले की, त्या मुलाचा जवाब घेण्यात यावा. त्या चौकशीमध्ये सदरहू मुलाचा जवाब घेण्याची बाब देखील अंतर्भूत केली जाईल. अतिरिक्त एसपी यांच्या माध्यमातून 15 दिवसात चौकशी पूर्ण करुन चौकशीअंती अहवालामध्ये नमूद असेल त्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. मी खात्री म्हटलेच नाही. तसेच एपीआयच्या माध्यमातून ही चौकशी सुरु आहे. तसेच हा गुन्हा चौकशीसाठी, तपासण्यासाठी डीवायएसपीकडे देण्यात येईल.

---*---

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : राज्यात ***सन १९७६ मध्ये अंमलात आलेल्या*** कमाल नागरी जमीनधारणा ***कायद्यांतर्गत पुणे महानगर क्षेत्रामध्ये एका धारकास १००० चौ.मी. रहिवासी क्षेत्र धारण करण्यास परवानगी देण्यात आलेली असून त्या धारकाचे उर्वरित रहिवासी क्षेत्र अतिरिक्त ठरविण्यात येणे.***

मु. शी. : राज्यात ***सन १९७६ मध्ये अंमलात आलेल्या*** कमाल नागरी जमीनधारणा ***कायद्यांतर्गत पुणे महानगर क्षेत्रामध्ये एका धारकास १००० चौ.मी. रहिवासी क्षेत्र धारण करण्यास परवानगी देण्यात आलेली असून त्या धारकाचे उर्वरित रहिवासी क्षेत्र अतिरिक्त ठरविण्यात येणे यासंबंधी*** वि.स.स. प्रा. मेधा कुलकर्णी यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मेधा कुलकर्णी (कोथरुड) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"राज्यात ***सन १९७६ मध्ये अंमलात आलेल्या*** कमाल नागरी जमीनधारणा ***कायद्यांतर्गत पुणे महानगर क्षेत्रामध्ये एका धारकास १००० चौ.मी. रहिवासी क्षेत्र धारण करण्यास परवानगी देण्यात आलेली असणे व त्या धारकाचे उर्वरित रहिवासी क्षेत्र अतिरिक्त ठरविण्यात आले असणे, सदरच्या कायद्यामधील कलम २० मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार मिळकत धारकास मिळकत विकसित करता येणे, त्या योजनेप्रमाणे जर धारकाने सदरचे क्षेत्र सहकारी गृहनिर्माण संस्थेला विक्री करण्याचे मान्य केल्यास तेवढे रहिवासी क्षेत्र हे विकसित करण्यास परवानगी देण्यात आलेली होती व त्यानुसार शहरांमध्ये अनेक धारकांनी नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांना जमिनी विकून अशा जमिनींवर असंख्य गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचे झालेले बांधकाम, सदरच्या इमारतींना आता ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असून अनेक इमारती धोकादायक स्थितीत असल्याने अशा इमारतींचे पुनर्विकास करणे आवश्यक झालेले असणे, केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे राज्य शासनाने*** कमाल नागरी जमीनधारणा ***कायदा निरसित करीत असताना कलम २० व २१ अंतर्गत सूट दिलेल्या योजना मात्र राखून ठेवण्यात आलेल्या असणे, सदर इमारतींचे पुनर्विकास करावयाचा असल्यास*** शासनाकडे ***ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी पुणे महानगरपालिकेतर्फे करण्यात येणे, कोथरूड (जि.पुणे) येथील दिपविश्व को-ऑप हाऊसिंग सोसायटी अशा ना-हरकत पत्राची मागणी गत ३ वर्षापासून*** शासनाकडे ***करीत असून अद्याप त्यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात न येणे, पुणे शहरात इमारतींच्या बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यात येऊन ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेला असणे, मिळकतींचे संपूर्ण क्षेत्र हे सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या मालकीचे आहे अशा परिस्थितीत संस्थेच्या क्षेत्राच्या बाजारमूल्याच्या २.५% रक्कम संस्थेकडून भरून घेऊन आणि शासनाचा निर्णय***

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

होईल त्याप्रमाणे उर्वरित रक्कम भरणार अशा हमीपत्र दाखल करण्याच्या शर्तीवर त्यांना त्वरित ना- हरकत पत्र देता येणे शक्य असणे, एखाद्या धारकाची जमीन marginal surplus ठरत असल्यास यापूर्वी बाजारमूल्याच्या २.५% रक्कम भरून देऊन अशी जमीन धारण योग्य करून देण्यात येत होती ***त्याप्रमाणेच आता निर्णय घेण्याची*** आवश्यकता ***असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."***

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...7/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. राज पुरोहित यांनी जागेवर बसावे. आपण बाहेर जाऊन चर्चा करावी.

प्रा. मेधा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, विचारण्यात आलेल्या प्रश्नाचे सोल्युशन उत्तरामध्ये आले नाही. हा प्रश्न अत्यंत गंभीर असून पुण्यामधील साधारणत: 500 ते 700 मिळकती बाधित होऊन हजारो नागरिक बाधित झालेले आहेत. युएलसी निरसीत झालेला असताना आज रोजी जागेची मालकी ज्या नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांकडे आहे, अशा संस्थांना, इमारतींना हा युएलसी कायदा लागू होतो काय, तसेच कलम 20 आणि 21 अंतर्गत अटींचे पालन करुन ज्या इमारती बांधण्यात आल्या असून त्यांना 30 ते 35 वर्षे पूर्ण झालेले आहेत. या इमारती आता मोडकळीस आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकार कोणती भूमिका घेणार आहे. तसेच ज्या संस्थांचे तीन वर्षांपासून विनंती अर्ज विभागाकडे प्रलंबित आहेत, त्यांच्या प्रस्तावास सरकार न्याय देणार आहे काय, असे माझे तीन प्रश्न आपल्यामार्फत मुख्यमंत्री महोदयांना आहेत.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे, ती वस्तुस्थिती आहे. यामध्ये कायदेशीर पेच निर्माण झाला आहे. ज्यावेळेस युएलसीचा कायदा रद्द केला, त्यावेळी आपण सेक्शन 20 सेव्ह केला आणि तो सेव्ह केल्यामुळे त्या अंतर्गत ज्या स्कीम झाल्या आहेत, त्या स्कीम पुरता तो कायदा लागू आहे, असे आपण समजतो. युएलसी कायद्यांतर्गत अनेक वसाहती तयार झाल्या. युएलसीच्या कायद्याप्रमाणे तयार करावयाची छोटी घरे तयार झाली व लोक तेथे रहायला गेले. आज अनेक वर्षानंतर तेथे रिडेव्हलपमेंटची स्थिती आली. काही ठिकाणची घरे जुनी झाली आहेत, काही ठिकाणी वेगवेगळ्या अडचणी आहेत. तेथे रिडेव्हलपमेंटचे मोठे पोटेनशीअल तयार झाले आहे. आता हा प्रश्न निर्माण होतो की, एकदा सेक्शन 20 अंतर्गत कार्यवाही करुन स्कीम तयार झाल्यानंतर पुन्हा रिडेव्हलपमेंटची वेळ आल्यास त्याला काय स्टेटस आहे. म्हणजे त्याला युएलसीचे स्टेटस आहे की, नॉर्मल स्टेटस आहे. युएलसीचे स्टेटस असेल तर रिडेव्हलपमेंट होऊ शकणार नाही.

...DD/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

युएलसीचे स्टेटस असेल तर रिडेव्हलप होऊ शकणार नाही. कारण पुन्हा तेवढ्याच स्क्वेअर फुटाचे बांधकाम करावे लागेल जे फिजिबल होणार नाही. तसेच जास्त फुटाचे बांधकाम करावयाचे असेल तर ते युएलसीमध्ये नाही, असा त्याचा अर्थ आपल्याला काढावा लागेल. याप्रकरणी कायदा नसल्याने त्यामध्ये अमेंडमेंट करता येत नाही. मी घेतलेल्या माहितीच्या आधारावर मला वाटते की याप्रकरणी निश्चितपणे मार्ग निघू शकतो. स्कीम इम्प्लीमेंट झाल्यानंतर त्याचे स्टेटस नॉर्मल स्टेटस प्रमाणे झालेले आहे. या पेच प्रसंगातून मार्ग काढण्यासाठी माननीय ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला घेऊन पॉलिसी तयार करण्यात येईल. तसेच, सदरहू पॉलिसी तयार करीत असताना सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली आहे त्या अनुरुप पॉलिसी तयार करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. पुणेच नव्हे तर अनेक महानगरांच्या बाबतीत हा प्रश्न निर्माण झालेला असल्याने सदरहू पॉलिसी लवकर तयार केली जाईल.

श्री.विजय काळे : अध्यक्ष महोदय, युएलसी कायदा रद्द झाल्यानंतर युएलसीचे शिक्के न काढल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. सदहू शिक्के काढण्यासाठी मोहिम राबविण्यात येईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, ज्या ठिकाणी 10(3) व 10(5) अंतर्गत कारवाई झालेली आहे तेथील शिक्के काढता येणार नाहीत. परंतु माननीय सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबत स्पष्ट रुलींग दिले आहे की, 10(3) व 10(5) ची कारवाई विहीत पध्दतीने झाली पाहिजे. अनेक ठिकाणी असे लक्षात आले की, एका रात्रीतून संबंधित ठिकाणच्या तलाठ्याने त्यावर युएलसी टाकून दिली, हे योग्य नाही. युएलसी टाकण्याकरिता नोटीस देऊन संबंधितास कालावधी दिला पाहिजे. अशा प्रकारामुळे अनेक लोक अडचणीमध्ये आले आहेत. मागील सरकारच्या काळामध्ये याप्रकरणी काही चांगले निर्णय घेण्यात आले आहेत. ज्यांच्यावर शिक्के टाकले होते त्यांच्यावर विहीत कारवाई न करता त्यांना त्यामधून वगळ्याचे आदेश मागील सरकारच्या काळात दिले होते व त्यासंबंधातील कार्यवाही ऑन गोईंग आहे. आमचे मत हेच आहे की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिलेला असल्याने 10(3) व 10(5) संबंधिची कार्यवाही विहीत पध्दतीने झाली नसेल तर त्यांना त्यामधून वगळण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.मेधा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, मी उपस्थित केलेल्या लक्षवेधी संदर्भातील उत्तरामध्ये अधिक स्पष्टता आणण्याची माझी विनंती आहे. तीन वर्षापूर्वीच ए.जी.साहेबांकडे एका संस्थेने याप्रकरणी अर्ज दिलेला असून त्यापूर्वी अजून एका संस्थेने अर्ज दिलेला आहे. याप्रकरणी विहीत कालमर्यादेत निर्णय घेण्यात आला तर संबंधित नागरिकांना न्याय मिळेल. सदरहू ठिकाणी आता नागरीक राहू शकत नसल्याने ते दुसरीकडे भाड्याने शिफ्ट झालेले आहेत.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रकरणी ए.जी. साहेबांना एका महिन्याच्या आत ओपिनियन द्यावे, अशी विनंती करण्यात येईल.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, याप्रकरणी माननीय मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक उत्तर दिले आहे. सन 2007 मध्ये सदरहू कायदा राज्याने निरंकीत केला आहे. सेक्शन 20 अंतर्गत जी जुनी बांधकामे पेंडींग आहेत त्यांच्या बाबतीत केस बाय केस निर्णय नगरविकास विभागामार्फत करण्यात येत आहे. याप्रकरणी माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये दोन वेळा अपिल दाखल करण्यात आले होते. त्यावेळी सरकारची पिछेहाट झाली होती. सरकारने रिव्ह्यू पिटीशन दाखल केले होते तेथे ही केस स्टँड झली नाही. याप्रकरणी लहान प्लॉट असलेल्या व इमारतीमध्ये राहणाऱ्या सामान्य नागरीकांना त्रास होत आहे. त्याकाळात बिल्डरांना नागरी जमीनधारणा कायद्याचा बेनिफिट जो मिळणार होता तो मिळालेला आहे. लहान गाळेधारकांच्या संदर्भात सेक्शन 20 कायम करण्यात आला आहे, तो काढण्याबाबत सरकार विचार करणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी वस्तुस्थिती मांडली आहे. सेक्शन 20 अंतर्गत सेव्हींग क्लॉजच्या माध्यमातून काही स्कीम सेव्ह केल्या आहेत. त्या स्कीम आता होत नाहीत व त्यांना परवानग्याही मिळत नाहीत. सदरहू प्रकरणी सन 2007 साली निर्णय केल्यानंतर युएलसीची कार्यलये का स्थापन केली, असा प्रश्न मला पडतो. हा विभाग माझ्या अंडर येत असला तरी मी सांगतो की, युएलसीची कार्यालये ही अडवणुकीची स्थाने झालेली आहेत. दुर्दैवाने सेक्शन 20 आपण सेव्ह केल्यामुळे या कार्यालयांच्या एनओसी घ्यावा लागत आहेत. त्या दिल्यानंतर अनेक वेळा चुकीच्या पध्दतीने परवानग्या देण्यात आल्या, त्यासंदर्भात कारवाई करा, अशा प्रकारच्या केसेस उद्भवतात. सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

यांनी सांगितलेली बाब खरी आहे की, याप्रकरणी सरकार माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये हरले. याप्रकरणी आपली अडचण अशी आहे की, अलीकडच्या काळात आपण सर्व घाबरतो. त्यामुळे "पोपट मेला आहे" हे सांगायला कोणी तयार नाही. ही बाब आमच्या सरकारसमोर आली त्यावेळी आम्हाला ॲडव्हाईस मिळत होता की, Review Petition will not succeed. मी जर रिव्ह्यु पिटिशन करु नका असे सांगितले तर वर्षभरामध्ये कोणी तरी म्हणाले असते की यांना बिल्डरांना मदत करावयची होती. त्यामुळे मी रिव्ह्यु पिटीशन करण्यास सांगितले व ती फेल झाली. दिल्लीचे अधिकारी म्हणतात रिव्ह्यु पिटीशन करुन नका, येथील अधिकारी आम्हाला सांगतात, "साहेब कशाला भानगडीमध्ये पडता अजून एक रिव्ह्यु वर रिव्ह्यु करा". याप्रकरणी मला असे वाटते की, कधी तरी यामधून आपल्याला निश्चितपणे मार्ग काढावा लागणार आहे. या अडचणीमुळे आपल्याला हाऊसिंग स्टॉक मिळत नाही. आतापर्यंत जर आपण पॉलिसी तयार करुन त्यामधून पैसा घेतला असता तर आपण त्याप्रमाणात हाऊसिंग स्टॉक तयार करु शकलो असतो. त्यामुळे यासंदर्भात मी सभागृहात घोषणा करतो की, याप्रकरणी सर्वंकष अभ्यास करुन निर्णय घेण्याकरिता माननीय सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश यांच्या अंतर्गत एक समिती नेमण्यात येईल. या समितीसमोर सर्व फॅक्टस् ठेवण्यात येतील व त्यांच्या रिपोर्ट प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले त्यामध्ये "पोपट मेलेला आहे, हे कोणी सांगावयाचे", या प्रश्नाचे त्यांनी उत्तर दिले नाही. माझे असे म्हणणे आहे की, पोपट मेलेला आहे हे सांगण्यास ती समिती गठीत केली आहे. माझे मत असे आहे की, "पोपट मेलेला आहे", हे सांगण्याची जबाबदारी मुख्यमंत्री महोदयांची असते. त्याकरिताच त्यांना राज्याच्या सर्वोच्च पदावर बसविलेले आहे. त्यांनीच जर "पोपट मेलेला आहे" हे सांगण्याकरिता दुर्लक्ष करुन अशा प्रकारच्या समित्या नेमल्या तर प्रा.मेधा कुलकर्णी यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीस न्याय मिळणार नाही. मुख्यमंत्री महोदयांनी याप्रकरणी स्पष्ट सांगावे. समिती नेमून हे प्रकरण पुन्हा समितीसमोर नेऊ नये. मला त्यांच्या स्पष्ट वक्तेपणा बद्दल खात्री आहे. त्यांच्या मनात जे आहे ते समिती जाहीर करणार आहे. त्यामुळे "पोपट मेलेला आहे", हे त्यांनीच आजच जाहीर करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : गट नेत्यांच्या बैठकीमध्ये हा प्रश्न सुटेल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, दोन वेगळे विषय आहेत. प्रा.मेधा कुलकर्णींनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत आपल्याला समिती नेमण्याची आवश्यकता नाही. त्या बाबत ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन घेऊन कारवाई करु शकतो. It is a matter of policy.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर यांनी मांडलेला विषय मोठा आहे. त्यांनी मांडलेल्या विषयाबाबत नागपूरी भाषेत सांगावयाचे झाले तर "युएलसीचे दुकान बंद करणे" असे म्हणवे लागेल. पोपट मेला हे मीच घोषित करणार आहे. याप्रकरणी कायदेशीर बाबी तपासून योग्य सल्ला मिळावा व मला मदत व्हावी म्हणून मी ही समिती गठीत करीत आहे. याप्रकरणी मागील तीन वर्षापासून विचार करण्यात येत आहे. याप्रकरणी हे सरकार नव्हे तर जुने सरकार देखील विचार करीत होते. याप्रकरणी प्रत्येक प्रकरण आमच्याकडे येते व त्यावर आम्ही निर्णय करतो. याप्रकरणी प्रत्येक प्रकरणावर स्वतंत्रपणे निर्णय करणे योग्य नाही, सदरहू निर्णय घेण्याकरिता पॉलिसीच्या माध्यमातून विचार झाला पाहिजे. म्हणून माननीय अध्यक्ष महोदयांनी केलेल्या सूचनेप्रमाणे हा मोठा विषय असल्याने मी तो माननीय गट नेत्यांची बैठकीत ठेवण्यासाठी सांगेन. याप्रकरणी माझे मत आहे की, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशांची एक टाईम बाऊंण्ड समिती तयार केली तर अनेक कायदेशीर पैलू समोर येतील. या बाबीला पुष्कळ कायदेशील पैलू आहेत.

यानंतर EE-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

ही एक वेगळ्या प्रकारची युनिक केस आहे. यामध्ये कायदा रिपील झाला पण सेक्शन सेव्ह झाला आहे. ही अतिशय वेगळ्या प्रकारची बाब असल्यामुळे त्यांच्याकडून आपण अहवाल घेऊ आणि त्यानंतर त्या अहवालावर आपण कार्यवाही करु.

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. डी.एन.नगर वसाहतीमधील गृहनिर्माण संस्थेचा पुनर्विकास करताना रुस्तमजी रिॲल्टी प्रा. लि. या विकासकाची नव्याने नियुक्ती करुन पूर्वीच्या विकासकाला काढून टाकून केलेल्या गैरव्यवहाराबाबत

मु.शी.: डी.एन.नगर वसाहतीमधील गृहनिर्माण संस्थेचा पुनर्विकास करताना रुस्तमजी रिॲल्टी प्रा. लि. या विकासकाची नव्याने नियुक्ती करुन पूर्वीच्या विकासकाला काढून टाकून केलेल्या गैरव्यवहाराबाबत सर्वश्री मो.आरिफ नसीम खान,राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना

श्री. नसीम खान (चांदिवली) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सी. स .नं. 195 (5) नवीन डी. एन. को. ऑप. हौ. सोसायटी युनियन लि. या गृहनिर्माण संस्थेने म्हाडाच्या जागेवर वसाहत विकासित करण्याचा घेतलेला निर्णय, त्याकरिता वैद्य आकाश प्रा.लि. या विकासकाची केलेली नियुक्ती, सदर गृहनिर्माण संस्थेने रुस्तमजी रिॲल्टी प्रा. लि. या विकासकाची नव्याने नियुक्ती करुन पूर्वीच्या विकासकाला काढून टाकणे, गृहनिर्माण संस्था आणि विकासकाने रहिवाशी आणि व्यापारी स्वरुपाचे गाळे ट्राय पार्टी करारपत्राच्या माध्यमातून सुमारे 300 लोकांना विकणे, तथापि, विकण्यात आलेल्या लोकांना गाळे व घरांचा ताबा न देणे, म्हाडाच्या ले-आऊटसाठी आरक्षित असलेले बगिचाचे आरक्षण वगळून अंदाजे 13 हजार चौ. मी. चा भूखंड व 7500 चौ.मी.चा आर.जी.च्या भूखंडाचे संपूर्ण आरक्षण बांधण्यात आलेल्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर दाखवून दुसरे आर.जी.साठी आरक्षित बगिच्यासाठी असलेले 7 हजार चौ. मी. 2.5 प्रमाणे चटईक्षेत्र दाखवून एकूण 17,500 चौ. मी. अतिरिक्त चटईक्षेत्र अनधिकृतपणे दाखविणे, यामध्ये करोडोचा झालेला गैरव्यवहार, यामुळे लोकांची फसवणूक होणे, याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. प्रकाश महेता (गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसीम खान : अध्यक्ष महोदय, मुंबई उपनगरातील डी.एन.नगर वसाहतीमध्ये 2 लाख मिटरपेक्षा एक मोठा ले-आऊट आहे. त्यामध्ये 12800 मिटर्सच्या एका प्लॉटवर पुनर्विकासाची योजना म्हाडाकडे गेली आणि म्हाडाने त्यांना एनओसी दिली आहे. त्याला लागून 8000 मिटर्सचा जो आर.जी. प्लॉट होता तो सार्वजनिक वापरातील आर.जी. प्लॉट रहिवाशीमध्ये कन्व्हर्ट करण्यात आला आणि 12800 मिटर्स प्लॉटचा एफएसआय सुध्दा त्यांना देण्यात आला आहे. डी.एन.नगरमधील रहिवाशांसाठी जो कॉमन आर.जी. प्लॉट होता तो वगळण्यात येऊन त्याचा एफएसआय सुध्दा त्यांना देण्यात आला आहे. म्हणजे 12800 मिटर्स प्लॉटवरील 45000 एफएसआय देण्यात आला. त्यानंतर त्या विकासकाने आणि सोसायटीने ट्रायपार्टी करारनामा करुन व्यापाऱ्यांकडून अंदाजे 300 गाळ्यांचे 300 कोटी रुपये घेतले आहेत. त्यांनी रजिस्ट्रर्ड डॉक्युमेंट्स केले. परंतु त्यांना आजपर्यंत गाळा देण्यात आलेला नाही. यामध्ये दोन प्रकार झाले आहेत. एक म्हणजे व्यापाऱ्यांकडून 300 कोटी रुपये घेऊन अफरातफर केल्याचा मामला आहे, यामध्ये चिटिंग झालेली आहे. दुसरा प्रकार म्हणजे 7200 मिटर्सचा जो आर.जी. प्लॉट होता तो संपूर्ण डी.एन.नगरमधील म्हाडा वसाहतींसाठी खुला होता त्याला वगळून पोडीयममध्ये पहिल्या मजल्यावर आर.जी. दाखविण्यात आले आहे. त्याचा एफएसआय देखील त्यांना देण्यात आला आहे. म्हणून हे दोन गंभीर प्रकार घडले आहेत. माझी स्पेसिफिक मागणी आहे की, या संपूर्ण प्रकरणाची एस.आय.टी.मार्फत चौकशी करावी आणि जोपर्यंत चौकशी होत नाही तोपर्यंत या प्रकल्पाला स्थगिती द्यावी अशी माझी मंत्री महोदयांकडे मागणी आहे.

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, डी.एन.नगर वसाहतीमध्ये एकूण 8 इमारतींमधील 480 सदनिकांना 2005 साली पुनर्विकासाकरिता म्हाडाकडून ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. मे. वैदेही आकाश हौसिंग प्रा. लि. यांची निवड लोकांनी केली आणि त्याला म्हाडाने मान्यता दिली. त्या ठिकाणी बांधकामाचा असलेला परिसर हा 20218.65 चौ.मी. क्षेत्रफळाचा प्लॉट आहे. त्यामध्ये एकूण 48524.35 चौ.मी. करिता अस्तित्वातील बांधकाम क्षेत्र 12522 मिटर्स सोडून प्लस विकास हक्क टी.डी.आर.वापरण्याकरिता देऊन एकूण 36001.64 मिटर्सचा भूखंड आणि त्याचे प्रमाणपत्र परवानगी म्हणून देण्यात आले आहे. यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाचा आरक्षणासंबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला आहे, त्या विषयी 2013 मध्ये प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात गेले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता.....

होते आणि सर्वोच्च न्यायालयामध्ये 17 डिसेंबर 2013 रोजी विनिमय 13 खाली मनोरंजनाचे आरक्षित क्षेत्र कलम 38, 34 मधील तरतुदीनुसार पोडीयमवर वापर करु नये असे आदेश दिले आहेत व त्यानुसार शासनाने ते 10.2.2014 रोजी कलम 154 (1) नुसार निर्देश दिले. परंतु महानगरपालिकेकडून प्राप्त अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणी सदर गृहनिर्माण संस्था व मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाने ना हरकत प्रमाणपत्र तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांचे आदेश हे 29-7-2013 रोजी मंजूर करण्यात आले व त्यास 9-10-2013 रोजी ओ.सी. देण्यात आली आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि शासनाने दिलेला डिफरन्स यामुळे सर्वोच्च न्यायालयाने आदेश देण्यापूर्वीचा हा प्रकार घडला आहे. हा विषय तेथे न अडकता तेथून तो पुढे गेला. यामध्ये मूळ विकासक म्हणून मे.वैदेही कन्स्ट्रक्शनला नेमले होते. त्यांनी परस्पर ही योजना दुसऱ्या विकासकाकडे दिली. वैदेही कन्स्ट्रक्शनने पूर्वी सेलेबल क्षेत्रफळामधून जवळ जवळ 300 कोटी रुपयांचा माल बाजारामध्ये विकून पैसे घेतले आहेत. त्यानंतर त्याने ही योजना दुसऱ्या विकासकाला दिली. दुसऱ्या विकासकाने त्यांच्याबरोबर जॉईन्ट व्हेंचर करुन पुन्हा जनरल बॉडीची बैठक घेतली आणि वैदेहीला यामधून बाद करुन स्वत:च्या नावावर संपूर्ण योजना करुन घेतली. यामध्ये ज्या लोकांचे 300 कोटी रुपये अडकले आहेत ते लोकांनी फौजदारी केसेस दाखल केल्या. आता प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. युओडब्ल्यूमध्ये हा गुन्हा आहे. त्यांच्यावर मोफा कायदा लावण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न बरोबर आहे की, यामध्ये गैरप्रकार झाल्याचे प्रायमा फॅसी दिसून येत आहे. गेल्या वर्षभरामध्ये त्यावर इकॉनॉमिक ऑफेन्स म्हणून काय काय कारवाई केली यासंबंधीची माहिती मी येत्या 15 ते 20 दिवसात घेऊन त्यासंबंधी पूर्ण अहवाल आल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही कायद्याने नक्की करण्यात येईल.

श्री. नसीम खान : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदय प्रायमा फॅसी ॲडमिट करीत आहेत की, यामध्ये गैरव्यवहार झालेला आहे. 300 कोटी रुपयांपेक्षा जास्त पैसे घेऊन लोकांची फसवणूक करण्यात आलेली आहे. संपूर्ण डी.एन.नगर वसाहतीमधील रहिवाशांसाठी जो आर.जी. प्लॉट होता त्याचे आरक्षण वगळून पोडीयमवर आर.जी. बनविण्याची परवानगी प्लस 7200 मिटर्सच्या 2.5 प्रमाणे त्याला एफएसआय देण्यात आला आहे. म्हणजे हजारो कोटी रुपयांचे हे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नसीम खान.....

अफरातफरीचे प्रकरण आहे. न्यायालयाने निर्देश देऊन सुध्दा कोणतीही कार्यवाही होत नाही. तीन तीन युओडब्ल्यूने या विकासकावर एफआयआर लॉड्ज केलेला आहे. मे. रुस्तमजी रियल डेव्हलपर्स याच्यावर दोन-दोन एफआयआर युओडब्ल्यूमध्ये दाखल केलेले आहेत. डी.एन.नगर पोलीस ठाण्यामध्ये एफआयआर दाखल झालेला आहे. परंतु हा किती मोठा बिल्डर आहे. याला कोणाचे संरक्षण आहे, जो युओडब्ल्यू त्याला आतापर्यंत अरेस्ट करीत नाही. त्या कोर्टामध्ये त्याचे पिटीशन रिजेक्ट केले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, यामध्ये जो युओडब्ल्यूमध्ये एफआयआर दाखल झालेला आहे त्यात येत्या 8 दिवसाच्या आत त्याला अरेस्ट करणार आहात काय ? दुसरे म्हणजे जोपर्यंत या प्रकरणाची चौकशी होत नाही तोपर्यंत या प्रकल्पाच्या कामास स्थगिती देणार आहात काय ?

श्री. प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, एक मुद्दा आरक्षणाच्या विषयासंबंधीचा आहे. एक मुद्दा ले-आऊटचे वाटप करीत असताना जो एफएसआय देण्यात आला त्यासंबंधीचा आहे. मुंबईच्या इतर एफएसआयचा वाटप करीत असताना त्यामध्ये अधिक गृहनिर्माण व्हावेत असे आहे. कॉमन आरजी देताना महानगरपालिकेने 7210.59 चौ.मी. एवढा आरजी जो प्रस्तावित केला आहे त्यासंबंधी सदर पोडीयमवरील मनोरंजन उद्यान अभिन्यासातील लोकांना सामायिकरित्या वापरण्यासाठी प्रवेश रस्ता महानगरपालिकेच्या मार्गावरुन होणार आहे. त्यामुळे यामध्ये जे आरक्षण दाखविले आहे ते महानगरपालिकेच्या अधिनियमाप्रमाणे योग्य केलेले आहे असे दिसते.

FF-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नसीम खान यांनी प्रश्न विचारला तो स्पष्ट आहे. उत्तरामध्ये माननीय मंत्री महोदय स्पष्ट करीत आहेत. स्पष्टपणे या सर्व प्रकरणामध्ये मोठी गडबड झालेली आहे. याचे कारण जो फिझिकल ऑन लॅन्ड भूपृष्ठावर जवळ जवळ 75 हजार स्वेअर फूटाच्या वर आरजी स्थानिक लोकांना मिळणे अपेक्षित होती ती आता गायब झालेली आहे. हातात मोकळी जागा किती मिळाली, ज्याच्यावरून या सभागृहामध्ये आणि बाहेरही रणकंदन होत आहे. 75 हजार स्वेअर फूट जागा लोकांना मिळायला पाहिजे होते. परंतु प्रत्यक्ष भूपृष्ठावर 550 चौ.मीटर म्हणजे साडेचार ते सहा हजार फुट फक्त जमिनीवर आणि बाकीची उरलेली 60 हजाराच्या वर पोडीएमवर गेली. ही जागा पोडीएमवर गेली म्हणजे तो बिल्डर हे म्हणायला मोकळा झाला की, या माझ्या डेव्हलपमेंटमध्ये 60 हजाराची आरजी मी देतो. त्याची व्हॅल्यू वाढली ती वेगळी. हे कव्हर करण्यासाठी सदर पोडीएमवर मनोरंजन मैदान आजूबाजूच्या लोकांना सामायिक करण्यासाठी प्रवेश रस्ता महापालिकेच्या मार्गावरून देण्यात आला आहे. कुठली सोसायटी यासाठी तयार होणार आहे काय? मी ज्याठिकाणी राहायला येणार त्याठिकाणच्या पोडीयमवर 60 फुटाचे आरजी आहे तर बाहेरच्या माणसाला मी येऊ देणार काय? हा प्लॅन फॉल्टी आहे. लोकांचा मोकळा श्वास खाल्लेला आहे. मुख्यमंत्री महोदयांनी तातडीने यावर स्टे दिला पाहिजे. आमची विनंती आहे की, स्टे तर दिला पाहिजे आणि चौकशी केली पाहिजे. ज्या अधिकाऱ्यांनी हा प्लॅन मंजूर केला त्यांना लगेच निलंबित केले पाहिजे ही आमची मागणी आहे.

श्री.प्रकाश मेहता : अध्यक्ष महोदय, याबाबत गुन्हा दाखल केलेला असून फौजदारी कारवाई सुरु आहे. विकासकाची चौकशी होईल आणि अधिकाऱ्यांची सुध्दा चौकशी करण्यात येईल. चौकशी पूर्ण झाल्यानंतर अधिकाऱ्यांवर आणि विकासकावर कारवाई करण्यात येईल. परंतु जे फौजदारी खटले दाखल आहेत. त्यात एडब्ल्यूकडून 15 दिवसाच्या आत फौजदारी खटल्यांसंबंधित कारवाईचा रिपोर्ट आल्यानंतर अधिकारी, विकासक यांच्यावर निश्चित कारवाई करून या योजनेला स्थगिती देण्याचा विचार करू

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी लक्षवेधीच्या उत्तरामध्ये अतिशय स्पष्टपणे म्हटलेले आहे की, कोणता गुन्हा दाखल झालेला आहे. विकासकाने

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील .....

परस्पर सामंजस्य करार केला. लोकांना डी.एन.नगरमध्ये फ्लॅट देण्यात आले. त्यांची फसवणूक झाली. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले की, काही बाबतीत त्यामध्ये हेराफेरी केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.नसीम खान जे म्हणतात त्याप्रमाणे एवढ्या सर्व गोष्टी आपल्यापुढे आल्या आहेत. हा एक फार मोठा गुन्हा झालेला आहे. यामध्ये बड्या बिल्डरांचा समावेश असल्याचे दिसून येत आहे. यावर कोणाचा प्रभाव आहे माहिती नाही. सरकार पारदर्शक कारभार करणार असल्याचे सांगते तर यासाठी 15 दिवस लावण्याची गरज नाही. आजच्या आज या प्रकरणाला स्टे देण्यात आला पाहिजे, तो आपण देणार काय? रहिवाश्यांचा राखीव भूखंड विकासकाला दिल्यामुळे नियमांचे उल्लंघन झालेले आहे. या सर्व प्रकरणाला स्थगिती दिली पाहिजे. दुसरे असे की, जर एफआयआर दाखल झालेला आहे तर चौकशी होण्याची गरज नाही. ताबडतोब यामध्ये जे दोषी असतील जसे बिल्डर, विकासक, ज्यांच्याबरोबर सामंजस्य करार झाला असेल अशांना अटक व्हायला पाहिजे, याबाबत कारवाई करणार काय? आणि तिसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, एसआयटीमार्फत याची चौकशी करणार काय? मी इतक्या वर्षापासून सभागृहात आहे, पण कधी एफएसआय, टीडीआर याची मला फार कल्पना नाही. परंतु सन्माननीय सदस्य जे काही सांगतात आणि माझ्याकडे जी माहिती येते. मुंबईला अनेक लोकांनी विळखा घातलेला आहे. एफआयआर दाखल केलेला आहे, गुन्हेगार व्यक्तीला ताबडतोब अटक झाली पाहिजे, या संपूर्ण कार्यवाहीला स्थगिती द्यायला पाहिजे ती देणार काय? न्यायप्रविष्ट बाबीच्या नावाखाली हा जो धुमाकूळ चाललेला आहे. याठिकाणी एसआयटीची चौकशी चालू असताना संबंधित अधिकाऱ्यांना ताबडतोब निलंबित करणार काय?

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, मी आधीच सांगितले की, ई.ओ.डब्ल्युमध्ये दोन फौजदारी केस दाखल आहेत. आधी उत्तर ऐकून घ्या.

श्री.नसीम खान : अध्यक्ष महोदय, 8 महिने झाले तरी अजूनही चौकशी झालेली नाही.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, काही तांत्रिक अडचणी अशा आहेत की, पहिला विकासक होता त्याच्यावर लोकांचे पैसे फसले म्हणून पहिल्या विकासकावर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. पहिल्या विकासकाने दुसऱ्या विकासकाला दिले आणि ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता.....

सन्माननीय विरोधी पक्षनेते आधी उत्तर ऐकून घ्या मग बोला. (व्यवधान) हम किसी को बचा नहीं रहे है.हमारी स्पष्ट भूमिका है. किसी को बचाने का प्रस्ताव नहीं है.

अध्यक्ष : मंत्री महोदय आधी त्यांचे म्हणणे ऐकून घ्या. पहिल्या विकासकाला दुसऱ्या विकासकाला विकता येते का असे विचारलेले आहे.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, होय, विकता येते.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, स्वतः मंत्री महोदयांनी सर्व मान्य केलेले आहे. यामध्ये आणखी काय कारवाई करायची राहिलेली आहे. एवढा मोठा रुस्तमजी बिल्डर आहे की त्याच्या पाट्या रोज आम्ही रस्त्यावर वाचत असतो. आपण त्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहात. कोण बिल्डर आहे याला महत्व नाही तर याठिकाणी जनतेची फसवणूक झालेली आहे. याठिकाणी कोट्यावधी रुपयांना फसवून लोक उध्वस्त झालेली आहेत. यामध्ये त्यांना ताबडतोब अटक व्हायला पाहिजे, या प्रकल्पाला स्थगिती द्यायला पाहिजे आणि एसआयटीमार्फत चौकशी केली पाहिजे. आमची माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, याबाबत तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, यामध्ये 480 भाडेकरु आहेत आणि या इमारतीचे जवळ जवळ 80 टक्के बांधकाम पूर्ण झालेले आहे. मूळ भाडेकरुंना घरे मिळायला पाहिजेत हे खरे आहे. पण हे प्रकरण सन 2005 पासून सुरु आहे. यामध्ये शासनाची भूमिका स्पष्ट आहे. सकारात्मक दृष्टीकोनातून शासनाच्या हे लक्षात आले आणि उत्तर देताना मी आधीच सांगितले की, प्रायमा फेसी पाहताना असे वाटते की यामध्ये काहीतरी गैरव्यवहार झालेला आहे. याची चौकशी झाल्यानंतर अहवाल घेऊन चौकशी आणि कारवाई करणे गरजेचे आहे असे मी आधीच सांगितले आहे. त्यामुळे शासन कोणाला पाठीशी घालण्याचा प्रश्नच येत नाही. परंतु माननीय विरोधी पक्षनेते आणि बाकी सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्याप्रमाणे 480 भाडेकरुंची इमारत आहे या इमारतीला सोडून जोपर्यंत या केसचा निकाल लागत नाही तोपर्यंत विकासकाला सेलेबल बांधकाम करण्याची अनुमती देण्यात येणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता.....

फौजदारी खटल्याची माहिती 15 दिवसाच्या आत पूर्ण रिपोर्ट घेऊन न्यायप्रविष्ठ असलेला विषय या दोन्ही भूमिका तपासून 15 दिवसांच्या आत त्याच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नसिमभाई आपण एक गोष्ट लक्षात घ्यावी. पहिली गोष्ट मंत्री महोदय कुठेही निगेटीव्ह नाहीत. सर्व गोष्टी त्यांनी मान्य करतात. त्याला पाठीशी घालण्याचे कारण नाही. कारण त्यांनी ही परवानगी दिलेली नाही. सर्व परवानग्या सन 2005, 2006, 2007 साली मिळालेल्या आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचा काही संबंध नाही. त्यांनी विकासकाला वाचविण्याचे कारण नाही. आपल्या पहिल्या मागणीनुसार सेलेबल जो काही पोर्शन आहे त्याच्यावर स्थगिती दिली. त्यामुळे विकासक आता पुढचे काम करु शकणार नाही. फौजदारी कारवाईच्या संदर्भात जे काही आहे, त्यांचे उत्तर बरोबर आहे. इथे अनाऊन्स करु शकत नाही की, त्याला आजच्या आज अरेस्ट करावे. कारण त्या केसची काय परिस्थिती पाहूनच कारवाई करता येईल. जर अनाऊन्स केले तर त्याचा फायदा त्यांना मिळतो. दबावाखाली अशी कार्यवाही केली असेल, म्हणून मंत्री महोदयांनी जो निर्णय दिलेला आहे. कोणालाही पाठीशी न घालता या केसमध्ये त्यांनी सांगितल्याप्रमाणे 15 दिवसात कारवाईचे निदेश देण्यात येतील.

श्री.अमित साटम : अध्यक्ष महोदय, सदर विषय हा माझ्या मतदार संघातील असून यामध्ये दोन विकासकांच्या भांडणामध्ये 480 मराठी कुटुंबे गेली 8 वर्षे घराबाहेर राहत आहेत. या 480 कुटुंबांतील लोक भाडेकरुन नाहीत. त्यांचे न्यु डी.एन.नगर च्या सोसायटीमध्ये स्वतःच्या मालकीचे ओनरशिपचे फ्लॅट आहेत. 480 मेंबर पैकी 25 मेंबर अगोदर मृत झालेले आहेत. गेली 8 ते 9 वर्षे आपल्या नवीन घरामध्ये येण्याचे स्वप्न बाळगून मधला काही काळ विडाऊट भाडयाने राहत होते. त्यामुळे कोणी काही चुकीचे केले असेल, कोणावर एफ.आय.आर. झाली. कोणी गैरव्यवहार केला, कोणी घोटाळा केला याच्याशी आमचे काही घेणे देणे नाही. त्याला फासावर लटकवा, परंतु कारवाई करताना 480 मुळ कुटुंबाचे घर जे आता पूर्णत्वाला येत आहे. 80 ते 90 टक्यापर्यंत त्यांना गुढीपाडव्याला पझेशन मिळणार होते. त्यामध्ये डिले झाला. दिवाळीला पझेशन मिळणार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता.....

आहे. सेलेबल थांबविल्यामुळे तो बाकीचे 20 टक्के काम थांबवू शकतो. पूर्णत्वाला नेऊ शकत नाही. त्यामुळे शासन त्या 480 मुळ कुटुंबांचे घर पूर्ण करण्याची जाबाबदारी घेऊन त्यांची पार्ट ओसी देण्याची व्यवस्था करणार का ?

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, मी प्रथम स्पष्ट केले आहे की, 480 कुटुंबाना तात्काळ घरे दिलीच पाहिजेत. त्याने घर देण्यामध्ये काही दिरंगाई केली तर त्याचे पूर्ण कॉन्ट्रॅक्ट रद्द करण्याचा शासन विचार करेल.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री आणि गृह मंत्र्यांना माझी विनंती आहे की, हे फार जुने प्रकरण आहे. उत्तर असे दिले आहे की, सन 2005 मध्ये विकासक वैधही आकाश याने रुस्तमजी महाशयांशी संयुक्तीक करार पत्र केले होते हे खरे नाही. आपले जे स्टेटमेंट आहे, त्याने 2008 साली त्याच्याशी अग्रीमेंट केले. अशा अनेक केसेस मुंबईत झालेल्या आहेत. जो नवीन विकासक नेमण्यात आला, त्या जुन्या विकासकाने नविन विकासक नेमण्याच्या आधी रुस्तमजी डेव्हलपर आहे. त्याच्याशी एक अग्रीमेंट केले. दोन लाख चौ.मी. देण्याचे कबूल केले. दोन लाख चौ.मी. जमिनीचा विकास करण्याचा अधिकार दिला. 57 हजार चौ.मी. याला परत मिळणार होते. यामध्ये रुस्तमजी महाशय आत घुसले. त्यांनी या सर्व सोसायटयांशी चर्चा वैगरे झाली असेल हा वैधही आकाश मराठी माणूस आहे. मराठी माणसाची कशी पिछेहाट होते. त्याचे उत्तम उदाहरण आहे. याचा अभ्यास केला तर आपल्याला कळेल. रुस्तमजींच्या आर्कीटेकने नगरपालिकेत पत्र दिले. त्याच्याकडे असणारी आ.यो.डी., सी.सी. हरवली, गहाळ झाली. त्याने कमिशनरकडे पत्र दिले. त्यांच्याकडून ॲन्डोसर्मेंट करुन ते पत्र खाली गेले. खाली जात जात ते महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या ऐवजी कार्यकारी अभियंत्याकडे गेले. कार्यकारी अभियंत्याने त्याला पुन्हा डायरेक्ट आ.यो.डी., सी.सी. सन 2013 साली दिली. त्यावर सन 2008 सालची तारीख घालून दिली.

....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदय, ही केस एकदम पिक्युलर आहे. हे बिल्डर कसे एकमेकात घुसतात. 480 घरे होती. त्या वैधही आकाशने 480 कुटुंबांशी इंडिव्हीज्युल ॲग्रीमेंट केले होते. तीन वर्षानंतर रूस्तमजी शिरला. हा रूस्तमती बिल्डर मोठा पैसेवाला पाहून व सर्व गोंधळ पाहून त्याला अपॉईंटमेन्ट दिली. या बिल्डरने त्यांचे इंडिव्हीज्युअ ॲग्रीमेंट न करता त्याचे जे जुने ॲग्रीमेंट व नुसते ठराव घेतले आणि दिले. त्याच्यावर त्याची केस पुढे गेली. याकधीही इंडिव्हीज्युअल सभासदाशी संपर्क साधून, ॲग्रीमेंट करणे, त्यांचे ॲप्रुव्हल घेणे वैगरे कधी केले नाही. यामध्ये आणखी एक मुद्दा गंभीर आहे. जुने विकासक श्री.फोंडेकर म्हणून मराठी विकासक आहे. आर.आर. पाटील गृहमंत्री असताना हे केस त्यांच्याकडे आली होती. म्हणून मला ही केस माहित आहे. माझा या केसशी तसा संबंध नाही. त्यावेळी श्री.फोंडकरांनी म्हाडामध्ये एन.ओ.सी.साठी 5 कोटी रूपये भरलेले आहेत. आता रूस्तमजी आल्यानंतर 2006 ते 2010 मध्ये या श्री.फोंडेकरांनी 6 इमारती त्या आवारात बांधल्या. 4 इमारती ग्राऊंड प्लस टू च्या बांधल्या. दोन इमारती बेसमेंट प्लस ग्राऊंड फ्लोअरच्या बांधल्या. त्या सगळया कोणाशीही चर्चा न करता सर्व इमारती पाडून टाकल्या. त्या इमारती बांधकामाचा श्री.फोंडेकरांचा खर्च होता तो या बहाद्दरांनी दिला नाही. मराठी विकासकाने एन.ओ.सी.साठी म्हाडामध्ये 5 कोटी रूपये भरलेले ते त्याला परत देण्याऐवजी म्हाडाने त्याच बेसिसवर ती एन.ओ.सी. या विकासकाला कन्टीन्यु करून दिली.

अध्यक्ष महोदय, मी महत्वाचा मुद्दा मांडत आहे. शासकीय चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांची ही सोसायटी आहे. नवीन विकासक सोसायटीच्या चेअरमनला आणि सेक्रेटीला भेटला हे प्रकरण बरेच जुने आहे. त्यांची आर्थिक सांपत्तीक परिस्थिती मिळणा-या पेन्शनवर अवलंबून आहे. तरी त्यांची सांपत्तीक परिस्थिती फार सुधारलेली आहे. मलाही त्याचा आनंद आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी करा. बरीच महिती आपल्याला येईल. शेवटचा माझा मद्दा आहे. ई.ओ.डब्ल्यू. ला गुन्हे शाखेमध्ये गुन्हा क्रमांक 27/15 दिलेला आहे. त्याचा तपास माझ्या माहितीने पूर्ण झालेला आहे. ई.ओ.डब्ल्यू. या निष्कर्षाला आलेली आहे की, जे दुसरे विकासक शिरलेले आहेत. त्यांच्यावर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

ठपका ठेवण्याची शिफरस तसेच त्यांच्यावर कोणती ॲक्शन घ्यावी, ॲक्शन लायेबल आहे हे ई.ओ.डब्ल्यू. ने त्यांच्या रिपोर्टमध्ये ब-या महिन्यांपूर्वी सांगितलेले आहे. आपण म्हणता 15 दिवसात कार्यवाही करु तर या 15 दिवसांच्या कार्यवाहीची गरज नाही. माझी आपणाला विनंती आहे की, हया प्रकरणी दोन्ही विकासकांची बाजू पहावी आणि मुंबई शहरात काय चालले आहे, एस.आर.ए.मध्ये किंवा रिडेव्हलमेंटमध्ये एकमेकांवर कशी माणसे अतिक्रमण करतात आणि जो कमकूवत असतो, जो स्थानिक आहे, जो मराठी माणूस आहे त्याच्यावर कसा अन्याय झाला त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळे या प्रकरणी माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे आणि ई.ओ.डब्ल्यू.ने शिफारस केलेली आहे. त्याची ताबडतोब ॲक्शन सुरु करतील काय ?

श्री.प्रकाश महेता : अध्यक्ष महोदय, सन 2014 पूर्वीचे सर्व घोटाळे असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी चांगल्या पध्दतीने माहिती दिली.

HH-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता .....

यामध्ये ही सर्व माहिती फार उपयोगी आहे. यामधील 480 मालक व रहिवाशांना प्रोटेक्ट करण्यास शासनाचे पहिले प्राधान्य आहे. फोंडेकर यांनी विकासक म्हणून जो काही माल विक्रीला घेतला आहे अशा 34 लोकांची नावे माझ्याकडे आहेत. ज्यांनी न्यायालयात व संबंधित कार्यालयात केसेस केलेल्या आहेत. अशा 34 लोकांचे 300 कोटी रुपये यामध्ये फसले गेले आहेत. आपणास मुळ 480 लोकांचा प्रश्न प्रथम सोडवायचा आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, ईओडब्ल्यूचा अहवाल आलेला आहे. पण हा अहवाल माझ्यापर्यंत किंवा शासनाकडे आलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती सत्य आहे असे गृहीत धरुन ही लक्षवेधी सूचना संपल्यानंतर त्याबाबत माहिती घेतो व सन्माननीय सदस्यांशी चर्चा करतो. या बाबीची गांभीर्याने नोंद घेऊन कडक कारवाई करण्याचा शासनाचा मानस आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : गडचिरोली जिल्हयात विद्यार्थ्यांच्या आवागमनासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या पुरेशा बस न सोडल्याने विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय

मु. शी. : गडचिरोली जिल्हयात विद्यार्थ्यांच्या आवागमनासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या पुरेशा बस न सोडल्याने विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय या संबंधी श्री.कृष्णा गजबे, श्री.राजेश काशिवार, श्री.चरण वाघमारे, डॉ.देवराव होळी,वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात मानव विकास मिशन अंतर्गत जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शाळेमध्ये आवागमनासाठी राज्य परिवहन विभाग, गडचिरोली यांना बसेस पुरविण्यात येणे, परंतु या बसेसमध्ये विद्यार्थ्यांची ने-आण करण्याऐवजी आगार व्यवस्थापकाने नफा कमविण्यासाठी त्या लांब मार्गावर सोडणे, गडचिरोली आगार व्यवस्थापनाचे वेळापत्रक बरोबर नसल्याने विद्यार्थी व पालकांनी आंदोलन केल्यावर मानव विकास मिशनकडून प्राप्त बसेस विद्यार्थ्यांची ने-आण करण्यास सोडणे, बसेस वेळेवर सोडण्यास कुचराई करणे, त्यामुळे विद्यार्थ्यांना बसस्टॉपवर तासनतास प्रतिक्षेत ताटकळत उभे राहावे लागत असणे, याचप्रकारे कुरखेडा, आरमोरी तालुक्यात सुद्धा हा प्रकार नेहमीचा असणे, त्यामुळे शाळेत पोहचायला उशीर होणे, जिल्हा नक्षलग्रस्त असल्याने रात्रीचे वेळी तर विद्यार्थ्यांची फार अडचण होणे. तसेच विद्यार्थ्यांना दर तीन महिन्यांनी फक्त गडचिरोली आगार येथून पास मिळत असल्याने जिल्हा आगार स्थानापासून १५० ते २०० किमी लांब अंतरावरुन पास काढण्यास जावे लागणे, गडचिरोली जिल्ह्यात एकूण पासधारक विद्यार्थी संख्या ही ३३५० व बसेसची उपलब्धता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

३५ असणे, त्यामुळे विद्यार्थी व पालकांनी वारंवार निवेदन देवूनही त्यात वाढ करण्यात न येणे, त्यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थी व पालकांमध्ये मोठ्या प्रमाणात असलेला असंतोष, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विजय देशमुख (परिवहन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कृष्णा गजबे : अध्यक्ष महोदय, राज्यातील नक्षलगस्त गडचिरोली जिल्हयातील दुर्गम भागातील 5000 पेक्षा जास्त विद्यार्थी तालुका व महत्वाच्या गावी शिक्षणासाठी जाणे येणे करतात. राज्य शासनाच्या वतीने मानव विकास मिशन अंतर्गत नव्या एस.टी.बसेस दिलेल्या होत्या. यातून विद्यार्थ्यांची ने आण करण्यासाठी निर्देश देण्यात आले होते. परंतु उत्तरात सांगितल्याप्रमाणे गडचिरोली आगार अंतर्गत 42 बसेस देण्यात आल्याचे म्हटले आहे. परंतु सप्टेबर महिन्यामध्ये गडचिरोली आगार अंतर्गत अधिकाऱ्यांना विचारले असता, त्यांनी 35 बसेस असल्याचे कबूल केले आहे. त्यामुळे मानव विकास मिशनच्या बसेस राज्य परिवहन महामंडळाने मुळ उद्देश बाजूला ठेऊन लांब पल्ल्याच्या मार्गावर सोडण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवागमनासाठी अत्यंत त्रास सहन करावा लागत आहे. म्हणून गडचिरोली आगार व्यवस्थापकांचे वेळापत्रक बरोबर नसल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करणार का ? विद्यार्थ्यांना प्रवास करण्यासाठी अहिल्याबाई होळकर मोफत पास योजना व विद्यार्थ्यांना सवलत पास काढण्यासाठी जवळपास 100-200 कि.मी.वर म्हणजे गडचिरोली आगारामध्ये जावे लागते. त्यामुळे हे पास तालुका स्तरावर देण्यात यावेत. वळसा तालुका हा अतिदुर्गम भागात येत असल्यामुळे मानव विकास मिशनची एकही बस त्या तालुक्यामध्ये नाही. त्यामुळे वळसा तालुका मानव विकास मिशनमध्ये घेण्यात यावा व येथे बस उपलब्ध करण्यात यावी, अशी मंत्री महोदयांना विनंती करतो.

श्री.विजय देशमुख : अध्यक्ष महोदय, सन 2014-2015 मध्ये मानव विकास मिशन अंतर्गत गडचिरोली जिल्हयातील 11 तालुक्याकरिता 5 बसेस याप्रमाणे 55 बसेस कार्यरत होत्या. यानंतर सप्टेबर 2015 मध्ये प्रत्येक तालुक्यास 2 बसेस प्राप्त झाल्याने आता 11 तालुक्यास 77 बसेस कार्यवाहीत असून या भागातील विद्यार्थ्यांच्या वाहतुकीस वापरल्या जात आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे बस कमी पडत असतील तर अधिक बस उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच त्यांनी सांगितले की, शाळेचे पास घेण्याकरीता 100 कि.मी.जावे लागते. आगार प्रमुख व शाळेच्या मुख्याध्यापकाकडून पासेसच्या विद्यार्थ्यांची यादी मागवून घेतली जाते, तेथील शाळेमध्ये आगार प्रमुख जाऊन ओळख पटवून पासेसचे वाटप केले जाते. तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जेथे बस जात नसेल तेथे विद्यार्थ्यांकरिता मानव विकास मिशन अंतर्गत बस उपलब्ध करुन देण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेश काशिवार : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निगडीत माझा प्रश्न आहे. साकोली विधानसभा क्षेत्रामध्ये बस कमी आहेत, काही गावांना बस जात नाहीत. तेथे वाहक व चालकांची मंजूर पदे व कार्यरत पदे यामध्ये फार मोठी तफावत आहे. भविष्यात वाहक चालकांची रिक्त पदे लवकर भरणार का, तसेच जास्तीत जास्त बसेस उपलब्ध करुन देणार का ?

श्री.दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, चालकांच्या पदाचा प्रश्न उपस्थित केला आहे तो खरा आहे, नुकतील 7600 चालकांची भरती पूर्ण होत आली असून जास्तीत जास्त चालक आपल्या तालुक्यात देऊन विद्यार्थ्यांकरिता बसची व्यवस्था करण्यात येईल.

डॉ.देवराव होळी : अध्यक्ष महोदय, गडचिराली जिल्हा हा अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भाग आहे. या जिल्हयाचे डिस्टन्स 450 कि.मी. आहे. यामध्ये एसटी महामंडळाचे गडचिरोली व अहेरी असे फक्त दोन आगार आहेत. माझ्या मतदारसंघात चार्मोशी व आष्टी असे दोन बस आगार निर्माण केले तर मुलांना येण्याजाण्याचे अंतर वाचेल. परिणामी मुलांसाठी पासची व्यवस्था चांगल्या प्रकारे होईल. त्यामुळे दोन बस डेपो माझ्या मतदारसंघात निर्माण करावेत.

श्री.दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, विद्यार्थ्यांच्या बसची व्यवस्था करण्याकरिता गट शिक्षणाधिकाऱ्यांच्या माध्यमातून वेळापत्रक तयार करण्यात येते. 100 कि.मी. ची मर्यादा असतानासुध्दा आपल्या जिल्हयाची परिस्थिती लक्षात घेता 153 कि.मी. वाहतूक करीत आहोत. आम्हाला मानव विकास मिशनकडून निधी उपलब्ध होत नसल्यामुळे तो खर्च महामंडळाकडून करण्यात येतो. विद्यार्थ्यांच्या पासेसचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे, याबाबत सांगू इच्छितो की, विद्यार्थ्यांच्या शाळेत जाऊन त्यांना पास देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वत: आगारामध्ये यावे लागणार नाही व पासाकरिता धावावे लागणार नाही.

डॉ.राहूल पाटील : अध्यक्ष महोदय, एस.टी. महामंडळाकडून दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मोफत पासाकरिता स्वाती अभय योजना राबविली जात आहे, तशी योजना या नक्षलग्रस्त भागातील गडचिरोली जिल्हयामध्ये लागू करणार का, तसेच स्वाती अभय योजना पुढील वर्षीसुध्दा मराठवाडयात लागू करणार का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, आदिवासी भागामध्ये आदिवासी विकास विभागाकडून राबविल्या जाणाऱ्या याबाबतच्या योजनेचा लाभ मिळतो. स्वाती अभय योजना ही फक्त दुष्काळग्रस्त भागाकरिता होती. फक्त दुष्काळाच्या कालावधीत ही योजना लागू करण्यात आली होती.

श्री.समीर कुणावर : अध्यक्ष महोदय, हा विषय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा असून हजारो विद्यार्थी विद्यार्थीनींना आपण पासेस दिलेले आहेत. मुलींच्या शिक्षणाकरिता मोफत पासेस दिलेले आहेत. हा गडचिरोलीचा प्रश्न असला तरी आमच्याकडेही लागू होतो. मुलामुलींना रात्री 9 वाजेपर्यंत बसची वाट पहावी लागते. म्हणून मी सूचना करु इच्छितो की, जेथे 20 पेक्षा जास्त मुले एका टायमिंगला असतील तर तेथे छोटया बसेसला व विद्यार्थ्यांना प्राधान्य देऊन या बसेस सुरु करणार का, जेणेकरुन विद्यार्थी वेळेवर शाळेत व घरी पोहचतील.

श्री.दिवाकर रावते : अध्यक्ष महोदय, परीक्षेच्या काळात सरकारने आदेश काढले होते की, विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्यात यावी व वेळेवर बस सोडून परिक्षेला जाता येईल याची काळजी घ्यावी. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाप्रमाणे विद्यार्थ्यांना उशीरापर्यंत थांबून राहू नये याचा अभ्यास करुन त्याबाबत बसची व्यवस्था केली जाईल. छोटया किंवा मोठया बस मधून आवश्यकतेप्रमाणे व्यवस्था केली जाईल.

यानंतर II-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: सार्वजनिक विद्यापीठ विधेयक

L. A. BILL NO. LXXI OF 2015

(A BILL TO PROVIDE FOR ACADEMIC AUTONOMY AND EXCELLENCE, ADEQUATE REPRESENTATION THROUGH DEMOCRATIC PROCESS, TRANSFORMATION, STRENGTHENING AND REGULATING HIGHER EDUCATION AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री): अध्यक्ष महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 71 विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधीत्व, उच्च शिक्षणाची अभिवृध्दी, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

अध्यक्ष : विधेयक मागे घेण्यास सभागृहाची अनुमती आहे.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 71 मागे घेतो.

अध्यक्ष : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 71 मागे घेण्यात आले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी : मुद्रांक (सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. XV OF 2016

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.)

श्री.संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक-15 महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

अध्यक्ष : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.संजय राठोड : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक-15 मांडतो.

अध्यक्ष : विधेयक मांडण्यात आले आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी : सार्वजनिक विद्यापीठ विधेयक

L. A. BILL NO. XVI OF 2016

(A BILL TO PROVIDE FOR ACADEMIC AUTONOMY AND EXCELLENCE, ADEQUATE REPRESENTATION THROUGH DEMOCRATIC PROCESS, TRANSFORMATION, STRENGTHENING AND REGULATING HIGHER EDUCATION AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि.क्रमांक-16 विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधीत्व, उच्च शिक्षणाची अभिवृध्दी, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक मांडण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

अध्यक्ष : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक-16 मांडतो.

अध्यक्ष : विधेयक मांडण्यात आले आहे.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, या अधिवेशनात हे विधेयक चर्चा करुन सर्वांनी मिळून पारित करणे आवश्यक आहे. जेणेकरुन नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होते वेळी विद्यापीठांच्या सिनेट व एक्झिक्यूटिव्हज वेळच्या वेळी होतील. उद्याच्या कामकाजाच्या क्रमामध्ये या विधेयकाकरिता अग्रक्रम देण्यात आला तर हे विधेयक पारित करता येईल.

मागील नागपूरच्या अधिवेशनातील विधेयक मागे घेण्याचे कारण असे आहे की, माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री.डी.पी.सावंत, सन्माननीय सदस्य श्री.राजेश टोपे व काही विधानपरिषद सदस्य यांच्यासमवेत बसून त्या विधेयकावर चर्चा करण्यात आली होती. सदरहू विधेयकावरील सुधारणासंह नव्याने हे विधेयक चर्चेला आणले गेलेले आहे, यावर सभागृहामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा समावेश यामध्ये करुन ते बिल सभागृहामध्ये मांडले गेलेले आहे.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: अनुदानाकरिता मागण्या.

मु.शी.: सन 2016-2017 च्या अनदानाकरिता मागण्या :

1) सार्वजनिक आरोग्य विभाग
2) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

अध्यक्ष : आता सार्वजनिक आरोग्य विभाग व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक आर-1,आर-2,आर-3,आर-4,वाय-2,वाय-3,वाय-4,वाय-5,वाय-6,वाय-7 चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे.

(**प्रेस** : सोबत जोडलेले मागण्यांसंबंधीचे जोडपत्र छापावे.)

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : आता सार्वजनिक आरोग्य विभाग व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्यांवर चर्चा होईल. मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांच्या विभागनिहाय याद्या सदस्यांना टपालखणाद्वारे (पिजन होल) वितरित करण्यात आल्या आहेत. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा जुलै, 2010 पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे मी गृहीत धरतो.

या चर्चेसाठी तीन तास वेळ देण्यात येईल. या तीन तासापैकी सत्तारुढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. प्रत्येक सदस्याने भाषण सुरु करण्याचे वेळी विभाग, याच बरोबर बाब क्रमांक विवरणपत्रातील पृष्ठ क्रमांक यांचा उल्लेख करावा. पुरवणी मागण्यांवरील चर्चा संबंधित बाबींपुरतीच मर्यादित असल्यामुळे सदस्यांना मूळ अनुदान अथवा मूळ मागणी यावर चर्चा करता येणार नाही. आता प्रथेप्रमाणे माननीय विरोधी पक्ष नेते चर्चेला सुरुवात करतील. त्यानंतर इतर सदस्यांची भाषणे होतील.

ही मागण्यांवरील चर्चा आजच संपवायची आहे. एक किंवा दोन विधेयकही संपवायचे आहे. यानंतर नियम 293 अन्वये प्रस्ताव, विधेयके व अर्धा तास चर्चा असा बिझनेस आहे. सत्ताधा-यांच्या नियम 293 अन्वयेच्या चर्चेला आज सुरुवात करु या. उद्या रोजी विरोधी पक्षाच्या नियम 293 अन्वये असलेल्या प्रस्तावावरील चर्चा आणि उत्तर घेण्यात येईल. सर्वच सन्माननीय सदस्यांनी वेळेत आपले म्हणणे मांडले पाहिजे. मी आता ज्या पक्षाचे जेवढे सदस्य बोलतील त्यांना वेळ वाटून देईल. वाटून दिलेल्या वेळेप्रमाणेच सन्माननीय सदस्यांना बोलण्याकरिता वेळ मिळणार आहे. समोरच्या वक्त्याने जर बोलण्याकरिता जास्त वेळ घेतला तर मागील वक्त्याला जास्त वेळ मिळणार नाही, याची जाणीव सर्वांनी ठेवावी.

श्री.शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. आपण आता आदेश दिले की, पक्षाचा वेळ बोलणा-या सन्माननीय सदस्यांमध्ये वाटून दिलेला आहे. सुरुवातीच्या वक्त्याने वेळेचे हे बंधन लक्षात घ्यावे. माझी आपल्याला सर्वच सन्माननीय सदस्यांच्या माध्यमातून अशी विनंती आहे की, आपण असो किंवा तालिका सभाध्यक्ष असो जास्त वेळ बोलणा-या वक्त्याला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

त्याच्या वाक्यानंतर थांबण्याच्या सूचना करणे आवश्यक आहे. अन्यथा मागील वक्त्याला बोलण्याकरिता वेळ मिळत नाही. 7

05-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) II-7

JN/ ST/ AKN/ 16:00

अध्यक्ष : यासंदर्भातील वेळेचे नियोजन पक्ष प्रतोदांकडूनही होणे अपेक्षित असते.

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष डॉ.सतीश पाटील)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता व मागण्यांना विरोध करण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. या विभागावर चर्चा जास्त झाली पाहिजे. वेळ वाढवून देण्यात यावी. मेडिकल टर्मिनॉलॉजीमध्ये लसीकरण या मोहीमेअंतर्गत पोलिओ व गोवरच्या लसी दिल्या जातात. लसीकरणांतर्गत आरआयपीआयपी असा कार्यक्रम राबविला जातो. रेग्यूलर इम्युनायजेशन प्रोजेक्ट इम्प्लिमेंटेशन प्लान असा एक कार्यक्रम राबविला जातो. सरकारमध्ये सध्या आता जे काम चालू आहे, त्याकरिता देखील अशाच प्रकारचा एपीआयपीआयपी हा स्वतंत्र कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी माझी सूचना आहे. एपीआयपीआयपी म्हणजे असोसिएट पाटी इम्युनायजेशन प्रोजेक्ट इम्प्लिमेंटेशन प्लान हा जर सरकारने राबविला तर सहकारी पक्षापासून रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत होईल. एपीआयपीआयपी या विशिष्ट कार्यक्रमाच्या माध्यमातून सहयोगी पक्षाकडून शासनाची प्रतिकारशक्ती वाढली तर शासनाला राज्यामध्ये अधिक चांगल्या प्रकारे काम करता येईल. असा एखादा प्लान किंवा संकल्पना आणली पाहिजे. खरे म्हणजे सत्तास्थापनेचे वेळी तुमच्या सेनेचे सुप्रिमो यांचे प्रेमसंवाद आणि मानापमानाचे प्रयोग लोकांनी पाहिलेले आणि ऐकलेले आहेत. कमळाच्या कोषामध्ये बाण घुसून बसलेला आहे, त्याची पुष्कळ चर्चा राज्यात आम्ही ऐकलेली आहे. सरकारमध्ये सहयोगी पक्षाकडून एकमेकांवर ज्या कुरघोडी चालू आहेत, त्यामुळे संबध राज्याचे आरोग्यच धोक्यात आलेले आहे. कमळामध्ये रूतलेला बाण हा बोथट झालेला आहे. कमळाच्या पाकळयाच आता चिखलफेक करीत आहेत. मंत्रिमंडळात चाललेला विसंवाद आता सर्वांच्या लक्षात येत आहे. माननीय मुख्यमंत्री आणि महसूल मंत्री यांच्यामधील विसंवाद, माननीय वित्तमंत्री व माननीय जलसंपदा मंत्री यांच्यातील विसंवादही लक्षात येत आहे. यामुळे माहिती अधिका-याकडे अर्ज करण्याची गरज उरलेली नाही. या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

विसंवादातून सगळीकडे आपोआप माहिती उपलब्ध होत आहे, अशी या राज्यामध्ये स्थिती निर्माण झालेली आहे.

जेजे-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

मी आज अनेक मंत्र्यांमधील असलेले विसंवाद उपस्थित केलेले आहेत. मंत्र्यांकडून राज्यात कुपोषण नाही, असे सांगितले जात आहे. पालघरमध्ये 5400 अतिकुपोषित बालके मृत्यूच्या छायेत आहेत. माननीय मंत्र्यांनी राज्यातील कुपोषणाची परिस्थिती अतिशय चिंताजनक असल्याचे मान्य केलेले आहे. एकीकडे मुख्यमंत्री राज्यात सर्व काही अलबेल आहे असे सांगत आहेत. माननीय आरोग्य मंत्र्यांनी आरोप-प्रत्यारोपाचे निर्मुलन करण्यासाठी एखादी लस शोधावी अशी माझी मागणी आहे. राज्यात बेटी बचाओ, बेटी पढाओ, असा नारा दिला जात आहे. मेक इन महाराष्ट्राच्या नावावर अनेक ढोल बजावले जात आहेत. परंतु, आज राज्यातील स्त्रीभ्रूण हत्येचे वास्तव काय आहे ? राज्यातील अनेक ठिकाणी स्त्रीभ्रूण हत्येच्या प्रकरणांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. राज्यातील सातारा, कोल्हापर, सांगली, चंद्रपूर, बुलडाना, वाशिम आणि बीडमध्ये लिंगोत्तराचे प्रमाण 30 ते 50 अंकांनी कमी झालेले आहे. सर्वसाधण 1 हजार बालकाप्रमाणे 952 इतक्या मुली असणे गरजेचे आहे. आपण गेल्या काही वर्षातील राज्याचे स्टॅस्टीस्क पाहिले तर 6 वर्षाखालील बालकांचे आणि विशेषकरुन मुलींचे प्रमाण कमी होत चालल्याचे दिसून येणार आहे. मंत्री महोदयांनी किती रुग्णालयांना भेटी दिलेल्या आहेत, याची माहिती माझ्याजवळ नाही. राज्यातील स्त्री-पुरुष जन्माचे प्रमाण हे 1 हजार पुरुषांमागे 922 स्त्रीया इतके आहे. केरळ राज्यात 1 हजार पुरुषांमागे 1058 स्त्रीया इतके प्रमाण आहे. परंतु, महाराष्ट्रात याबाबत खूप मोठी तफावत आहे आणि त्याहून वाईट अवस्था ही मुंबई शहराची आहे. मुंबई शहरात 1 हजार पुरुषांमागे 832 स्त्रीया असे प्रमाण आहे. हजार बालकांमधून 24 बालके दगावली जातात अशी आरोग्याची वाईट अवस्था आहे. हा जेंडर रेश्यो इनबॅलंन्स होऊ लागला आहे. यासाठी आरोग्य, शिक्षण आणि जागृतीवर आरोग्य विभागाने विशेष लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र हा महत्वाचा कणा आहे. आज प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भिंती पडलेल्या आहेत, ऑपरेशन थिएटर बंद आहेत, तज्ज्ञ डॉक्टर नाहीत, वैद्यकीय परिचारिका नाहीत. ग्रामीण भागात सर्पदंशाच्या अनेक घटना घडत आहेत. पण आज ग्रामीण भागात सर्पदंशावरील लसी

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

उपलब्ध नसतात, अशी वाईट अवस्था आहे. आज सीएसआरमधील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, प्रायव्हेट ट्रस्ट, सेवाभावी संस्था असून त्यांची गुणवत्तपा तपासून निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. राजकीय हस्तक्षेप करुन निर्णय घ्यायला लागला तर पुन्हा नवीन संकट ओढवल्याशिवाय राहणार नाही. गुणवत्ता तपासून निर्णय घेतले तर आपल्यावरील बोजा कमी होणार आहे. आरोग्य सेवा दुर्गम भागात सक्षम करावयाची असेल तर याबाबतीत मंत्री महोदयांना चांगले काम करणे शक्य आहे. आरोग्य विभागाने मध्यंतरीच्या काळात बीडमध्ये महाआरोग्य शिबिर आयोजित केले होते. सदर शिबिरामध्ये आरोग्य मंत्र्यांचे मी फ्रेश फोटो पाहिले आहेत. एका बाजुला लोकांचे आरोग्य बिघडलेले आहे तर दुसऱ्या बाजूला आरोग्य मंत्र्यांचे मी फ्रेश फोटो पाहिले आहेत. आरोग्य विभागाने महाआरोग्य शिबिर आयोजित करुन काय साध्य केले असा माझा प्रश्न आहे. या माध्यमातून राज्यातील कुपोषण कमी होणार आहे काय किंवा आरोग्य केंद्रांमध्ये सुधारणा होणार आहे काय ? प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरेसा कर्मचारी वर्ग आणि आवश्यक सुविधा देण्याची गरज आहे. एवढे केले तरी आपल्याला महाआरोग्य शिबिर घेण्याची वेळ येणार नाही. राज्यातील वैद्यकीय अधिकारी आणि विशेष तज्ज्ञाची अनेक पदे रिक्त आहेत. राज्यात जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्य चिकित्सकांची 60 टक्के पदे रिक्त आहेत. म्हणजे आरोग्य विभाग किती गंभीर आहे, हे यावरुन दिसून येत आहे. राज्यातील विशेष तज्ज्ञांची एकूण 551 मंजुर पदांपैकी 386 पदे रिक्त आहेत. नवसंजिवनीची अवस्था तर अतिशय चिंताजनक आहे. याचा आढावा घेतला जाणार आहे की नाही ? नाही तर मंत्र्यांकडून डॉक्टर ग्रामीण भागात जात नाही, असे उत्तर आम्हाला दिले जाते.

अध्यक्ष महोदय, आरोग्य परिवहन सेवेची अवस्था किती वाईट आहे, याबाबत मी बोलणार आहे. पुणे स्टेशनला आरोग्य केंद्राचे मुख्यालय आहे. मी पुणे मार्गे माझ्या मतदारसंघात जात असताना आरोग्य केंद्राच्या मुख्यालयातील अनेक वाहने गंजलेल्या अवस्थेत असल्याचे मला नेहमीच दिसून येत होते. मी संबंधितांकडे या गंजलेल्या वाहनांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

अशा वेळी आरोग्य विभागाने आरोग्य केंद्राच्या मुख्यालयातील गंजलेली वाहने लोकांना दिसू नये याकरिता त्याच्या बाहेरील भिंतीची ऊंची वाढविली होती. आरोग्य विभाग आज बिघडलेला नाही. हा पूर्वीपासून बिघडलेला आहे. आरोग्य विभागाने गंजलेली वाहने लोकांनी पाहू नये म्हणून भिंत ऊंच केलेली आहे. अशा वेळी राज्याचे आरोग्य किती बिघडलेले आहे, हे या ठिकाणी दिसून येत आहे.

अध्यक्ष महोदय, आरोग्य परिवहन विभागातील 566 मंजुर पदांपैकी 218 पदे रिक्त आहेत. मेक इन महाराष्ट्राच्या कार्यक्रमातून एअर ॲम्ब्युलन्सची कल्पना मांडण्यात आली होती. लोकांना दोन वेळेचे पुरेसे जेवण मिळत नाही. अशा लोकांना औषोधोपचाराचा खर्च परवडत नाही. परिवहन सेवेतील वाहनांना डिझेल वेळेवर मिळत नाही. अनेक वाहने डिझेल अभावी सुरु नाहीत. परिवहन विभागतील वाहनचालकाची पदे रिक्त असल्यामुळे वाहेन एकाच जागेवर उभी आहेत. परिवहन विभागातील 4420 वाहनांपैकी 1 हजार वाहने बंद अवस्थेत आहेत. याबाबत आरोग्य मंत्र्यांनी माहिती घेतली आहे काय ? एअर ॲम्ब्युलन्सच्या माध्यमातून सर्वसामान्यांचा जीव न वाचविता त्यांना वैकुंठाला पोहचविण्याचे कामच केले जाणार आहे. आज आरोग्य विभागात बालरोग तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञांची आवश्यकता आहे. संबंधित डॉक्टर्सला 50 हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. ग्रामीण भागामध्ये आरोग्य सेवा पुरविणाऱ्या डॉक्टर्सला एक ते दीड लाख रुपये विद्यावेतन दिले तरच ते त्या ठिकाणी स्वत:हून काम करण्यास जाणार आहेत. राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या माध्यमातून आरोग्य विभाग सुरु आहे. या योजनेमुळे सरकारची इभ्रत वाचलेली आहे. ही मागील सरकारकडून या सरकारला मिळालेली देणगी आहे. आज राजीव गांधी जीवनदायी योजना नसती तर दुष्काळी भागातील लोकांची अवस्था कशी झाली असती, याची कल्पनाच केली जाऊ शकत नाही. आरोग्य विभागाने एअर ॲम्ब्युलन्सवर खर्च करण्यापेक्षा ग्रामीण भागामध्ये आरोग्य सेवा पुरविणाऱ्या डॉक्टर्सला एक ते दीड लाख रुपये विद्यावेतन देण्याची आवश्यकता आहे. आरोग्य सेवा सुधारण्यासाठी मंत्री महोदयांनी एअर ॲम्ब्युलन्सची कल्पना मांडलेली आहे. आज आरोग्य विभागासाठी अर्थसंकल्पात आवश्यक तेवढी तरतूद केल्याचे दिसून येत नाही. या माध्यमातून राज्यातील जनतेला आरोग्य सेवा देण्याविषयी सरकार किती गंभीर आहे हे दिसून येत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

आरोग्य विभागाच्या अनुदानामध्ये किती कपात झाली? आपण सरकारवर दबाव आणून अनुदान वाढवून घ्यावे. आज रुग्ण कल्याण समितीची काय परिस्थिती आहे? या योजनेतून जी रक्कम मिळत होती ती कमी झाली आहे म्हणून रुग्ण कल्याण समितीचे अनुदान वाढवून घेतले पाहिजे. रुग्ण कल्याण समितीचे अनुदान वाढवून दिले तर ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासा मदत होईल. आज सार्वजनिक आरोग्य विभागाचे तीन तेरा वाजलेले आहेत. सन 2015-2016 मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद 6591 कोटी रुपये होती. त्यात 1456 कोटी रुपयांची वाढ होऊन सुधारित अंदाज 8047 कोटी रुपयांचा झाला. सन 2016-2017 मध्ये अंदाजापेक्षा अधिक निधीची तरतूद करणे आवश्यक होते. सन 2015-2016 मध्ये 8047 कोटी रुपयांचा सुधारित निधी प्राप्त झाला होता, त्याऐवजी यावर्षी फक्त 6912 कोटी रुपये मिळाले. एकूण सुधारित अंदाजापेक्ष 1135 कोटी रुपये कमी दिलेले आहेत. तुम्ही काय या राज्याची आरोग्य व्यवस्था सुधरविणार आहात? आपल्या पक्षाकडून आपली प्रतिकार शक्ती वाढली पाहिजे. आपली प्रतिकार शक्ती कमी झालेली आहे. आपण गर्भगळित झालेले आहात. आपली प्रतिकार शक्ती क्षीण झालेली असून आपल्याला आता सलाईन लावण्याची गरज आहे. राज्यातील एवढ्या महत्वाच्या खात्याला 1100 कोटी रुपये यावर्षी कमी दिलेले आहेत. सन 2015 मध्ये योजनांसाठी तरतूद 1780 कोटी रुपयांची केली होती, त्यात 2692 कोटी रुपयांची वाढ करुन 4423 कोटी रुपयांची सुधारित तरतूद करण्यात आली. सन 2016-2017 मध्ये सुधारित अंदाजापेक्षा जास्त निधी वाढविणे अपेक्षित होते. यावर्षी मागील वर्षाच्या तुलनेत 1461 कोटी 88 लाख रुपयांची तरतूद कमी करण्यात आली आहे. सर्वसामान्य माणसांच्या आरोग्याच्या दृष्टीने तुमच्या भावना ही प्रामाणिक आहे का, शासनाच्या प्रमाणिकपणावर आज प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रजनन व बाल स्वास्थ्य योजनेतंर्गत सन 2015-2016 मध्ये 620 कोटी 75 लाख रुपये केंद्राकडून निधी मिळाला होता. 620 कोटी रुपयांपैकी 342.86 कोटी रुपये खर्च झाले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

आहे. एकूण निधीच्या 55 टक्के निधी खर्च केलेला आहे. जानेवारी 2016 पर्यंतची ही आकडेवारी आहे.

अध्यक्ष महाराज, नियमित लसीकरणाच्या कार्यक्रमाला 50 कोटी रुपयांची तरतूद असताना फक्त 23.70 कोटी रुपये खर्च केले म्हणजे 46 टक्के रक्कम खर्च केलेली आहे. संपूर्ण लसिकरण्ाच्या कार्यक्रमाला निधी खर्च करणे अपेक्षित होते. आपणाला या सर्व विषयांचे गांभीर्य आहे काय? "मेक इन महाराष्ट्र" या कार्यक्रमासाठी तुमचा सिंह फिरत आहे. लोकांच्या अंगावरुन फिरुन झालेले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये बाबा आमटे सारख्या समर्पित व्यक्तिमत्वाचा या महाराष्ट्राला नेहमी गौरव राहिलेला आहे. त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी चांगल्या भावनेने काम केलेले आहे. महाराष्ट्र राज्यात कुष्ठरोग्यांची संख्या 16415 आहे. या राज्याला ही गोष्ट भूषणावह आहे काय? या कुष्ठरोग्यांना 2500 रुपये मानधन देण्याची मागणी केली होती, परंतु मुख्यमंत्री महोदय तसेच माननीय वित्त मंत्र्यांनी आपली मागणी फेटाळून लावली. आपल्या देशाने कुष्ठरोग मूक्त ही संकल्पना स्वीकारलेली असताना या कुष्ठरोग नियंत्रण विभागात मंजूर 107 पदांपैकी 47 पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र राज्य हे गुंतवणुकीसाठी पहिले, अमूक गोष्टीसाठी पाहिला, तमूक गोष्टींसाठी पहिला, परंतु आज कुष्ठरोग्यांची काय परिस्थिती आहे? कुष्ठरोग निर्मूलनासाठी राज्याचा फार शेवटी क्रमांक लागतो. आपल्या राज्याची अधोगती झालेली आहे. आपल्या पुरोगामी महाराष्ट्राला ही गोष्ट भूषणावह नाही. मंत्री महोदयांचे कोणी ऐकत नाही त्यामुळे कुष्ठरोगी शोधण्याशिवाय आपल्याकडे दुसरे कोणतेच काम राहिलेले नाही. आपण कुष्ठरोग्यांना मानधन वाढवून देत नाहीत.

अध्यक्ष महाराज, राजीव गांधी जीवनदायी योजनेमुळे ग्रामीण भागाला मोठा दिलासा मिळाला आहे. ही योजना बंद करण्याचे शासनाच्या डोक्यात आहे काय? गेल्या चार महिन्यापूर्वी जीवनदायी योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.पियुष सिंह यांची बदली केलेली आहे. मध्यंतरीच्या काळात मी वर्तमानपत्रातून बातमी वाचली की, या जीवनदायी योजनेला आदरणीय शिवसेनाप्रमुख यांच्या नावाने ही योजना आणण्याचा विचार सुरु आहे. परंतु योजनांची नावे बदलून काहीही होणार नाही. राजीव गांधींच्या नावाने योजना सुरु केली आहे त्यामुळे आपण अन्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

दुसरी नवीन योजना सुरु करावी, परंतु हे नाव बदलवू नये. आपण शिव वडापाव योजना सुरु केली. शिवाजी महाराजांचे नाव द्यायचे असेल तर वडापावला कशाला नाव देता आपण.

डॉ.दिपक सावंत : अध्यक्ष महाराज, शिव वडापाव योजना ही शिवसेनेची आहे, त्याचा संबंध दुसऱ्या गोष्टीशी जोडू नये, असे माझे मत आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महाराज, वडापावमुळे लोकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. नाव बदनाम होते असे मला म्हणावयाचे आहे. माननीय आरोग्य मंत्र्यांचे दु:ख आम्हाला समजते, आपल्या वेदना आम्हाला कळतात, परंतु मंत्री महोदय डॉ.दिपक सावंत आपले ऐकले जात नाही, हे वास्तव आपण का मान्य करीत नाही? राज्याचे आरोग्य तुमच्यापासून बिघडले आहे. सहयोगी पक्षाला अपमानास्पद वागणूक मिळते, यामध्ये राज्याचे मोठे नुकसान होत आहे. हे सर्व सहन करण्याशिवाय आपल्याला दुसरा पर्याय नाही. स्वाभिमानी बाण्याचे लोक हे कसे सहन करतात, याचे मला आश्चर्य वाटते...(अडथळा).... तुमचा बाण कमळामध्ये रुतलेला आहे, वाकलेला आहे. तुम्हाला सहन होत नाही आणि सांगता येत नाही, अशी तुमची अवस्था झालेली आहे. आपण मौन व्रत धारण केलेले आहे. मला नेहमी तुमचे कौतुक वाटते. मौनी बाबा सारखी तुमची परिस्थिती झालेली आहे. आरोग्य मंत्र्याच्या दृष्टीने मध्यंतरी खाजगी रुग्णालयासाठी तसेच गरीब रुग्णांना सेवा मिळावी यासाठी महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट आपण आणणार आहात. एका बाजूला आपण हा ॲक्ट आणत असताना दुसऱ्या बाजूला आपण सेवा वाढविली पाहिजे, यासंदर्भात मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात खुलासा केला पाहिजे. राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या संदर्भात तुमची नॅशनल इन्शुरन्स कंपनीसमवेतची मुदत संपत आलेली आहे. ती आपल्याला रिव्हाईज करावयाची आहे. मंत्री महोदय मुख्यमंत्री महोदयांना वेळ मागत आहेत, परंतु तुम्हाला वेळ मिळत नाही. अनेक वेळेला मुख्यमंत्री महोदयांचे उंबरठे झिजवूनही वेळ मिळत नाही. तुम्ही म्यान केलेली तलवार एकदा बाहेर काढा. तुमचा डिसेंबर 2014 पासून दबलेला वाघ जागा करा अन्यथा तुमची शेळी झाल्याशिवाय राहणार नाही, अशी अवस्था या सरकारची झालेली आहे.

यानंतर LL-1 ..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ...

तुमची शेळी कधी हे तुम्हालाही कळणार नाही ते तुमच्या सुप्रीमोला कधी कळेल हे मला माहीत नाही.

डॉ. दीपक सावंत (बसून): तुम्ही पण येथे होता ना तुम्हाला माहीत आहे ना की, शेळी आहे की वाघ आहे ते ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : आम्ही असताना वाघ होता तुम्ही वाघाची शेळी करुन टाकली अशी परिस्थिती आहे. मी तेव्हा वाघच होतो परंतु, तुमची शेळी झाल्याचे दु:ख मला आहे. सन्माननीय सदस्य श्री. शंभुराज देसाई म्हणून तुम्ही आता शेळी आणि बुगडी आणायला निघाला आहात. तुम्ही आता जे शेळी आणि बुगडी आणायला निघाला आहात ना त्याचे कारण ते आहे. तुमचे दु:ख आम्हाला समजते. मी माझ्या जुन्या संबंधांचा वापर करुन सांगतो पाहिजे तर, भविष्यात तुमचा निश्चित विचार झाला पाहिजे.

डॉ. दीपक सावंत : माननीय विरोधी पक्ष नेते आपल्याला काँग्रेसने जे दिले नाही ते, आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांनी दिले. आपण हे लक्षात ठेवावे की, वाघ हा नेहमी वाघच असतो, तो कधी शेळी होत नाही.

तालिका सभाध्यक्ष (डॉ. सतीश पाटील): कृपया आपापसात बोलू नका.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : मंत्री महोदय आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्याबाबत आमच्या मनात नेहमीच आदर राहिलेला आहे. आम्ही त्यांचा अनादर कधी केलेला नाही व करणारही नाही. परंतु, त्यांनी जी स्वप्ने पाहिली होती, त्या स्वप्नांची राख करण्याचे पाप तुमच्याकडून होत आहे. त्यांच्या मनातील जो वाघ तुम्ही त्याची शेळी करुन टाकली आहे याचे आम्हाला दु:ख होते.

अध्यक्ष महोदय, या शासनाच्या संवेदना संपलेल्या आहेत. आम्ही सातत्याने सांगतो की, तुम्ही या दुष्काळी भागातील जनतेसाठी काही तरी करा. आज तुम्ही मराठवाड्यात जाऊन आला आहात. आज तुमच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया होत नाहीत. शासकीय हॉस्पिटल्समधील सर्व शस्त्रक्रिया थांबलेल्या आहेत. पाणी नाही, पाण्यासाठी लोकांची भटकंती सुरु आहे. लातूर, हिंगोली, परभणी, बीड, उस्मानाबाद येथील डॉक्टरांची अवस्था काय आहे तर, पूर्ण आरोग्यसेवा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ...

पाण्याच्या अभावी ठप्प झालेली आहे. आपल्याला कर्जमाफी करायची आहे तर करा, करु नका, तुम्हाला करावयाचे आहे ते करा, शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्यांना करु द्या, मरु द्या तुम्ही काही चिंता करु नका. आपण आता सर्व सोडून दिलेले आहे. कोणताही अभिनिवेश आपण ठेवलेला नाही, कुठल्याही संवेदना ठेवलेल्या नाहीत. आज तुमचे माननीय श्री. एकनाथराव खडसे लातूरला रेल्वेने पाणी घेऊन जायला गेले आहेत. या आरोग्याच्या संदर्भात पाण्याअभावी मराठवाड्यातील दुष्काळी भागातील शस्त्रक्रिया बंद पडलेल्या आहेत. त्यासंबंधात आपण काही तरी विचार केला पाहिजे

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने राष्ट्रीय आरोग्य अभियानात येणाऱ्या निधीपैकी 50 टक्के निधी आपण कापलेला आहे. त्यामुळे आता नॅचरली आता तो सर्व ताण जिल्हापरिषदेवर येणार आहे. येणाऱ्या निधीला कात्री लागल्यामुळे कुपोषण, माता मृत्यू, कुष्ठरोग निर्मूलन, मधुमेह, कर्करोग व हृदयरोग नियंत्रण कार्यक्रमावर परिणाम झालेला आहे. एनआरएचएमच्या बाबतीत केंद्र शासनाने 50 टक्के निधी कमी केल्यानंतर आमची अशी अपेक्षा होती त्याची 50 टक्के भरपाई राज्य सरकार करील. याचा अर्थ राज्य सरकारने तुम्हाला दिलेला नियतव्यय 1100 कोटी रुपये कमी केला. एनआरएचएमचा 50 टक्के निधी कमी झाला. मग मी मघाशी म्हटल्याप्रमाणे आरोग्यसेवेचे तीनतेरा वाजणार नाही तर काय होणार ? आज आदिवासी भागातील परिस्थिती आणखी दयनीय आहे. तेथे कोणी जात नाही. मी स्वत: मेळघाटमध्ये 4 वर्षे काम करीत होतो. मेळघाटची काय परिस्थिती आहे, आपण तेथे इतक्या सुखसुविधा दिल्या, आरोग्य केंद्र उभारली. ती आरोग्यकेंद्र आपण डांबरी सडकांवर नेऊन टाकली, तरी तेथील कुपोषणाचे प्रश्न काही सुटत नाहीत.

आम्ही मधल्या काळात एक प्रयोग केला. तेथील आदिवासी लोक बाबालोकांशिवाय औषध घेत नाहीत. त्या पाड्यामध्ये एक प्रमुख बाबा असतो. त्याला तेथे बसवून स्टायपँड देण्यास सुरुवात केली. त्याच्यामार्फत डॉक्टरांच्या गोळ्या महिलांना देण्यास सुरुवात केली. असे तुमच्या पुस्तकात नसलेले प्रयोग पूर्वी झाले आहेत. हे सर्व प्रयोग आपण याकरिता करतो की, यामुळे आदिवासींचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ...

कुपोषण संपले पाहिजे. आज आदिवासी विकास मंत्री महोदयांच्या विक्रमगडची अवस्था पाहिली तर, आमचा आदिवासी आता व्हेंटिलेटरवर गेलेला आहे, अशी परिस्थिती आहे. जी काही आदिवासी भागातील आरोग्यकेंद्रांची अवस्था दिसते, ती अतिशय दयनीय आहे. त्याबाबत अधिक काम करण्याची गरज आहे. आदिवासी पाडे, गाव आहेत ते डोंगर, खोऱ्यांमध्ये राहणारे लोक आहेत. आज विक्रमगडची परिस्थिती काय आहे याबाबतची आकडेवारी मी आणलेली आहे. तेथे 25 मंजूर पदांपैकी 12 पदे रिक्त आहेत. आज 50 टक्के पदे रिक्त असताना परवा जव्हारमध्ये विषबाधेची घटना घडली. तेथे शेजारीच 1 कि.मी. अंतरावर आरोग्य केंद्र आहे परंतु माणसे नाहीत. शेवटी 20 कि.मी. अंतरावर नेऊन त्या मुलांना आरोग्यसेवा दिल्यानंतर ती वाचली. हे मागच्या महिन्यातील वास्तव आहे. आपण हे स्वत: अनुभवले आहे.

डॉ. दीपक सावंत (बसून) : तेथे 240 मुले बाधित झाली होती आणि आरोग्यकेंद्रामध्ये 30 बेड्स असतात, याची आपल्याला माहिती असेल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : परंतु, आपल्या आरोग्यकेंद्रामध्ये कोणीही नव्हते साहेब, तेथे काहीच साधने नव्हती.

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदय आपण आपल्या रिप्लायमध्ये याबाबत सांगावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आज राज्यातील कुपोषणाचा प्रश्न गंभीर आहे. कुपोषण का वाढले ? कुपोषण निर्मूलनाबाबत आज 30 संस्था काम करीत आहेत. आज कुपोषणाची जबाबदारी आरोग्यखात्याकडे आहे, आदिवासींची जबाबदारी आदिवासी विकास विभागाकडे आहे, बालकांची जबाबदारी महिला व बालक विकास खात्याकडे आहे. कुपोषणाचे निकष कोणते व काय मानायचे हा खरा प्रश्न निर्माण झालेला आहे. महिला व बाल विकास खात्याचे निकष वेगळे आहेत. तुमच्या खात्याचे निकष वेगळे आहेत व आदिवासी विकास खात्याचे निकष वेगळे आहेत. एक सचिव दुसऱ्या खात्याचे ऐकत नाहीत. मला तुम्ही येथे प्रामाणिकपणे कबुली द्या की, तुमच्या या तिन्ही खात्यावर खरे तर हे कुपोषण कोणत्या ना कोणत्या मार्गाने कमी करण्याची जबाबदारी आहे. तुमच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ...

तिन्ही खात्यांची संयुक्त बैठक कधी होते काय, हे मंत्री महोदय एकदा सांगावे. प्रत्येक खात्याच्या सचिवांना वाटते की, माझेच साम्राज्य आहे. प्रत्येक मंत्री महोदयांना वाटते की, माझे साम्राज्य आहे. तुम्ही तुमचे साम्राज्य सांभाळा परंतु, तुमचे साम्राज्य सांभाळताना आमचा आदिवासी कुपोषणाने मरत आहे त्याला मरु देऊ नका, एवढीच आमची विनंती आहे. काही तरी वन विंडो सिस्टम आणावी.

अध्यक्ष महोदय, बालमृत्यूचे प्रमाण वाढत चालले आहे. आज महाराष्ट्रातील माता मृत्युंची आकडेवारी पाहिली तर, सन 2015 मध्ये माता मृत्यू 409 होते त्यामध्ये वाढ होऊन सन 2016 मध्ये ती संख्या 574 इतकी झालेली आहे. हे कशाचे द्योतक आहे ? दुर्गम भागामध्ये आरोग्यसेवा पुरविण्याकरिता शिव आरोग्य योजना सुरु केल्याचे परवा आम्हाला समजले. मघाशी शिव वडापावचा उल्लेख केल्यावर मंत्री महोदयांना फार वाईट वाटले. मला समाधान असे वाटले की, मंत्री झाल्यामुळे काही तरी मांडण्याकरिता संधी मिळाल्यावर तुम्ही शिव आरोग्य योजना मांडली. मी एवढ्या दुष्काळी भागात फिरलो परंतु, एकाही गावात मला त्याची कोठेही पाटी पाहायला मिळाली नाही. माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी अर्थसंकल्पाच्या भाषणात या योजनेचा उल्लेखही केला नाही. मग या योजनेकरिता निधी कोठून आणणार ? तुम्ही ही योजना कोणासाठी आणलेली आहे, या योजनेतून तुम्ही कोणाचे आरोग्य राखणार आहात, मला असे वाटते की शिवाजी महाराजांचे नाव वापरुन आमच्या एवढ्या मोठ्या आराध्य दैवताची तुम्ही का बदनामी करता ? मघाशी शिव वडापाव म्हटले तर तुम्हाला वाईट वाटले. वडापाव कधी शिव वडापाव होऊ शकतो का ? तुम्ही काही म्हणा उध्दव पाव किंवा दीपक पाव असे काही तरी करा. शिवाजी महाराजांची बदनामी करु नका एवढीच आमची अपेक्षा आहे. मला शिवसेनेचे हे कळत नाही की, तुम्ही भान नसलेल्या योजना आणता आणि त्याला तुम्ही शिवाजी महाराजांचे नाव देता. महाराज आमचे आदर्श आहेत. एवढ्या मोठ्या माणसाचे नाव देताना त्या योजनेची उपयुक्तता माहीत झाली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माझे 2-3 मुद्दे राहिलेले आहेत. आज आपण औषधांच्या किंमती दामदुप्पट वाढविलेल्या आहेत. आरोग्य सुविधांच्या शुल्कामध्ये दुप्पट वाढ केली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

मी मघाशी म्हटले. आरोग्य सुविधांच्या शुल्काच्या वाढलेल्या किमतीमध्ये केवळ राजीव गांधी योजनेच्या निमित्ताने सरकारने तग धरलेला आहे.

अध्यक्ष महोदय, आपण 108 हा टोल फ्री नंबर सुरु करुन त्याद्वारे तत्काळ रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याच्या योजनेचा उल्लेख त्यामध्ये केला आहे. आपण त्याचे श्रेय घ्यावे. टोल फ्री नंबर डायल केल्यावर काय ऐकायला मिळते. गाडी बंद आहे, गाडीमध्ये डिझेल नाही असेच सांगण्यात येते...(अडथळा)...आपण भाषणामध्ये सांगावे. आम्हाला आलेले अनुभव मी सांगत आहे...(अडथळा)...माननीय मंत्री डॉ. दिपक सावंत हे व्यस्त नाही, आपण जागेवर आहात. त्याबद्दल आमची हरकत नाही. परंतु आपण उस्मानाबादला जाताना व्हाया हैदराबाद का जाता याबद्दल आम्हाला समजलेले नाही...(अडथळा)...

डॉ. दिपक सावंत : अध्यक्ष महोदय, मला या बाबीचे उत्तर देण्याची संधी द्यावी. मी हैदराबादहून जाईल किंवा संभाजीनगरहून जाईल. उमरगा हे उस्मानाबादचे, धाराशीवचे शेवटचे टोक आहे. ते हैदराबादहून जवळ पडते. संभाजीनगरहून गेल्यास पूर्ण उस्मानाबाद जिल्हा येतो. माननीय विरोधी पक्षनेते कुठे जातात, तर तुळजापूरपर्यंत जातात आणि परत येतात आणि दुष्काळी दौरा करतात, हे दुर्दैव आहे. मी कमीतकमी 17 ते 18 वेळा पालकमंत्री म्हणून उस्मानाबादमध्ये गेलेलो आहे. मला ही बोलण्याची संधी हवी होती. आपण माहिती घ्यावी. मी आपला पूर्ण मान राखतो. विरोधी पक्षनेते म्हणून आपण सर्व माहिती घेऊन सांगावे. आपण आपले सन्माननीय श्री. मधुकरराव चव्हाण यांना विचारावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपण हैदराबादला गेले तरी आमचा त्यास आक्षेप नाही. आपण तेथे जायला काही हरकत नाही. तेथे रामोजी स्टुडीओ आहे. परंतु तेथे आपण जाऊ नये. मला माननीय मंत्री डॉ. दीपक सावंत यांच्याविषयी आदर आहे. मी आपल्याबद्दल काही वाईट बोललो असल्यास सांगावे.

अध्यक्ष महोदय, नागरिकांना उपलब्ध होणाऱ्या आरोग्य सेवेमध्ये राज्य सरकारचे अपयश आहे. मी बाकीच्या विषयावर जास्त बोललो नाही. परंतु या विषयावर पुन्हा, पुन्हा बोलत आहे. राज्यातील आरोग्य व्यवस्थेची परिस्थिती अत्यंत बिकट आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका अध्यक्ष : सन्माननीय विरोधी पक्षनेते आपला 35 मिनिटे कालावधी झालेला आहेत.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आरोग्य बिघडले असल्यामुळे त्यावर बोलण्यासाठी थोडा वेळ लागणारच आहे. राज्यातील आरोग्य दूर झाले पाहीजे आणि माननीय मंत्र्यांना चांगल्या सूचना केल्या पाहीजे म्हणून मी बोलत आहे. राज्यातील धर्मदाय ट्रस्टच्या हॉस्पीटलमध्ये 10 टक्के आरक्षण आहे. मुंबईतील रुग्णालयामध्ये 50 हजार खाटा आहेत. धर्मादाय आयुक्त यांच्या अंतर्गत असले तरी तेथे आरोग्य सेवेचा भागच नाही. आपण त्याकरिता पैसा खर्च करतो. त्यांनी मोफत सुविधा द्यायला पाहीजे. त्यासंदर्भात मागील महिन्यात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने टीआयएसमध्ये घेतलेल्या जनसुनावणीच्या वेळी काही शिफारसी केलेल्या आहेत. त्या शिफारसी अमलात आणल्यास त्याचा चांगला उपयोग होईल. आता राज्याची नाडी आपल्या हातात आहे. नाडीची परिक्षा करताना सारासार विचारशक्तीने योग्य ते विचार करावेत, पूर्वी नाडी परिक्षणच होत होते. आता नाडी तपासता तपासता हाताची नाडी गेली आणि कंबरेला नाडी आली. आता आमची अपेक्षा एवढीच आहे की, कंबरेची नाडी सुटू देऊ नये...(अडथळा)...मी आरोग्याची नाडी म्हणत आहे. कारण सुधारित अर्थसंकल्पामध्ये 2,000 कोटी रुपयांची कपात झाल्यानंतर या राज्याच्या आरोग्य विभागाचे काय होणार आहे. ज्याप्रमाणे भारतीय रेल्वे माननीय केंद्रीय रेल्वे मंत्री श्री. सुरेश प्रभु यांच्या भरवशावर आहे, त्याप्रमाणे राज्यातील आरोग्य परमेश्वराच्या भरवशावर चाललेले आहे. आम्हाला आपल्या कर्तुत्वाबद्दल, कार्याबद्दल शका नाही. या उणिवा तुमच्या काळातील नाही. हे अनेक वर्षातील संचित होते. त्यामध्ये सुधारणा करण्याची अपेक्षा आहे. परंतु आपल्या खात्याला देण्यात आलेल्या तरतुदीमध्ये 2,000 कोटी रुपयांची तरतूद कमी होणार असेल तर नागरिकांचे आरोग्य कसे सुधारले जाणार आहे. किमान त्याकरिता आपली इच्छाशक्ती पणाला लावावी. आपण सिंह, वाघ म्हणता त्याप्रमाणे वाघाचा अवतार आम्हाला दिसू द्या. माझ्या बरोबरचा माणूस वाघ असल्याचे दिसले पाहिजे, माझ्या बरोबरचा माणूस शेळी होते, याचे मला दु:ख आहे. तसा वाघ आम्हाला दिसू द्यावा, एवढीच अपेक्षा करतो आणि या मागण्यांना विरोध करुन थांबतो, धन्यवाद.

---*---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : आता मी एक घोषणा करणार आहे.

श्री. ग. आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, आपण प्रस्ताव मांडत असाल तर मला त्यावर बोलण्याची संधी द्यावी.

तालिका सभाध्यक्ष : नाही. मी आज घडलेल्या घटनेबद्दलची घोषणा करणार आहे.

श्री. ग. आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, त्यासंदर्भात सभागृहाने निर्णय घ्यायचा असतो.

तालिका सभाध्यक्ष : संबंधितांनी आक्षेपार्ह पत्रके वाटली, घोषणा दिल्या. त्यासंदर्भात आपण काय केले, त्याबाबत मी घोषणा करीत आहे.

पृ.शी./मु.शी. : घोषणा

तालिका सभाध्यक्ष : आज दिनांक 05 एप्रिल 2016 रोजी दुपारी 01.57 च्या सुमारास सभागृहाचे कामकाज सुरु असताना सभागृहाच्या प्रेक्षक गॅलरीत बसलेले श्री. विकास वसंत पाटील, श्री. धनाजी साधु धायगुडे, श्री. सुरेश देवराम होलगुंडे व श्री. कुंडलिक कोलपे यांनी सभागृहामध्ये पत्रके फेकून अत्यंत आक्षेपार्ह घोषणा दिल्या व सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय निर्माण करण्याचा प्रयत्न केला व पर्यायाने सभागृहाचा विशेषाधिकार भंग व अवमान केला.

सदरहू व्यक्तींना सुरक्षा दलाने ताब्यात घेतले असून त्यांना सभागृहाचे आजच्या दिवसाचे कामकाज संपेपर्यंत सभागृहाच्या मुख्य सुरक्षा अधिकाऱ्यांच्या ताब्यात ठेवण्यात येईल व त्यांच्या या गंभीर व अवमानकारक वर्तनाबद्दल त्यांना सक्त ताकीद देण्यात येऊन सोडून देण्यात येईल.

---*---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. सुनील देशमुख (अमरावती) : अध्यक्ष महोदय, 2016-2017 च्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाचे राज्यातील प्रत्येक नागरिकाला अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, पाणी व आरोग्य आदी मूलभूत सुविधा पुरविण्याचे कर्तव्य आहे. मी माननीय मंत्री डॉ. दीपक सावंत यांना चांगले ओळखतो. बहुतेक लोकांनी त्यांचे काम वरील विधानपरिषदेच्या सभागृहामध्ये पाहिले नाही. विरोधी पक्षाचे आमदार म्हणून त्यांचे काम मी अत्यंत जवळून पाहिले आहे. आरोग्य खात्याचा माक्रोलेव्हल म्हणजे डिटेल अभ्यास त्यांचा आहे. सर्वसामान्य जनता आणि आदिवासींच्या प्रश्नांची ओळख असेलेले ते एक आमदार होते. हे प्रश्न धसास कसे लावावे, महाराष्ट्राची आरोग्य व्यवस्था कशी सुधारावी म्हणून विरोधी पक्षात असताना देखील ते अत्यंत कन्स्ट्रक्टीव्ह असे सजेशन शासनाला देत होते. जेव्हा ते महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री झाले, या खात्याची सुत्रे त्यांच्या हातात आली, तेव्हा मला विश्वास होता की, आता महाराष्ट्रातील जनतेला आरोग्यबद्दल आता नक्कीच अच्छे दिन येणार आहे. परंतु काय झाले. असे म्हणतात की, क्रांती झाल्यावर प्रत्येक क्रांतीकारक हा प्रति क्रांतीकारी होतो. After revolution, revolutionary became anti revolutionary. म्हणजे ज्यांना प्रश्नांची जाण होती, ज्यांना आरोग्य खाते संपूर्णपणे कळले होते, ते आरोग्य मंत्री झाल्यानंतर काय घडले. या खात्याची एवढी दुरावस्था या दीड वर्षामध्ये झाली. त्यामध्ये त्यांचा दोष नाही. हे इनहेरीटेड आहे. म्हणजे पहिल्यापासून चालत आलेले आहे आणि ते खाते आता त्यांच्या हातात सोपविण्यात आले आहे. मला विश्वास आहे की, ते येणाऱ्या काळामध्ये यामध्ये दुरुस्ती करतील.

अध्यक्ष महोदय, आपल्याला त्यांच्याकडून पुष्कळ आशा आहे. परंतु त्यांना या परिस्थितीची जाणीव करुन देणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्याचे रिफ्लेक्शन येणाऱ्या काळामध्ये त्यांच्या कार्यक्षमतेमध्ये दिसून येईल. जागतीक आरोग्य सेवेचे निकष असे आहे की, 40 रुग्णाच्या मागे एक खाट असली पाहीजे. महाराष्ट्रामध्ये 3,500 रुग्णांच्यामागे एक खाट आहे. यामध्ये मोठी विसंगती दिसत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुनिल देशमुख.....

राज्याची लोकसंख्या 11 कोटी 23 लक्ष 74 हजार असून त्याकरिता 516 रुग्णालये आहेत. या रुग्णालयातील खाटांची संख्या 32,630 इतकी आहे. राज्यातील लोकसंख्येचा विचार करता 2 लाख 20 लोकसंख्येमागे एक रुग्णालय व 3,500 लोकांमागे एक खाट, अशी दुरवस्था आहे. ही बाब माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सांगितली होती व ती खरी आहे.

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभागासाठी अतिशय तुटपुंजी तरतूद करण्यात येते, ती वाढविण्याची आवश्यकता आहे. यावर्षी या विभागाकरिता 1,500 कोटी रुपये तरतूद कमी करण्यात आली आहे. हा राज्याच्या आरोग्याचा प्रश्न असल्याने त्याबाबत मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात स्पष्टीकरण द्यावे.

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभागाच्या दुरवस्थेमागे तीन ते चार कारणे आहेत. मी आताच सांगितले की, आरोग्य विभागास मिळणारा अपुरा निधी, या मुद्याचा उल्लेख माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केला होता. आरोग्य विभागाचा योजनेपेक्षा योजनेतर खर्चावर भर असून यावर्षी मागील वर्षीच्या योजनेपेक्षा योजनांतर्गत तरतूद 1,461 कोटी रुपयांनी कमी करण्यात आली आहे. सन 2015-16 मध्ये योजनांतर्गत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये जवळपास 4,557 कोटी रुपये तरतूद करण्यात आली होती व सन 2016-17 मध्ये 3,059 कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. सदरहू तरतूद मागील वर्षी पेक्षा 1,461 कोटी रुपयांनी कमी आहे, ही बाब अत्यंत गंभीर आहे. या विभागाचा निधी मागील वर्षीच्या तुलनेमध्ये 10 टक्के वाढावयास पाहिजे होता परंतु तो कमी करण्यात आला. याबाबत मंत्री महोदय चांगल्या प्रकारे स्पष्टीकरण देऊ शकतील, असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, जवळपास 30 ते 40 हजार लोकसंख्येसाठी एक प्राथमिक आरोग्य असून त्यांना जिल्हा परिषदमार्फत औषध खरेरीकरिता 1 लाख 20 हजार रुपये देण्यात येतात. याचा अर्थ असा की, एका माणसावर वर्षभराच्या कालावधीत 12 रुपये औषधोपचारासाठी खर्च करण्यात येतो. मुंबई व्यतिरिक्त ग्रामीण भागातील लोक प्राथमिक आरोग्य केंद्रावर सर्वार्थाने अवलंबून असतात. कारण त्यांना खाजगी दवाखान्यामध्ये उपचार घेणे परवडत नाही. आता राज्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती वाईट असून ते खाजगी दवाखान्यामध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुनिल देशमुख.....

उपचार घेऊ शकत नाही. हे सरकार एका माणसावर 12 रुपये औषधोपचारावर खर्च करीत असेल तर आरोग्याची काय व्यवस्था लोकांसाठी उभी केली आहे, याचा विचार केला तर अंदाज येईल. अनेक छोट्या छोट्या गोष्टीमध्ये सरकार सुधारणा करु शकते. प्राथमिक आरोग्य केंद्र, नळाचे बील व वीजेच्या बिलाकरिता शासनाकडून पैसे देण्यात येत नाहीत. वीज बिल, पाणी बिल, नगर परिषदेचा टॅक्स याकरिता सरकार कमी तरतूद करते. रुग्ण कल्याण समितीतील पैसा हा इमर्जन्सीमध्ये आरोग्य केंद्रामध्ये औषधे उपलब्ध नसतील तर ती तातडीने बाहेरुन आणून रुग्णाला वाचविण्याकरिता असतो. त्यामधून ही सर्व बिले भरण्यात येतात. मला असे वाटते की, याबाबीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. यासर्व बाबीकरिता मायक्रो लेवल प्लॅनिंग करणे शक्य आहे, याकरिता मी या बाबी सांगत आहे. सत्तारुढ पक्षाचा आमदार म्हणून कन्स्ट्रक्टीव्ह प्रपोजल किंवा ॲडव्हाईस मी देऊ शकतो व त्याची दखल सरकारने घेतली पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, आरोग्य उप केंद्र हे रेफरल सेंटर झालेले आहेत. तेथे औषधांची वाणवा आहे, डॉक्टरांची वाणवा आहे. शासनकडून सांगण्यात येते की, ग्रामीण भागामध्ये सर्वत्र डॉक्टर उपलब्ध करुन दिले आहेत. या दवाखान्यामध्ये तीन डॉक्टर असतात व दोन दिवस एक डॉक्टर याप्रमाणे ते दिवस वाटून घेतात. वाटून घेतलेले दोन दिवस वगळता इतर चार दिवस ते मुख्यालयी न राहता जवळ असलेल्या मोठ्या गावात त्यांचे घर असते तेथे ते राहतात. शासनाला समाधान आहे की त्याने तीन डॉक्टर रुग्णालयासाठी दिले. परंतु त्या ठिकाणी एकच डॉक्टर कर्तव्यावर हजर असतो व तो डॉक्टर पेशंट रेफर करण्याच्या मनसिकतेत असतो. त्यामुळे शासनाने उभी केलेली सिस्टम फेल्यूअर होते.

अध्यक्ष महोदय, सिव्हील सर्जन व आरएमओ यांची जबाबदारी ऑपरेशन करणे, पेशंटची काळजी घेणे व एकंदर प्रशासन सांभाळणे ही आहे. परंतु प्रत्यक्षात त्याकरिता त्यांना वेळ मिळत नाही. जिल्हाधिकारी, मंत्री महोदयांच्या व इतर बैठकीसाठी हे सिव्हील सर्जन हॉस्पिटल सोडून बाहेर जात असतात. यासर्व प्रशासकीय बाबींसाठी स्वतःला ते इच्छा नसताना गुंतवून ठेवतात. त्यामुळे साहजिकपणे त्यांचे हॉस्पिटलकडे दुर्लक्ष होते. यामुळे रुग्णालयातील प्रशासकीय बाबी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुनिल देशमुख.....

हाताळण्याकरिता स्वतंत्र अधिकारी असला पाहिजे. तसेच, पेशंटशी निगडीत असलेल्या बाबीकरिता सिव्हील सर्जन व आरएमओ फ्री असले पाहिजे, अशी सिस्टम डेव्हलप करण्याची आवश्यकता आहे.

तालिका सभाध्यक्ष (डॉ.सतीश पाटील) : सिव्हल सर्जनकडे ॲडमिनिस्ट्रेशन न देता त्याकरिता स्वतंत्र अधिकारी नियुक्त करण्यात यावा, हा महत्वाचा मुद्दा आहे.

डॉ.सुनिल देशमुख : अध्यक्ष महोदय, मी तोच मुद्दा सांगत आहे. सिव्हील सर्जनकडे ॲडमिनिस्ट्रेशन देण्याऐवजी त्याकरिता दुसरी व्यवस्था निर्माण करण्यात यावी.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी अतिदुर्गम भागातील डॉक्टरांच्या संदर्भात उल्लेख केला होता. दुर्गम भागातील डॉक्टरांना पूर्वी डबल एनपीए देण्यात येत होता. आता तो रद्द करण्यात आला आहे, का केला हे मला माहीत नाही. अमरावतीपासून हथरु येथील अंतर 300 ते 325 कि.मी. आहे व तेथे जाण्याकरिता दोन दिवस लागतात. अशा ठिकाणी राहण्याच्या मोबदल्यात डॉक्टरांना अधिकचे इन्सेटिव्ह मिळत नसल्याने डॉक्टर तेथून पळून येतात. अशा ठिकाणी डॉक्टरांना डबल एनपीए मिळत होता, त्यावेळी ते तेथे राहत होते. थोडे फार पैसे वाचविण्याकरिता मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असलेल्या आदिवासींना आरोग्य व्यवस्थेपासून वंचित करण्यात येत आहे, याची शासनाने दखल घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कमतरतेबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. मराठवाड्यामध्ये 73, विदर्भामध्ये 43, उर्वरित राज्यात 136 प्राथमिक आरोग्य केंद्र कमी आहेत. याप्रकरणी विभागाने सातत्याने पाठपुरावा करुन ते उपलब्ध करुन देण्याकरिता वित्त विभागाकडून निधी प्राप्त केला पाहिजे.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी पिठासीन अधिकारी डॉक्टर आहेत, उत्तर देणारे मंत्री महोदय डॉक्टर आहेत व बोलणारे सन्माननीय सदस्य ही डॉक्टर आहेत त्यामुळे त्यांनी डॉक्टरांच्या संदर्भातील अडचणीवर ताबतोब उपचार करावा.

डॉ.सुनिल देशमुख : अध्यक्ष महोदय, खरे तर आम्ही आरोग्य सेवा सोडून या क्षेत्रात आल्याने अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुनिल देशमुख.....

अध्यक्ष महोदय, मराठवाड्यामध्ये 643, विदर्भामध्ये 313, उर्वरित राज्यात 1477 या आरोग्य उप केंद्राचे काम आज सुरु केले तर पुढील 5 वर्षांच्या कालावधीमध्ये पुष्कळ प्रमाणात आरोग्य उप केंद्रे तयार होतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आरोग्य विभागातील रिक्त पदाबाबतचा मुद्दा मांडला आहे तो मी पुन्हा उपस्थित करणार नाही.

अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाच्या सत्ताकालावधीमध्ये राजीव गांधी आरोग्यदायी जीवन योजना सुरु करण्यात आली, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या योजनेंतर्गत 7 लाख 10 हजार 847 रुग्णावर यावर्षी उपचार करण्यात आले असून त्याकरिता 1750 कोटी रुपये खर्च करण्यात आला. सदर योजना नसती तर अनेक गरीब लोकांना वैकुंठवास झाला असता, हे सांगण्याची आवश्यकता नाही. या योजनेला अजून मजबूत करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मागील सरकारच्या कालावधीमध्ये 5 वर्षे श्री.शेट्टी हे आरोग्य मंत्री होते. त्यांच्या 5 वर्षाच्या पूर्ण कालावधीमध्ये अनेक ठिकाणी सिटी स्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्यात आल्या नाही. सिटी स्कॅन मशीनमुळे बेसिक इन्व्हेस्टिगेशन करुन योग्य डाग्नोस्टीक करणे शक्य होते. जिल्ह्याच्या ठिकाणी सिटी स्कॅन मशीन नाहीत, ही बाब इतर देशांना समजली तर आपली काय परिस्थिती निर्माण होईल ? मंत्री महोदयांनी पदभार घेऊन दीड वर्षांचा कालावधी झाला आहे परंतु अजूनही दूरपर्यंत सिटी स्कॅन मशीनचा पत्ता नाही, त्यांनी ते उपलब्ध द्यावेत अशी माझी विनंती आहे.

यानंतर OO-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. सुनिल देशमुख.....

दुसरी गोष्ट अमरावतीच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसंबंधी आहे. महाराष्ट्राची सक्सेसफूल स्टोरी म्हणून आपल्याला नाव घेता येईल की, एक हॉस्पिटलकडून शासनाला कसा निधी मिळतो. या ठिकाणी अत्यंत चांगली सोय आहे. येथील पदस्थापनेबद्दल मागच्या वेळी आपण लक्षवेधी सूचना लावली होती. आपण त्यास अत्यंत पॉझिटीव्ह उत्तर दिले होते. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: उठून 1 महिन्याच्या आतमध्ये आम्ही पदस्थापना देऊ असे त्यांनी आम्हाला आश्वासित केले होते. आपल्या नेतृत्वाखाली हा महाराष्ट्र आरोग्यदृष्ट्या सुदृढ होईल अशी मला खात्री आहे. कार्यक्षम मंत्री म्हणून आम्ही आपल्याला ओळखतो म्हणून आपण कृपया कामाला सुरूवात करावी, अशी आमची मनापासून इच्छा आहे. धन्यवाद.

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर (बीड) : अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अनुदानाच्या मागण्या चर्चेसाठी आज सभागृहात आलेल्या आहेत. त्यासंबंधी मी बोलत आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग हे कल्याणकारी राज्य म्हणून जी प्रतिमा तयार होत असते त्यासाठी अतिशय सहाय्यभूत ठरणारे हे खाते आहे. आरोग्यमंत्री डॉ. दिपक सावंत साहेब हे खूप कार्यक्षम आहेत. त्यांचा काम करायचा उत्साह दांडगा आहे. परंतु कोंडी होताना दिसते, आर्थिक कोंडी होताना दिसते आणि त्या कोंडीतून बाहेर पडणे म्हणजे मला वाटते त्यांच्यासाठी आव्हान आहेत. पण ते हे आव्हान झेलतील, स्वीकारतील याबद्दल माझ्या मनात शंका नाही. या ठिकाणी राज्याची आरोग्य सेवा ही कशी आहे, हे आपण सांगतो, सर्व बोलतात किंवा अनुभवतात, त्याऐवजी महाराष्ट्र राज्यातील आरोग्य सेवा असमाधानकारक आहे असे राष्ट्रीय मानवी अधिकार आयोग यांनी त्यांचे आक्षेप नोंदविताना म्हटले आहे. ज्यावेळी साक्षी झाल्या, त्यावेळी अशा प्रकारचे आक्षेप त्यांनी नोंदविले आहेत. त्यामुळे माणसाचे आरोग्य चांगले राहणे, स्वास्थ्य आणि स्वास्थ्यपूर्ण महाराष्ट्र राहणे हे आपल्यासमोरील पहिले उद्दिष्ट आवश्यक आहे. राज्य सरकारच्या वतीने करावयाच्या तरतुदींसंबंधी ज्याचा उल्लेख माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी केला आहे त्यासंबंधी दरवर्षी यावरील मागण्या आणि खर्च वाढत असताना तरतूद कमी होत आहे. मागच्या 2015 वर्षीचा अर्थसंकल्पिय अंदाज आणि सुधारीत अंदाज यामध्ये 8047 कोटींची तरतूद असताना त्याचा खर्च किती टक्के झाला यासंबंधीचे विवरण देणे आवश्यक आहे. मागच्या वर्षीचा सुधारीत अंदाज जर 8047 कोटी रुपये असेल तर या वर्षीचा अर्थसंकल्पिय अंदाज 6912 कोटी इतकी आपण तरतूद केली. त्यामुळे 1135 कोटी रुपयांनी आपल्या खात्याच्या अर्थसंकल्पाला कात्री लावली आहे. शिवसेनेच्या मंत्र्यांच्या कार्यक्षमतेला वाव मिळू नये, झुकते माप मिळू नये असे जे होते, आणि यासंबंधी पेपरामध्ये बातम्या छापून येतात. ठिकठिकाणी आम्हाला जे वाचण्यात येते त्याचाच हा भाग आहे का, असे आम्हाला वाटते. त्यामुळे आपल्या माध्यमातून सभागृहासमोर मांडू इच्छितो की, आरोग्य खात्याला जास्तीत जास्त निधीची तरतूद होणे आवश्यक आहे. त्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी जनतेचे सार्वजनिक आरोग्य चांगले राहिल. या ठिकाणी मी मुद्दाम सांगू इच्छितो की, आपले जे निकष असतात त्यामध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या साडे अकरा कोटीपेक्षा जास्त असून त्यामध्ये किती लोकांच्या मागे 1 खाट असायला पाहिजे हे जर निकष आपण पाहिले तर 3500

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

लोकसंख्येमागे अशी 1 खाट असायला हवी. जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषाप्रमाणे 40 लोकांसाठी 1 खाट याप्रमाणे खाटा असायला पाहिजेत. एका बाजूला आपण मेक इन महाराष्ट्र म्हणतो, गुंतवणूक आणतो, आदर्श सिटी तयार करतो, अशा परिस्थितीत एखादी आपत्ती उद्भवली तर या खाटा कशा पुरेशा होतील ? यासाठी खाटा वाढविणे, आरोग्य सेवा दर्जेदार करणे, ही सर्व आव्हाने आपल्यासमोर आहेत. सध्याची अवस्था माझ्या अगोदार सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व्यक्त केली. अनेक ठिकाणी राम भरोसे परिस्थिती आहे. रिक्त जागा खूप आहेत. या रिक्त जागा भरणे आवश्यक आहे. रिक्त जागा किती आहेत हे आपल्याला माहिती आहे. सध्याची आपण माहिती घेतली तर रिक्त जागेचे वर्ग-1 चे प्रमाण 70 टक्के इतके आहे. या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी, बालरोग तज्ज्ञ, भूल तज्ज्ञ हे वेगवेगळे मल्टी स्पेशालिटी आणि एक्सपर्ट आहेत, त्यांच्या 70 टक्के जागा रिक्त आहेत. इतर वेगवेगळ्या संवर्गातील पदे रिक्त आहेतच, परंतु जे स्पेशालिस्ट डॉक्टर्स आहेत त्यांचे जिल्हा रुग्णालय आणि इतर सर्व रुग्णालयांमधील रिक्त जागांचेप्रमाण 70 टक्के आहे. यासाठी आपण त्यांचा पगार वाढविणे आवश्यक आहे, अन्यथा ते मिळणे शक्य नाही. ते जर मिळाले नाहीत तर खासगी डॉक्टर्सकडे आणि मल्टिस्पेशालिटी हॉस्पिलटकडे ओघ जाणार आहे. हे गरीब माणसाला परवडत नाही. विशेषत: मराठवाडा आणि विदर्भात जी दुष्काळी परिस्थिती आहे त्यामुळे हा ओघ खासगी रुग्णालयांकडे चालला आहे. त्यांच्यावर फार मोठा आर्थिक बोजा पडत आहे. त्यामुळे माझी आग्रहाची सूचना राहील की, या सर्व जागा भरण्यासाठी आपण प्रयत्न सुरू केलेले आहेत. पण या जागा आपण गतीने भरल्या जाव्यात आणि विशेषत: विशेष तज्ज्ञांच्या जागा अधिक भरल्या जाव्यात यासाठी मी आपल्याला आग्रह करतो.

अध्यक्ष महोदय, लॅमिनर फ्लो बसविलेले ओ.टी. तयार करण्याची गरज आहे. अन्यथा इन्सफेक्शनचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. त्यामुळे ऑपरेशन थिएटर्स आपण लॅमिनर फ्लोने युक्त असे केले तर मला वाटते की, हे इन्स्फेक्शनचे प्रमाण कमी होईल. त्यामुळे त्याकडे आपण अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. शहरांमध्ये नागरी आरोग्य सेवेच्या बाबतीत केंद्र सरकारकडून मदत करण्यात येते. नगरपरिषदेच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आरोग्य केंद्रे निर्माण होणे आवश्यक आहे. बीड नगरपरिषदेचा जो प्रस्ताव आहे. त्यासंबंधी आपण एखादी बैठक लावावी. या रुग्णालयामध्ये 200 खाटा वाढीव क्षमता मंजूर होऊन साधारणपणे एक वर्ष झालेले आहे. या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

200 खाटांची अंमलबजावणी होण्यासाठी त्याची उपलब्धी व्हावी अशा प्रकारची तातडीने मागणी मी या ठिकाणी करीत आहे. ज्याचा उल्लेख अनेक वक्त्यांनी केलेला आहे. माझ्या मित्रांनी देखील केला आहे, त्यामुळे त्याचा उल्लेख करणार नाही. पण आपण एक बाब फार चांगली केली की, आऊट सोर्सिंगकरिता ज्या कंपन्या होत्या. ज्यांना अनेक वर्षांपूर्वी कंत्राटे दिले होते मग त्यामध्ये जीई असेल किंवा विप्रो असेल, त्यांची कंत्राटे आपण रद्द केली आहेत. हा पहिला टप्पा झाल. परंतु त्यांना ज्या कामाकरिता आऊटसोर्सिंग दिले होते त्याचा शासनाकडे आज कोणता पर्याय उपलब्ध आहे, आज साधा सी.टी.स्कॅन काढायचा असेल तर बाहेर जावे लागते. एमआरआय काढायचा असेल तर बाहेर जावे लागते. आपले सध्याचे दराचे पत्रक पाहिले तर सर्व दर आपण दुप्पट वाढविले आहेत. जिल्हा रुग्णालयामध्ये जाऊन साधी चिठ्ठी काढावयाची असेल तर त्यासाठी 5 रुपयांचे दर आता 10 रुपये केले आहेत. पोस्टमार्टेम करायचे असेल तर त्याचेही दर आपण वाढविले आहेत. रस्त्यावर एखादा कुठे दुर्दैवी अपघात झाला आणि पोस्टमार्टेमची बॉडी त्या ठिकाणी आली तर त्याचे पैसे कोण भरणार आहे. त्यामुळे पोस्टमार्टेमचे दर वाढविले आहेत. जिल्हा रुग्णालयातील सर्व प्रकारच्या सेवांचे दर वाढविले आहेत. मंत्री महोदय, दात कोरुन पोट भरत नाही. एवढेसे दर वाढविल्यामुळे राज्याचा गाढा आहे. त्यांचे वाघाचे दात मजबूत आहेत. परंतु बाजूला बसलेले पण घालूनी जबड्यात वाघाच्या हात, मोजतो मी दात असे म्हणणारे लोक पण त्या ठिकाणी आहेत. त्यामुळे तुमच्या दाताबद्दलचा प्रश्न नाही. परंतु दात कोरुन पोट भरत नाही. त्यामुळे हे वाढलेले दर कृपया कमी करावेत. दुसरी महत्वाची मागणी म्हणजे आपण लॅमिनर फ्लोअर ऑपरेशन थिएटरमध्ये बसवावेत आणि ज्या ठिकाणी जुन्या पध्दतीच्या एक्स-रे मशिन्स आहेत आणि जेथे क्लिअर डायग्लोसीस होत नाही त्या ठिकाणी डिजिटल एक्स-रे मशिन्स तातडीने बसविणे आवश्यक आहे. आपण अनेक जिल्हा रुग्णालयामध्ये पाहतो की, साधारणपणे दररोज 40 ते 50 डिलिव्हरी आमच्या बीड जिल्ह्याच्या ठिकाणी होतात. डिलिव्हरी करणाऱ्या कोण असतात तर सफाई कामगार असतात त्या डिलिव्हरी करतात. ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. डिलिव्हरी करणाऱ्या योग्य परिचारिका मिळत नाहीत, योग्य तज्ज्ञ डॉक्टर्स मिळत नाहीत आणि त्यामुळे ही दुर्दैवाने पाळी येते. म्हणून याकडे आपण अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. अनेक बाबी या ठिकाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

बोलण्यासारख्या आहेत. राज्य कामगार विमा योजनेच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, आपण कामगारांकडून विमा घेतो. त्यांच्यासाठी मर्यादित हॉस्पिटल्स आहेत. त्यांना पूर्णपणे सेवा देता येत नाही म्हणून आपण काही पॅचअप म्हणून आपण कोणत्या तरी दवाखान्याशी करार केल्याचे दाखवितो आणि त्यांना वैद्यकीय सेवा उपलब्ध झाल्या असे दाखवितो.

PP-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर.....

माझी आग्रहाची सूचना राहील की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये आता जे चालू आहे ते कार्यक्षमतेने चालू राहिले पाहिजेत. प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक कामगार रुग्णालयात विम्याच्या माध्यमातून त्याची रक्कम जमा करतो. त्याला सेवा देणे हे आपले प्रधान कर्तव्य व उद्दिष्ट आहे. कामगारांकरिता ही बाब करणे आवश्यक आहे. आपल्याला दर्जेदार सेवा द्यायची असेल तर 108 नंबरची सेवा आणि राजीव गांधी जीवनदायी योजना, या दोन योजनांचे मी याठिकाणी कौतुक करेल. 108 नंबरला डॉक्टर बिझी आहेत असे कधी ऐकू येत नाही. 108 नंबरची योजना प्रभावीपणे चालू आहे. यामध्ये अधिक कार्यक्षमता आणण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे जीवनदायी योजना ही जीवनदायीप्रमाणे सार्थक करणारी योजना आहे. परंतु ती बीपीएल कार्डधारकांसाठी आहे. माझा आग्रह राहील की, ही योजना एपीएल कार्डधारकांसाठी सुध्दा चालू करण्यात यावी. मराठवाड्यामध्ये दुष्काळी परिस्थितीमध्ये सर्व लोकांना याची आवश्यकता पडणार आहे. आत्महत्या तर खूप होत आहेत, त्याच्यावर अनेक वेळा चर्चा झाली. यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात. कमीत कमी जगणे स्वस्त करावे आणि मरणे महाग करावे आणि जगणे स्वस्त करायचे असेल तर दुष्काळी भागामध्ये या योजना जास्तीत जास्त प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. जर रुग्णाला वेळेवर सेवा देऊ शकलो तरच रुग्ण बरा होऊ शकेल. परंतु सध्या राज्यातील जर वाहन व उपकरणांची परिस्थिती पाहिली तर सरासरी 22 टक्के वाहने सर्व ठिकाणी बंद आहेत. परिवहन सेवेतील जवळपास 39 टक्के पदे रिक्त आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात उपकरणे बंद आणि वाहने पदे रिक्त असतील तर चांगल्या कार्यक्षमतेने ते कसे जगू शकतील. म्हणून या दोन्ही बाबतीत लक्ष देणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याच्या अर्थमंत्री महोदयांनी ज्यावेळी भाषण केले त्या अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये त्यांनी सांगितले की, राज्यातील 50 हजार कुटूंबे ही कुपोषित आहेत. पालघर, नंदूरबार आणि ठाणे जिल्ह्यातील अहवाल दरवर्षी सादर केला जातो यामध्ये ही आकडेवारी जाणीवपूर्वक लपवून ठेवलेली आहे असे मला वाटते. आदिवासी भागामध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. बालमृत्यूचे प्रमाण त्यामुळे वाढलेले आहे, कुपाषित मातांचे प्रमाण वाढलेले आहे. या कुपोषित भागाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर.....

अध्यक्ष महोदय, पाणी पुरवठ्याच्या बाबतीत याठिकाणी सांगणे आवश्यक आहे की, पाणिबाणी आणि आणिबाणी, आतापर्यंत आत्महत्या भूकबळीमुळे होत होत्या. मराठवाड्यामध्ये पाणिबाणीमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढेल असे चित्र दिसत आहे. लातूर शहरामध्ये पाण्यासाठी 144 कलम लावले जाते. परंतु आज परभणी शहरामध्ये सुध्दा 144 कलम पाणी वाटपासाठी लावण्यात आलेले आहे. त्यामुळे याचा प्रादुर्भाव आणि लागण संपूर्ण मराठवाड्यामध्ये व्हायला वेळ लागणार नाही. अभूतपूर्व असे जलसंकट आज मराठवाड्यावर येऊन ठेपलेले आहे. माझी आग्रहाची विनंती राहील की, सर्व पेयजल योजना एक वर्षापासून बंद केलेल्या आहेत. ज्यावेळेस माननीय मुख्यमंत्री बीडला आले होते त्यावेळेस जाहीर केले होते की, मुख्यमंत्र्यांच्या नावाने पेयजल योजना सुरु करण्यात येईल. आता माणसे पाण्याविना तडफडून मरायला लागली आहेत. टँकरखाली पोर चिरडली जाऊ लागलीत. रात्री 3-3 वाजेपर्यंत एक घागर पाण्याकरिता बायका टँकरची वाट पाहत उभ्या राहतात. जनावरांची परिस्थिती भीषण आहे आणि शासनाकडून पाण्याच्या बाबतीत जर दुर्लक्ष होत असेल तर यापेक्षा दुसरे कुठले पातक नाही. याच्यासारखा गंभीर गुन्हा दुसरा कुठला नाही. 500 कोटी रुपयांची तरतूद बजेटमध्ये केली ती फार तोकडी तरतूद आहे. 60 हजाराच्या जवळपास योजना महाराष्ट्रामध्ये बंद आहेत, अपूर्णावस्थेत आहेत, रखडलेल्या अवस्थेत आहेत. त्या पूर्ण करण्याचे फार मोठे आव्हान पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाकडे आहे.

अध्यक्ष महोदय, शहरी भागाबाबत बोलायचे झाले तर बीड शहर माझा मतदारसंघ आहे. आजपर्यंत मराठवाड्यामध्ये सगळीकडे टँकर लागले. हे दुष्काळाचे चौथे वर्ष आहे पण एकही टँकर बीड शहरामध्ये लागले नाही. दूरदर्शीपणे आपण जो निर्णय घेतला आणि माजलगावच्या जायकवाडीमधून पाणी आणले आणि 90 किलोमीटरवरुन शहराला पाणी पुरवठा केला. त्यामुळे हे शक्य झाले. पण आज आम्ही सुध्दा अडचणीत आहोत. मोठे संकट आणि आव्हान आम्हाला समोर दिसत आहे. लातूर शहराला बीड शहरातून पाणी पुरवठा होतो. लातूर शहराला पाणी पुरवठा व्हावा यासाठी एक समिती स्थापन केलेली आहे. तांत्रिकदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या योग्य आहे किंवा नाही हे तपासण्याकरिता समिती स्थापन केलेली आहे. सदस्यांनी सांगितले की, आधीच

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षीरसागर.....

जायकवाडीतून खूप तोकडे पाणी सोडण्यात येते. पाणी सोडताना नगर आणि नाशिक येथील लोक वेगवेगळ्या आयुधांचा वापर करून माननीय सुप्रिम कोर्ट, उच्च न्यायालय तसेच त्यांच्या हातामध्ये ज्या शक्ती आहेत त्यांचा वापर करून पाणी कमी कसे सोडता येईल अशाप्रकारचा विचार करतात. या कमी पाण्यातून बीड शहराची तहान भागविण्यात येते. जेथे बीड शहराची तहान भागत नाही. आज बीड शहराची हद्दवाढ झालेली आहे. बीड शहराची लोकसंख्या आधी दीड लाख होती ती आता जवळपास 3 लाखापर्यंत झालेली आहे. या वाढीव लोकसंख्येची योजना आम्हाला करायची आहे. आमचा आग्रह आहे की, अमृत नावाने जी योजना जाहीर केलेली आहे. त्यामध्ये आमची पात्र योजना आली असतानाही कुठल्या निकषामुळे ही बाजूला सारली याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे. हा राजकारणाचा प्रश्न नाही तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, यामध्ये कोणतीही बाब न आणता नगरपरिषदेच्या निकषात बसत असेल, प्राप्त असेल तर ती योजना प्राध्यान्याने घेतली गेली पाहिजे. आमची तहान भागली तर उरलेले पाणी लातूर आणि मराठवाड्याला द्यायला तयार आहोत. पण आज तशी परिस्थिती नाही. भविष्यामध्ये बीड शहराला दुप्पट पाणी लागणार आहे. आमचे पाणी तोकडे पडत असताना लातूरसाठी पाण्याची योजना आखायची हा फार मोठा अन्याय होणार आहे. जो प्रस्ताव अगोदर आला होता की उजनी धरणातून उस्मानाबादला पाणी देण्यात येते तो पहिला टप्पा करून लातूरचा दुसरा टप्पा करावा. शासनाकडे जी योजना मंजूर झाली होती त्याच योजनेला प्राधान्य देऊन लातूर शहराची तहान भागवावी. लातूरची तहान भागविण्याकरिता रेल्वेन पाणी सुरु करण्यासाठी माननीय महसूल मंत्री त्याठिकाणी गेले होते असे सांगण्यात आले. त्यांना फार उशीर जाग आली, अगोदरच जाग यायला हवी होती. कारण दुष्काळाची चाहूल लागली त्यावेळेस मराठवाड्यामध्ये त्यांचा दौरा झाला होता. ज्यावेळेस वीजेच्या बीलाची मागणी झाली त्यावेळेस माननीय महसूल मंत्री म्हणाले की, शेतकऱ्यांकडे मोबाईलचे बील भरण्यासाठी पैसे आहेत आणि वीजेचे बील का भरता येत नाहीत. अशाप्रकारे जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार जबाबदार मंत्र्यांकडून केले जात असतील आणि बोलले जात असतील तर राज्यासमोर जो पाणिबाणीचा संघर्ष राज्यासमोर निर्माण झालेला आहे. त्याला गांर्भीयाने घ्यायची मानसिकता आजही सरकारची नाही. 4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष महोदय, सरकारला वाटते की, आणखी तीन महिने राहिलेत असेच जाईल. पाऊस पडेल, चांगला पाऊस पडला की लोक हे सर्व विसरतील. People's memory is too short. अशाप्रकारची आपली ठाम धारणा दिसते. त्या भूमिकेतून याकडे जाणीवपूर्वक लक्ष देत नाहीत. माझा आग्रह राहील की, पाणी पुरवठा हा अतिशय महत्वाचा विषय आहे. तात्पुरत्या नळ योजनेच्या बाबतीत आणि टँकरच्या बाबतीत खूप अडचणी आहेत. सन 2011 ची लोकसंख्या गृहीत धरुन टँकर देण्यात येते. जनावरांची संख्या त्यात गृहीत धरण्यात येत नाही. आता साधारणत: 20 टक्के लोकसंख्येमध्ये वाढ झालेली आहे. कलेक्टर आणि आयुक्तांकडे आग्रह धरल्यानंतर ते सांगतात की आदेश आमच्या हातामध्ये आलेले आहेत. तात्पुरती नळ योजना करायची असेल तर टँकरप्रमाणे खर्च किती आणि नळ योजनेवर होणार खर्च किती याचा तुलनात्मक तक्ता तयार केला जातो. तात्पुरत्या नळ योजनेवर खर्च जास्त असेल तर त्याठिकाणी टँकर सुरु ठेवण्यात येते.

अध्यक्ष महोदय, गेल्या चार वर्षामध्ये त्या भागामध्ये टँकरवर किती खर्च झाला. तो निकष लावून त्याठिकाणी तात्पुरत्या नळ योजना चालू करावयात. पिण्याच्या पाण्याकरिता मराठवाड्यामध्ये बुडीत क्षेत्र असेल त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या विहिरी कुठल्याही योजनेतून तातडीने घेणे आवश्यक आहे. या सर्वार्थाने आपण काही करु शकलो तर ही पाण्याची वाढणारी दाहकता आणि तीव्र टंचाई थोड्या फार प्रमाणात कमी होईल. आता मराठवाड्यामध्ये सारखर कारखान्यांचे पट्टे पडले. पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखाने बंद झाले की बीड आणि अन्य जिल्ह्यातील अडीच लाख मजूर आपल्या पोराबाळांसह आणि जनावरांसह ऊस तोडायला जातात. हे परत आल्यानंतर पुन्हा पिण्याच्या पाण्याचा होप आणि जोर पुन:श्च एकदा वाढणार आहे. मग या लोकांना आणखी पाणी कुठून आणि कसे द्यायचे, आज टँकर सुरु आहेत. मराठवाडा टँकरवाडा झाला, दर आठवड्याला मराठवाड्यामध्ये 200 टँकर मागविले जातात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षिरसागर .....

टँकरवाडा शिवाय अन्य नाव याला देता येत नाही. स्वच्छ आणि पिण्याचे पाणी कोठून द्यायचे हा प्रश्न आहे. लातूरला पाण्यासाठी मिरजहून किंवा अन्य ठिकाणाहून वॅगन पाठवून हा प्रश्न काही कालावधीपूरता सोडवाल. जलसंकट सोडवायचे असेल तर आपल्याला पाणी अडवा आणि पाणी जिरवा याबाबती मोठया प्रमाणात अंमलात आणाव्या लागतील. आपल्या खात्याचा प्रश्न नाही. परंतु हा अनुषंगिक प्रश्न आहे म्हणून बोलतो. धन्यवाद.

.....

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई (पाटण) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016-17 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांना पाठींबा देण्यासाठी उभा आहे. सार्वजनिक आरोगय विभाग, पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग या दोन विभागांवरच्या मागण्यांवर सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. माझ्या अगोदर सन्माननीय तीन वक्त्यांनी मनोगत व्यक्त केले. ब-याच वक्त्यांचा आरोग्य विभागावर सर्वांचा भर होता. सन्माननीय सदस्य श्री.जयदत्त क्षिरसागर यांनी पाणीपुरवठयाबाबत थोडक्यात उल्लेख केला. मला प्रकर्षाने पाणीपुरवठा विभागावर मत व्यक्त करायचे आहे. पिण्याचे पाणी पुरवठा करणारा हा अत्यंत महत्वाचा विभाग आहे. या ठिकाणी सनमाननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले की, 1019 कोटी रुपये आरोग्य विभागाला कमी तरतूद या अर्थसंकल्पामध्ये केली.

अध्यक्ष महोदय, मला या निमित्ताने मानीय पाणीपुरवठा मंत्री यांना आपल्या माध्यमातून विचारायचे आहे. पाणीपुरवठा विभागाची तरतूद मुख्यमंत्री पाणीपुरवठा योजनेचे 500 कोटी रुपये सोडले तर गेल्या दोन किंवा तीन वर्षामध्ये राष्ट्रीय पेयजल योजनांची मॅचिंग ग्रॅन्ट राज्य सरकारची होती. ती देण्याकरिता किती तरतूद हया पाणीपुरवठा विभगाकरिता राज्य सरकारने केलेली आहे ? दिड वर्षापासून राष्ट्रीय पेयजल योजनांची सर्व कामे बंद आहेत. इस्टिमेट तयार आहेत. काही योजनांचे टेंडर झाले पण वर्क ऑर्डर द्यायच्या थांबविल्या आहेत. त्यामुळे माझ्या सारख्या आमदाराला प्रश्न पडतो की, राज्याची ग्रामीण पाणीपुरवठा विभाग सुरु आहे की, नाही ? पिण्याच्या पाणीपुरवठा सारख्या महत्वाच्या विभागाकरिता अत्यंत तोकडी तरतुद झाली असेल तर त्याचा सुध्दा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, आमच्या माननीय श्री.लोणीकर साहेबांचा स्वभाव मितभाषी आहे. ते फार संघर्ष करणार नाहीत. फार टोकाची भूमिका घेणार नाहीत. त्याच्यामुळे आपले नुकसान होते. माननीय श्री.लोणीकर साहेब आपण प्रखर भूमिका घेऊन किमान पुरवणी मागण्यांमधून याच्यासाठी थोडेसे जास्त पैसे द्या. केंद्राने निकष बदलेले असतील आम्ही जेव्हा जिल्हयामध्ये आढावा घेतो, तेव्हा जिल्हयाचे सी.ई.ओ. सांगतात केंद्र सरकारचे एक पत्र आले आहे. त्या केंद्र सरकारच्या पत्राला अनुसरुन राज्य सरकारच्या पाणीपुरवठा विभागाच्या प्रधान सचिवांनी जिल्हा परिषदेच्या सर्व सी.ई.ओ. ना कळविले की कुठल्याही नवीन पिण्याच्या पाणीपुरवठा योजनांचे नवीन प्रस्ताव तयार करु नका.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई.....

त्याला निधी दिला जाणार नाही. नेमके लोकांना पाणी द्यायचे कसे. आज काही मंडळी म्हणतात दुष्काळ आहे. दुष्काळी भागामध्ये टँकरने, वॅगनने पाणीपुरवठा करणे हया तात्पुरत्या उपाययोजना आहेत. पण राज्याचे एक वर्षाचे जेव्हा आपण बजेट मांडतो तेव्हा किमान राज्यातील ग्रामीण भागातील जनतेला मुबलक पिण्याचे पाणी देण्याबाबतचे नियोजन आपल्याकडे असणार आहे का ? राष्ट्रीय पेयजलच्या योजना बंद आहेत. मार्च, एप्रिल, मे तीन महिने टि.बी.डब्ल्यू.एस. करतो तात्पुरत्या पिण्याच्या पाण्याच्या योजना मला तर आवर्जुन मंत्री महोदय निदर्शनास आणायचे आहे. चार दिवसापुर्वी पालकमंत्र्यांनी टंचाईची बैठक घेतली. तीन महिन्यापूर्वी तात्पुरत्या पाणीपुरवठा 13 योजनांचे माझ्या मतदार संघातील प्रस्ताव जिल्हाधिका-यांनी जिल्हा परिदेकडून मागविले. श्री.कोळी नावाचा कार्यकारी अभियंता जिल्हा परिषदेमध्ये आहे. पर्वाच्या पाणी टंचाईच्या मिटींगमध्ये जिल्हयातील सर्व आमदारांनी जिल्हयाच्या माननीय पालकमंत्र्यांकडे श्री.कोळी नावाच्या कार्यकारी अभियंत्याची तक्रार केली. 13 नळ योजनांच्या प्रस्तावाला तीन महिने झाले. तो प्रस्ताव पाठवला टंचाईच्या आराखडयामध्ये नाव नाही. प्रांतानी टंचाई घोषित करुन प्रस्ताव पाठविला. नावांचा समावेश करण्यासाठी प्रस्ताव परत खाली पाठवला. आराखडयामध्ये नांवा समावेश होऊन दिड महिना झाला. त्यावर श्री.कोळी यांनी सांगितले सर्व जिल्हयाचे प्रस्ताव आल्यानंतर मग आपण ते मंजूरीला पाठवू. ज्या तालुक्यातील प्रस्ताव आलेले आहेत. त्याऐवजी जिल्हयातील बाकीच्या प्रस्तांची वाट पाहत बसायचे आणि हे 13 प्रस्ताव मागे ठेवायचे याचा अर्थ जिल्हा परिषदेतल्या पाणी पुरवठा विभागातल्या अधिका-यांचा निगेटीव्ह ॲप्रोच बदलणे गरजेचे आहे

अध्यक्ष महोदय, छोटया योजनांना जिल्हा परिषदेतून जिल्हा परिषदेतून पाणीपुरवठा विभागाला पैसे देतो. आम्ही जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-याला आग्रहाने सांगतो डोंगरी भागातील वाडयांकरिता ग्रॅव्हीटीच्या योजना करायच्या असतील त्यातून पैसे द्यावेत. जर जुन्या ग्राव्हीटीच्या योजना असतील त्या योजनांसाठी किरकोळ 7 ते 8 लाख रुपये खर्च करुन दुरुस्त होणार असतील तर त्याला पैसे द्यावेत. मी आपल्याला मंत्री महोदय खात्रीपूर्वक या ठिकाणी सांगतो गेल्या दिड वर्षामध्ये सातारा जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने दुरुस्तीचा एकही प्रस्ताव मंजूर केलेला नाही. त्यामुळे नेमके लोकांना पाणी कसे देणार आहोत ? हा खऱ्या अर्थाने

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई.....

महाराष्ट्रातील डोंगरी भागातील अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.जयदत्त क्षिरसागर यांच्या मताशी सहमत आहे. राज्यामध्ये मुख्यमंत्री पेयजल योजना सुरु केली. 500 कोटी रुपये देऊन या योजनेला मुर्त स्वरुप येणार नाही. त्याला अधिक तरतुद करावी लागणार आहे. थोडेसे निकष बदलावे लागणार आहेत. तुम्ही राष्ट्रीय पेयजल योजनेचे निकष मुख्यमंत्री पेयजल योजनेला लावले तर छोटी गावे त्यामध्ये बसणार नाहीत. डोंगरातील वाड्या, वस्त्या या निकषामध्ये बसणार नाहीत. त्या निकषामध्ये बसत नाहीत. म्हणून ही लहान गावे, लहान खेडी, लहान वस्त्या कायमच्या पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी मघाशी म्हटले आपण मितभाषी आहात. आपण अभ्यासपूर्णपणे माननीय मुख्यमंत्री व माननीय वित्त मंत्र्यांकडे हा विषय आग्रहाने मांडावा. किमान पुरवणी मागण्यांवरुन मुख्यमंत्री पेयजल योजनेला आणि पाणीपुरवठा विभागाला अधिकचा निधी मिळवून घ्यावा. जे प्रलंबित प्रस्ताव आहेत ते किमान तात्काळ या महिना भरामध्ये किंवा आपल्याला खात्री असेल की, महिन्या दोन महिन्यात निधी वाढवून मिळाणार आहे. तर त्या मिळणा-या निधीच्या आधारे आता ही कामे चालू करा. अशा तरी सूचना पाणीपुरवठा विभागातील मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा परिषदेतील कार्यकारी अभियंत्याला देणे गरजेचे आहे. मला या पाणीपुरवठा विभागाच्या माध्यमातून ज्या पूर्वी प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना केलेल्या आहेत. या योजना बहुतांशी फेल गेलेल्या आहेत. हया सहा-सहा, आठ-आठ गावांच्या मिळून मोठया केलेल्या प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनांची देखभाल कोणी करायची, लाईट बिल कोणी भरायचे, पाणीपट्टी कोणी वसूल करायची हया सर्व वादामध्ये या योजना फेल गेल्या. कोटयावधी रुपयांचा खर्च वाया गेला. त्यातील काही गावे स्वत: तयार झाली आहेत. या योजनेतून आम्ही बाहेर पडतो आम्हाला स्वतंत्र नळ योजना करुन द्यावी. या माध्यमातून आम्हाला खात्रीचे पाणी तरी मिळेल. ज्या ज्या ठिकाणी अशी गावे तयार आहेत. त्यांना त्या प्रादेशिक नळ योजनेतून बाहेर काढणे. त्यांची त्यांना स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजना करुन देण्याचा एक कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे. मी पाणीपुरवठा विभागावर बोलताना एवढेच सांगेन की, 1000 लोकसंख्येची अट आपण सुध्दा मुख्यमंत्री पेयजल योजनेला घातलेली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई.....

आहे. किमान डोंगरी भागामध्ये माझा पाठण विधानसभा मतदार संघ 70 टक्के डोंगरी भाग आहे. 70 टक्के गावे, वाडया, वस्त्या हया डोंगर भागामध्ये आहेत. त्यामुळे डोंगरी भागातील गावांना हा निकष न लावता तेवढयापुरता हा निकष शिथील करावा अशी मागणी करतो. या पाटण विधानसभा मतदार संघटातील जिल्हा परिषदेचे सर्व नियंत्रण मुख्यकार्यकारी अधिका-याकडे आहे. पिण्याच्या पाण्याच्या योजना वेगवेगळया हेडमधून करतो त्याचे नियंत्रण पाणीपुरवठा विभागाकडे आहे. सातारा जिल्हा परिषदेतील पाणीपुरवठा विभागाचे काम एवढे गलथान आहे की, वर्ष होऊन गेले माझ्या मतदार संघातील 6 योजनांच्या निकृष्ट कामांची तक्रार तालुका समन्वय समिती, जिल्हा नियोजन समितीत झाली. दोन वेळा तक्रारी मी स्वत: केल्या.

RR-1 .....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई .....

पण त्या 60 योजनांची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी केलेली नाही. याचे कारण काम करणारा कंत्राटदार हा एका राजकीय पक्षाशी संबंधित असणारा पुढारी आहे. त्यांच्या मुलाने व नातेवाईकांनी ही कामे केलेली असल्यामुळे त्यांना पाठीशी घातले जात आहे. एका बाजूला आपण पाणीपुरवठा योजनांना कोटयावधी रुपयांचा निधी देतो. दुसऱ्या बाजूला ठेकेदार मध्येच पैसे हडप करीत असेल तर त्याच्यावर कारवाई होणे व तो पैसा त्यांच्याकडून वसूल करणे गरजेचे आहे. आज कागदावर त्या गावची योजना पूर्ण झालेली दिसत आहे. पण त्या गावाला पिण्याचे पाणी मिळत नाही, त्या गावाने टँकरची मागणी केलेली आहे. त्यामुळे त्याची चौकशी करुन पैसा वसूल तर करावा. पण पावसाळयापूर्वी या योजना दुरुस्त करणे किंवा नवीन करुन देणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, पाणीपुरवठा विभागासोबत सार्वजनिक आरोग्य विभागाचीसुध्दा आज चर्चा आहे. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याबाबत काही वक्तव्ये केलेली आहेत. त्याचे सडेतोड उत्तर माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी देतील.

(वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते)

अध्यक्ष महोदय, किती वेळ झालेला आहे ते आपण बघा.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.शंभुराज देसाई यांना मी सांगू इच्छितो की, आपण फक्त पाणीपुरवठा विभागावरच बोलणार होता. आपण 12 मिनिटे बोललेले आहात. आपण लवकर बोलावे. कारण अजून बऱ्याच सदस्यांना बोलावयाचे आहे.

श्री.शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभागातील यापैकी पाणीपुरवठा विभागास मी प्राधान्य दिलेले आहे. आपण वेळ पहावी की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सन्माननीय सदस्य श्री.जयदत्त क्षीरसागर किती वेळ बोलले आहेत व मी किती वेळ बोललो आहे. त्यांच्यापेक्षा माझा वेळ जास्त झाला असेल तर मी दुसऱ्या मिनिटाला खाली बसतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई .....

अध्यक्ष महोदय, माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना उत्तर दिलेले आहे की, शेळी कोण आणि वाघ कोण आहे. या विषयावर मला बोलायचे नाही. परंतु माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत यांना माननीय श्री.उध्दव ठाकरे यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाची जबाबदारी दिलेली आहे. कारण त्यांचा या विभागाचा व या क्षेत्रातील असणारा अभ्यास व अनुभव आहे. विशेषतः आदिवासी भागात यापूर्वी त्यांनी काम केलेले आहे, त्यामुळे त्यांना निश्चितपणे यापूर्वीचे सर्व बारकावे माहिती आहेत. मंत्री महोदय चांगले निर्णय घेतात. मी उर्जा मंत्री महोदय श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांच्याबाबतही सांगितले होते. मंत्री महोदय चांगल्या अर्थाने व चांगल्या दृष्टीकोनातून निर्णय घेतात. पण त्याच वेगाने त्याचे खाली पर्क्यलेशन होते का, त्या वेगाने खाली अधिकारी त्याची अंमलबजावणी करतात का ? यावर मंत्री महोदयांनी बारकाईने विचार करावा. तुमच्या निर्णयाची 100 टक्के अंमलबजावणी झाली पाहिजे यासाठी आपण काही तरी यंत्रणा उभी करावी. मी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना विनंती करतो की, पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्हा, पाटण तालुका यांच्यासह विभागवार, मतदारसंघनिहाय किंवा जिल्हानिहाय आरोग्य विभागाच्या प्रश्नासंबंधीच्या बैठका आपण घ्याव्यात. त्याशिवाय जिल्हयातील प्रश्न आपणास समजणार नाहीत. माझ्या मतदारसंघात ढेबेवाडीला उपजिल्हा रुग्णालय दिलेले आहे. 2004 ते 2009 मध्ये मी आमदार असताना स्व.विमल मुंदडा या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मंत्री होत्या. त्यांच्या सहकार्यातून ग्रामीण रुग्णालय मंजूर झाले होते. मधली पाच वर्षे 2009 ते 2014 पर्यत या ग्रामीण रुग्णालयाचे काम बंद होते. मी आमदार झाल्यावर मंत्री महोदयांकडे पाठपुरावा केलेला आहे. आता मंत्री महोदयांनी त्याकरिता गेल्यावर्षी निधी दिलेला आहे, तेथे इमारतीचे काम पूर्ण झालेले आहे पण आतमध्ये लागणारे साहित्य अजून मिळालेले नाही. हे साहित्य दिल्यास 2-4 दिवसात ग्रामीण रुग्णालय सुरु होण्यासारखी परिस्थिती आहे. मी मंत्री महोदयांना काल भेटून रिक्त पदांबाबत सांगितले आहे. आमच्या ढेबेवाडी ग्रामीण रुग्णालयात 18 पदे रिक्त आहेत. पाटण तालुकयातील सर्व आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची 7 पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्यांची वर्ग 3 ची 2 पदे रिक्त आहेत. आरोग्य पर्यवेक्षकाची पदे रिक्त

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई .....

आहे. माझ्याकडे सर्व यादी आहे. आपण म्हटला तर आपणास नंतर भेटून ती यादी देतो. जवळपास जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील 72 पदे, सार्वजनिक आरोग्य विभागातील ग्रामीण रुग्णालयातील 18 पदे अशी 92 पदे एका विधानसभा मतदारसंघातील रिक्त आहेत. ही पदे भरणे गरजेचे आहे. वर्ग-3 व वर्ग-4 मधील सेवक वर्ग, महिला आरोग्य सेविका इत्यादी पदे रिक्त आहेत. या 13 प्राथमिक आरोग्य केंद्रे व 2 ग्रामीण रुग्णालयातील पदस्थापना तातडीने करणे गरजेचे आहे. कारण बऱ्याचदा असे होते की, एका मेडीकल ऑफीसरवर दोन प्राथमिक आरोग्य केंद्राची जबाबदारी असते. त्यामुळे तो अधिकारी दोन दिवस इकडे व दोन दिवस तिकडे असल्याचे रेकॉर्डवर राहते. पण कधी तरी तो जातच नाही व त्यामुळे तेथील लोकांची खूप गैरसोय होते. डोंगरी भागातील रुग्ण आठवडी बाजाराला खाली येतो, तेव्हाच दवाखाना करुन तो घरी जातो. केवळ दवाखान्याच्या कामासाठी लांबून पायी चालत खाली कधी येत नाही. अशी वेळी तरी त्या प्राथमिक आरोग्य केंद्रात त्या ग्रामीण रुग्णालयात पूर्णवेळ मेडीकल ऑफीसर असणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, बरेच ठिकाणी साफसफाईच्या सेवा आपण कंत्राट बेसीसवर दिलेल्या आहेत यामुळे या कंत्राटदारावर कोणाचेही नियंत्रण नाही. तेथील मेडीकल सुपरीटेंडेंटला कंत्राटदार मॅनेज करतो. दरमहा मेडीकल सुपरीटेंडेंटच्या बिलांवर सहया घेतो, पण प्रत्यक्ष दवाखान्यातील परिस्थिती पाहिली तर स्वच्छता ठेवली जात नाही. अनेक वेळा आपल्या सर्वांचा अनुभव आहे की, आपण छोटया दवाखान्यात जरी गेलो तर तेथील स्वच्छता, तेथील टापटीपपणा आपणास दिसतो व आमच्या सरकारी रुग्णालयात कंपाऊंडच्या आतमध्ये गेल्यानंतर तेथेच दुर्गंधी येण्यास सुरुवात होते. खाजगी ठिकाणी त्यांना काम करुन घेण्यास जमते पण आपण सरकारी ठिकाणी स्वच्छता करण्यासाठी पैसे देऊनही आम्हाला का जमत नाही. याबाबत आपण काही दुरुस्ती करणे गरजेचे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभुराज देसाई .....

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात डावरी, लुणी, तामीनी, कसनी, कसनी, काडोली या सहा नवीन उप केंद्राचे प्रस्ताव पंचायत समितीकडून जिल्हा परिषदेकडे पाठविले आहेत व जिल्हा परिषदेने शिफारशीसह शासनाकडे पाठविलेले आहेत. आपण जेव्हा नवीन उप केंद्रांना मंजूरी द्याल तेव्हा या डोंगरी भागातील या उप केंद्राचा प्राधान्याने आपण समावेश करावा अशी विनंती करतो. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या व पाणीपुरवठा विभागाच्या मागण्यांना पाठींबा व्यक्त करून मी थांबतो. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : राज्यात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करणे

मु.शी. : राज्यात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यासंबंधी माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे निवेदन.

श्री.राजकुमार बडोले (सामाजिक न्याय मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

यानंतर SS-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: अनुदानाकरिता मागण्या.

मु.शी.: सन 2016-2017 च्या अनदानाकरिता मागण्या

मागण्या :

1) सार्वजनिक आरोग्य विभाग

2) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(चर्चा पुढे सुरु.....

डॉ.पतंगराव कदम (पलुस-कडेगाव): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि सार्वजनिक आरोग्य खात्याच्या मागण्यांवर मी माझे विचार मांडणार आहे. या विभागाच्या मागण्यांवर टीका करण्याकरिता मी उभा राहिलेलो नाही. मी याबाबत काही सूचना करणार आहे. याबाबत दैनंदिन राजकीय आयुष्यात जे अनुभव आलेले आहेत, जे रोज येत आहेत, त्याबाबत मी बोलणार आहे. माननीय सार्वजनिक आरोग्यमंत्री डॉ.दिपक सावंत यांची या विषयावरील भाषणे मी आमदार असताना आणि 20 वर्ष मंत्री असल्यापासून ऐकत आहे. या खातयाकरिता आम्ही खूप प्रयत्न केला होता. परंतु आम्ही हे खाते सुधारु शकलो नाही. सार्वजनिक आरोग विभाग हा खरोखर आरोग्य देण्याचा विभाग आहे की, आरोग्य बिघडविण्याचा विभाग आहे हेच समजत नाही. कारण एखाद्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये जायचे म्हणजे मरण्यासाठीच जायचे, इतकी विचित्र परिस्थिती तेथे निर्माण झालेली आहे. याबाबत पूर्वी लोकशाही आघाडीच्या काळामध्ये तुम्ही मांडलेले प्रश्न सुटले होते. पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्ये मान्यता मिळाल्याशिवाय डॉक्टर्स नेमता येत नाहीत, ते आपण बाजूला काढले होते. बीएएमएसला ॲलोपथीचा कोर्स दिला होता. होमिओपथीला गरज वाटली तर त्यांनाही देण्याचा पर्याय ठेवला होता. शासनाने सगळीकडे स्टाफ आणि डॉक्टर्स नेमले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, मी औरंगाबाद जिल्हयाचा पालकमंत्री असताना प्रसिध्द घाटी हॉस्पिटलला भेट देण्याकरिता गेलो होते. तेथे मशिन आहे पण तंत्रज्ञ नाहीत. अनेक ठिकाणी तंत्रज्ञ आहेत पण मशिन्स नाहीत अशी परिस्थिती आहे. मी आणि सार्वजनिक आरोग्यमंत्री अनेक वेळा या विषयावर बोललो होतो. मी आपल्याला यापूर्वी देखील सांगितले होते की, कमीत कमी सर्पदंश आणि श्वानदंशाचे औषध तरी आरोग्य केंद्रात मिळणे आवश्यक आहे. 2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.पतंगराव कदम.....

यावर आपण आता उत्तर देणार की, पीएचसी व ग्रामीण रुग्णालयामध्ये श्वानदंश व सर्पदंशाकरिता औषध उपलब्ध केलेले आहे. तळेगाव दाभाडे येथे रात्री दोन वाजता एका मजूराच्या मुलीला साप चावला होता. ग्रामीण रुग्णालयात त्यांना औषध उपलब्ध नाही असे सांगितले गेले. पेशंटला ससूनला घेऊन जा, असे सांगितले. ससूनला गेल्यानंतर तेथे रात्रीचे डॉक्टर्स मिळाले नाहीत. रात्रीच्या वेळी रुग्णालयांमध्ये इमर्जन्सी उपचाराकरिता काय व्यवस्था आहे, काय पध्दत आहे, हे मला माहिती नाही. परंतु ससून येथे नेले असता त्या रात्री डॉक्टर्स उपलब्ध नसल्यामुळे ती गरिबाची मुलगी मरुन गेली. शासनाने रुरल हॉस्पिटल्स काढली. शासनाने योजना खूप आखल्या पण प्रत्यक्षात त्यांच्या अंमलबजावणीची अवस्था आणि स्थिती जी आहे, ती अतिशय गंभीर आहे. पालकमंत्री असतानाच कलेक्टर आणि सीईओ यांना मी सूचना दिल्या होत्या. तुम्ही ज्या ज्या भागात जाता त्यावेळी दहा मिनिटे वेळ काढत जा आणि तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र व रुरल हॉस्पिटलला भेटी देत जा. आणि हा प्रयोग केल्यानंतर असे लक्षात आले की, अनेक ठिकाणी डॉक्टर्सची नेमणूक एका ठिकाणी आणि ते काम दुस-या ठिकाणी करीत असतात. माननीय श्री.भाई सावंत चिंचणी येथील रुरल हॉस्पिटलला भेट देण्याकरिता खेडेगावात निघाले. तेथे गेल्यानंतर डॉक्टर्स कुठे आहेत, असे विचारल्यावर उत्तर मिळाले की, येथे एक बाई नेमलेल्या आहेत, पण त्या काम इस्लामपूरला करीत आहेत. एकतर त्यांना येथे काम करु द्यावे, अन्यथा त्यांची इस्लामपूरला ऑर्डर काढण्यात यावी. असा या खात्यामध्ये गोंधळ आणि घोळ आहे. मंत्री महोदय,पोटतिडकीने बोलल्यामुळे मला सूचना करावयाची आहे की, जिल्हा पातळीवर हा विषय संपवून टाका.

अध्यक्ष महोदय, सरकारी मिरज मेडिकल कॉलेज फार पूर्वी निघाले होते. त्या ठिकाणी सिव्हील हॉस्पिटलही ॲटॅच होते. आता मिरज मेडिकल कॉलेजचे हॉस्पिटल स्वतंत्र झालेले आहे, तरीही सिव्हील हॉस्पिटलचा आणि त्यांचा घोळ काही संपत नाही. आमच्य काळात त्यांच्या ऑर्डर्स काढल्या गेल्या होत्या. सिव्हील हॉस्पिटल वेगळ करुन मिरज मेडिकल कॉलेजमधील हा घोळ आपल्या काळात तरी मिटावा, असे मला वाटते. 3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.पतंगराव कदम.....

अध्यक्ष महोदय, विजापूर - गुहागर हा स्टेट हाय वे आहे. हा नॅशनल हाय वे करण्याकरिता सन्माननीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांनी जाहीर केलेला आहे. येथे ट्रॉमा केअर सेंटर उघडण्याबाबत घोषणा करण्यात आली होती. कडेगाव रूरल हॉस्पिटल काढण्याच्या वेळी तत्कालीन मंत्र्यांनी हे आश्वासन दिले होते. हा दोष केवळ युती शासनाचाच नाही. त्यांनी सांगितले की, सहा महिन्यात ट्रॉमा केअर सेंटर सुरु होईल. या भागातील ट्रॉमा केअर सेंटरचे उद्घाटन करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून मी निश्चितपणे जबाबदारी घेईल. राजीव गांधी जीवनदायी योजना सामान्य गरीब माणसाकरिता खूप मोठी आणि महत्त्वाची योजना आहे. माणूस घरात आजारी असताना त्याला उपचार मिळण्याची सोय योजनेच्या माध्यमातून होते. काही जुन्या गोष्टी मला आठवतात. कराडपासून दहा कि.मी.अंतरावर माझे गाव आहे. वर्षातून एक डॉक्टर टोचायला येत होता. आणि तो डॉक्टर कशाकरिता कोणते औषध देत होता, हे माहिती नव्हते. शेवटी त्याला परत पोहोचवित असताना रस्त्याने तो कचकायचा, कराडपर्यंत पोहोचायचा नाही. त्यावेळी रस्त्यांची अशी अवस्था होती. आज नाकाचा, कानाचा,डोळयाचा डॉक्टर वेगळा आहे. सर्व उपचार पध्दती अता विशेषज्ञ या संज्ञेमध्ये येत आहे. शासनाने या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मिनिमम गोष्टी असल्या पाहिजेत, याची काळजी घेतली पाहिजे. रूग्णालयात गेल्यानंतर बसण्याकरिता व पेशंटला ठेवण्याकरिता योग्य अशा पध्दतीची स्वच्छता आणि वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न स्वत: लक्ष घालून करावा, कारण फार जाणीवपूर्णक शिवसेनाप्रमुख माननीय श्री. उध्दवजीं ठाकरे यांनी माननीय डॉ.दिपक सावंत यांच्यसारखा डॉक्टर, सामंजस्य असलेला, सोबर असलेला असा मंत्री या खात्याला दिलेला आहे. आपल्या कामाचा प्रभावी परिणाम दिसावा एवढीच विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदय श्री.बबनराव लोणीकर यांच्या पाणीपुरवठा खात्याला काय सांगावे हेच मला कळत नाही. 80 टक्के पाणीपुरवठयाच्या योजना बंद आहेत. या खात्यात पाणी वाहत नाही तर केवळ पैसाच वाहत आहे. माझा एक मित्र मंत्री झाला म्हणून मी सुस्वातीलाच एक काम सांगायला गेलो होतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.पतंगराव कदम.....

परंतु त्या कामाची बोंब झाली. काम झाले नाही. शासन दुष्काळाचे नियोजन कशा प्रकारे करीत आहे ? आज मला कलेक्टर, सांगली यांचा फोन आला. मिरजेवरून कृष्णेचे पाणी तिकडे न्यायचे आहे याकरिता माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे आणि माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे मिरजेला आलेले आहेत. काय नियोजन आहे ? काय विचार आहे ? लोकशाही आघाडी शासनाच्या काळामध्ये कलेक्टरला 20 लाखापर्यंतच्या योजनांच्या कामांचे अधिकार दिले होते. आयुक्तांना एक कोटी रुपयापर्यंतच्या कामांचे अधिकार दिले होते. एका ठिकाणी चर होत नसेल तर दुस-या ठिकाणी चर काढण्याचे सर्व अधिकार दिले होते. पाणीपुरवठा योजनांसदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हापातळीपर्यंत दिले होते. यामध्ये कोणाचीही चौकशी होणार नाही, असे सांगितले होते. केवळ भानगड ,लफड करप्शन करु नका असे सांगितले होते. याबाबत जिल्हाधिका-यांच्या कार्यालयात जाऊन मी सांगत होतो. या संदर्भातील कॅबिनेट सब कमिटी माझ याच अध्यक्षतेखाली होती. त्यामध्ये निरलीपासून तडसरच्या दुष्काळी भागात टेंभूचे पाणी नेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. सन्माननीय पाणीपुरवठा मंत्री श्री.बबनराव लोणीकर याची नोंद घ्यावी. आणि मग काय दिवा लावायचा असेल तर एकदाच पक्का लावा. अन्यथा भाषण झाले आणि पुन्हा घरी गेले, काहीच खर नाही, काहीच झाले नाही असे होऊ नये. याकरिता 2.46 कोटी रुपये मान्य केले गेले. याकरिता विभागाने संमती दिली. पैसे रिलीज केले. त्यापैकी एक कोटी खर्च झाले. मलाही यासंदर्भातील नियम माहिती आहेत. मीही 20 वर्ष मंत्री होतो. 3 महिन्यांमध्ये सरकार बदलल्यानंतर जर काही गैर निर्णय झाले तर ते बदलण्यात येतात. सहा महिन्यापूर्वीचा लोकशाही आघाडीचा सबकमिटीचा निर्णय एकूण निधीपैकी एक कोटी रुपये खर्च झाल्यानंतर उर्वरित 1.46 कोटी रुपयांच्या वेळी त्यावर नवीन शासनाने स्टे दिला. आता ती योजना बंद झाली. असे असेल तर मग हे सर्व कशासाठी चाललय ? सरकार बदलत असते, ही एक प्रोसिजर आहे. त्यामुळे माणसे येतात आणि जातात ज्या योजना पिण्याच्या पाण्यासाठी राखून ठेवलेल्या आहेत, त्यांचे काही झालेले नाही. थोडया कारणासाठी हे पेसे देखील पाण्यात जाणार आहेत. आघाडी शासनाच्या काळात आम्ही देखील दिवे लावले. त्यावेळी आम्ही यामध्ये सुधारणा करु शकलो नाही. सांगलीला तुमच्या खात्यातील एक अधिकारी आहे. 5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.पतंगराव कदम.....

अध्यक्ष महोदय, कुंडलला मी फॉरेस्टची एक ॲकॅडॅमी आणली. कुंडल हे एका क्रांतिकारकाचे गाव आहे. त्याकरिता 4.5 कोटी रुपये भरले होते. कृष्णा नदीवरुन ॲकॅडॅमीकरिता पाणी आणण्याकरिता रेव्लेची परवानगी घेतली होती. आपले खाते पैसे देऊनही काम करण्याकरिता हलत नाही. कामही करीत नाही. या संदर्भात जरा दबाव ठेवा. प्रशासन बळकट करा. अन्यथा काहीच होणार नाही. एक मित्र म्हणून मी आपल्याला सल्ला देत आहे की, या खात्यात आपण प्रभावी काम करावे. अशी मी सूचना करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

टीटी-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. देवयानी फरांदे (नाशिक मध्य) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, मी सरकारचे पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भातील महत्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधणार आहे. समन्यायी पाणी वाटप कायद्यानुसार जायकवाडीला पाणी सोडण्यासाठी नोव्हेंबर, 2015 मध्ये गंगापूर धरणातून 2.13 टीएमसी पाणी सोडण्यात आले होते. प्रत्यक्ष जायकवाडी धरणात 10.15 टीएमसीमधून फक्त 6 टीएमसी पाणी पोहचलेले आहे. 4 टीएमसी पाणी वाया गेलेले आहे. सभागृहात माननीय पाणी पुरवठा मंत्री उपस्थित आहेत. मी या विषयाकडे मुख्यमंत्री महोदयांचे आणि सिंचन मंत्र्यांचे लक्ष वेधणार आहे. जलयुक्त शिवार योजनेमध्ये 24 टीएमसी पाणी साठविण्यासाठी 1600 कोटी रुपयांचा खर्च आलेला आहे. धरणाच्या माध्यमातून 24 टीएमसी पाणी उपलब्ध करुन द्यावयाचे असेल तर त्यासाठी 5 हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असतो. नाशिक जिल्ह्यातील गंगापूर धरणातून 10.15 टीएमसी पाणी जायकवाडी धरणामध्ये सोडण्यात आले होते. त्यामुळे 4 टीएमसी पाण्याचा अपव्यय झालेला आहे. मराठवाड्याला पाणी सोडण्याबाबत आमची कोणतीही हरकत नाही. गंगापूर धरणातून 4 टीएमसी पाण्याचा अपव्यय झालेला असेल तर सरकारचे पर्यायाने राष्ट्रीय संपत्तीचे 850 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. मी यासंदर्भात मी पाणी पुरवठा मंत्र्यांना एक चांगला उपाय आणि सूचना करणार आहे. त्यावर सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. गंगापूर धरणातील पाणी, गोदावरी नदीतील पाणी आणि उप नद्यातील पाणी नांदूर माध्यमेश्वरच्या उपासा केंद्रामध्ये येत असते. या केंद्रातून नांदूर माध्यमेश्वर ते वैजापूरला एक्सप्रेस फिडर लाईन आहे. याच धर्तीतीवर नांदूर माध्यमेश्वरवरुन थेट जायकवाडीला पाईपलाईनची व्यवस्था केली तर पाण्याचा कोणताही अपव्यय होणार नाही. आज नाशिक जिल्ह्यात पाण्याचा खूप गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी सभागृहात निवेदन करण्याची गरज आहे. नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांची त्या भागात गाडी रोखण्यात आली होती. त्यावेळी खूप मोठ्या प्रमाणावर जनक्षोभ उसळून आलेला होता. आपल्या सर्वांना पाण्याचा अपव्यय

.....2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. देवयानी फरांदे.....

आणि पाणी प्रश्न सोडवायचा असेल तर नांदूर माध्यमेश्वरवरुन थेट जायकवाडीला पाईपलाईनची व्यवस्था करण्यासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर करण्याची गरज आहे. तसेच त्यासंदर्भातील एक योजना तयार करण्याची गरज आहे. परिणामी नाशिक जिल्ह्यातील लोकांवरील अन्याय थांबणार आहे आणि मराठवाड्यासाठी आम्हाला कमी पाणी सोडावे लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, एमडब्ल्युआरने 12.84 टीएमसी पाणी सोडण्यास सांगितले होते. यामधील 7 टीएमसी पाणी वाया जाणार होते. मी सुचविलेल्या योजनेचा सरकारने विचार केला तर आपली राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान वाचण्यास मदत होणार आहे. जायकवाडी धरणातील 7 टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन झाल्यामुळे पाण्याचा अपव्यय होतो. पाईपलाईनच्या माध्यमातून मराठवाड्याला पाणी दिले तरी देखील नाशिक जिल्ह्यास पाणी कमी पडणार नाही. सरकारने याबाबत गांभीर्याने नोंद घेण्याची आवश्यकता आहे. या विषयाच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी सभागृहात निवेदन करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभागाच्या संदर्भात मी काही महत्वाच्या सूचना करणार आहेत. शासनाने आज राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. माननीय आरोग्य मंत्री डॉक्टर आहेत. राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये विमा योजनेच्या माध्यमातून गोरगरीब लोकांवर उपचार करण्यासाठी योजना सुरु केलेली आहे. विमा कंपनीच्या माध्यमातून एखादा पेशंट हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाला तर चोवीस तासाच्या आत संबंधित पेशंट ज्या आजारासाठी ॲडमिट झालेला असतो, त्यासाठी विमा कंपनीच्या माध्यमातून हॉस्पिटलमध्ये नोंदणी केली जाते. परंतु, चार ते आठ दिवसांमध्ये पेशंटचे आरोग्य अजून बिघडले तर विमा कंपनीच्या माध्यमातून पुढील औषधोपचार करण्यासाठी संरक्षण देत नाही. यासंदर्भात माननीय आरोग्य मंत्र्यांनी विमा कंपन्याच्या संदर्भात योग्य तो बदल करण्यासाठी प्रयत्न करावा, अशी मी विनंती करीत आहे.माननीय आरोग्य मंत्र्यांनी विमा कंपन्याच्या ॲग्रिमेंटमध्ये खाजगी किंवा शासकीय

.....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. देवयानी फरांदे.....

डॉक्टरांनी सुचविलेल्या उपचारानुसार पुढील काळात काही बदल झाला तर तो विमा कंपन्यांनी ग्राह्य धरावा आणि त्या माध्यमातून गरीब रुग्णांना संरक्षण दिले जावे, अशी मी विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, खाजगी हॉस्पिटलच्या माध्यमातून रुग्णांची मोठ्या प्रमाणावर लूट केली जात आहे. या विषयाच्या संदर्भात आरोग्य विभागाने एक धोरण निश्चित करण्याची गरज आहे. राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये आपण हॉस्पिटला अे,बी,सी आणि डी असे ग्रेड निश्चित करुन दिलेले आहेत. याच धर्तीवर सर्वच खाजगी हॉस्पिटलसाठी ग्रेड निश्चित करण्याची गरज आहे. ग्रेड निश्चित केल्यानंतर सिजरिंग, एंजोप्लास्टी, बायपासवर उपचार करण्यासाठी अे,बी,सी अशा विविध हॉस्पिटीमध्ये लागणारा खर्चाचे अनुमान करावा आणि खाजगी हॉस्पिटलने बिले रुग्णांकडून घ्यावीत अशा पध्दतीचे धोरण निश्चित केले तर महाराष्ट्रातील जनतेचा त्याचा फायदा होणार आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी सिटीस्कॅन मशीनच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केलेला आहे. नाशिक जिल्ह्यातील संदर्भ रुग्णालयातील सिटीस्कॅन मशिन आणि सिव्हिल हॉस्पिटलमधील सिटीस्कॅन मशिन बंद आहे. नाशिक जिल्ह्यातील संदर्भ रुग्णालयातील सिटीस्कॅन मशिनसाठी लागणारी एक्सरे ट्युब बदल्याण्यासाठी 52 लाख रुपयांच्या खर्चासाठी वित्त विभागाने मंजुरी दिलेली आहे. सदरहू निधी माननीय आरोग्य मंत्र्यांनी संदर्भ रुग्णालयासाठी वर्ग करावा, अशी मी विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, नाशिक आणि अमरावती जिल्ह्यामध्ये सुपरस्पेशॅलिस्ट हॉस्पिटल आहेत. सिव्हील हॉस्पीटलकरिता बजेटमध्ये विविध हेड आहेत. परंतु, सुपरस्पेशॅलिस्ट हॉस्पिटलसाठी बजेटमध्ये हेड ठेवण्यात येत नाही. त्यामुळे त्या ठिकाणच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्हाला मंत्रालयात खेपा माराव्या लागत असतात.

अध्यक्ष महोदय, नाशिक जिल्ह्यातील सुपरस्पेशॅलिस्ट हॉस्पिटलमध्ये किडनी ट्रान्सप्लंटचे युनिट कधी सुरु करणार असा माझा आरोग्य मंत्र्यांना प्रश्न आहे. यासाठी नॅफ्रोलॉजिस्टची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. देवयानी फरांदे.....

आवश्यकता लागणार आहे. याचबरोबर तंत्रज्ञ आणि आवश्यक असणाऱ्या मुनष्यबळाची मान्यता आरोग्य विभागाकडून केव्हापर्यंत दिली जाणार याबाबतचा खुलासा माननीय आरोग्य मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणातून करावा अशी विनंती करते आणि माझे भाषण संपविते. धन्यवाद.

.....5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ.देशमुख (सांगोला) : अध्यक्ष महोदय, अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्य विभागासाठी 6912 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. गेल्या वर्षी 8047 कोटी रुपयांची तरतूद केली होती. या आर्थिक वर्षात 1135 कोटी रुपयांची तरतूद कमी केलेली आहे. प्रत्येक आर्थिक वर्षात तरतूद वाढविलेली असती. पण ही तरतूद कमी का केली याबाबत पूर्वीच्या अनेक वक्त्यांनी खुलासा मागितलेला आहे आणि मी देखील तोच खुलासा मागत आहे. पुरवणी मागणीमध्ये अधिकची तरतूद करावी, अशी मी सूचना करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष (डॉ.सतिश पाटील) : सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.ग.आ. देशमुख : या राज्यामध्ये जी शासकीय रुग्णालये आहेत, त्यामध्ये खाटांची संख्या 32 हजार आहे. ही खाटांची संख्या किती कमी आहे हे यापूर्वी काही सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. एवढी कमी संख्या असताना देखील यांची अवस्था काय आहे?

अध्यक्ष महाराज, ग्रामीण रुग्णालयांमध्ये आठ-आठ, दहा-दहा महिन्यापासून डॉक्टर नाहीत. शेजारच्या ग्रामीण रुग्णालयातून त्यांना बोलाविले जाते. खऱ्या अर्थाने गोरगरीब माणसाला आरोग्याच्या सेवा मिळत नाहीत. सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकाऱ्यांची मंजूर पदे 9718 असून त्यापैकी 7089 एवढी पदे भरलेली आहेत. जवळपास 1800 वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. यामध्ये वर्ग-1 ची 551 पदे असून त्यापैकी 168 पदे भरलेली आहेत आणि 383 पदे रिक्त आहेत. म्हणजे 70 टक्क्यापेक्षा जास्त पदे रिक्त आहेत. ग्रामीण रुग्णालयांची काय अवस्था असेल, याचा विचार न केलेला बरा. ही वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे का भरली जात नाहीत, ही पदे भरण्यासाठी सरकार कोणती उपाययोजना करणार आहे? याबाबत मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात खुलासा केला पाहिजे. दरवर्षी रिक्त पदांची संख्या वाढत चाललेली आहे त्यामुळे आरोग्य सेवा ग्रामीण भागामध्ये मिळत नाहीत, याचाही खुलासा करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महाराज, आठ दिवसापूर्वी माननीय आरोग्य मंत्र्यांनी सोलापूर जिल्ह्यातील विधानसभा व विधान परिषदेच्या सदस्यांची एक बैठक घेतली होती. त्यामध्ये या रिक्त पदांबाबत चर्चा झाली. सांगोला रुग्णालयात 50 टक्के पदे रिक्त आहेत, अशी माहिती दिली होती. ती पदे लवकरात लवकर भरण्यात येतील असे आश्वासन दिलेले आहे, ते लवकर पूर्ण करावे, अशी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महाराज, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही अतिशय चांगली योजना आहे. या योजनेची अंमलबजावणी चांगल्यात्हेने व्हावी, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. राजीव गांधी जीवनदायी योजनेत कुटुंबांचे उत्पन्न एक लाख रुपयापेक्षा कमी पाहिजे. या योजनेतंर्गत वर्षाला दीड लाख रुपयांची सवलत दिली जाते, परंतु हे अनुदान शेजारच्या काही राज्यांमध्ये चार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

लाख रुपयांपर्यंत दिले जाते. चालू वर्षामध्ये प्रत्येक कुटुंबामागे किमान दोन लाख रुपये अनुदान दिले जावे. सन 2015-2016 मध्ये जवळपास तीन लाख रुग्णांना या योजनेची मदत झालेली आहे. 108 ही योजना गेल्यावर्षी सुरु झाली. सन 2013 मध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु झाली. या दोन्ही योजना अधिक चांगल्या रितीने कार्यान्वित व्हाव्यात, तसेच या योजनांच्या सुविधांमध्ये वाढ करावी, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महाराज, पुणे, मुंबई येथे चॅरिटी ॲक्ट अंतर्गत जी हॉस्पिटल्स आहेत, त्यामध्ये बॉम्बे हॉस्पिटलचा समावेश होतो. या चॅरिटी हॉस्पिटल्सना शासनाने जागा, पाणी, वीज अशा प्रकारच्या सवलती दिलेल्या आहेत. त्यांचेशी करार करताना 10 टक्के खाटा या गोरगरिबांसाठी विनामुल्य दिल्या जाव्यात, असे असतानाही तशा प्रकारची सवलत दिली जात नाही. याबाबतीत विधानसभेचे अध्यक्ष स्व.बाबासाहेब कुपेकर यांनी फार लक्ष दिले होते. ही हॉस्पिटल्स राज्यात किती आहेत, यांच्याकडे किती खाटा आहेत, या हॉस्पिटल्स मधून सेवा मिळण्यासाठी काय केले पाहिजे, याबाबतही विचार होणे आवश्यक आहे. पुणे, मुंबई सारख्या ठिकाणी 10 टक्के खाटांची सेवा गोरगरिबांना कशा मिळतील, यासाठी एखादा अधिकारी नेमावा, या समस्यांकडे लक्ष देण्याची गरज आहे. दारिद्रयरेषेखालील लोकांना विनामूल्य सेवा दिल्या जातात, त्या अधिक बळकट कशा करता येतील, यादृष्टीने शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. 10 टक्के खाटांची सेवा मिळण्यासाठी खास अधिकाऱ्यांनी नियुक्ती करण्यात यावी.

अध्यक्ष महाराज, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागावर मी माझे मत मांडणार आहे. सप्टेंबर 2015 पासून या राज्यामध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेला जवळ जवळ स्थगिती मिळाल्यासारखे झालेले आहे. या योजनेचे काम बंद पडत चालले आहे. जी कामे अर्धवट स्थितीत राहिलेली आहेत, त्याला निधी मिळालेला नाही. ज्या योजना चालू आहेत, त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारकडून निधी मिळणार नसले तरी राज्य सरकार या योजना पूर्ण करण्याचे धोरण घेणार आहे काय, याचाही खुलासा होण्याची गरज आहे. या योजनांच्या दुरुस्तीचा खर्च ग्राम पंचातीने करावा किंवा जिल्हा परिषदेने करावा, अशी सरकारची अपेक्षा असते. परंतु ग्रामपंचायतीकडे निधी नसल्यामुळे या योजना दुरुस्त होत नाहीत. कोट्यवधी रुपये खर्च करुन या योजना बंद असतात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ. देशमुख...

योजना बंद असतात. ज्या ठिकाणी पाण्याची टंचाई असते अशा ठिकाणी या योजना राबविल्या जातात. याबाबतीत उदाहरण द्यावयाचे झाले तर 756 ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पूर्ण झालेल्या असून त्यापैकी 157 योजना बंद आहेत.

यानंतर VV-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. ग.आ. देशमुख ....

उर्वरित योजनाही सर्वच गावांना पाणी पुरवठा करीत आहेत, असे म्हणता येणार नाही. कोट्यवधी रुपये खर्च केलेले करुन या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना तयार केलेल्या आहेत. परंतु, त्यातून गावांना पाणी मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. या योजना दुरुस्त करण्यासाठी सरकारने खर्च केला पाहिजे. सरकार याबाबत विचार करीत आहे, असे आम्ही गेल्या 5-6 वर्षापासून ऐकत आहोत. परंतु, याबाबतीत काही प्रगती होत नाही. या योजना बंद पडण्याचे एक कारण हे आहे की, मोठ्या हॉर्सपॉवरच्या मोटारी वापराव्या लागतात. त्याकरिता उद्योगधंद्याकरिता केली जाणारी दर आकारणी केली जाते. मी मागणी करतो की, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना यामध्ये विजेची बिले ही हॉर्सपॉवरवर आकारण्यात यावी. चालू योजना दुरुस्त करण्यासाठी शासनाच्यावतीने दरवर्षी काही ना काही व्यवस्था केली पाहिजे, अशीही मी मागणी करु इच्छितो.

अध्यक्ष महोदय, पाण्याच्या बाबतीत काय अवस्था आहे, यावर या सभागृहात चर्चा झाली. लातूर सारख्या शहरामध्ये कलम 144 पुकारले जाते. महिना महिना लोकांना पाणी मिळत नाही हीच परिस्थिती जवळजवळ अनेक शहरांमध्ये आहे. ग्रामीण भागामध्ये तर हंडाभर पाण्यासाठी रात्रंदिवस वणवण करीत फिरावे लागते, रात्र-रात्र जागावे लागते, ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे. याबाबतीत गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे, शासनाने तो विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो व मला बोलण्याकरिता वेळ दिला याबद्दल आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

काही सन्माननीय सदस्य : यांचा पक्ष छोटा आहे.

श्री. शरद सोनावणे (जुन्नर) : अध्यक्ष महोदय, माझ्या पक्षाला कोणी छोटे म्हणायचे नाही. माझ्या पक्षाला कोणाला छोटे बोलण्याचा अधिकार नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा मी एकमेव आमदार आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांच्या चर्चेवर बोलण्याकरिता मी उभा आहे. आपण मला बोलण्याकरिता संधी दिली, त्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत त्यांच्या साक्षीने मला हे सांगावे लागेल की, माझ्या अगोदरच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी पाणी पुरवठा, स्वच्छता विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागाबाबत आपली मते आपल्यासमोर ठेवलेली आहेत. मी ज्या विभागातून निवडून आलेलो आहे तेथे छत्रपती शिवरायांची जन्मभूमी असलेला शिवनेरी किल्ला आहे. त्या भूमीत माझ्याकडे जेवढ्या पाणी पुरवठ्याच्या योजना सुरु आहेत त्याबाबत सांगावयाचे झाले इथून मागच्या कार्यकाळातील 50 टक्के योजना अजूनपर्यंत तशाच बंद राहिलेल्या आहेत. त्याबाबतीतील पर्यायी व्यवस्था अजून पर्यंत होत नाही. बऱ्याचशा ठिकाणी भ्रष्टाचार झालेले आहेत. काही ठिकाणी ग्रामसेवक आणि काही ठिकाणी सरपंच मिळून अशा पध्दतीने या योजनांची वाट लागलेली आहे, त्यामुळे सर्वसामान्य माणूस पाणी पुरवठा विभागाकडून जिल्हापरिषद असेल, सीईओ असेल किंवा राज्य शासन असेल या माध्यमातून अपेक्षा करतो. माझ्याकडे त्यांच्या तक्रारी आहेत, अनेक सूचना ते करतात.

पाणी पुरवठ्याच्या बाबतीत मंत्री महोदयांना मला हे सांगावे लागेल की, लोकांच्या आयुष्याचा, जीवनमानाचा प्रश्न म्हणजे पाणी आहे. या पाण्याचे धोरण ठरवित असताना आपण निश्चितपणे येथून मागे महाराष्ट्रात आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा सर्वप्रथम घ्यावा. मुळात ज्या कामासाठी आपण खर्च केला, ज्यासाठी आतापर्यंत शासनाचा, जनतेचा पैसा लावला तो पैसा मातीमध्ये गेला आहे, असे मला आपल्या सर्वांसमोर जाहीरपणे सांगावे लागेल.

अध्यक्ष महोदय, मला अतिशय नम्रपणे सांगावे लागेल की, नवीन पाणी पुरवठ्याच्या योजना आपल्याला पुन्हा नव्याने सुरु कराव्या लागतील. त्याकरिता चांगल्या पध्दतीचा फंड तत्परतेने द्यावा लागेल. हे वर्ष आपण शेतकरी वर्ष घोषित केलेले आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि त्यांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शरद सोनावणे ....

स्वप्नांसाठी या पाणी पुरवठ्याच्या बाबतीत माननीय श्री. बबनराव लोणीकर आपण धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे.

सार्वजनिक आरोग्य विभागाची आज वाईट अवस्था आहे. माननीय डॉ. दीपक सावंत साहेब मला आपल्याला सांगावे लागेल की, माझ्या मतदारसंघात जेथे छत्रपती शिवरायांची जन्मभूमी असलेला शिवनेरी किल्ला आहे तेथे दोनच रुग्णालये आहेत. ती दोन रुग्णालये आपण पाहिली तर, आपण आश्चर्यचकित व्हाल. जुन्नर ग्रामीण हॉस्पिटलमध्ये आपण जो डॉक्टर अपॉईंट केलेला आहे तो स्वतःच्या ओपीडीमध्ये असतो आणि सार्वजनिक क्षेत्रात काम करीत नाही. मी त्याला 1-2 वेळा वॉर्निंग दिली आहे. तिसऱ्यांदा मात्र मला सन्माननीय सदस्य श्री. बच्चू कडू यांच्यासारखी वॉर्निंग द्यावी लागणार आहे. कारण माझ्याकडे दुसरा पर्याय नाही.

जनतेची परिस्थिती अतिशय वाईट आहे. अधिकारीवर्ग काम करीत नाही. अधिकाऱ्यांची परिस्थिती पाहता महाराष्ट्र या नावाला साजेसे काम आपला अधिकारीवर्ग करतो आहे काय ? ग्रामीण रुग्णालयांची अतिशय वाईट अवस्था आहे. आजही एखादी महिला अडली आणि रात्री 12-1 वाजता तेथे गेली तर मला आमदार म्हणून जाऊन डॉक्टर शोधावे लागतात इतकी वाईट परिस्थिती ग्रामीण रुग्णालयांची आहे.

हा मतदारसंघ अतिशय मोठा असून तेथे 4 लाख इतकी लोकसंख्या आहे. या 4 लोकसंख्येकरिता आरोग्य विभागाची अतिशय दारुण परिस्थिती आहे. माझ्या अगोदर सन्माननीय सदस्य श्री. ग. आ. देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. मंत्री महोदय आपण पेशाने डॉक्टर आहात. अध्यक्षांच्या आसनावर बसलेलेही डॉक्टर आहेत. मी एक तरुण आमदार आहे, मी आपल्याला हात जोडून नम्रपणे विनंती करतो, मी काही अपेक्षा घेऊन या विधिमंडळात आलेलो आहे. केवळ 550 ग्रामीण रुग्णालयांचा आपण विचार करावा. आपण फक्त 1 महिना दौरा करावा. आपण एकही दिवस मंत्रालय किंवा मुंबईत थांबू नका. सतत सर्व तालुक्यांचे दौरे करा, 550 हॉस्पिटल्सना भेट द्या, महाराष्ट्र तुमचे कौतुक केल्याशिवाय राहणार नाही, हे मला जाहीरपणे सांगावे लागेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शरद सोनावणे ....

आज आरोग्य विभागाची खूप दारूण परिस्थिती आहे. आपण बाहेरच पडले पाहिजे त्याशिवाय पर्याय नाही. या संपूर्ण परिस्थितीचा विचार केला तर आपण प्रत्येक ठिकाणी नामोहरम झालो आहोत. मी आपल्याला पाठींबा देण्यासाठी उभा आहे. मी या शिवशाही सरकारचा आदर करणारा माणूस आहे. छत्रपती शिवरायांचा जन्म माझ्या मतदारसंघातील शिवनेरी किल्ल्यावर झाल्यामुळे या युती सरकारला पाठींबा देण्यासाठी मी जरी उभा असलो तरी, सूचना देणे क्रमप्राप्त आहे. सर्वसामान्य रयतेचा विचार, त्यांचा आश्वासक शब्द घेऊन तुम्ही-आम्ही सर्वजण काम करीत आहोत. आरोग्य विभागाची अतिशय दारूण परिस्थिती असताना मंत्री महोदय आपले नाव दीपक आहे आपण नेत्रदीपक काम करावे, एवढी अपेक्षा व्यक्त करून माझ्या दोन शब्दांना विराम देतो, जय हिंद. जय महाराष्ट्र.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव (गुहागर) : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये सार्वजनिक आरोग्य आणि पाणी पुरवठा विभागाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय आरोग्य मंत्र्यांबद्दल मला प्रेम व आदर कायमच आहे. त्यांच्या खात्यावर झालेला अन्याय या सभागृहामध्ये आकडेवारीनिशी माझ्या पूर्वीच्या सर्वच सन्माननीय सदस्यांनी मांडला, विशद केला. हा अन्याय आपण कशापध्दतीने दूर करणार ? तो आपल्याला अर्थसंकल्पामध्ये दूर करता आला नाही. भविष्यामध्ये ज्यावेळेस पुरवणी मागण्या मांडण्यात येतील त्यावेळेस तरी हा अन्याय दूर करण्याच्यादृष्टीने प्रयत्न करावा. आपल्यावरचा अन्याय हा महाराष्ट्रावरचा अन्याय आहे अशापध्दतीने शासनाने आपल्या विभागाला न्याय दिला म्हणजे पर्यायाने महाराष्ट्राला न्याय दिला असे मी समजेन, या दृष्टीनेही त्यांनी प्रयत्न करावा.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात कपात आहे. त्याच बरोबर मंत्री महोदय, योजना व योजनेतर खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात फरक पडत आहे. योजनेतर कामावर मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे.

WW-1/-...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव.....

परंतु योजनांवर दिवसागणीक कमी खर्च होत असून यातील तफावत कमी करण्याची आवश्यकता आहे. एका बाजूला भूक बळींची संख्या राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. तर दुसऱ्या बाजूला गरोदर मातांच्या मृत्युंचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. बालमृत्युचे प्रमाण तर आपल्या सर्वांना अतिशय विचार करायला लावणारे आहे. दर हजार बालकांमागे 24 मुलांचा मृत्यू होत आहे. सरासरी पाहिले तर वर्षाला 5,979 बालकांचा मृत्यू होत आहे. केरळ राज्यामध्ये हजाराच्या मागे 12 मुलांचा मृत्यू होतो तर तामिळनाडू राज्यामध्ये हजारामागे 21 बालके मृत्यूमुखी पडतात. आकडेवारी देऊन मी वेळ घेणार नाही. परंतु अर्भकांचा मृत्यू देखील मोठ्या प्रमाणात आहे. स्त्रीभृण हत्त्या आपल्याला चिंता वाटावी, काळजी करावी आणि त्यासाठी चांगले कठोर उपाय करावेत, अशा प्रकारच्या होत आहेत. काही वर्षामध्ये स्त्रीभृण हत्त्यामध्ये 19 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. 2001 साली पुरुषांच्या प्रमाणात हजाराच्या मागे 913 असे स्त्रीयांचे प्रमाण होते. ते 2011 मध्ये 894 वर आले. पर्यायाने 19 टक्क्यांनी महिलांचे प्रमाण घटले, याचाच अर्थ 19 टक्क्यांनी स्त्रीभृण हत्त्या वाढल्या.

अध्यक्ष महोदय, अल्ट्रा सोनोग्राफी म्हणजेच लिंग तपासणीचे प्रमाण सांगायचे झाले तर यासंदर्भात 2014-2015 मध्ये 481 लोकांवर गुन्हे दाखल झाले होते. तेच प्रमाण 2015-2016 मध्ये 552 वर गेले. सर्व प्रकारचे उपाय करुन, नवनवीन कायदे अमलात आणून वेगवेगळ्या प्रकारची शिक्षा व अधिकाधिक कठोर उपाययोजना करुन देखील अल्ट्रा सोनोग्राफीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे यासंदर्भात दखल घेण्याची आवश्यकता आहे. राज्यातील स्त्री व पुरुषाचे प्रमाण हजार पुरुषामागे 922 स्त्रीयांचे प्रमाण आहे. आपल्या राज्यात बीड जिल्ह्यामध्ये हे प्रमाण सर्वात कमी आहे. परंतु तेच प्रमाण केरळमध्ये हजार पुरुषामागे 1,058 इतके आहे. आंध्र प्रदेशमध्ये 988 जन्मदर आहे. देशात पाहिले तर 36 राज्यांपैकी आपला 27 वा क्रमांक लागतो. हे आपल्याला भूषणावह नाही. त्यामुळे मुलींचे प्रमाण वाढण्यासाठी उपाययोजना कराव्यात. याकरिता आम्ही सभागृहामध्ये आपल्याला सहकार्य करु, याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही. मी या ठिकाणी दोन, तीन सूचना सांगितल्या. परंतु आपल्या विभागाची चिंतेची बाब अशी आहे की, शासनाने सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी सरकारी दवाखाने काढले. त्यामध्ये चांगली दर्जेदार सेवा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव.....

मिळावी म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र, उप केंद्र, जिल्हा उप रुग्णालय, जिल्हा रुग्णालय अशा प्रकारची रुग्णालये काढून सर्वसामान्य मानसाला याद्वारे शक्यतो मोफत आणि कमीतकमी दरामध्ये सेवा मिळावी, असे अपेक्षित आहे. परंतु मला कळत नाही की, आपल्याकडे या विभागाचा कार्यभार आल्यानंतर एकाएकी ही गरिबांची सेवा मोठ्या प्रमाणात का महाग करता, हे कळत नाही. आपल्या खात्याला कमी बजेट मिळते. आणि दुसऱ्या बाजूला आपण सर्वसामान्य मानसाला सेवा देण्याऐवजी त्याच्या खिशामध्ये हात घालून मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य मानसाची नाराजी ओढवून घेत आहात.

अध्यक्ष महोदय, 108 हा टोल फ्री नंबर फिरविल्यानंतर राज्यातील सर्वसामान्य मानसाला रुग्णवाहिका मिळत होती. त्या रुग्णवाहिकेचा खर्च आपण प्रति किलोमिटर 15 रुपये केला. फिटनेस सर्टीफिकेट द्यायचे असेल तर 100 रुपये दर आकारणे सुरु केले. एखाद्या आजारी मानसाला सर्टीफिकेट द्यायचे असल्यास त्याचा 75 रुपये दर करण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांना वयाचा दाखला द्यायचा असल्यास 50 रुपये फी आकारणी करण्यात आली. प्रतीक्षा शुल्क 50 रुपये केले. जनरल वार्डमध्ये पेशंटला दाखल करायचे असेल तर 100 रुपये चार्जेस आकारले जातात. एसी नर्सिंग होम वापरायचे असेल, एखाद्या पेशंटला तेथे ॲडमीट करायचे असेल तर 500 रुपये आकारण्यात येतात. रक्त चाचणी करायची असेल तर 200 रुपये खर्च येतो. एचआयव्ही चाचणी करायची असेल तर 250 रुपये चाचणी खर्च येतो. सीटी स्कॅन करायचे असेल तर 400 रुपये खर्च येतो. मोठी शस्त्रक्रिया किंवा छोटी शस्त्रक्रिया करायची असेल तर 500 रुपये खर्च येतो. कॅन्सरच्या चाचणीकरिता हजार रुपये दर लावण्यात येतो. आयसीयु युनीटमध्ये दाखल करायचे असल्यास प्रतिदिन 200 रुपये चार्ज केला जातो. पूर्वी अशा पद्धतीने 2 रुपये, 5 रुपयामध्ये केस पेपर्स मिळत होते, 50 ते 100 रुपयामध्ये उपचार केले जात होते. मी सांगितलेले दाखले 20 रुपयापर्यंत दिले जात होते. परंतु त्यामध्ये आपण 200 रुपये, 500 रुपये, 100 रुपये, 5000 रुपये, 200 रुपये पर डे अशा मोठ्या प्रमाणात वाढ करुन किंवा खर्चाचे दर वाढवून सर्वसामान्य मानसाची नाराजी का ओढवून घेत आहात, हे मला कळत नाही.

अध्यक्ष महोदय, मी विधानपरिषदेचा 12 वर्षे सदस्य होतो. त्या ठिकाणी मी आपल्याला आमदार म्हणून जवळून पाहिलेले आहे. आपण विशेषकरुन आदिवासी भागामध्ये सर्वसामान्य

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव.....

मानसाला चांगली वैद्यकीय सेवा मिळावी, याकरिता काम करणारे तळमळीचे डॉक्टर, प्रामाणिकपणे, निस्पृहपणे आणि निस्वार्थीपणे काम करणारे डॉक्टर आमदार म्हणून मी बघितले. परंतु आपण मंत्री झाल्याबरोबर आपल्या मनातील दया, माया, कनव, कळवळा कुठे गेला हे मला कळत नाही. त्यांनी असे दर का वाढविले, याबाबतचे स्पष्टीकरण आपल्या भाषणातून देण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये 108 हा टोल फ्री नंबर फिरविल्यानंतर एमजन्सी ॲम्ब्युलन्स देण्याची सुविधा आमच्या सरकारने केली होती. अशा प्रकारच्या ॲम्ब्युलन्स महाराष्ट्रामध्ये दिल्या होत्या त्याच प्रमाणे मुंबईमध्ये देखील 142 ॲम्ब्युलन्स दिल्या होत्या. परंतु आपण त्यातील 30 ॲम्ब्युलन्स कमी केल्या. मुंबईच्या त्या ॲम्ब्युलन्स का कमी करण्यात आल्या, यासंदर्भात आपल्याला माहीत आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. परंतु यासंदर्भात आपण विभागाकडून माहिती घ्यावी. आपण मुंबईचे डॉक्टर आहात. शिवसेनेची मुंबई आहे. मुंबईतील लोकांना उपचार मिळण्याऐवजी 30 ॲम्ब्युलन्स कमी केल्या. शिवसेनेचे मंत्री असताना हे कसे काय होऊ शकते, यासंदर्भात आपल्या उत्तरातून स्पष्ट करण्यात यावे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये मूत्रपिंडाचे पेशंट मोठ्या प्रमाणात आहेत. एकट्या मुंबईत मूत्रपिंड मिळण्याच्या प्रतिक्षेमध्ये जवळजवळ तीन ते साडेतीन हजार रुग्ण वेटींग लिस्टमध्ये आहेत. अशा परिस्थितीमध्ये आपल्याला वर्षाला केवळ 300 ते 325 मूत्रपिंड मिळतात. मुंबईत 65 ते 70 मृत व्यक्तीकडून मूत्रपिंड मिळतात आणि वर्षाला 300 मूत्रपिंड मिळतात. एकट्या मुंबईमध्ये मूत्रपिंडाकरिता 3000 ते 3500 हजार पेशंट वेटींग लिस्टमध्ये आहेत. 2004 मध्ये आपण 754 मूत्रपिंडाचे प्रत्यारोपण केले. 2015 मध्ये 560 मूत्रपिंडाचे प्रत्यारोपण केले. सन 2014 मध्ये जीवंत व्यक्तींनी 674 मूत्रपिंड दान केली. तर मृत व्यक्तींनी 80 मूत्रपिंड दान केले. 2015 मध्ये जीवंत व्यक्तींनी 499 मूत्रपिंड दान केले आणि मृत व्यक्तींनी 69 मूत्रपिंड दान केले. यासंदर्भात आपल्याला विचार करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरी एक महत्वाची समस्या सर्वांसमोर आहे. सन्माननीय सदस्यांमध्ये देखील किडनी फेलचे पेशंट बरेच येतात. त्यांना डायलेसीस करावे लागते. राज्यामध्ये अनेक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव.....

क्षेत्रात डायलेसीसची समस्या आहे. यामध्ये कमी सोयी आहेत. किडनी मिळेपर्यंत पेशंटला कायमस्वरुपी डायलेसीस करावे लागते. कोणाला 15 दिसांनी तर कोणाला 8 दिवसांनी, कोणाला 3 दिवसांनी तर कोणाला 1 दिवस आड डायलेसीस करावे लागते. याचा खर्च आणि त्याची सोय पेशंटला जीवघेणी आणि त्यापेक्षा जगण्यापेक्षा मेलेले बरे अशी परिस्थिती झालेली आहे. आपल्या राज्यामध्ये आज 115 डायलेसीस मशिन्स आहेत. तसेच काही खाजगी डॉक्टरांकडे अशा मशिन्स असतील. या मशिन्स मर्यादीत आहेत. याकरिता आपण चांगली योजना आणावी. त्या प्रमाणामध्ये डायलेसीस मशिनची सोय तालुक्याच्या ठिकाणी करणे शक्य असल्यास तालुक्याच्या ठिकाणी करावी किंवा जवळजवळ प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा तालुक्याच्या ठिकाणी डायलेसीस मशिनची सोय केली तर त्याचा निश्चितपणे रुग्णांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल.

...XX/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव.....

अध्यक्ष महोदय, एक अत्यंत गंभीर बाब निदर्शनास आली आहे. बाहेर राज्यातून आपल्या राज्यात मोठ्या प्रमाणात निकृष्ट दर्जाच्या औषधांचा पुरवठा करण्यात येत आहे. ही बाब आपणा सर्वांच्या लक्षात आली आहे व उघडकीस आलेली आहे. आज आपल्या राज्यात गुजरात, पंजाब, हरियाणा, उत्तरांचल, हिमाचल प्रदेश व कर्नाटक येथून औषध विक्री होते. पुरवठा करण्यात येणाऱ्या एकूण औषधाच्या 12.26 टक्के औषधे निकृष्ट दर्जाची येत आहेत. अशी माहिती आपणा सर्वांसमोर आली आहे, त्याबाबत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. राज्यातील 281 सरकारी हॉस्पिटल आणि आरोग्य केंद्रातील औषधांच्या विविध चाचण्या आपण घेतल्या तर 335 प्रकारची औषधे बोगस आहेत. औषधे स्वस्त मिळतात म्हणून रुग्ण औषधे खरेदी करतात. या औषधांचा परिणाम हृदयावर होतो, रक्ताच्या गुळण्या होतात, अर्भकामध्ये अपंग दोष निर्माण होतो, मुत्रपिंडाचे आजार होतात, स्वादुपिंडाचे आजार होतात, उलट्या मळमळणे अशा प्रकारचे आजार होतात. याप्रकरणी गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2008 साली तत्कालीन शासनाने प्रत्येक ठिकाणी ट्रामा केअर सेंटर करण्याचा निर्णय केला होता. ही सेंटर्स काही ठिकाणी सुरु झालेली आहेत परंतु बहुतांश ठिकाणी ती अद्याप सुरु झालेली नाहीत. मुंबई-गोवा हायवे वर संगमेश्वर व्यतिरिक्त एक ही ट्रामा सेंटर सुरु होऊ शकले नाही, सदर प्रकरणी मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ठाणे व नवनिर्मित पालघर जिल्ह्यात कुपोषित बालकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, त्याकडे सरकारने लक्ष देण्याची आवश्यता आहे.

अध्यक्ष महोदय, अजून एक चिंतेची बाब आहे की, सध्या कॅन्सर हा आजार मोठ्या प्रमाणात फैलावत आहे. या आजाराचे सिम्टम्स दिसून येत नाहीत. कॅन्सर का होतो, कशामुळे होते, कधी होतो, झाला की झाला नाही, हे समजण्याचे कोणतेही साधन नाही. कॅन्सर झाला म्हणजे माणूस आयुष्यातून संपला, अशा पध्दतीने त्याच्याकडे पाहिले जाते किंवा त्याला स्वतःला वाटते. कॅन्सर प्राथमिक स्टेजवर डिटेक्ट झाला तर त्याच्यावर उपचार होऊ शकतात. कॅन्सर कोणत्या स्टेजवर आहे यावर उपचार होणे किंवा न होणे अवलंबून असते. हा आजार मोठ्या प्रमाणात वाढलेला असल्याने त्याबाबत काही शोध लावता येतो का, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव.....

अध्यक्ष महोदय, आरोग्य विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर कंत्राटी व मानधन तत्वावर कर्मचारी कार्यरत आहेत, त्याबाबतचा उल्लेख सभागृहामध्ये करण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, सरकारकडून सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. परंतु आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या व 30-35 वर्षे सेवा केलेल्या "आशा वर्कर" या 500 ते 800 रुपये दरमहा मानधनावर काम करतात. त्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही, प्रवासाचा खर्च देण्यात येत नाही. अंगणवाडी सेविका किंवा मदतनीस यांच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आली आहे परंतु या आशा वर्करच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आली नाही. आरोग्य मंत्री महोदयांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये आशा वर्कर यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला तर त्यांच्याकडून त्यांना विशेष धन्यवाद मिळतील.

अध्यक्ष महोदय, आजी आमदार व माजी आमदार यांच्या वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती मिळण्याकरिता त्यांना अगोदर खर्च करावा लागतो व त्यानंतर तो देण्यात येतो. मला अनेक माजी आमदार भेटले व त्यांनी सांगितले की, वैद्यकीय उपचारासाठी ओढूनताणून पैसे आणून उपचार घेतले. परंतु वर्षानुवर्षे त्यांना वैद्यकीय बिलाची प्रतिपूर्ती करण्यात येत नाही. संगमेश्वर येथे श्री.मुसा मोडक हे माजी आमदार आहेत त्यांच्यावर बायपास शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्याबाबतच्या वैद्यकीय देयकीय प्रतिपूर्ती मिळविण्याकरिता ते दोन वर्षापासून विधान भवन येथे खेटा मारत आहेत. परंतु त्यांना त्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीचे बिल मिळू शकले नाही. त्यांनी सूचना केली होती की, दोन लाख रुपयापर्यंतच्या वैद्यकीय बिलाच्या प्रतिपूर्तीची रक्कम जिल्हाधिकारी स्तरावर देता आली तर त्याचा विचार करावा.

अध्यक्ष महोदय, बंधपत्रित परिचारिकांच्या सेवा झाल्यानंतर त्यांना कालबध्द पदोन्नती देण्यात येत नाही. या परिचारिकांना 18 महिन्यांचा कालावधी ग्रामीण भागामध्ये पूर्ण केल्यानंतर नियमित सेवेचे प्रमाणपत्र देणे अपेक्षित असते परंतु ते देण्यात येत नाही. त्यामुळे अनेक अडचणी उद्भवलेल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये नळ पाणी पुरवठा योजना अतिशय चांगल्या सुरु आहेत. परंतु कोकणामध्ये खारी हवा असते त्यामुळे मोठ्या प्रमाणात नळ पाणी पुरवठा योजना नादुरुस्त होतात. ग्रामपंचायतींना त्या योजना दुरुस्त करणे अवघड जाते. त्यामुळे कोकणातील भौगोलिक परिस्थिती व खारे हवामान लक्षात घेता सदरहू योजनांच्या दुरुस्ती करिता विशेष निधीची तरतूद करण्याबाबत विचार करण्यात यावा, अशी माझी मागणी आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

तालिका सभाध्यक्ष (डॉ.सतीश पाटील): माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की त्यांनी थोडक्यामध्ये सजेशन्स करावीत.

श्री.सत्यजित पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यावर चर्चा सुरु आहे, त्यानंतर म.वि.स.293 च्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात येणार आहे. कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेलील अर्धा तास चर्चा आज चर्चेसाठी घेण्यात येणार आहे काय ?

तालिका सभाध्यक्ष : अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेवर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे, त्यावर मंत्री महोदयांचे उत्तर होणार आहे. या चर्चेसाठी तीन तासांचा कालावधी दिला आहे. आपण ही चर्चा लवकर संपविली तर अर्धा तास चर्चेसंबंधी निर्णय घेण्यात येईल.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.तुषार राठोड (मुखेड) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील सार्वजनिक आरोग्य विभाग व पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग या विभागांच्या अनुदानाच्या मागण्यांना समर्थन देण्यासाठी व त्यावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय हे ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेचे घटक आहेत. या रुग्णालयांची रचना शासनाच्या 20 ते 25 वर्षापूर्वीच्या निकषावर व धोरणावर आधारीत आहे. अनेक गावातील 30 हजार लोकसंख्येच्या आधारावर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदरहू निकषानुसार जवळपास 20 ते 30 वर्षापूर्वी सदरहू आरोग्य केंद्राची निर्मिती करण्यात आली होती व सदरहू गावातील लोकसंख्येत वाढ होऊन ती आता 60 हजारापेक्षा अधिक झाली आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कामाचा ताण वाढलेला आहे. वैद्यकीय अधिकारी हाच ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर म्हणून काम करीत असतो. त्याला तालुका व जिल्हास्तरावरील बैठकांना 4 ते 5 वेळा जावे लागते. तसेच, त्यांना ओपीडी, उप केंद्र भेटी, लसीकरण मोहिमेस भेटी द्याव्या लागतात. मुख्यालयाच्या ठिकाणी किमान एका वैद्यकीय अधिकाऱ्याचे वास्तव्य बंधनकारक असल्याने ही सर्व कर्तव्ये तो पूर्ण करु शकत नाही.

अध्यक्ष महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील शेवटचे गाव हे 15 ते 20 कि.मी. दूर अंतरावरील असल्याने तेथील लोक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ओपीडी व इतर सेवा घेण्याकरिता प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये येऊ शकत नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्र ज्या गावामध्ये आहे ते गाव व त्याच्या बाजूची 2-3 गावे सोडली तर त्याचा लाभ इतर गावातील लोकांना होत नाही. वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र सोडून उप केंद्रांना दररोज भेटी देण्याकरिता जाऊ शकत नाहीत. राष्ट्रीय कार्यक्रम व लसीकरण या सुविधा सोडल्या तर या गावांचा व प्राथमिक आरोग्य केंद्रांचा कोणताही संबंध येत नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रातील पायाभूत सुविधांच्या अभावामुळे बहुतांशी रुग्णांना रेफर करण्यात येते. लांबच्या गावातील ज्या रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा उपलब्ध होत नाही असे रुग्ण व रेफर केलेले रुग्ण यामुळे ग्रामीण रुग्णालय व उप जिल्हा रुग्णालय येथील डॉक्टरांवर कामाचा ताण वाढतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.तुषार राठोड.....

अध्यक्ष महोदय, एक वैद्यकीय अधिक्षक व तीन वैद्यकीय अधिकारी अशी ग्रामीण रुग्णालयांची रचना आहे अनेक वर्षापासून आहे. ग्रामीण रुग्णालयातील 4 पदापैकी एखादे पद नेहमीच रिक्त असते. शस्त्रक्रियागार नसणे, बायोकेमिस्ट्री व लॅबोरेटरी नसणे, आयसीयू सुविधा नसणे व यापैकी एखादी सेवा उपलब्ध असेल तर डॉक्टर नसतात. त्यामुळे मायनर सर्जरी व क्षुल्लक कारणासाठी रुग्णांना जिल्ह्याच्या ठिकाणी रेफर करण्यात येते. एका बाजूला जगभरात हेल्थ सायंसमध्ये दररोज नवनवीन शोध लागत आहेत. प्रगत राष्ट्रातील आरोग्य व्यवस्था वेल ऑर्गनाईझ्ड आहे. तेथे उपचाराच्या नवनवीन पध्दती व ज्ञानाचा अंतर्भाव ते उपचारामध्ये करतात त्याचा तेथील रुग्णांना फायदा होतो. याउलट ह्यूमनायझेशन व इन्स्टिट्युशनल डिलीव्हरीज या सारख्या मुलभूत प्रश्नावर आपली सिस्टीम स्ट्रगल करीत आहे, याचा आपण सर्वांनी गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, डॉक्टर्स, कर्मचारी व इन्फ्रास्ट्रक्चरवर मोठ्या प्रमाणात खर्च होऊनही प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालये ही राष्ट्रीय कार्यक्रम वगळता केवळ रेफर सेंटर म्हणून कार्यरत आहेत, ही अतिशय गंभीर बाब आहे. एकंदरीत राज्यातील ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था मोडकळीस आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयाच्या लोकसंख्येचे निकष डॉक्टरांची संख्या, पायाभूत सुविधा, प्राथमिक आरोग्य केंद्रातील सुविधा व डॉक्टरांचे वेतन याबाबींचा नव्याने विचार होऊन ग्रामीण भागातील यासेवेची पुनर्रचना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

यानंतर YY-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. तुषार राठोड.....

यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी व शासनाने विचार करुन ठोस पावले उचलावीत, अशी विनंती करतो. सन 2014-15 च्या आर्थिक पाहणीनुसार राज्यामध्ये एकूण 12987 रुग्णवाहिका आहेत. यामध्ये 10 ते 15 टक्के खासगी आहेत. इतर रुग्णवाहिका प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये यांच्या अखत्यारीत तर केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पंतप्रधान सुरक्षा योजना, जननी शुशू योजना, 102 आमदार खासदार यांच्या स्थानिक विकास निधीतून खरेदी करण्यात आलेल्या रुग्णवाहिका व 108 रुग्णवाहिका कार्यरत आहेत. या सर्व रुग्णवाहिकांना इंटिग्रेट करुन राज्यातील सर्व रुग्णवाहिकांना एकच विभागाच्या अखत्यारीत ठेऊन एकात्मिक रुग्णवाहिका सेवा निर्माण करणे गरजेचे आहे. इंटिग्रेटेड रिस्पॉन्स सेंटर निर्माण करण्याची आवश्यकता आहे. याबाबत सखोल अभ्यास करुन धोरण ठरवावे असे मी आरोग्यमंत्री व विभागास विनंती करतो. माझ्या मतदार संघातील पेठवडस हे गाव 10 ते 11 हजार लोकसंख्येचे गाव आहे. मागच्या अनेक वर्षापासून फायलेरियासीस रोगाने हे गाव त्रस्त आहे. या गावातील हत्तीपाय झालेल्या रुग्णांची संख्या 731 असून ही राज्यात सर्वात जास्त आहे. रक्ताचे नमुने जर आपण तपासले तर प्रत्येक दोन व्यक्तींपैकी एकजण फायलेरियासीस पॉझिटीव्ह आहे. गावातील घाणीचे साम्राज्य, नाल्या व गटारांचा अभाव तसेच गावाशेजारील नाल्यात साचलेले घाण पाणी यामुळे डासांची पैदास होते व या रोगाचा प्रसार होतो. माझी सार्वजनिक आरोग्य मंत्री आणि पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी या गावामध्ये येऊन या गावातील रुग्ण व या गावचा कालबध्द कृती आराखडा तयार करुन गावच्या स्वच्छतेचा व रुग्णांचा प्रश्न मार्गी लावावा. राज्यात मागील 3 वर्षापासून अतिशय गंभीर दुष्काळ आहे. माझ्या मतदार संघात आजच्या स्थितीत 90 टँकर्सने पाणी पुरवठा केला जात आहे. माझ्या मतदार संघातील कुरळा या जिल्हा परिषद गटास 1998 साली 22 गावांची एक पाणी पुरवठा योजना झाली. पण आजपर्यंत या योजनेद्वारे त्यामधील एकाही गावाला पाणी पुरवठा होऊ शकला नाही, ही बाब अतिशय गंभीर आहे. योजना पूर्ण होण्यापूर्वी ज्या स्त्रोतामधून पाणी पुरवठा करावयाचा होता ती स्त्रोते कोरडी पडली आहेत. या 22 गावांपैकी बहुतांश गावांना टँकर्सने पाणी पुरवठा करावा लागत आहे. शेजारच्या अहमदपूर तालुक्यातील लिंबूटी हे धरण अवघ्या 10-12 किलोमिटर अंतरावर आहे. या योजनेस नव्याने

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. तुषार राठोड.....

विचारात घेऊन लिंबूटीमधून पाण्याचा स्त्रोत उपलब्ध करुन दिला तर खऱ्या अर्थाने या 22 गावांचा पिण्याच्या पाण्याचा शाश्वत पुरवठा होऊ शकतो. यासंबंधीचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आलेला आहे. त्यामुळे माझी पाणी पुरवठा मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी ही योजना विचारात घेऊन त्या 22 गावांना भविष्यकाळात पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करावी, ही विनती. धन्यवाद.

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : आता मी चर्चा संपवित आहे. मी 4 वाजता चर्चा सुरू केली होती. यासाठी 3 तासाचा वेळ आहे. आता मंत्र्यांसाठी फक्त 15 मिनिटांचा वेळ आहे. आता आपले दोन नियम 293 चे प्रस्ताव आहेत त्यावर आपण बोलावे. काल आपल्या सर्वांना मागण्यांवर बोलण्याची संधी दिली आहे. आज दोन 293 चे प्रस्ताव आणि एक बिल काढावयाचे आहे आणि अर्धा तास चर्चा आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मागण्यांवर सर्वांना बोलण्याची संधी दिली आहे. सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल आपण रोज मागण्यांवर बोलता. अशी एक मागणी नाही की ज्यावर आपण बोलले नाहीत. सभागृहासमोरील सर्व कामकाज शिल्लक आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य मागण्यांवर बोलण्याची संधी न मिळाल्यामुळे वेलमध्ये बसतात.)

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयकुमार रावल (सिंदखेडा) : अध्यक्ष महोदय, धन्यवाद. अनेक विषय होते. पण मी दोनच मिनिटे बोलणार आहे. आरोग्य सेवा म्हणजे केवळ आजारी पडल्यानंतर औषध पुरविणे नव्हे. स्वच्छ पर्यावरण, शुध्द पाणी, शुध्द हवा, सकस जेवण या सर्व बाबी आणि या सर्वात महत्वाचे म्हणजे Prevention is better than cure. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव सुध्दा सांगत होते की, आपल्याकडे प्रत्यारोपणाची जी व्यवस्था आहे त्यामध्ये महाराष्ट्र राज्य हे देशातील अग्रगण्य असे राज्य आहे. मुंबई हे शहर असे आहे की, या ठिकाणी देशातील आणि जगातील अनेक लोक या ठिकाणी सेवेसाठी येतात. प्रत्यारोपणाच्या संबंधी फार मोठ्या अडचणी आहेत. तामिळनाडूसारख्या राज्याने यासंबंधी अनेक चांगले नियम केले आहेत. यामध्ये नातेवाईकाकडून जर एखादा अवयव घ्यावयाचा असेल तर त्यासाठी समितीकडे जावे लागते. पोलिस व्हेरीफीकेशन करणे अशा अनेक बाबी आहेत. एखादा आपला मित्र असेल आणि त्याला जर सहानुभूतीपूर्वक आपला एखादा अवयव द्यावयाचा असेल तर त्यासाठी फार किचकट अशी प्रोसिजर आहे. मूत्रपिंडाच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर त्यासंबंधी आपल्याकडे जागृतीच नाही. जर ब्रेन डेड जर कोणी माणूस असेल तर त्याचा ब्रेन डेड डिक्लेअर करण्याच्या बाबतीत जनजागृती नाही. ब्रेन डेड झाल्यानंतर तो अवयव घ्यायचा आणि काही तासात तो ट्रान्सप्लान्ट करायचा असतो. त्यासाठी फक्त काही तासांचा वेळ असतो. परंतु आपली प्रणाली इतकी किचकट आहे की, आपल्याला त्या समितीकडे जावे लागते, पोलिस व्हेरीफीकेशन करावे लागते. या अवयवांच्या बाबतीत 2-5 टक्के लोक चुकीचे काम करीत असतील, व्यापार करीत असतील, पण त्यामुळे 90 टक्के लोकांना अडचणींना सामोरे जावे लागते. आपल्याला सकारात्मक भूमिका घ्यायची आहे. कारण यामधून दुसरे जीवन मिळण्याची संधी आहे. या संदर्भात तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर सर्व नियम करावेत, यासंबंधी सर्व सांगत बसण्यापेक्षा मी सन्माननीय मंत्री महोदयांना कागदपत्रे देतो. यासंबंधी येणाऱ्या एका महिन्यामध्ये आपण निर्णय घेणार आहात काय ?

अध्यक्ष महोदय, मी ग्लोबल हॉस्पिटलला रोज जातो. माझे मामा त्या ठिकाणी आजारी असल्यामुळे ॲडमिट आहेत. त्या ग्लोबल हॉस्पिटलमध्ये ट्रान्सप्लान्टच्या सर्व प्रकारच्या टेक्नॉलॉजी आहेत. सर्व प्रकारचे डॉक्टर्स आहेत. आपले वरच्या सभागृहाचे माजी सन्माननीय सदस्य कै. गिडवाणी त्यांची पत्नी पडली आणि त्यांनी हॉस्पिटलमध्ये आमचा नंबर लागेल का, त्यांचा मुलगा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयकुमार रावल.....

मला माहिती देत होता की, आमचा या क्यूमध्ये नंबर लागला नाही तर माझ्या आईचे बरे वाईट होईल. त्याच्याकडे पैसे आहेत, डोनर आहे, सर्व काही आहे. पण प्रोसिजरमुळे अनेकांचा जीव जातो. या ग्लोबल हॉस्पिटलमध्ये जगातील साऊथ ईस्टमधील सर्व तज्ज्ञ डॉक्टर्स आलेले आहेत. सर्व बाबींचा विचार करुन प्रोसिजर सिम्प्लीफाय करणार आहात काय ? ट्रान्सप्लान्टेशनच्या संदर्भातील धोरण आणणार आहात काय आणि ते किती दिवसात आणणार आहात ? या संदर्भातील निर्णय करणे गरजेचे आहे. विषय अनेक आहेत, परंतु वेळेचे बंधन असल्यामुळे माझी मंत्री महोदयांना एवढीच कळकळीची विनंती आहे की, यासंबंधी आपण आठवडा दोन आठवड्यात निर्णय घ्यावा. कारण यामध्ये अनेक पेशन्ट दगावत आहेत. आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो.

ZZ-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दीपीका चव्हाण (बागलान) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या पुरवणी मागण्यांवर मी बोलणार आहे. आरोग्य विभागावर बोलणार नाही, पाणीपुरवठा विभागावरच बोलणार आहे. आपण मला बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल मी आपली आभारी आहे. नाशिक जिल्ह्यात माझ्या बागलान मतदारसंघात विंचूर राज्य महामार्गावर शासनाने जुलै, 2009 मध्ये ट्रॉमा केअर सेंटरला मान्यता दिली होती. सदर इमारतीचे बांधकाम सुरु होऊन 6 वर्षे झालेली आहेत. त्यासाठी लागणारे सर्व साहित्य व यंत्रसामुग्री पुरविण्यात आलेली आहे. आवश्यक असलेली पदनिर्मिती न झाल्यामुळे आजही सदर इमारत विनावापर पडून आहे. विंचूर या राज्य महामार्गावर होणाऱ्या अपघातग्रस्तांची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. अपघातग्रस्तांना वेळेवर उपचार मिळत नसल्यामुळे मृत्यूला सामोरे जावे लागत आहे. याप्रकरणी अनेकवेळा निवेदन देऊन आणि बैठका घेऊन सुध्दा मार्ग निघत नाही. ट्रॉमा केअरसाठी उपलब्ध करुन दिलेली साधनसामुग्री वापरात येत नसल्यामुळे ती निरोपयोगी होण्याची शक्यता आहे. यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा खर्च वाया जाण्याची शक्यता आहे.

अध्यक्ष महोदय आपल्याला माहिती आहे की, मांगीतुंगी येथे 108 फूट वृषभ देवाचा महाअभिषेक सोहळा नुकताच पार पडला. या सोहळ्यासाठी माननीय मुख्यमंत्री, माननीय जलसंपदा मंत्री, माननीय ग्रामविकास मंत्री व आपण सुध्दा आलात. राज्याचे प्रधान सचिव यांनी सुध्दा हजेरी लावली. याठिकाणी देशभरातून मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. सालरकिल्ले, शिवकालीन किल्ले याच परिसरात असल्याने पर्यटकांची आणि गिर्यारोहणांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. बऱ्याचवेळा याठिकाणी लहान मोठे अपघात होत असतात. त्यासाठी पर्यटकांना वेळेवर सुविधा मिळावी प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीच्या माध्यमातून सटाणा येथील ट्रॉमा केअर सेंटर येथील पद निर्मिती करावी अशी विनंती करते. चांदोर हे राष्ट्रीय महामार्गावरील गाव आहे. येथे सुध्दा ट्रॉमा केअर सेंटरची इमारत पूर्ण झाली आहे. माननीय पालक मंत्री यांच्याहस्ते या इमारतीचे उद्घाटन सुध्दा करण्यात आले. याठिकाणी सुध्दा पद निर्मिती नसल्यामुळे ही इमारत विनावापर पडून आहे.

अध्यक्ष महोदय, जुलै, 2009 मध्ये नाशिक येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दीपीका चव्हाण .....

माझ्या मतदारसंघातील मुल्यर या आदिवासी भागामध्ये ग्रामीण रुग्णालय, नाशिक विकास पॅकेज अंतर्गत मंजूर करण्यात आले होते. त्याबाबत संबंधित शासन निर्णय सुध्दा निघाला होता. परंतु आजपर्यंत याठिकाणी ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित होऊ शकले नाही. आदिवासी बांधवांना त्वरित वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी मुल्यर येथे ग्रामीण रुग्णालय सुरु करण्यास मान्यता देणे अत्यंत गरजेचे आहे. आदिवासी भागामध्ये काही अप्रिय घटना घडली तर तेथील लोकांना उपचारासाठी 60 ते 70 किमी अंतरावर असलेल्या सटाणा किंवा नामपूर येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये जावे लागते. माझी आरोग्य मंत्री महोदयांना विनंती आहे की, याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करावी आणि आदिवासी बांधवांचा दुवा घ्यावा. धन्यवाद.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.जयप्रकाश मुंदडा (वसमत) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर मी याठिकाणी बोलत आहे. मी फक्त मुद्दे सांगणार आहे. राज्यातील 12 कोटी जनतेचे आरोग्य चांगले ठेवण्याची या खात्याची जबाबदारी आहे. मी यासाठी काही सूचना करणार आहे. आपल्याकडे जवळ जवळ 1800 पीएसी आहेत, 10 हजार सबसेंटर आहेत. दोन सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल आहेत. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा रुग्णालय आहे. मागच्या मंत्री महोदयांनी सांगितले की, प्रत्येक जिल्ह्याला सिटीस्कॅन मशीन देऊ. केवळ सिटीस्कॅनच्या मशीन देऊन चालणार नाही तर त्यासाठी टेक्नीशियन आहेत किंवा नाही हे पाहण्याची आवश्यकता आहे. म्हणून सिटीस्कॅन मशीन देताना त्यासोबत टेक्नीशियनची नेमणूक करणे गरजेचे आहे. वसमत येथे ट्रॉमा केअर सेंटर मंजूर झालेले आहे. परंतु एक एकरपेक्षा जास्त जागा मिळत नाही. इरिगेशन विभागाने एक एकर जागा उपलब्ध आहे म्हणून सांगितले. म्हणून एक एकर जागेवर ट्रॉमा केअर सेंटर बांधण्यासाठी जागा द्यावी अशी मी विनंती करणार आहे.

अध्यक्ष महोदय, जीवनदायी योजनेमध्ये असे काही आजार आहेत की, ते खर्चिक आहेत. सेरब्रल पायरीस या आजाराचा समावेश जीवनदायी योजनेत करावा. कारण या आजारावर उपचार करण्यासाठी खूप मोठा खर्च लागतो आणि सर्वसाधारण माणूस हा खर्च करु शकत नाही. आज औषधे खूप महाग झालेली आहेत. साधा ताप आला तरी सर्वसाधारण माणसाला औषधे घेणे कठीण होते. म्हणून अशा वेळेस जेनेरीक मेडिसीनची व्यवस्था या खात्याकडून करण्यात यावी एवढी मी याठिकाणी मागणी करणार आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी डायलिसिस सेंटर करण्यात यावे त्यायोगे किडनीवर उपचार करण्यासाठी किंवा ज्यांना नेफराईटीज झालेला आहे. ज्यांना बाहेर कुठे उपचार घेता येत नाहीत अशा गोरगरीब माणसाला तालुक्यासाठी डायलिसीसची सुविधा होईल आणि यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ब्लड बँक उभारणे गरजेचे आहे. अशा वर्कर्सना त्यांच्या क्षमतेवर मानधन देण्यात येते. समजा एखाद्या गर्भवती महिलेला हॉस्पीटलमध्ये नेण्यासाठी 100 रुपये मिळत असतील तर ते फार कमी पडत आहेत. हे पैसे 100 ऐवजी 200 करण्यात यावेत अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये स्मार्टसिटी, स्मार्ट व्हिलेज करण्याचे शासनाने ठरविलेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.जयप्रकाश मुंदडा .....

त्याचप्रमाणे स्माट हॉस्पीकल करण्याचे आपल्या मनामध्ये घोळत आहे काय आणि एखादे स्मार्ट हॉस्पीटल ट्रायल बेसवर करावे एवढी आपल्याला विनंती करणार आहे. पाण्याच्या बाबतीत एक सूचना करणार आहे. 10 हजार लोकसंख्येचे एक गाव आहे. मागच्या वेळेस मंत्री महोदयांना भेटलो त्यावेळेस त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय पेयजल योजनांमध्ये नवीन कामांना कोणतीही तरतूद नाही. फक्त जुन्या कामांसाठी 3 हजार कोटी रुपये उपलब्ध आहेत. सर्व अपूर्ण कामे त्यामध्ये पूर्ण करणार आहोत. मग नवीन गावांना गरज आहे त्यांनी काय करायचे. म्हणून आपण सांगितले की, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना सुरु केलेली आहे. यामध्ये 500 कोटी रुपये उपलब्ध आहेत. यामध्ये हट्टा गावाचा समावेश करावा हे आपण कबूलही केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, ज्या प्रादेशिक नळ योजना आहेत त्या वीजेअभावी बंद आहेत. जुन्या योजनांवर सौरपंपाची व्यवस्था करावी. त्यायोगे त्याठिकाणी दरवर्षी वीजेचे बील भरायची गरज पडणार नाही. म्हणून याचीही तरतूद जर या खात्याने केली तर पाणीपुरवठ्याला भविष्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. त्याचप्रमाणे या प्रादेशिक नळ योजनांसाठी त्यांच्या काही खर्चामध्ये 1 किंवा 2 टक्क्यांची दुरुस्तीसाठी वेगळ्या निधीची तरतूद करावी. म्हणजे या योजना चांगल्याप्रकारे चालू राहतील. एवढेच मी याठिकाणी सांगू इच्छितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) : अध्यक्ष महोदय, खूप काही बोलायचे होते पण आपल्या भितीने जास्त बोलणार नाही. माझे म्हणणे थोडक्यात मांडणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना आमचे जुने मित्र माननीय राज्यमंत्री महोदय डॉ.दिपक सावंत या विभागाचे मंत्री आहेत. जेव्हा ते मंत्री झाले त्यावेळेस मला खूप आनंद झाला. आपल्या विभागाची जी अवस्था आहे ती मनाला दु:ख देणारी आहे. एका बाजूला खूप काम करु इच्छिता आणि त्याची अंमलबजावणी होत नाही. याप्रकारची भावना या सभागृहामध्ये अनेक सदस्यांनी व्यक्त केलेली आहे. रिक्त पदे असो, टेक्नीशियनची रिक्त पदे असो. दवाखान्यामध्ये औषधांचा पुरवठा कमी असतो. रुग्णाला जी औषधे हवी असतात ती रुग्णालयामध्ये उपलब्ध नसतात. डॉक्टर प्रिसक्रीपशन देतात. यादृष्टीने जनेरीक औषधांचा जास्तीत जास्त वापर झाला पाहिजे यादृष्टीने कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. मी जास्त वेळ घेणार नाही. मागच्या वर्षापेक्षा यावर्षी अर्थसंकल्पामध्ये एक हजार कोटी रुपयांचे नियोजन कमी देण्यात आलेले आहे ते वाढविण्याची आवश्यकता आहे. या चर्चेच्या माध्यमातून राजीव गांधी जीवनदायी योजनेबाबत बोलणार आहे. दुर्दैवाने 7 लाख लोकांनी या योजनेचा लाभ घेतला. गोंदिया जिल्ह्यामध्ये 1,400 लोकांनी याचा फायदा घेतला. तुमची 125 हजाराची जी लिस्ट आहे ती फक्त जिल्ह्याच्या हॉस्पीटलमध्ये आहे आणि खाजगी रुग्णालयांमध्ये 20 ते 25 हजारांसाठी व्हेरीफाय केलेले आहे. सन 2015-2016 मध्ये गोंदिया जिल्ह्यामध्ये 1 हजार 400 च्या वर रुग्णांना या योजनेचा फायदा घेता आला नाही.

3A-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल.....

अध्यक्ष महोदय, 400 पेक्षा जास्त रूग्णांना योजनेचा फायदा घेता आला नाही. म्हणून या विषयी सुध्दा या मागासलेल्या जिल्हयात मोठया प्रमाणावर बी.पी.एल.चे लोक आहेत. त्यांना राजीव गांधी योजनेचा लाभ मिळत नाही. एक चांगली योजना 108 ची असो किंवा राजीव गांधी जीवनदायी योजना असो याचा लाभ सर्वसामान्य माणसाला मिळाला पाहिजे. यादृष्टीने काम करावे,अशा प्रकारची मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, दुर्देवाने मंत्री महोदयांचे पत्र माझ्या हातामध्ये आहे. त्यांनी हे सर्व मान्य केले आहे. गोंदियाचे नर्सिंग कॉलेज, मागच्या दोन वर्षापासून, केंद्र सरकारने मान्य केले. या कॉलेजसाठी पहिला हप्ता 3 कोटी 37 लाख रूपयांचा दिला. निर्सिंग कॉलेज यांच्या लाल फितीशाहीमुळे पूर्ण झालेले नाही. मी अनेक वेळा याबाबत पाठपुरावा करतो. मंत्री महोदय सुध्दा पाठपुरवा करतात. ते सुध्दा हतबल आहेत. इज ऑल्सो हेल्पलेस, डॉक्टर ऑल्सो हेल्पलेस अशा प्रकारची परिस्थिती या नर्सिंग कॉलेज बद्दलची आहे. याबाबत मी माननीय मंत्र्यांना विनंती करतो की, मागील दोन वर्षा पासून इंडियन नर्सिंग कॉन्सिल, महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिल, हाय पावर कमिटी यासर्वांनी मान्यता देऊन, पैसे येऊन सुध्दा इमारतीचे बांधकाम होत नाही. नर्सिंग कॉलेज सुरु होत नाही. अशा प्रकारची दुर्देवी परिस्थिती मंत्री महोदय आपल्या काळामध्ये आहे. याचे मला जास्त दुख: आहे. यामध्ये आपण लक्ष घालावे अशा प्रकारची विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, कॅन्सर सारखे हॉस्पिटल, विशेषत: आमच्या विदर्भासाठी संत तुकडोजी महाराज ज्यांना स्वत:लाच कॅन्सर झाला. कॅन्सर हॉस्पिटलला केंद्र सरकार तयार आहे. परंतु जे लोक नार्मसमध्ये बसत नाही. फक्त पृष्टीकरण करण्यासाठी चार चार हॉस्पिटलची नावे पाठविली. राष्ट्रसंत तुकडो महाराजांना आपण मानत असाल तर त्यांना केंद्र सरकारचे अनुदान मिळायला पाहिजे. यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करावा. दुसरे पत्र माझ्या हातात आहे. सब सेंटर 75 टक्के झाले. तर पद निर्मिती करु मंत्री महोदय आमच्या जिल्हयामध्ये 8 सब सेंटर 100 टक्के झालेली आहेत. माननीय पालकमंत्री महोदयांनी सेंटरचे उद्घाटन केले. तेथे अजून पदनिर्मिती केली नाही. यामध्ये आपण लक्ष घालावे. फक्त पत्र देऊन घोषणा करावी, सर्वसामान्याला जर फायदा नाही मिळाला, तर निश्चित स्वरूपात योजनेचा उपयोग नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल.....

अध्यक्ष महोदय, पाणीपुरवठा योजनेचा पुर्ण बटयाबोळ या सरकारमध्ये झालेला आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना, सर्वशिक्षा अभियान, प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजना असो, त्याच प्रकारे राज्याच्या पाणीपुरवठा योजनेचा पूर्णपणे बटयाबोळ झालेला आहे. मुख्यमंत्री पाणीपुरवठा योजना येण्याची मागच्या एक वर्षापासून वाट बघतो आहोत, त्याकरिता किती निधी आहे ? तिला फक्त 500 कोटी रुपयांचा निधी दिला आहे. 500 कोटी रुपयांमध्ये लातूर सारख्या जिल्हयात कलम 144 लावून आम्हाला पाणी वाटप करावे लागते. दुस-या बाजूला पाणीपुरवठा योजनेला इतका दुजाभाव आहे. याला सुध्दा न्याय देण्याचा प्रयत्न करावा. गोंदियाची वाडी पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. गोंदियाचे अंडरग्राऊंड ड्रेनेज सिस्टीम मागच्या तीन वर्षापासून 70 कोटी रुपये केंद्र सरकार व राज्य सरकारने दिले आहेत. परंतु योजनेचे काम सुरु झाले नाही. यामध्ये सुध्दा मंत्री महोदयांनी पुढकार घ्यावा हीच विनंती करतो.

.....

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. राहुल पाटील (परभणी) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी व पाठींबा दर्शविण्यासाठी मी उभा आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बोलायचे झाले तर 12 कोटी जनतेचे आरोग्य सांभाळण्याचे काम माननीय आरोग्य मंत्र्यांच्या खांदयावर आलेले आहे. अतिशय चांगल्या प्रकारचे काम त्यांनी हाती घेतलेले आहे. शिव आरोग्य सेवा असेल किंवा बाईक अँम्ब्युलन्स असेल अतिशय चांगल्या योजना त्यांनी शासनामार्फत राबविलेल्या आहेत. गेल्य वर्षीच्या तुलनेमध्ये यावर्षी जवळपास 1462 कोटी अर्थसंकल्पामध्ये कमी आलेले आहेत. या अर्थसंकल्पात हा निधी वाढून दिला तर निश्चित चांगली सेवा मिळू शकते. आरोग्याच्या बाबतीत बोलायचे झाले तर अतिशय मॉक्रो प्लॅनिंग यावेळी करावे लागणार आहे. कारण जवळपास 70 टक्के जागा रिकाम्या आहेत. प्रमोशनच्या बाबतीमध्ये डायनामिक स्किम केंद्राच्या धर्तीवर, कॅशच्या शर्तीवर आणली तर निश्चित जी प्रमोशनची प्रकरणे असतील तर ती मार्गी लावू शकतो. तशाच प्रकारे नॅशनल हेल्थ मिशन 2007 पासून सुरु आहे. पण तेथील कर्मचारी तात्पुरत्या स्वरूपात किंवा कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर आहेत. तामिळनाडू प्रमाणे आपण त्यांना कायम करु शकलो तर फार चांगली गोष्ट होणार आहे. तशाच प्रकारे दर दहा हजार मनुष्यबळामध्ये किंवा दर दहा हजार जनतेमागे एक पी.एस.सी. असली तर खूप चांगली गोष्ट होणार आहे. 60 ते 70 हजार जनतेचेच्या मागे पी.ए.सी. उपलब्ध करुन देतो. पी.ए.सी.चे कशा प्रकारचे वातावरण आहे. हे सर्वांना माहित आहे. त्या पी.एस.सी.ला तीन मेडिकल ऑफिसर उपलब्ध करुन दिले तर दर आठ तासाला त्याची डयुटी बदलून तेथे चांगल्या प्रकारची सेवा डॉक्टरर्स् उपलब्ध करुन देऊ शकतात. सिव्हील हॉस्पिटलमध्ये सिव्हील सर्जनची पोस्ट ही प्रशासकीय पोस्ट झालेली आहे. याला सुध्दा काही पर्याय उपलब्ध करुन देता येऊ शकतो का ते पहावे लागेल.

अध्यक्ष महोदय, ज्या प्रकारे मानवविकास प्रोग्रॉम आदिवासी भागामध्ये राबविला जातो. तशा प्रकारचा प्रोग्रॉम जर मराठवाडयाच्या दुष्काळी 14 जिल्हयात राबवू शकलो तर चांगली गोष्ट मराठवाडयासाठी होणार आहे. तशाच प्रकारे राजीव गांधी आरोग्य योजनेमध्ये 972 आजारांवर उपचार होतात. ती योजना मराठवाडयामध्ये राबविली तर त्याचा दुष्काळी जनतेचा फायदा होणार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. राहुल पाटील .....

आहे. तशाच प्रकारे जनरल मेडिकल स्टोअर्स प्रत्येक जिल्हयामध्ये उपलब्ध केले तर औषधावर होणारा खर्च निश्चितच कमी होईल आणि आत्महत्यांचे प्रमाण कमी होऊ शकेल. 108 ॲम्ब्युलन्स सेवा आपण चांगल्या प्रकारे राबवित आहात. तशाच प्रकारे प्रत्येक जिल्हयामध्ये चांगल्या प्रकारचे कॅन्सर हॉस्पिटल असले पाहिजे. परभणीच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये सिटी स्कॅन मशिन बऱ्याच वर्षापासून नाही. मी मंत्री महोदयांना हे मशिन बसविण्याबाबत अनेक वेळा विनंती केलेली आहे. तशाच प्रकारे हुमन्स हॉस्पिटलचे काम 5 वर्षापासून रखडलेले आहे. ते काम पूर्ण झाले तर परभणीमध्ये चांगली सेवा मिळू शकते. काही हॉस्पिटलमध्ये मशिनरी आहे पण ती चालविण्यासाठी टेक्निशियन नाहीत. म्हणून मिसमॅच होते आहे. जर हॉस्पिटलला टेक्निशियन उपलब्ध करुन दिले तर निश्चित जनतेला चांगली सेवा देऊ शकतो. माझ्या मतदार संघामध्ये जरी किंवा जाम असे दोन प्रायमरी हेल्थ सेंटर आहेत. त्यांना चांगल्या प्रकारची इमारत नाही. जाम आणि जरी मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र असेल किंवा तेथे निवासाकरिता स्टाफ क्वॉटर्स् असतील हे आपण निश्चित आपल्या कार्यकाळामध्ये पूर्ण करावे अशी विनंती करतो. तशाच प्रकारे नर्सिंग कॉलेजेस् तालुक्याच्या ठिकाणी मेडिकल स्टाफ उपलब्ध होण्यासाठी स्थापन करावेत.

अध्यक्ष महोदय, परभणीमध्ये सन 2007 पासून पाणीपुरवठयाची योजना सुरु आहे. कालच परभणीच्या पाण्यासाठी 144 कलम लागू करण्यात आलेले आहे. परभणी पाणीपुरवठा 2007 पासून सुरु होती, त्यामध्ये दोन भाग करण्यात आले. एलदरीपासून परभणी एकमेव जिल्हा असा आहे की, ते पाणी उपलब्ध आहे. परंतु इंटर्नल डिस्ट्रीब्युशन नसल्यामुळे पाईप लाईन नसल्यामुळे आजपर्यंत तेथे पाणीपुरवठया योजना पूर्ण होऊ शकली नाही. जालनाच्या धर्तीवर ज्या प्रकारे जालना येथे योजना राबविण्यात आली. तशा प्रकारचे शासनाने 75 कोटी रुपये विशेष अनुदान उपलब्ध करुन दिले. तर निश्चितच परभणीची पाणीपुरवठा योजना आज सुरु होऊ शकते. परभणी येथे 144 कलम लागू झालेले आहे. पाण्याची खूप मोठी चणचण भासत आहे. म्हणून मंत्री महोदयांना विनंती आहे की, अशा प्रकारचे 75 कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावेत. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी माननीय अध्यक्षांचे आभार व्यक्त करतो. धन्यवाद, जयहिंद जय महाराष्ट्र !

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, मैं सन 2016-17 की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मैं सार्वजनिक आरोग्य विभाग और पानी पुरवठा एवं स्वच्छता विभाग पर अपने विचार व्यक्त करना चाहता हूं. बजट में 6912 करोड 36 लाख 52 हजार रुपये पब्लिक हेल्थ के लिए एलोकेट किया हुआ है. एलोपेथिक के लिए बजट है, आयुर्वेद के लिए बजट है, होमियोपेथी के लिए थोड़ा बजट है. लेकिन मुझे अफसोस है कि युनानी के लिए कोई बजट नहीं है, कोई प्रोविजन नहीं किया गया है. सरकारी अस्पतालों में 25 प्रतिशत आयुर्वेद के लिए रिजर्व किया गया है. पिछले 3-4 सालों से बहुत डिमांड की गई है. केंद्र सरकार और यहाँ की मिनिस्ट्री के साथ बात की गई है. दस प्रतिशत का वादा किया था. युनानी डॉक्टरों की भर्ति 25 प्रतिशत में 10 प्रतिशत होगी. लेकिन आज तक इस बारे में कार्यवाही शुरु नहीं हुई है.

अध्यक्ष महोदय, भिवंडी में सिविल हॉस्पिटल हो गया. लेकिन वहाँ पर सुविधाएं बिल्कुल नहीं है. मेरा निवेदन हे कि इस ओर ध्यान दिया जाए. वहां पर सुविधाएं दी जानी चाहिए. मुंब्रा में एक भी सिविल हॉस्पिटल नहीं है. वहां पर गरीब और मिडल क्लास की आबादी बहुत ज्यादा है. सरकार ने जनसंख्या के आधार पर अस्पतालों के लिए बंदोबस्त करना चाहिए. आज मुंबई की 54 प्रतिशत आबादी स्लम में रहती है. यहाँ पर गंदगी के कारण बहुत बिमारियाँ होती है. मानखुर्द-शिवाजीनगर में एसएमएस कंपनी का धुंआ और डम्पींग ग्राऊंड के कारण बिमारी फैल रही है. एक सर्वे के अनुसार लोगों की उम्र 68 साल है. लेकिन वहाँ पर 40 साल है. यह सब गंदगी ओर बिमारी के कारण है. इस ओर ध्यान देना बहुत जरुरी है. बड़े अस्पतालों में लोड बहुत ज्यादा है. अस्प्तालों में करप्शन बहुत बढ़ रहा है. अस्पतालों में बेड्स की बहुत कमी है. मेरा निवेदन है कि इस ओर ध्यान दिया जाए.

अध्यक्ष महोदय, सरकारी अस्पतालों में से सिटी स्कॅन ओर एमआरआई की सेवाएं प्राईव्हेट वालों को दे दी गई है. प्राईव्हेट अस्पतालों में बहुत लम्बी लाइन लगी रहती है. इससे जनता का बहुत नुकसान हो रहा है. इस ओर ध्यान दिया जाना चाहिए.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी.....

अध्यक्ष महोदय, मुंबई शहर में बीएमसी के चार मेडिकल कॉलेज है. 16 पेरीफरी हॉस्पिटल है. यहाँ पर लोगों को सुविधाएं नहीं मिलती है. डॉक्टर नहीं रहते है. शताब्दि को मेडिकल कॉलेज बनाने के लिए बहुत दिनों से मांग चल रही है. उसे सरकार ने स्वीकार किया है. लेकिन अभी तक काम शुरु नहीं हुआ है. शताब्दि को मेडिकल कॉलेज बनाने का काम शुरु किया जाना चाहिए. अस्पतालों में बाहर से मेडिसिन लाने के लिए कहा जाता है. अस्पताल के बाहर केमिस्ट की बहुत सारी दुकाने है. वहाँ पर दवा लाने के लिए भेजा जाता है. इस पर रोक लगायी जानी चाहिए. टी.बी. का मर्ज बहुत बढ़ रहा है. डब्ल्यूटीओ की रिपोर्ट है. हिंदुस्थान में सबसे ज्यादा टी.बी. के मरीज है. मुंबई में धारावी, मानखुर्द-शिवाजीनगर, मालाड, मालवणी में टी.बी. का मर्ज बहुत है. बीएमसी टी.बी. के लिए प्रोग्राम तो चला रही है. लेकिन सेंटर्स ज्यादा बनाने की जरूरत है. तीन चीजों पर ध्यान देना आवश्यक है. मेडिसिन, कौन्सिलिंग, न्यूटीशियन. अभी केवल मेडिसिन पर फोकस हो रहा है. बाकी चीजों को स्ट्राँग करने की जरूरत है. शताब्दि हॉस्पिटल में टी.बी. के इलाज की सुविधा है वह बहुत कम है. यहाँ पर सुविधाएं बढ़ायी जानी चाहिए. मुंबई के बाहर टी.बी. के कोई अस्पताल नहीं है. टी.बी. का एक ही अस्पताल वडाला-शिवडी में है. टी.बी. का अस्पताल खोला जाना चाहिए. यूनानी का दवाखाना बीएमसी में खोला जाए.

अध्यक्ष महोदय, पूरे मुंबई में पानी का वितरण समान होना चाहिए. जहां पर आबादी कम है वहाँ पर पानी ज्यादा दिया जाता है. उपनगर में आबादी बढ़ रही है, वहां पर पानी बहुत कम दिया जाता है. 25 प्रतिशत पानी लिकेज में जा रहा है. मेरा निवेदन है कि उस लिकेज को बंद किया जाए. हाई कोर्ट का एक जजमेंट आया है. समय के अभाव में इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : अध्यक्ष महोदय, मी सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे. मी आमदार झाल्यापासून जवळपास 12 वर्षे पूर्ण होत आहेत. मागील 12 वर्षापासून माझ्या मतदारसंघातील 3 ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षकाची पदे रिक्त आहेत. तेथे चार डॉक्टरांऐवजी एक डॉक्टर आपण देत आहात. बाराव वरीस धोक्याचं असे म्हणतात. या तीन ठिकाणी वैद्यकीय अधिक्षक नसल्यामुळे एक पद सातत्याने रिक्त दिसत आहे. कंत्राटी लोकांकडे आपण ग्रामीण रुग्णालयाचा चार्ज ठेवल्यामुळे त्यांच्यावर काहीही बंधन नाही, सफाई कर्मचारी, वॉर्डबॉय व नर्सेस त्यांचे ऐकत नाही. त्यामुळे तेथे अत्यंत दुरावस्था झालेली आहे. म्हणून तातडीने आपण ही पदे प्रमोशनच्या माध्यमातून भरली पाहिजेत. जेणेकरुन त्या रुग्णालयांना स्थैर्य लाभेल. चांदूर रेल्वे उप जिल्हा रुग्णालयाचा प्रस्ताव मागील तीन वर्षांपासून मी रेटत आहे त्यालाही अद्यापपर्यंत मंजूरी दिलेली नाही. ते मध्यवर्ती ठिकाण असून 50 हजार लोकसंख्येचे गाव आहे. त्यामुळे या उप जिल्हा रुग्णालयाला मंजूरी देण्याबाबत मी विनंती करतो. चांदूर रेल्वे तालुक्यातील भुईखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचे आपण बृहत आराखडयानुसार नवीन बांधकाम केलेले आहे. त्याकरिता कर्मचारी भरतीचा प्रस्ताव प्रलंबित आहे. तुम्हाला भेटून 3 महिने झाले आहेत. हा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित आहे असे सांगण्यात येत आहे. हा प्रस्ताव आपण तातडीने मंजूर करावा. मंत्री महोदयांनी कृपया लिहून घ्यावे की, भुईखेड प्राथमिक आरोग्य केंद्र हवे आहे. तसेच नांदगाव खंडेश्वर येथे मंजूर असलेल्या ट्रामाकेअर युनीटमध्ये पदभरती करणे आवश्यक आहे., ट्रामा केअर रुग्णालयाचे बांधकाम 70 टक्के पूर्ण झालेले आहे. त्यामुळे तेथे डॉक्टर व कर्मचारी भरती करणे आवश्यक आहे. याकरिता आपण मंजूरी द्यावी अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, मंगरूळ, निबोंली व भुईखेड प्राथमिक आरोग्य केंद्राच्या लोकार्पणासाठी तसेच माझ्या स्वतःच्या गावामधील आयुर्वेदीक दवाखाना मंत्री महोदय व राज्यमंत्री महोदयांची तारीख देण्यात यावी. हे आजच आपल्या उत्तराच्या भाषणात घोषित करावे. मी याकरिता पत्र दिलेले आहे, आपण हो म्हणता, मी विरोधी पक्षाचा आमदार आहे. पण या लोकार्पण कार्यक्रमासाठी एक दिवस आमच्यासाठी देण्यात यावा. जेणेकरुन कायम दुष्काळी असलेल्या भागातील रुग्णालयांना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप.....

न्याय मिळेल. या लोकार्पण कार्यक्रमास पालकमंत्री यांनाही बोलावण्यात येईल. पण पालकमंत्री हे माननीय राज्यमंत्री श्री.रणजित पाटील यांना विचारल्याशिवाय कदाचित या कार्यक्रमास येणार नाहीत. त्यामुळे या लोकार्पणाची तारीख मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात सांगावी अशी विनंती करतो. ट्रामा केअर युनीट व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचारी भरतीचा प्रस्ताव आपण तत्काळ मंजूर करावा अशी विनंती करतो. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रदीप नाईक (किनवट) : अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्याकरिता मला अनुमती दिल्यामुळे मी मनापासून आपला आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, मानव जातीच्या कल्याणासाठी माझ्या मतदारसंघात लांजी पॅटर्न नावाने किनवट व माहूर तालुक्यातील जवळपास 30-35 गावामध्ये आम्ही गटारमुक्त योजना राबविलेली आहे. ही खूप चांगली योजना आहे. मी आपणा सर्वांना सांगू इच्छितो की, केंद्र शासनाने या योजनेची दखल घेतलेली आहे. 4 x 4 चे शोषखड्डे तयार करुन मध्यभागी सिमेंटची टाकी बसविली जाते. टाकीच्या चारही बाजूला दगड लावले जातात. घरातील सांडपाणी पाईपद्वारे यामध्ये सोडले जाते. अशा प्रकारे शोषखड्डे आम्ही तयार केलेले आहेत. 500 गावाची लोकवस्ती असेल तर तेथे दररोज या शोषखड्डयाच्या माध्यमातून 1 लाख लीटर पाणी मुरले जाते. वर्षाला 3 कोटी 65 लाख लीटर पाणी जमिनीत मुरले जाते. आज आपण आरोग्य व पाणी पुरवठयाकरिता शासनाची योजना करीत आहोत पण पाहिजे तेवढी सुधारणा होत नाही. मानव जातीवर भयंकर संकट या पाणी व रोगराईच्या माध्यमातून उत्पन्न होत आहे. आमच्या योजनेमुळे या संकटातून मुक्तता मिळू शकते. ही योजना मांडण्यासाठी मी पाच मिनिटाचा वेळ मागतो. शोषखड्डयामुळे पिण्याचा प्रश्न सोडविण्यास आम्हास 100 टक्के यश आलेले आहे. आजची अशी परिस्थिती आहे की, विंधन विहीरींना 300-400 मीटर खोल पाणी लागत नव्हते. पण या योजनेमुळे 100-150 मीटरवर पाणी लागत आहे. अशा दुष्काळी परिस्थितीत गावातील विहीरींची पाणी पातळी 3-4 मीटरपर्यंत वाढलेली आहे. गटारमुक्त केल्यानंतर त्या गावातील रोगराई मुक्त होत आहे. गटारमुक्त केल्यास त्या गावात माशा, डास असे काहीही दिसणार नाही. एवढे चमत्कारीक काम आम्ही आमच्या मतदारसंघात करीत आहोत. सध्या देश, महाराष्ट्र, मराठवाडयावर पिण्याची पाणी व रोगराईची भयंकर परिस्थिती ओढावलेली आहे. अशा परिस्थितीत आम्ही नांदेड जिल्हयातील माहूर तालुक्यात लांजी पॅटर्न ही योजना राबवित आहोत.

यानंतर 3C-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रदीप नाईक.....

या योजनेची दखल केंद्र शासनाने घेतलेली आहे. आमच्या जिल्हापरिषदेचे सीईओ श्री.अभिमन्यू काळे यांनी या योजनेबाबतचे सादरीकरण व प्रोजेक्शन दिल्ली येथे केलेले आहे. लांझी गावामध्ये आजुबाजूचे जिल्हाधिकारी व आजुबाजूच्या राज्यातील तेलंगणा, हरयाणा पंजाब येथील अधिकारी हा प्रयोग व योजना पाहण्याकरिता येत आहेत. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल कुल (दौंड): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, युती शासनाने अवयव प्रत्यारोपण कायदा डिसेंबर,2015 मध्ये लागू झालेला आहे. हा कायदा उशिरा लागू झालेला आहे. भविष्यकाळात अवयवदानासंदर्भात शासनाने जागृती करण्याची व पुढाकार घेण्याची गरज आहे. डेथ सर्टिफिकेटवर सही करीत असतांना मृतांच्या नातेवाईकांना अवयवदानाकरिता विचारणा करण्यात यावी, अशी सूचना मला या निमित्ताने करावयाची आहे. डायलिसिस संदर्भात अनेक वक्त्यांनी आढावा घेतलेला आहे. प्रत्येक तालुक्यात एक डायलिसिस केंद्र असावे, अशी सूचना आहे. या डायलिसिसकरिता वापरली जाणारी सामग्री ही चांगल्या दर्जाची असावी. किडनीशी संबंधीत आजारांवर दीर्घकाळ उपचार करावे लागतात. याची औषधे महाग असतात. ही औषधे स्वस्त व सवलतीच्या दरात देण्यात यावी. धर्मादाय दवाखाना ही योजना चांगली असून ती वेगवेगळया ठिकाणी राबविली जाते. याकरिता 50 हजाराच्या आत वार्षिक उत्पन्न असेल तर उपचार पूर्ण सवलतीमध्ये होतो. एक लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असेल तर पन्नास टक्के सवलत मिळते. या उत्पन्नाच्या मर्यादा डबल करण्यात याव्यात, अशी माझी सूचना आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील विविध प्रश्नासंदर्भात डिसेंबर,2015 मध्ये नागपूर येथे बैठक घेतली होती. त्या बैठकीचे प्रोसिडींग मला चार -पाच महिन्यांपासून मिळत नाही. या बैठकीत चांगले निर्णय झाले होते. मी आपले आभार मानतो. या निर्णयांची अंमलबजावणी व त्यानुसार प्रक्रिया सुरु झालेली नाही. प्रोसिडिंगकरिता मी चार-पाच महिन्यांपासून याचा पाठपुरावा करीत आहे. प्रोसिडींग अद्यापहि तयार नाही. या बैठकीतील निर्णयासंदर्भात लवकर कार्यवाही व्हावी.

अध्यक्ष महोदय, पाणीपुरवठा विभागासंदर्भात मी एकच सूचना करेल की, हा विभाग जवळपास मागील वर्षभर बंद असल्यासारखा आहे. 500 कोटी रुपयांच्या तरतुदीमध्ये हा विभाग त्वरित सुरु होईल, अशी अपेक्षा आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर): अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, मी माझ्या तालुक्यातील अडचणींविषयी मंत्रिमहोदयांना सूचित करीत आहे. माझ्या इंदापूर तालुक्यामध्ये 08 प्राथमिक आराग्य केंद्र आणि 44 उपकेंद्र कार्यरत आहेत. त्यापैकी 16 उप केंद्रांना इमारत नसल्यामुळे त्याची तरतूद करणे आवश्यक आहे. वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांची अनेक दिवसांपासून पदे रिक्त आहेत,ती पदे भरण्यासंदर्भात शासनस्तरावरुन कार्यवाही होणे आवश्यक आहे. बावडा आणि लासूर्णे ही दोन मोठी गावे आहेत, येथे अपघाताचे प्रमाण जास्त आहे. अपघातस्थळावरुन रुग्णांना वाहून नेण्याकरिता या भागामध्ये रुग्णवाहिकेची सोय व्हावी. आराखडयामध्ये मंजूरीकरिता आलेल्या नवीन उप केंद्रांना मंजूरी मिळावी, त्याचप्रमाणे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना नवीन निवासस्थाने मिळण्यासाठी शासन स्तरावरुन कार्यवाही होणे आवश्यक आहे. निमगाव - केतकी या ग्रामीण रुग्णालयाकरिता पोस्ट मॉर्टेम रुमची व्यवस्था करण्यात यावी. एक्स-रे, बाईल्स मशिन्स, जम्बो ऑक्सिजन सिलेंडर मिळणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. उप जिल्हा रुग्णालय,इंदापूर करिता पूर्णवेळ रेडिऑलॉजिस्ट आणि नेत्र शल्यचिकित्सक, सर्जन आणि फिजिशियन मिळण्याकरिता कार्यवाही व्हावी. डोळयाच्या शस्त्रक्रियेकरिता लागणारे मायक्रोस्कोप मशिन मिळण्याकरिता शासनस्तरावरुन कार्यवाही होणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

अध्यक्ष : उर्वरित सन्माननीय सदस्यांना मी बिलावर बोलण्याकरिता परवानगी देतो.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016-2017 या वर्षीच्या सार्वजनिक आरोग्य विभागावरील अर्थसंकल्पीय मागण्यांवरील चर्चेला उत्तर देण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य सर्वश्री.सुनील देशमुख,जयदत्त क्षिरसागर, डॉ.सुनील देशमुख, डॉ.पतंगराव कदम, प्रा.देवयानी फरांदे, डॉ.तुषार राठोड, डॉ.जयप्रकाश मुंदडा, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री ग.आ.देशमुख, शरद सोनावणे, भास्कर जाधव, जयकुमार रावळ, गोपालदास अग्रवाल, राहुल पाटील, अबु आजमी, प्रदीप नाईक या सर्वांनी आपले विचार मांडलेले आहेत. या सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो. ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी माझे अभिनंदन केले, त्यांचे देखील मी आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांची एकच मागणी आहे की, राज्यातील आरोग्य खात्यामध्ये रिक्त पदांची संख्या खूप मोठी आहे. राज्यातील डॉक्टरांच्या रिक्त पदांची संख्या खूप जास्त आहे. ज्यावेळी मंत्री म्हणून मी हे खाते टेकओव्हर केले,त्यावेळी साधारणपणे या रिक्त पदांची टक्केवारी 65-70 टक्के इतकी होती. 512 विशेषज्ञांच्या मंजूर पदांपैकी 151 पदे भरलेली होती आणि 361 पदे रिक्त आहेत. शासकीय सेवेमध्ये विशेषज्ञांचे येण्याचे प्रमाण कमी आहे. सेवेमध्ये असलेली विशेषज्ञ टिकून राहणे ही शासनाकरिता एक महत्त्वाची बाब आहे. त्यांचा पगार वाढविणे हा एक उपाय झाला. दिनांक 4.8.2015 करिता 58 वरुन 60 वर्ष वयोमर्यादा वाढविण्याचा निर्णय या राज्य शासनाने केलेला आहे. 31 मे,2015 पासून हा निर्णय पुढील तीन वर्षांसाठी लागू झाला. शासन सेवेत दाखल होणा-या एमबीबीएस नंतर घेतलेल्या पदवीकरिता 6 अधिक वेतनवाढ पदविकेसाठी 3 अतिरिक्त वेतनवाढी देण्यात आल्या. शासन सेवेतील वैद्यकीय अधिका-यांना व विशेषज्ञांना मूळ वेतनाच्या 35 टक्के रक्कम व्यवसायरोध भत्ता म्हणून दिली जाते. राज्यात विशेषज्ञ उपलब्ध व्हावे, म्हणून सार्वजनिक आरोग्य खात्याने वैद्यकीय शिक्षण खात्यामध्ये उडी घेतलेली आहे. साधारणपणे सीपीएस कोर्सेसद्वरे 09 पदविका अभ्यासक्रम सुरु केलेले आहेत. यानंतर वैद्यकीय पद भरतीकरिता विशेष मोहीम हाती घेऊन 1,351 वैद्यकीय अधिका-यांची पदे गेल्या वर्षभरामध्ये भरलेली आहेत. सद्यस्थितीमध्ये राज्यातील वैद्यकीय अधिका-यांची संख्या 7200 मंजूर पदांपैकी 6352 पदे भरली गेलेली आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत.....

एकंदर राज्यातील शासकीय महाविद्यालयाचा विचार केला तर डिमांड आणि सप्लायचे यामध्ये समीकरण आहे. आपल्या राज्यामध्ये 16 शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आहेत. त्यातून एमबीबीएस डॉक्टर्स तयार होतात. प्रत्येक महाविद्यालयामध्ये 200-250 सीट्स असतात. साधारणपणे प्रतीवर्षी या कॉलेजेसमधून 3500 च्या आसपास डॉक्टर्स नव्याने शासनाला मिळतात. खाजगी मेडीकल कॉलेजेसची संख्या 26-27 इतकी आहे. त्यामध्ये अभिमत विद्यापीठे देखील समाविष्ट आहेत. यातून तयार होणारे डॉक्टर्स हे शासकीय सेवेमध्ये जात नाहीत. कारण त्यांनी करोडो रुपयांचे डोनेशन देऊन या सीट्स घेतलेल्या असतात, त्यांना खाजगी प्रॅक्टीसमध्ये अधिक इंटरेस्ट असतो. हे व्यस्त प्रमाण पाहिले तर आपल्याला या बाबतीत लक्ष घालण्याची गरज आहे. त्यामुळे जितकी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये जास्त होतील तितके डॉक्टर्स राज्यामध्ये जास्त प्रमाणात यातर होतील. दुसरी महत्त्वाची गोष्ट आहे की, विशेषज्ञांची पदे का मिळत नाहीत ? एमडी आणि एमएसच्या सीट्स मर्यादित आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत.....

मर्यादित सिट्स असल्यामुळे एका असोसिएट प्रोफेसरकडे दोन सिट्स असे प्रमाण केले तर 300 ते 400 विशेष तज्ज्ञ दरवर्षी राज्यातून मिळतात. यामधील अनेक डॉक्टर हे प्रायव्हेट प्रॅक्टिस करीत असतात, याच कारणामुळे विशेष तज्ज्ञाची पदे कमी आहेत. त्यामुळे हे प्रमाण व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता असल्यामुळे 6 जिल्ह्यांमध्ये अस्थायी डॉक्टर भरण्याचे अधिकार तेथील जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. प्रायोगिक तत्वावर सिंधुदुर्ग, वाशिम, बुलडाणा, जळगाव, रायगड, कोल्हापूरमधील डोंगरी भागात तशा प्रकारचे अधिकार दिलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय अभियान योजनेंतर्गत एकंदरित 1030 डॉक्टर आयपीएचएसच्यामार्फत भरलेले आहेत. अनेक डॉक्टर एमडी आणि एमएसचे शिक्षण घेण्यासाठी जातात. त्यामुळे ते पद आपल्याकडे भरले आहे, असे दिसून येते. परंतु, प्रत्यक्षात डॉक्टर त्या ठिकाणी हजर नसतात. अधिसंख्या पदभरतीचा कायदा आहे. अधिसंख्या पदभरतीसाठी कॅबिनेटकडून परवानगी घेणे अतिशय आवश्यक आहे. यासंदर्भातील नस्ती प्रोसेसमध्ये आहे. दरवर्षी 380 डॉक्टर एमडी आणि एमएसचे शिक्षण घेण्यासाठी जातात. हे डॉक्टर आपल्याला मिळाले तर ही 380 पदे भरण्यास मदत होणार आहे.

अध्यक्ष महोदय, ॲबस्कॉन्डेड डॉक्टराच्या संदर्भात बोलणार आहे. आज 485 ॲबस्कॉन्डेड डॉक्टरांची संख्या आहे. कलम 148 नुसार संबंधित 155 डॉक्टरांच्या विरोधात कारवाई केलेली आहे आणि उर्वरित डॉक्टरांवरील कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे. अशा प्रकारे पदे भरण्यासाठी आरोग्य विभागाच्या माध्यमातून प्रयत्न केला जात आहे. राज्याचा जो आऊटले दिलेला आहे, त्यामधील आरोग्य विभागाला कमी निधी मिळाला म्हणून अनेक सन्माननीय सदस्यांनी खंत व्यक्त केली होती. यासंदर्भातील तूट माननीय मुख्यमंत्री आणि माननीय वित्तमंत्री पुढील पुरवणी मागण्यांमध्ये भरून काढतील अशी मला आशा आहे. त्यामुळे कमी वाटणारे दीड हजार कोटी रुपये आरोग्य विभागाला मिळणार आहेत.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी त्यांच्या

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत.....

भाषणातून शिव वडापाव, शिव आरोग्यावर टीका केलेली आहे. शिव आरोग्य सेवेच्या माध्यमातून सिमाडोहमध्ये दर 15 दिवसाला तेथील पेशंट जमा करुन मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांचा real time tele-medicine केले जाते. सिमाडोहमध्ये संबंधित रुग्णाला स्टेस को लावला तर त्याचे ठोके मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टर ऐकायला येतात. अशा प्रकारची सेवा गेल्या 6 महिन्यांपासून प्रायोगिक तत्वावर सुरु केलेली आहे. त्या ठिकाणी कम्युनिकेशन किंवा नेटवर्क नसल्यामुळे तशा प्रकारची सुविधा प्रायोगिक तत्वावर सुरु केलेली आहे. त्यामुळे V-SAT तंत्रज्ञानाचा उपयोग करुन मोठी बँडविथ वापरुन ती सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे. आता त्यामध्ये आणखी नवीन प्रयोजन केलेले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या लॅपटॉपवर संबंधित पेशंटचे ठोके ऐकण्यास किंवा सल्ला देण्यास मदत होणार आहे. सिमाडोहपासून ही योजना प्रायोगिक तत्वावर सुरु केली होती. आता अशा प्रकारची सेवा नाशिकमधील आदिवासी भाग असणाऱ्या सुरगणा पेठ, वाडा-मोखाड्यातील आदिवासी भागात आणि नंदूरबार-अक्कलकुवा-धडगाव या भागांमध्ये सुरु केली जाणार आहे. साधारपणे 5 ठिकाणी ती सेवा सुरु केली जाणर आहे.

अध्यक्ष महोदय, काल माननीय केंद्रीय मंत्री श्री. जे. पी. नड्डाजी यांनी लसीकरणामध्ये महाराष्ट्र राज्याने मिशन इंद्रधनुष्यमध्ये मोठी मजल मारल्याबद्दल अभिनंदन केलेले आहे. याही पुढे जाऊन लसीकरणाची नोंद वेबसाईटवर होईल आणि त्याची माहिती सेंट्रल ऑफिसला समजली पाहिजे आणि रोजच्या रोज त्यासंदर्भातील डाटा तयार झाला पाहिजे या दृष्टीकोनातून आरोग्य विभाग प्रयत्नशील आहे. म्हणजे लसीकरणापासून एकही बालक वंचित राहणार नाही, असे आरोग्य विभागाचे उद्दिष्ट आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी ASV चा स्टॉक उपलब्ध नसतो, असे त्यांनी भाषणातून सांगितले होते. मी त्यांना चॅलेंजपूर्वक सांगू इच्छितो की, राज्यात ASV आणि ARV सर्व ठिकाणी उपलब्ध आहे. ज्यावेळी पेशंटला व्हेंटिलेटरची गरज लागते अशा वेळी स्नेक बाईटचा पेशंट रेफर केला जातो. राज्यात ASV आणि ARV मिळाला

.....3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत.....

नाही अशा प्रकारची तक्रार सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे द्यावी. पेशंट सिरियस असेल तर त्याला रेफर केले जाते. पण ASV नाही म्हणून पेशंट रेफर केला असेल तर अशा अधिकाऱ्याला ताबडतोब सस्पेंड करुन त्याला कायमचे घरी पाठविले जाईल. आरोग्य विभागात हलगर्जिपणा मुळीच खपवून घेतला जाणार नाही. आता आरोग्य विभागाकडे 3 लाख 37 हजार 969 ASV उपलब्ध आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी 108 ॲम्ब्युलन्स सेवेबद्दल स्वागत केलेले आहे. 108 ॲम्ब्युलन्स सेवेच्या माध्यमातून ट्रॉमाचे 1 लाख 594 पेशंट, कार्डियाकचे 5382 पेशंट, मेडिकल एमर्जन्सीचे 2 लाख 66 हजार पेशंट, डिलिव्हरी इन ॲम्ब्युलन्स 7667 अशा सर्व पेशंटवर यशस्वी उपचार केलेले आहेत. तसेच उर्वरित 7 लाख 28 हजार 911 पेशंटला 108 सेवेच्या माध्यमातून फायदा झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी शिवसेनेचे राज्य असताना 108 सेवा मुंबईतून कमी का केली असा प्रश्न उपस्थित केलेला होता. त्यांनी थोडेसे राजकीय भाषण केले होते. मुंबईतील 42 ॲम्ब्युलन्सचे शून्य कॉल सातत्याने असल्यामुळे अशा ॲम्ब्युलन्स अतिसंवेदनशील मेळघाट, वाडा-मोखाडा, अक्कलकुवा-धडगाव, हायवेच्या ठिकाणी ट्रान्सफर करुन उपयोगी आणलेल्या आहेत. आपण ॲम्ब्युलन्स सेवेसाठी पैसे मोजत असतो. त्यामुळे प्रत्येक ॲम्ब्युलन्सचा दोन ती अडीच कॉल होण्याची आवश्यकता आहे. कारण ती राज्याची एक मोठी योजना आहे.

अध्यक्ष महोदय, आरोग्य परिवहन सेवेत अनेक वाहने बंद असल्याची माहिती काही सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे. ही वाहने अनेक वर्षापूर्वी खरेदी करण्यात आली होती. आरोग्य परिवहन विभागाकडे अपघातग्रस्त 30, नादुरुस्त 132 वाहने आहेत आणि 282 वाहने निर्लेखित करावयाची आहेत. यासंदर्भात लवकर निर्णय घेतला जाणार आहे. बंद वाहनांची संख्या 444 एवढी आहेत.

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी एअर ॲम्ब्युलन्सच्या संदर्भात टीका केलेली आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर अपघात झाल्यास किंवा मुंबई-गोवा हायवेवर अपघात झाल्यास

.....4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत.....

उपचाराअभावी लोकांचे प्राण जातात. अशा पेशंटला मुंबईपर्यंत ठराविक वेळेत, ठराविक पध्दती एअर लिफ्ट करुन आणण्यासाठी एअर ॲम्ब्युलन्सचा उपयोग होतो. एक्सप्रेस हायवेवर अपघात झाल्यास संबंधित पेशंटला एअर ॲम्ब्युलन्सच्या माध्यमातून ब्रिजकॅन्डी, जे.जे.हॉस्पिटल, पवनहंस येथे 15 ते 20 मिनिटामध्ये पोहचविण्यास मदत होणार आहे. पेशंटचा गोल्डर हावर वाचावा ही एअर ॲम्ब्युलन्सची संकल्पना आहे.

अध्यक्ष महोदय, नंदूरबारमधील 26 खेड्यांमध्ये बोट ॲम्ब्युलन्सची संकल्पना राबविलेल आहे. त्या ठिकाणी पूर्वी उपचार करण्यासाठी कोणतेही साधन नव्हते, त्या ठिकाणी पूर्वी तरंगता दवाखाना होता. अशा ठिकाणी बोट ॲम्ब्युलन्सची संकल्पना राबविलेल आहे. बोट 26 गावांमध्ये जाऊन भोगा वाजून पेशंटवर योग्य ते उपचार केले जातात. पेशंटला आयव्हीची गरज असल्यास ती सेवा देखील दिली जाते. तसेच ईसीजीची आवश्यकता असल्यास ती सेवा देखील दिली जाते. अशा प्रकारे पेशंटवर उपचार केले जातात. अलिबागला अपघात झाल्यास संबंधित अपघातग्रस्तास मुंबईला आणण्यासाठी साडेतीन तास लागतात. अशा अपघातग्रस्त पेशंटला गेटवेला आणण्यासाठी बोट ॲम्ब्युलन्सची सेवा देऊ शकतो. याच धर्तीवर गडचिरोलीमध्ये देखील सुविधा दिलेली आहे. तेलंगनामधील काही पेशंटला प्राणहिता नदीवर बोट ॲम्ब्युलन्सची सेवा देऊ शकतो

3E-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दिपक सावंत...

माथेरान आणि महाबळेश्वर येथे बेलएअर चालवायला का देत नाहीत, यासंदर्भात सन्माननीय सदस्य डॉ.पतंगराव कदम यांनी मला दोन तीन वेळा फोन करुन सांगितले. बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना लक्षात घेऊन बेलएअर महाबळेश्वरचे हॉस्पिटल आपण चालवायला देत आहोत. माथेरान तसेच महाबळेश्वर येथे अपघात झाल्यानंतर पर्यटक घोड्यावरुन पडला, कोणी चालताना पडला, कोणाला हॉर्ट अटॅक आला तर तेथे ती सुविधा नव्हती, ती सुविधा आपण उपलब्ध करुन देत आहोत.

अध्यक्ष महाराज, राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडून काही सूचना केलेल्या आहेत असे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले, परंतु या आयोगाच्या सूचना अद्यापपर्यंत प्राप्त झालेल्या नाहीत. त्या आल्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे उपाययोजना करु. पीसीपीएनडीटी मुलांचा आणि मुलींचा सेक्स रेश्यो बद्दल सांगितले. आपण एक अप्रोप्रिएट ॲथॉरिटी तयार केलेली आहे. एक स्टेट सुपरवायजरी बोर्ड आहे. महाराष्ट्रामध्ये साधारणपणे 552 केसेस लॉज केलेल्या आहेत. त्यासाठी "आमची मुलगी" अशी एक वेबसाईट तयार केलेली आहे. त्यामध्ये साधारणपणे मुंबईचा सेक्स रेश्यो कसा वाढविता येईल. आताच मुंबईच्या सेक्स रेश्योवर बातमी आली होती त्यामुळे आम्ही मुंबई बरोबर इतर जिल्ह्यातील सेक्स रेश्योवर कॉन्सन्ट्रेट करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख यांनी डॉक्टरांची पदे भरण्यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख यांचे समवेत बैठक झालेली आहे. मी त्यांना तीन पर्याय सांगितले की काही अस्थायी डॉक्टर्स सोलापूर जिल्ह्यासाठी भरले जातील. काही आयपीएचएस मधून विशेतज्ज्ञ घेतले जातील आणि आपली डॉक्टरांची कमतरता कमी करण्यात येईल. सन्माननीय सदस्या श्रीमती फरांदे यांनी सी.टी. स्कॅन संदर्भातील मुद्दा उपस्थित केला. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटल मध्ये 70 टक्के जास्त खर्च झाल्यामुळे सी.टी. स्कॅनला शासन स्तरावरुन परवानगी देण्यात येईल. एनयुएमच्या अंतर्गत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठीची जी पदे आहेत, त्यासाठी केंद्र सरकारकडे मागणी करण्यात आलेली आहे. ती मागणी मान्य झाली की, जास्तीचे पदे भरण्यात येतील. सी.टी. स्कॅनच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. 23 सी.टी. स्कॅनपैकी 9

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सी.टी. स्कॅन मशिन्स सुरु आहेत. आपला विप्रो आणि जीई या कंपनीबरोबर करार झाला होता. या करारामुळे आम्हाला नवीन सी.टी. स्कॅन मशिन घेता येत नव्हते. गेल्यावर्षी हा 26 जिल्ह्यांसाठी हा करार होता, त्यामध्ये दोन भागीदार होते. फिलिप्सबरोबर करार झाला नव्हता पण शासनाने विप्रो आणि जीई बरोबर करार झाला होता. आपण हा करारनामा बंद केला आणि आता केंद्र सरकारच्या माध्यमातून टेंडर फ्लोट होत आहे. त्यानंतर 26 जिल्ह्यांना सी.टी. स्कॅन मशिन त्याचबरोबर सोनोग्रॉफी, डिजीटल एक्सरे केंद्र सरकार आपल्याला देत आहे. काही सन्माननीय सदस्यांनी मशिन्ससोबतच टेक्निशियन सुध्दा दिले पाहिजेत, अशी मागणी केली. केंद्र सरकारच्या माध्यमातून आपल्या टेक्निशियन मिळणार आहेत. येत्या दीड वर्षामध्ये आपल्याला 26 जिल्ह्यांमध्ये टेक्निशियन समवेत सी.टी. स्कॅन मशिन्स येण्याचे प्रस्तावित आहेत. साडेतीन महिन्यात हे टेंडर पूर्ण होईल.

सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी माता मृत्यू बद्दलचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, मेळघाट मध्ये माता मृत्यूंचे प्रमाण खूप जास्त होते, परंतु गेल्या वर्षामध्ये केवळ 7 मृत्यू झालेले आहे. आपला आयएमआर सन 2011 मध्ये 25, सन 2012 मध्ये 25, सन 2013 मध्ये 24, आता आपण तो 22 वर आयएमआर आणला आहे. परंतु हे प्रमाण समाधानकारक नाही. मला तो 20 च्या खाली किंवा शून्याच्या खाली आणावयाचा आहे, परंतु यासाठी सर्वांची साथ मिळणे आवश्यक आहे. भौगोलिक परिस्थिती तसेच काही सामाजिक परिस्थितीमुळे आपल्याला याबाबतीत काही बंधने येत आहेत.

काही सन्माननीय सदस्यांनी आपल्या राज्याची तुलना केरळ राज्याशी केलेली आहे, परंतु महाराष्ट्राची लोकसंख्या आणि केरळची लोकसंख्या यामध्ये जमीन असमानचा फरक आहे. लोकसंख्येमुळे आपल्याला दोन्ही राज्याची अशी तुलना करणे योग्य होणार नाही. डायलिसिस सेंट्रर बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. सिध्दी विनायक न्यासातर्फे 102 नवीन डायलिसिस सेंटर आपल्याला मिळत आहेत. प्रत्येक जिल्ह्यात तीन डायलिसिस मशिन्स देण्यात येणार आहेत.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपण मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शासनाच्या मागण्यांवर चर्चा आहे. सिध्दी विनायक ट्रस्ट काय करणार आहे हे सांगण्याचा विषय येथे नाही. सरकारच्या मागणीची जी तरतूद आहे, त्यावरच बोलावे.

अध्यक्ष : काही सन्माननीय सदस्यांनी अधिकची माहिती विचारली असेल तर सांगायला काही हरकत नाही.

डॉ.दिपक सावंत : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपण ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहात. सीएसआर फंडा मधून तसेच शासनाच्या निधीतून आपण करु शकतो. डायलिसिस मशिन उपलब्ध करुन देण्याबाबत काही सन्माननीय सदस्यांनी विनंती केली. राज्याला डायलिसिस मशिन्स मिळणे ही बाब महत्वाची आहे. ते कोठून आले, हे महत्वाचे नाही. बजेटवर अनेक सन्माननीय सदस्य खूप कमी बोलले. सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्याचे उत्तर देणे माझे काम आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, आपण सिध्दी विनायकचा मुद्दा काढलाच आहे, मी काही दिवसापूर्वी आपल्याला भेटून सांगितले होते की, सिध्दी विनायक ट्रस्टने सहा कोटी रुपये या कामासाठी मंजूर केलेले आहेत. आरोग्य विभागाचे याबाबतीत टेंडर काढायचे राहिलेले आहे. मी आपाणास सांगूनही आठ, पंधरा दिवस झाले असतील. ते टेंडर काढले का ते आपण कृपया सांगावे.

डॉ.दिपक सावंत : अध्यक्ष महाराज, टेंडर झालेले आहे. ते मी का सांगत नाही याचे कारण असे की, दालनात झालेली चर्चा सभागृहात सांगू नये, अशा प्रकारचा दंडक आहे. आपण महाराष्ट्र विधानसभेचे माननीय अध्यक्ष होतात. त्यामुळे आपण सभागृहात काय बोलावे आणि काय बोलू नये याबाबतीत बंधन आहे.

अध्यक्ष : माननीय मंत्री महोदयांना जेवढे बोलायचे असेल तेवढेच बोलावे बाकी अन्य बोलण्याची गरज नाही.

डॉ.दिपक सावंत : अध्यक्ष महाराज, महाराष्ट्र शासनातर्फे लवकर निदान मिळावे म्हणून आपण जिल्हास्तरीय कॅन्सर सेंटर सुरु करीत आहोत, त्याचबरोबर राजीव गांधी जीवनदायी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दिपक सावंत....

योजनेतंर्गत 311 शासकीय रुग्णालयामध्ये कॅन्सरचे उपचार सुरु केले आहेत. टाटा कॅन्सर हॉस्पिटल समवेत कॅन्सर वॉरीअर ही संकल्पना सुरु केलेली आहे. टाटा कॅन्सरचे एक्स्पर्ट डॉक्टर आणि आपले डॉक्टर यांची टीम या कॅन्सर वॉरीअरसाठी काम करणार आहे. वरुड येथे एक नवीन रक्तपेढीची मागणी झालेली आहे, ती आपण सकारात्मक केलेली आहे. अवयव प्रत्यारोपण, किडनी ट्रॉन्सप्लांट हा अनेक सन्माननीय सदस्यांचा महत्वाचा मुद्दा होता. कायदा करणे ही बाब वैद्यकीय शिक्षण खात्याच्या अखत्यारित येते आणि परवानगी देणे ही बाब आमच्याकडे आहे. वैद्यकीय शिक्षण खात्याला या कायद्यातील बदलांबाबत तसेच तो कायदा अधिक सुटसुटित व्हावा, तसेच सिंगल विंडो सिस्टीमने लोकांना किडनी मिळावी, यासाठी वैद्यकीय शिक्षण खात्याला प्रस्तावित करण्यात येईल.

यानंतर 3F-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत ....

मात्र या सर्वामध्ये आपण ग्रीन कॉरिडोअर ही संकल्पना राबवित आहोत. ग्रीन कॉरिडोअरमुळे जे काही अवयव आणण्यात येणार आहेत, त्यासाठी बराच कमी वेळ लागणार आहे. त्याचप्रमाणे आपण काही नॉन-ऑर्गन ट्रान्सप्लांट रिट्रायव्हल सेंटर्स देखील सुरु करीत आहोत. जेथे आयसीयु आहे तेथे आपण हे ऑर्गन काढून घेण्यासाठी परवानगी देत आहोत. त्याचबरोबर पोलिसांची परमिशन आणि पोस्टमॉर्टेम रिपोर्ट सिंगल विंडो सिस्टमने कसा मिळेल यासाठी देखील सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांनी सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये ई-औषधीच दिली जाते याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. सर्व औषधे जेनरिकच असतात. 416 औषधांची जी यादी आहे ती आपण जेनेरिकच देतो. या सर्व ई-औषधींचे मॉनिटरिंग आपण कॉम्प्युटरद्वारे करतो. तसेच, त्यांनी नर्सिंग कॉलेजचाही प्रश्न मांडलेला आहे. येणाऱ्या बजेटमध्ये म्हणजे पुरवणी मागण्यांमध्ये ...

श्री. गोपालदास अग्रवाल : मंत्री महोदय ते कॉलेज या वर्षी सुरु झाले पाहिजे.

डॉ. दीपक सावंत : पॉझिटिव्हली या वर्षी आपले कॉलेज सुरु होईल असे पाहिले जाईल. त्याच बरोबर आपण एक मुद्दा उपस्थित केला होता की, आपल्याकडे राजीव गांधी जीवनदायी योजना नाही. मी आपल्याला सांगू इच्छितो की, 2 शासकीय रुग्णालयांमध्ये व 3 खाजगी रुग्णालयांमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु आहे.

श्री. गोपालदास अग्रवाल (बसून) : मंत्री महोदय मी असे म्हटले होते की, राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ 1400 लोकांना मिळाला नाही.

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. तुषार राठोड यांनी सांगितले होते की, सन 2013 च्या लोकसंख्येच्या माध्यमातून पीएचसींची संख्या वाढविण्यात येणार आहे. सन 2013 मध्ये लोकसंख्येचा अभ्यास करुन आपण एक बृहत आराखडा तयार केला होता. या बृहत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत ....

आराखड्यानुसार आपण 911 नवीन सिव्हील हॉस्पिटल्स, 911 एससी, 273 पीएचसी, 51 ग्रामीण रुग्णालये आणि 42 ट्रॉमा केअर सेंटर मंजूर केलेले आहेत. इतर सन्माननीय सदस्यांच्याही ट्रॉमा केअर सेंटर सुरु करावे, पीएचसी सुरु करावे किंवा उपकेंद्र सुरु करावे, अशा मागण्या आहेत. त्यांचा समावेश या बृहत आराखड्यामध्ये करणे आवश्यक आहे. त्याकरिता कॅबिनेटची मंजुरी मिळणेही आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अबु आजमी यांनी युनानीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. आपण निश्चितपणे 10 टक्के जागा युनानीसाठी राखून ठेवलेल्या आहेत. प्रा. विरेंद्र जगताप यांनी त्यांच्या 13 आरोग्य संस्थांची बांधकामे झालेली आहेत, त्याच्या उद्घाटनाच्या तारखेबाबत विचारले आहे. प्रा. विरेंद्र जगताप यांना मी सांगू इच्छितो की, आपण अधिवेशन संपल्याबरोबर पहिल्या शनिवारी तुमच्या जागेचे उद्घाटन करुया.

अध्यक्ष महोदय, वैद्यकीय अधीक्षक लगेच देण्यात येतील. जवळजवळ सर्व सन्माननीय सदस्यांनी दर वाढले म्हणून तक्रार केली आहे. परंतु, सन 2010 मध्ये वैद्यकीय शिक्षण खात्याचे जे दर होते त्याच दरांना आज आपण ॲट पार केलेले आहे. दर वाढविलेले नाहीत. पोस्टमॉर्टेमसाठी व 108 सेवेसाठी पैसे घेतले जात नाहीत. बीपीएलखालच्या लोकांना फ्री आहे आणि ज्येष्ठ नागरिकांपासून ते गरोदर मातेपर्यंत आपण डेसिग्नेट केलेल्या 17 कॅटेगरीतील लोकांना हॉस्पिटलमध्ये कोणत्याही प्रकारचा चार्ज नाही. केवळ आरएच अँड अबाव्ह याच लोकांकरिता हे दर वाढलेले आहेत. पीएचसी लेव्हलला, उपकेंद्र लेव्हलला हे दर वाढलेले नाहीत, हे मी सभागृहाला पुन्हा निक्षून सांगतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या विभागाशी संबंधित असलेल्या सर्व कपात सूचनांची उत्तरे मी लिखित स्वरुपात सन्माननीय सदस्यांना देणार आहेच. मी सर्व सूचना व मुद्यांची दखल घेतलेली आहे. त्यावर योग्य ती कारवाई करण्याच्या सूचनाही मी संबंधितांना देत आहे.

अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या 6912.38 कोटी रुपयांच्या आर-1 ते आर-4 या अर्थसंकल्पीय मागण्या मान्य कराव्यात, अशी मी सभागृहास विनंती करतो.

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : प्रथम माननीय श्री. बबनराव लोणीकर यांचे उत्तर होऊ द्या. आता आपल्याला प्रश्नोत्तरे करता येणार नाहीत.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, साधा मुद्दा आहे, माननीय डॉ.दीपक सावंत यांच्या उत्तरातून एका प्रश्नाची माहिती येणे अपेक्षित होते. सन 2016-2017 मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज हा 6912 कोटी रुपयांचा आहे. सन 2015-2016 मध्ये सुधारित अंदाज 8047 कोटी रुपयांचा होता. 1135 कोटी रुपयांनी तुम्ही या वर्षीचा खर्च का कमी केला ? याची माहिती सभागृहाला द्यावी.

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महोदय, मी याचे उत्तर सुरुवातीलाच ऑलरेडी दिलेले आहे. आपण सभागृहात उशिरा आलात.

प्रा. देवयानी फरांदे : अध्यक्ष महोदय, माझ्या 2-3 मुद्यांचा मंत्री महोदयांनी खुलासा केलेला नाही. नाशिकचे किडनी ट्रान्सप्लांटचे युनीट आपण कधी सुरु करणार व खाजगी रुग्णालयांच्या बाबतीत सरकार धोरण करणार आहे काय आणि ते कधीपर्यंत करणार ?

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महोदय, खाजगी रुग्णालयांच्या बाबतीत क्लिनीकल इस्टॅब्लिशमेंट ॲक्ट कॅबिनेट मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे. तो कॅबिनेटमध्ये मंजूर झाल्याबरोबर आपण करु. नाशिकच्या किडनी ट्रान्सप्लांट युनीटबाबत थोडीशी अजून इक्विमेंटची आवश्यकता आहे. ती इक्विमेंट आल्यानंतर आपण ते लगेच सुरु करु.

श्री. सुनील केदार : अध्यक्ष महोदय, माननीय आरोग्य मंत्र्यांनी सांगितले की, जे कमी झालेले आहे ते आपण सप्लीमेंटरीमध्ये करणार. याचा अर्थ पुढचा डेफिसीट वाढणार आहे काय किंवा आपल्याकडे अनबजेटेड आऊटले दिला आहे काय ?

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महोदय, सर्व खर्च यामध्ये नमूद आहेत, मी ते आपल्या माहितीसाठी पटलावर ठेवतो.

श्री. गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, संत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटलबाबत सांगावे.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल मंत्री महोदयांनी मघाशी आपले कॉलेज सुरु होण्याबाबत सांगितलेले असल्याने आपला प्रश्न सुटलेला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महोदय, संत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटलचे प्रपोजल दिल्लीला गेले आहे. आम्ही पाठपुरावा करुन ते मान्य करुन घेऊ.

अनेक सन्माननीय सदस्य : ते कधी पर्यंत होणार ?

डॉ. दीपक सावंत : अध्यक्ष महोदय, ते दिल्लीला पाठविले असल्याने, त्याबाबत मी कसे काय सांगणार ?

अध्यक्ष महोदय, मी पुन्हा एकदा विनंती करतो की, माझ्या विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागणी क्रमांक वाय-1 ते वाय-7 खाली सादर करण्यात आलेल्या एकूण 3487 कोटी, 16 लक्ष, 16 हजार रुपयांच्या मागण्या सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, या मागण्यांवर सभागृहातील बहुसंख्य सन्माननीय सदस्यांनी आपले बहुमुल्य विचार मांडलेले आहेत, मी त्यांचा आदर करतो. त्यांच्या महत्त्वपूर्ण सूचनांचा मला व माझ या विभागाला कामकाजात निश्चितपणे उपयोग होईल. सन्माननीय सदस्य सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, शंभुराज देसाई, डॉ. पतंगराव कदम, प्रा. देवयानी फरांदे, सर्वश्री ग.आ. देशमुख, शरद सोनावणे, भास्कर जाधव, गोपालदास अग्रवाल, डॉ. तुषार राठोड, डॉ. जयप्रकाश मुंदडा, डॉ. राहूल पाटील या सन्माननीय सदस्यांनी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्यांवर काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पाण्याची पातळी पाचशे ते हजार फूट खोलवर गेलेली आहे. कारण 100 दिवस पडणारा पाऊस 100 तासांवर आलेला आहे. पाण्याची पातळीवर खाली गेली, या संदर्भात आपल्याला जलयुक्त शिवारासारखे अभियान राबवावे लागेल. गावागावातील नद्या खोल करणे, धरणातील, तळ्यातील गाळ काढणे अशाप्रकारचे जलयुक्त शिवाराचे काम करावे लागेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बबनराव लोणीकर.....

तसेच अपूर्ण धरणांची कामे पूर्ण करावी लागणार आहे. म्हणजेच काही धरणांचे 50 टक्के, काही धरणांचे 60 टक्के, काही धरणांचे 80 टक्के तर काही धरणांचे 90 टक्के काम झाले. परंतु त्या धरणांची कंदरभरणी झालेली नाही. त्याची धार दाबावी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीपोटी त्यांना 5 वर्षे काय तर 15 वर्षे झाले तरी पैसे मिळालेले नाहीत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी धरणांची कंदरभरणी करु दिलेली नाही. एकट्या मराठवाड्यामधील 26 हजार शेतकरी न्यायालयात गेलेले आहेत. न्यायालयाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे पैसे दिले पाहीजे. दररोज जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या गाड्या जप्त होतात. शेतकऱ्यांचे देणे 15 वर्षांचे आहे. आपल्याला शेतकऱ्यांचे पैसे देणे आणि पाणी अडविणे असा कार्यक्रम हाती घ्यावा लागणार आहे. जमिनीच्या भुगर्भामधील पाणी सुमारे हजार फुटापर्यंत खोल गेलेले असून यासंदर्भात सरकारने गांभीर्याने विचार केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शंभुराज देसाई यांनी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सातारा यांच्यासंदर्भातील काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्यासंदर्भात, अपूर्ण पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात त्यांनी मुद्दा मांडलेला आहे...(अडथळा)...

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्यासंदर्भातच मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शंभुराज देसाई यांनी राष्ट्रीय पेयजल योजना बंद झाल्याचे सांगितले. तसेच अपूर्ण पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यात याव्यात, असेही त्यांनी सांगितले. अपूर्ण पाणी पुरवठा योजना पूर्ण होईपर्यंत नवीन योजनांना मान्यता देऊ नये, असे केंद्र शासनाचे आदेश आहेत, ही बाब खरी आहे. परंतु अपूर्ण योजना पूर्ण करण्याच्या संदर्भात केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या वतीने मॅचिंग ठेवण्यात आलेले आहे. 720 कोटी रुपयांची तरतूद प्रादेशिक योजनेसाठी ठेवण्यात आलेली आहे. डोंगरी भागातील पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात मुख्यमंत्री पाणी पुरवठा योजनेमध्ये समावेश करावा, अशी देखील त्यांनी मागणी केलेली आहे. निश्चितपणे डोंगरी भागातील योजनेसंदर्भात सकारात्मक विचार करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बबनराव लोणीकर.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती देवयानीताई फरांदे यांनी नाशिक आणि नगर जिल्ह्यातील जायकवाडी धरणात सोडण्यात येणारे पाणी बंद पाईपलाईनद्वारे सोडण्यात यावे, अशी मागणी केलेली आहे. यासंदर्भात माननीय जलसंपदा मंत्री आणि पाणी पुरवठा विभाग यांची बैठक घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. गणपतराव देशमुख यांनी प्रादेशिक योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी निधीच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केलेला आहे. प्रादेशिक पाणी पुरवठा योजना दुरुस्तीसाठी यास हेड नाही. त्यामुळे या योजनेसाठी लागणाऱ्या निधीसंदर्भात मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून ज्या योजना दुरुस्त होऊ शकतात, ज्यांचे पुनर्जिवन होऊ शकते अशा 1100 पाणी पुरवठा योजना मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजनेमध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. तुषार राठोड यांनी मौजे पेठवडज, ता.कंधार, जि.नांदेड येथील स्वच्छतेबाबत काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांना अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील. तसेच त्यांनी 22 गावे पाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्तीसंदर्भातील मुद्दे उपस्थित केलेले आहेत. या तांत्रिक बाबी तपासून ही योजना सुरु करण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश मुंदडा यांनी हट्टा ता.वसमत, जि. परभणी या योजनेच्या संदर्भातील विषय उपस्थित केलेला आहे. हट्टा योजना ही मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजनेमध्ये घेण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांनी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेकरिता केवळ 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. पुरवणी बजेटमध्ये मागणी आल्यास निधी वाढविण्याबाबत माननीय वित्त मंत्री यांच्यासोबत चर्चा झालेली आहे. 500 कोटी रुपयांची तरतूद ठेवली असली तरी पुरवणी बजेटमध्ये आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. गोंदिया येथील पाणी पुरवठा योजना पूर्ण झालेली आहे. काही कामे शिल्लक असतील तर तशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील... (अडथळा)...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बबनराव लोणीकर.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राहूल पाटील यांनी परभणी पाणी पुरवठा योजना पूर्ण करणे व निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. परभणी येथे महानगरपालिका आहे. त्यांच्या मुद्यासंदर्भात नगरविकास खात्याला कळविण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, माझ्या पाणी पुरवठा विभागाच्या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी, अशी मी आपल्या मार्फत विनंती करतो.

श्री. गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, गोंदिया येथील वाढीव पाणी पुरवठा योजना मंजूर झालेली आहे, असे मंत्री महोदयांनी सांगितले. ही योजना 235 किलोमीटर पाईप लाईन बसविण्याची आहे. त्यामध्ये केवळ 197 किलोमीटर पाईप लाईन बसविण्यात आलेली आहे. आपण म्हटले होते की, एमजीपीकडे निधी नाही. याकरिता मुख्यमंत्री महोदयांनी विशेष निधी म्हणून 18 कोटी रुपये दिलेले आहेत. त्यासंदर्भातील कार्यवाही सुरु आहे. परंतु योजना पूर्ण झाल्याचे आपण सांगितले असून ही माहिती चुकीची आहे. देण्यात आलेल्या 18 कोटी रुपयामधून काम झाल्यावर योजना पूर्ण होणार आहे. त्यामुळे आपण दिलेल्या उत्तराबाबत माझा आक्षेप आहे.

श्री. शंभुराज देसाई : अध्यक्ष महोदय, राष्ट्रीय पेयजलची कामे पूर्ण केली जातील असे मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु या योजनेमधून मंजूर झालेल्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्याची टेंडर प्रक्रिया सुरु झाली आणि आपला आदेश आला. त्यामुळे ती राष्ट्रीय पेयजल योजनेची कामे मुख्यमंत्री पेयजल योजनेमध्ये वर्ग करणार आहात काय, असा माझा आपल्यामार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, मी अगोदरही सांगितले की, नवीन योजना घेण्यासंदर्भात केंद्र सरकारने काही निदेश दिलेले आहेत. त्यांनी त्यासंदर्भात पत्र दिलेले आहे की, जुन्या योजनांची सुरु असलेली कामे पूर्ण झाल्याशिवाय नवीन योजना हाती घेण्यात येऊ नये. तरी देखील यासंदर्भात केंद्र सरकारला विनंती करण्यात येईल.

अध्यक्ष : राहिलेल्या योजनांचा मुख्यमंत्री पेयजल योजनेमध्ये समावेश करण्यात येईल काय, असा सन्माननीय सदस्य श्री. शंभुराज देसाई यांचा प्रश्न आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शंभुराज देसाई यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. राहिलेल्या मागील योजना नव्या योजनेमध्ये घेणार काय, असा त्यांचा प्रश्न होता. नवीन योजना हातात घेऊ नये, अशा केंद्र सरकारच्या सूचना असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. अर्थसंकल्पाच्या मागण्यामध्ये आपण घोषणा केली असून मुख्यमंत्री पाणी पुरवठा योजना सुरु केली जाणार आहे. म्हणजे एका बाजूला केंद्राने बंद करण्याच्या सूचना दिल्याचे आपण सांगत आहात आणि दुसऱ्या बाजूला नवीन काहीतरी सुरु करीत आहात. हा आपल्या उत्तरातील विरोधाभास आहे. सन्माननीय सदस्य श्री. शंभुराज देसाई यांनी विचारलेल्या प्रश्नाला आपण स्पेसिफिकली उत्तर द्यावे. या पूर्वी अर्धवट राहिलेल्या योजना घेणार आहात काय, त्या योजना घ्यायच्या असतील तर त्याकरिता आज मांडली जाणारी 500 कोटी रुपयांची डिमांड म्हणजेच हा निधी त्याकरिता कमी पडेल. मागच्या योजनांनाच कदाचित दोन ते अडीच हजार कोटी रुपये लागणार आहेत. तो निधी देऊन, ते पूर्ण करुन नवीन योजना आपण घेणार आहात काय, असा असा माझा आपल्या मार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, ज्या योजना अपूर्ण आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचे मॅचिंग ग्रँड आहे.

...3H/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, ज्या योजना टेंडर प्रक्रियेपर्यंत आल्या परंतु त्यावर निधी खर्च झाला नाही, अशा योजनांचा समावेश आपण मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेत टप्प्याटप्प्याने का होईना कराल का ?

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, ज्या पाणी पुरवठा योजनेवर केंद्र सरकार व राज्य सरकार मॅचिंग ग्रँट करुन खर्च झालेला आहे त्याच योजना पूर्ण करण्यात येतील. नवीन योजना रद्द करण्यात आल्या नसून त्यांना तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. नवीन योजनांसाठी केंद्र शासनाला राज्य शासनाच्यावतीने पुन्हा एकदा विनंती करण्यात येईल व निधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

श्री.चंद्रदीप नरके : अध्यक्ष महोदय, ज्या योजनांचे टी.एस. झाले त्यांची वर्क ऑर्डर झाली परंतु काम चालू झालेले नाही अशा सर्व योजना थांबविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. टी.एस. व वर्क ऑर्डर झालेल्या योजना सुरु करण्यासाठी अर्थसंकल्पातून निधी उपलब्ध करुन देऊन त्यांची कामे सुरु करण्यात येतील काय ?

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांच्या सूचनांचा विचार करु असे उत्तर मंत्री महोदयाकडून अपेक्षित आहे.

श्री.बबनराव लोणीकरण : अध्यक्ष महोदय, मी अगोदर सांगितले की, मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठा योजनांना मान्यता देण्यात आली होती. ज्या योजना अपूर्ण आहेत त्या पूर्ण करण्यात येतील. ज्या योजनांचे टेंडर पूर्ण झालेले आहे, वर्क ऑर्डर झालेली आहे त्या केंद्र शासनाने थांबविलेल्या आहेत. राज्य सरकारच्यावतीने केंद्र शासनाला विनंती करुन निधी उपलब्ध करण्यासंदर्भात पुन्हा एकदा विनंती करण्यात येईल.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, सातरा जिल्ह्यातील 134 कोटी रुपयांचे प्रस्ताव मंत्री महोदयांकडे सादर करण्यात आले आहेत, ही बाब मी उदाहरणार्थ सांगत आहे. अशा प्रकारे प्रत्येक जिल्ह्यातून प्रस्ताव सादर करण्यात आले असतील. राज्य शासनाला केंद्र शासनाने पाणी पुरवठा योजनेकरिताचा निधी देण्याकरिता नकार देऊन दीड वर्षाचा कालावधी झालेला आहे. मागील दीड वर्षामध्ये आमदार महोदयांनी शिफरस केलेली एकही नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली नाही. यावर्षी प्रथमच मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेच्या माध्यमातून निधी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे.....

उपलब्ध करुन देण्यात आला आहे व तो 500 कोटी रुपये एवढा अत्यल्प प्रमाणात आहे. सदरहू योजनेतून पाणी पुरवठा योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करावयाची असतील तर उपलब्ध तरतूद अतिशय अल्प असल्याने कामे पूर्ण करताना सरकारची कसोटी लागणार आहे. केंद्र शासनाकडून ग्रामीण पाणी पुरवठा योजनेकरिता मागील दीड वर्षापासून निधी उपलब्ध करुन देण्यात येत नाही. मंत्री महोदयांनी सांगितलेल्या चुकीच्या माहितीची नोंद होऊ नये, याकारणास्तव मी ही बाब सांगत आहे. मागील योजना पूर्ण करणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे व नवीन योजनांसाठी किती तरतूद करणार हे सरकारने सांगण्याची आवश्यकता आहे. मागील दीड वर्षात एकही योजना मंजूर करण्यात आली नाही. पुढील वर्षात 5-50 योजना मंजूर होतील यापेक्षा अधिक एकही योजना मंजूर होणार नाही.

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने नवीन योजना हाती घेऊ नये अशा प्रकारचे आदेश दिले असून राज्य सरकारची स्वतंत्र योजना नाही. यावर्षी मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना सुरु करण्यात आली असून त्याकरिता 500 कोटी रुपये निधी दिला आहे. या योजनेकरिता मुख्यमंत्री महोदय व अर्थ मंत्री महोदयांनी पुरवणी बजेटमध्ये निधी देण्याचे मान्य केले असून आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे सांगितले आहे.

अध्यक्ष : या योजनेकरिता केंद्र शासनाने निधी देणे बंद केले असले तरी राज्यातील नळ पाणी पुरवठा योजना सरकारला निधीच्या उपलब्धेनुसार पूर्ण कराव्या लागतील. मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजनेमध्ये अशा प्रकरच्या योजनांचा समावेश करुन त्या पूर्ण कराव्या लागतील.

श्री.बबनराव लोणीकर : अध्यक्ष महोदय, राज्यातील जिल्हा परिषदांनी जो आराखडा तयार केला आहे त्यांचा समावेश मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजनेमध्ये करण्यात आला आहे. याप्रकरणी ज्या सन्माननीय आमदारांनी पत्र दिले आहे त्यासर्व योजनांचा समावेश सदरहू योजनेत करण्यात आला आहे.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.सत्यजित पाटील यांना सांगू इच्छितो की, मंत्री महोदयांनी सर्व योजना घेण्याचे मान्य केले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : आता मी सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक आर-1, आर-2, आर-3, आर-4, वाय-2, वाय-3, वाय-4, वाय-5, वाय-6, वाय-7 आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : आता विधेयकावरील चर्चा घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपण आज एका विधेयकावर चर्चा करण्याचे मान्य केले आहे.

श्री.जयंत पाटील : सन्माननीय सदस्यांचा माझ्यावर दबाव आहे की त्यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा कधी घेण्यात येईल ?

अध्यक्ष : शासकीय विधेयकावरील चर्चा आपण लवकर पूर्ण झाली तर आपण अर्धा-तास चर्चा घेऊ.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सदरहू शासकीय विधेयक फार महत्वाचे असून त्यावरील चर्चा किती तरी तास चालले. आता रात्रीचे सव्वा आठ वाजले आहेत.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी कृपया शासकीय विधेयकावरील चर्चेस सुरुवात करावी. मागील दोन आठवड्यामध्ये एकाही शासकीय विधेयक चर्चा करुन मंजूर झाले नाही, ही चांगली बाब नाही. या आठवड्यामध्ये आपण किमान शासकीय विधेयकावरील चर्चेस सरुवात तरी करु, असे मला वाटते. शासकीय विधेयकावर थोडा वेळ चर्चा घेऊ व त्यानंतर अर्धा-तास चर्चेबाबत विचार करु.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहाचा आजच्या कामकाज पत्रिकेवरील क्रम कशा पध्दतीने आहे ?

अध्यक्ष : सभागृहाचे कामकाज हे कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या क्रमानुसार सुरु आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे कामकाज हे कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या क्रमानुसार सुरु आहे, हे खरे आहे. परंतु आता एक शासकीय विधेयक चर्चेसाठी घेण्यात येणार की दोन घेण्यात येणार आहेत, अर्धा-तास चर्चा घेण्यात येणार आहे काय, मराठवाड्यातील प्रश्नावर चर्चा घेण्यात येणार आहे काय ?

अध्यक्ष : सभागृहाचे मत विचारात घेऊन पुढील कामकाज घेण्यात येईल.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, आज सर्व सन्माननीय सदस्य सकाळी 9 वाजता सभागृहामध्ये आले आहेत. आता रात्रीचे साडे आठ वाजत आले आहेत. प्रस्तावित विधेयक अतिशय महत्वाचे असून त्यावरील चर्चा लवकर संपेल असे हे विधेयक नाही. कामकाज पत्रिकेवर खूप कार्यक्रम दाखविण्यात आला आहे. आज घेण्यात येणाऱ्या कामकाजच्या वेळेबाबतचा अंदाज सन्माननीय सदस्य व माननीय मंत्री यांना असला पाहिजे.

अध्यक्ष : माननीय मंत्री यांना कामकाजाचा अंदाज आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, तो आम्हाला सांगावा.

अध्यक्ष : कामकाज पत्रिकेवर कार्यक्रम छापलेला असल्याने सभागृहात घ्यावयाचे कामकाज सन्माननीय सदस्यांना समजते.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, कामकाज पत्रिकेवरील सर्व कामकाज आज घ्यावयाचे आहे काय ?

अध्यक्ष : पुढील कामकाजाबाबत तासाभरानंतर निर्णय घेऊ त्याकरिता जास्त वेळ लागणार असेल तर कामकाज थांबविण्यात येईल. परंतु सुरुवातच करावयाची नाही, असे होणार नाही. आपण विधेयकावरील चर्चा सुरु करावी, असे मला वाटते.

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, कामकाज पत्रिकेमध्ये 5 अर्धा-तास चर्चा दर्शविण्यात आला आहे व त्यावर 15 मिनिटे याप्रमाणे चर्चा घेतली तर त्या कामकाजास एक ते दीड तास कालावधी लागेल.

अध्यक्ष : आपण विधेयकावरील चर्चेस सुरुवात करु व आवश्यक वाटले तर अर्धा-तास चर्चा पुढे ढकलल्या तरी हरकत नाही. परंतु आता आपण विधेयकावरील चर्चेस सुरुवात करु. सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील चर्चेस सुरुवात करावी. मंत्री महोदयांनी विधेयक मांडावे.

श्री.धैर्यशील पाटील : अध्यक्ष महोदय, आज सकाळी 10 वाजता सर्व सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये आले आहेत. उद्या पुन्हा 9 किंवा 10 वाजता अध्यक्ष महोदय सांगतील त्यानुसार सभागृहात उपस्थित रहावयाचे आहे. कामकाजाच्या आठ तासांच्या वेळेत जेवणाची सुट्टी व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धैर्यशील पाटील.....

विश्रांतीची सुट्टी अधिकाऱ्यांना असते. आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविलेले कामकाज करावयाचे असेल... आता जरी आपण सभागृहाची बैठक समाप्त केली तरी सभागृहाचे कामकाज आज 11 तास चालले आहे. मला असे वाटते की आम्हालाही प्रामाणिकपणे काम करावयाचे असते, आमच्या भूमिका मांडावयाच्या असतात.

.....ll-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धैर्यशील पाटील.....

विधिमंडळाचे कामकाज 100 दिवस व्हावे असे साधारणपणे ठरलेले आहे. कारण नसताना आता बोलत बसल्यापेक्षा अधिवेशनाचे दिवस वाढवावेत. आम्हाला आनंदाने काम करु द्यावे. आम्हाला क्वॉलिटी वर्क करु द्यावे असे आमचे म्हणणे आहे. म्हणून या ठिकाणी आपण काही तरी योग्य विचार करावा.

अध्यक्ष : आपले हे कायदेमंडळ आहे आणि दोन-दोन आठवडे एकही कायदा मंजूर न होणे हे काही चांगले नाही. या विषयी माझी गटनेत्यांशी चर्चा झाली होती. त्यावेळी ते म्हणाले होते की, एक बिल आपण काढू. म्हणून आपण या बिलाच्या चर्चेला सुरूवात करावी. अध्यादेश नापसंतीचा प्रस्ताव कोण मांडत आहे ?

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आपली अशी चर्चा झाली होती की, कायद्याचे आपले सभागृह आहे. खरे म्हणजे आपण या ठिकाणी कायदे पास करण्यासाठी एकत्रित येतो. पण इतक्या उशिरा कायदे मंजूर करणे योग्य नाही. अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आपली अशी चर्चा झाली होती की, या विधेयकाच्या चर्चेला सुरूवात करु, परंतु हे विधेय आजच संपवू अशी काही चर्चा झालेली नव्हती.

अध्यक्ष : ठीक आहे. आपण चर्चेला सुरूवात तर करावी.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, पण मंत्री महोदयांनी हे विधेयक येथे मांडावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, हे बिल मांडायलाच माझी हरकत आहे. हे भारताच्या संविधानामध्ये पुस्तक आहे. या ठिकाणी बिल मांडण्यासाठीच माझा विरोध आहे. आपण ज्यावेळी राज्यघटनेमध्ये सहकारी कायद्याच्या संदर्भात दुरुस्ती केल्यानंतर आपल्या सर्व सहकारी संस्थांमध्ये संचालकांची संख्या 21 इतकी ठरविली आहे. राज्यघटनेमध्ये दुरुस्ती झाल्यानंतर आणि त्यासंबंधी याच विधानसभेने सहकार कायदा मंजूर केला आणि त्या कायद्याच्या कलम 97 मध्ये काही सुधारणा करुन संचालकांची सदस्य संख्या 21 एवढी निश्चित केलेली आहे. मंत्री महोदय आता या सभागृहासमोर जे बिल घेऊन आले आहेत त्यामध्ये आपण त्यांना संचालक म्हणा किंवा तज्ज्ञ म्हणा किंवा आणखी काही म्हणा, अशा पध्दतीने अधिकचे दोन सदस्य वाढविण्यासंदर्भात हे विधेयक आपण या ठिकाणी आणले आहे. म्हणून भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद 243 - ZJ मध्ये "Number and term of members of

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील...

board and its office bearers" - Article 243 ZJ (1) reads as, "The board shall consist of such number of directors as may be provided by the Legislature of a State, by law:" This is already decided by the House. या सभागृहामध्ये एकदा 21 सदस्यांचे संचालक मंडळ अशा प्रत्येक सहकारी संस्थांमध्ये राहील असे सभागृहाने मान्य केल्यानंतर त्यामध्ये आपल्याला वाढ करावयाची असेल किंवा त्यात सुधारणा करावयाची असेल तर माझे मत असे आहे की, या संदर्भात आधी स्पष्टता व्हायला पाहिजे की, आपल्याला या बिलाच्या माध्यमातून वाढविण्यात येणाऱ्या संचालकांमुळे संविधानिक क्रायसेस येऊ शकतात काय, मला आपल्याकडून यामध्ये लगेच रुलिंग नको आहे. मला मंत्री महोदयांचे काय म्हणणे आहे ते मला समजून घ्यावयाचे आहे. हे विधेयक आपल्याला मांडताच येत नाही.

अध्यक्ष : हे विधेयक आपण 10 मार्च 2016 रोजी मांडले गेले आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, इन्ट्रोड्यूस केले आहे. मांडले नाही.

अध्यक्ष : इन्ट्रोड्यूस केले आहे.

श्री. दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, हे बिल नागपूरच्या अधिवेशनात मांडले आहे. म्हणायला गेले तर ते विधेयक ऑनलेग आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील साहेब यांनी जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे, त्यासंबंधी ही बाब खरी आहे की, 97 च्या घटना दुरुस्तीनंतर संचालक मंडळाची सदस्य संख्या किती असावी हे त्या ठिकाणी निश्चित केले आहे. आता आपण जे दोन सदस्य तज्ज्ञ संचालक म्हणा किंवा कार्यलक्षी संचालक म्हणा, जी तरतूद आपण करणार आहोत त्यामध्ये त्यांना मतदान करण्याचा अधिकार नसेल आणि समितीच्या सदस्य संख्येची जी गणना करण्यात येणार आहे त्यामध्ये हे काऊंट केले जाणार नाहीत. त्यामुळे त्यामध्ये संख्या वाढण्याचा प्रश्न निर्माण होत नाही, हे याचे समर्पक उत्तर आहे. म्हणून सन 2016 चे विधानसभा विधेयक क्रमांक 7 महाराष्ट्र सहकारी संस्था विधेयक 2016 विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा पॉईन्ट ऑफ प्रोसिजर आहे. आता सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, हे विधेयक आम्ही ऑलरेडी नागपूरला मांडले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील...

त्याच्यावर चर्चा झाली. ऑनलेग असलेले हे विधेयक आहे. जर हे विधेयक ऑनलेग असेल तर आज पुन्हा नव्याने हे विधेयक इन्ट्रोड्यूस करायचे कारण काय आहे. आता मंत्री महोदय सांगतात की, हे विधेयक आम्ही नागपूरच्या अधिवेशनामध्ये मांडले आहे. हे शब्द मंत्री महोदयांचे आहेत, माझे शब्द नाहीत. ते असे म्हणाले की, हे विधेयक आम्ही नागपूरला मांडले आहे. त्यावर काही चर्चा झाली आणि आता हे ऑनलेग असलेले विधेयक आहे, असे मंत्री महोदयांचे वर्डींग आहे. आपण पाहिजे तर तपासून पहावे. जर हे विधेयक ऑनलेग असेल तर जे सदस्य या विधेयकावर बोलत होते त्या सदस्यांना या ठिकाणी पुढची चर्चा सुरू करावी लागेल. दुसऱ्या कोणालाही चर्चा सुरु करता येणार नाही. मंत्री महोदय या सभागृहाला जी माहिती देतात ती खरी आहे काय की, पहिल्यापासून सुरुवात करायची की, जेथे चर्चा थांबली होती तेथून सुरुवात करायची याबाबतीत सभागृहामध्ये स्पष्टता झाली पाहिजे.

श्री. ग. अ. देशमुख : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, या संचालकांना मत देण्याचा अधिकार नाही. मत देण्याचा अधिकार असावा किंवा नसावा ही बाब गौण आहे. ते संचालक येतात आणि व्याख्या करताना आपण त्यांचा संचालक म्हणतो आणि संचालकांची संख्या निश्चित केल्यानंतर घटनेप्रमाणे त्या संचालकांच्या संख्येमध्ये वाढ करता येणार नाही. या ठिकाणी घटनात्मक मुद्याला हरकत घेतलेली आहे, त्यावर आपल्याला निर्णय द्यावा लागेल.

अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, या ठिकाणी जे बिल इन्ट्रोड्यूस केले त्यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनीच विसंगती निर्माण केली आहे. हे बिल नागपूरच्या अधिवेशनात आले होते, त्यावर सदस्य बोलले आहेत, ही जी विसंगती आहे त्यासंबंधी आपण प्रोसिडींग बघून याबद्दल निर्णय द्यावा लागेल. हे दोन निर्णय घेतल्यानंतरच आपल्याला या बिलावर चर्चा करता येईल. हा हरकतीचा मुद्दा आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी भारताच्या संविधानामध्ये 2014 पर्यंत फेरबदल केल्याप्रमाणे अनुच्छेद 243 - ZJ मध्ये सरळपणे म्हटले आहे की, सहकारी संस्थांच्या संचालकांची संख्या 21 पेक्षा अधिक नाही. आणखी असे आहे की, परंतु विधानमंडळाद्वारे कायद्याद्वारे व्यक्तिगत सदस्याच्या अनुसूचित जातीच्या आणि अनुसूचित जनजातीच्या व महिला प्रवर्गातील सदस्यांचा अंतर्भाव असलेल्या प्रत्येक सहकारी संस्थेच्या मंडळावर अशा अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जनजातीच्या सदस्यांकरिता एक जागा राखीव असेल. म्हणजे यामध्ये संख्या निश्चित केलेली आहे. त्यामुळे यामध्ये 21 सदस्य संख्या आहे आणि त्यामध्ये आपण अधिक 2 सदस्य संख्या वाढ करणार आहोत मग त्याला मतदानाचा अधिकार असो अगर नसो, ही बाब गौण आहे. आपण जेव्हा त्यांना संचालक मंडळाच्या बैठकीला बोलावणार आहात त्या क्षणी ते 21 चे 23 होणार आहेत. त्यामुळे घटनेची पायमल्ली करण्याचा अधिकार या सभागृहाला नाही. या सभागृहातील सरकारने मांडलेले कोणतेही विधेयक घटनेची पायमल्ली करून मांडू शकत नाही. त्यामुळे घटनेचे याठिकाणी उल्लंघन होत आहे असे विधेयक याठिकाणी मांडता येणार नाही हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

अध्यक्ष : हे विधेयक नागपूरला मांडले होते आणि दिनांक 14 मार्च, 2016 ला मागे घेतले आहे. आता पुन्हा हे विधेयक मांडत आहोत.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, याचा विचार केला, सरकारने याचा विचार केला नाही. त्यांनी बिल विथड्रॉ केले हे नवीन मुद्दे आहेत. त्यावेळी सुदैवाने हे विधेयक मंजूर झाले नाही.

अध्यक्ष : घटनेत सहकाराचा नवीन कायदा आला. त्यात 21 सदस्यांची संख्या दिलेली असली तरी हे दोन सदस्य येणार आहेत. या दोन सदस्यांना वोटिंगचा अधिकार नसल्याने या विधेयकामुळे त्यावर परिणाम होण्याचे काही कारण नाही.

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, संविधानाच्या अनुच्छेद 21 ही सदस्यांची जी संख्या ठेवलेली आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, आज या विधेयकाच्या चर्चेच्या सुरुवातीला जे मुद्दे या बाजूकडून मांडले गेलेले आहेत ते सर्वसामान्य हरकतीचे मुद्दे नाहीत तर यामध्ये घटनात्मक

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

प्रश्न इनव्हॉल असलेले मुद्दे आहेत. म्हणून माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, या विधानमंडळाकडून कळत नकळत सुध्दा यामध्ये आपल्याकडून काही चूक होऊ नये. शेवटी असे आहे की, भारतीय राज्यघटना ही सार्वभौम राज्यघटना आहे. आपण या घटनेप्रमाणे देशाचे पार्लमेंट, राज्याचे विधानमंडळ, कायदेमंडळ ही सर्व त्याप्रमाणे गौण केली जातात. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, दोन प्रश्न याठिकाणी निर्माण झालेले आहेत. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख यांनी आपली भूमिका मांडलेली आहे. त्यामुळे हे घटनात्मक मुद्दे याठिकाणी मांडलेले आहेत त्याचे रुलिंग आपल्याला द्यावे लागणार आहे. याचे रुलिंग दिल्यानंतरच या विधेयकावर चर्चा सुरु करायची किंवा नाही हे आपल्याला ठरवावे लागणार आहे. म्हणून माझी आपल्याला अशी विनंती आहे की, या विषयाच्या संदर्भामध्ये अधिक स्पष्टता येण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यकता वाटल्यास ॲडव्होकेट जनरलचा सल्ला यामध्ये घ्यावा. ॲडव्होकेट जनरलचा सल्ला घेऊन मग पुढे जाण्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात यावा. कारण विधानसभा किंवा पार्लमेंटने केलेला कुठलाही कायदा हा उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयामध्ये चॅलेंज होऊ शकतो. हा कायदा चॅलेंज झाल्यानंतर संबंधित न्यायालयांना आपण केलेला कायदा निरसित करण्याचा अधिकार दिलेला आहे. म्हणून माझी आपणाला विनंती आहे की, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी जी भूमिका मांडलेली आहे. घटनेचे आर्टिकल वाचून दाखविलेले आहे. यासंदर्भात निर्णय घ्यावा आणि रुलिंग द्यावे, त्यानंतरच चर्चा सुरु करता येईल.

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी जो काही घटनात्मक मुद्दा याठिकाणी उपस्थित केलेला आहे. (अडथळा.....)

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी काही घटनात्मक मुद्दे उपस्थित करण्याचा प्रयत्न केला आहे. मला असे वाटते की, ज्यावेळेस सरकारने हे विधेयक याठिकाणी पुर:स्थापनार्थ मांडलेले आहे. ते लॉ आणि ज्युडिशिअरी खात्याकडे जाऊनच हे विधेयक याठिकाणी आलेले आहे. त्यामुळे या विधेयकाच्या संदर्भात हे घटनेला धरुन नाही असे त्यांचे मत असू शकते. तुमच्या पध्दतीने बरोबरही असू शकते. परंतु ते बरोबर आहे किंवा नाही हे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अतुल भातखळकर .....

ठरविण्याची ही जागा नाही. आमचे असे मत आहे की हे घटनेला धरुन आहे. जेव्हा सरकार विधयेक पुर:स्थापनार्थ मांडते तेव्हा ते लॉ आणि ज्युडिशिअरी विभागाकडून आलेले असते. त्यामुळे हे विधेयक याठिकाणी पुर:स्थापनार्थ मांडण्यात आलेले आहे, हे चर्चेला घेण्यात यावे. जर हे घटनेच्या विरोधात आहे असे तुमचे प्रामाणिक मत असेल तर उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठवायला आपण मोकळे आहात. त्यामुळे आता या विधेयकावर चर्चा करावी आणि मांडण्यात यावे.

अध्यक्ष : मंत्री महोदयांचे म्हणणे ऐकून घेण्यात यावे. मंत्री महोदय स्पष्टीकरण करीत आहेत.

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी जो घटनात्मक मुद्दा याठिकाणी उपस्थित केलेला आहे. संविधानाच्या ज्या अनुच्छेदानुसार 21 संचालकांची संख्या नश्चित केलेली आहे. त्याच्याच पोटकलम 3 द्वारे जे काही एक्सपर्ट डायरेक्टर आणि फंक्शनल डायरेक्टर नेमणार आहोत त्यांच्यासाठी ही तरतूद लागू नाही असे याठिकाणी स्पष्टपणे नमूद केलेले आहे. म्हणून जे तज्ज्ञ संचालक नेमणार आहोत, त्यामुळे संविधानाला कुठलीही बाधा निर्माण होत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, हे विधेयक याठिकाणी मांडण्यात आले आहे. आपल्याजवळ पुस्तक आहे त्यातील पोटकलम 3 आपण वाचावे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या अगोदरच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांनी काही सूचना केलेल्या होत्या. हाऊसिंग सोसायट्यांमध्ये सुध्दा काही कर्मचाऱ्यांसाठी काही करता येईल काय? म्हणून या विधेयकामध्ये त्याठिकाणी सुधारणा केलेली आहे. ज्या सोसायट्यांमध्ये ऑथोराईज सदस्यांची संख्या 25 च्या वर आहे त्यांच्यासाठी या विधेयकामध्ये आम्ही तरतूद केलेली आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या विधेयकांन्वये संचालक नेमायचा अधिकार देत आहोत. संचालकांची कॉन्स्टीट्युशनमध्ये जी व्याख्या आहे त्या व्याख्याप्रमाणे ही संख्या 21 जास्त असू शकत नाही. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, घटनेतील कोणतेही कलम मला दाखवा की, ज्यामुळे अलाऊड

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

आहे ते सांगा. सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे जर घटनेने 21 ही संख्या सांगितली आहे. सरकारने त्यात आवश्यक ती दुरुस्ती करावी. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, लॉ ॲन्ड ज्युडिशिअरीने त्याचा अभ्यास केलेला आहे. लॉ ॲन्ड ज्युडिशिअरीने अभ्यास केल्यावर आणि त्यांनी मांडलेले मुद्दे ओव्हर रुल करुन विधेयक आणले आहे की नाही याची माहिती आमच्याकडे नाही. म्हणून आपण जे विधेयक मांडत आहात ते घटनेच्या विरोधात आहे, त्यामुळे हे विधेयक सभागृहामध्ये मांडण्यात येऊ नये.

3K-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : आपण आता विधेयकावर चर्चेला सुरुवात करुया.

21 सदस्यांवर या दोन सदस्यांचा कुठलाही परिणाम होत नाही. राज्यघटनेचा कुठे अवमान होणार नाही. या दोन सदस्यांना व्होटींगचा अधिकार नाही, त्यामुळे ते सोसायटीमध्ये जाऊ शकतात असे मंत्री महोदयांचे म्हणणे आहे. प्रस्तावावर चर्चा सुरु करावी.

....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात
आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.

MOTION FOR DISAPPROVAL OF ORDINANCE NO.V OF 2016 (AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.) AND L. A. BILL NO. VII OF 2016 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)

श्री.दादाजी भुसे (सहकार राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 7 महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, ज्या सहकारी समितीची सदस्य संख्या 17 पेक्षा कमी आहे. जेथे अशा समितीत्यांच्या संस्थांवर कर्मचा-यांचे पुरेसे प्रतिनिधीत्व नसल्यामुळे बऱ्याचशा ठिकाणी असे दिसून आले की, या सहकारी संस्था अडचणीत आलेल्या आहेत. जर कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी तिकडे असला तर या संस्थांच्या कामासाठी तो चांगले मार्गदर्शन करु शकतो. शेवटी कर्मचा-यांना माहिती आहे या संस्था टिकल्यातरच त्यांना पगार मिळणार आहे. त्यांची ती रोजीरोटी आहे. म्हणून चांगल्या सूचना त्या संस्थांना देऊ शकतील. सूचित केलेले आहे मागील काळामध्ये बिल मांडल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.आशिष शेलार किंवा सन्माननीय सदस्य श्री.प्रभू असतील त्यांनी काही मुद्दे उपस्थित केले होते. जेथे अधिकृत कर्मचारी 25 पेक्षा जास्त असतील अशा संस्थांसाठी हे बिल तेथे लागू होणार आहे. कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी देत असताना त्या संस्थांमध्ये अधिकृत, नोंदणीकृत कर्मचा-यांचे संघटन असेल तो कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून त्या कर्मचा-याची थेट नियुक्ती करु शकेल किंवा कर्मचा-यांची अधिकृत संघटना त्या संस्थेमध्ये नसेल तर त्या ठिकाणी कर्मचारी मिळून तो प्रतिनिधीनी त्यांचा कर्मचारी निवडून देणार आहे. अशा प्रकारची सुविधा कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधित्वासाठी करण्यात आली आहे. कर्मचा-यांचा जो प्रतिनिधी त्या संस्थेवर आपल्याला द्यायचा आहे. तर ज्या ठिकाणी अधिकृत कर्मचाऱ्यांची संघटना आहे. त्या कर्मचाऱ्यांची संघटना त्या प्रतिनिधीची डायरेक्ट नियुक्ती करु शकेल. ज्या ठिकाणी मान्यता प्राप्त संघटना नाही त्या ठिकाणी ते कर्मचारी मतदान करुन ते त्यांचा प्रतिनिधी देतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दादाजी भुसे .....

अध्यक्ष महोदय, ज्या संस्थांनमध्ये शासनाचा भागभांडवलाच्या स्वरुपामध्ये शासनाचा हिस्सा आहे अशा संस्थांमध्ये सुध्दा त्या संस्थेच्या हितांचे रक्षण झाले पाहिजे. 97 व्या घटना दुरुस्तीच्या अगोदर हे प्रतिनिधी तिकडे होते. 97 व्या घटना दुरुस्तीच्या मान्यतेनंतर ही शिथिलता आलेली आहे. या जागेवर पूर्वी दोन प्रतिनिधी शासकीय अधिकारी असायचे या दोन शासकीय अधिकाऱ्यांपैकी एक शासकीय अधिकारी असेल आणि या क्षेत्रामध्ये ज्याचा मोठा अनुभव आहे. जो चांगल्या सूचना तिकडे करु शकतो असा प्रतिनिधी तिकडे दिला तर संस्था चांगल्या सक्षमपणे काम करु शकतील. अशा पध्दतीने दोन प्रतिनिधी देण्याची सुविधा या बिलामार्फत केलेली आहे. सहकार चळवळ चांगली आहे.

अध्यक्ष महोदय, परंतु मधल्या काळामध्ये काही मोजक्या लोकांनी भ्रष्टाचार केल्यामुळे त्याला गालबोट लागले. त्यामुळे सहकार चळवळीला कुठे तरी घरघर लागते की काय ? असे वाटू लागते. म्हणून हया संस्था टिकल्या पाहिजेत, वाढल्या पाहिजेत, त्याच्यामध्ये कर्मचारी असतील त्याचे प्रतिनिधी गेले तेथे तर त्यांची रोजीरोटी आहे म्हणून संस्थेला चांगल्या सूचना देऊ शकतील. मी प्रथम स्पष्ट केले आहे की, या प्रतिनिधीला मतदानाचा अधिकार असणार नाही. काऊंटीग करत असताना सदस्य संख्या धरत असताना त्यांना त्या ठिकाणी काऊंट केले जाणार नाही. घटनेला बाधा होत नाही. म्हणून चांगल्या सूचना, चांगले मार्गदर्शन या संचालकाच्या माध्यमातून होणार आहे. हे मला आपल्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. मी सर्वांना विनंती करेन की, अतिशय चांगले बिल शासनाने आणलेले आहे. या बिलाला सर्वांनी मंजुरी द्यावी.

प्रश्न प्रस्तुत झाला.

.....

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : यावर कोण बालणार आहे का ? कामकाज संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : अध्यक्ष महोदय, हे बिल इंट्रोडयुस करायला मला एक तास लागणार आहे. या बिलावर खूप बोलायचे आहे.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, माझी हरकत आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील असे म्हणाले की, हे इंट्रोडयुस करायला त्यांना एक तास लागणार आहे. आपण माननीय मंत्र्यांना बिल इंट्रोड्युस करायला सांगितले, त्याप्रमाणे त्यांनी इंट्रोड्युस केले. सन्माननीय सदस्यांना तो अधिकार आहे की, एकातासाने विषयाच्या इंट्रोडक्शनवर येतील. मग फंक्शनल डायरेक्टर, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर याच्या डेफिनेशनवर येतील. आम्हाला सांगा या सदनामध्ये सकाळी 9.00 वाजल्या पासून आम्ही आलो आहोत, आणखी किती वेळ बसायचे ? विधेयकावर बोलण्याचा त्यांचा अधिकार आहे. त्यावर आम्ही काही बोलत नाही. परंतु या सदनाला कळू द्या की, किती वेळ बसायचे आहे. जेवणाची व्यवस्था केली आहे का ते तरी विचारावे.

अध्यक्ष : पहिल्या सन्माननीय सदस्याचे भाषण किती वेळ चालते यावरुन सभागृह किती वेळ चालवायचे ते ठरवू.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपण ज्यावेळेला एखादे विधेयक चर्चेला घेतो. त्यावेळेला विधेयकाच्या बरोबरीने सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी अध्यादेशाला नापसंतीचे जे प्रस्ताव दिलेले असतात. त्यावेळी ते प्रस्ताव मांडणार आहे की नाही, हे ठरल्यावर एकत्रित चर्चा करायची की, कसे करायचे हे आपण आम्हाला विचारायला पाहिजे होते. मांडता आपण डायरेक्ट मंत्री महोदयांना डायरेक्ट पुढची स्टेज पूर्ण करायला सांगितले. हा आमच्यावर अन्याय आहे.

अध्यक्ष : आपले म्हणणे बरोबर आहे. तुमच्या दोघांच्या चर्चेत ते पुढे गेले आहेत. आपण पुढे जाऊ.

श्री.दिलीप वळसे-पाटील : बिलावरील प्रक्रिया जाऊ देण्याबाबत माझे काही म्हणणे नाही. परंतु येथून पुढे असे होऊ नये अशी माझी अपेक्षा आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, शासनाने आपल्या सहकारी संस्था अधिनियम, 1960 मध्ये आणखी एक सुधारणा आपल्या सर्वांच्या समोर आणलेली आहे. सहकारी संस्था हा महाराष्ट्राच्या जीवनाचा अभिवाज्य घटक आहे यातशंका नाही. या सहकारी संस्था जेवढया मुक्तपणाने चालवायला देऊ आपण तेवढया या सहकारी संस्था अधिक चांगल्या चालू शकतात.

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर)

3L-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये जेवढी सहकारी संस्थांची संख्या आहे. तेवढी संख्या आपल्या देशातील कोणत्याही राज्यात वाढू शकली नाही. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे या राज्याने महाराष्ट्रात सहकार चळवळ वाढावी म्हणून जाणीवपूर्वक काही भूमिका स्वीकारली होती. राज्यातील यापूर्वीच्या सरकारनेही या चळवळीला आधार दिलेला आहे. अलिकडच्या काळात सहकार चळवळ ही ठरावीक राजकीय पुढाऱ्यांची आहे अशी मानसिकता समाजात रूढ करण्याचा प्रयत्न काही लोक करीत असतात. पण खरे तर या राज्यातील सामान्य माणसाला संघटित करून त्याची ताकद वाढविण्यासाठी सहकार चळवळीचा वापर झाला आहे. महाराष्ट्रामध्ये सहकार ऐवजी खाजगी कारखानदारी होती. आपण अहमदनगर व नाशिक जिल्हयात गेला तर लक्षात येईल की, पूर्वीच्या काळात जेव्हा सहकारी संस्थांच्या पध्दती रूढ झालेल्या नव्हत्या तेव्हा या राज्यामध्ये अनेक खाजगी कारखाने आले आहेत. अहमदनगर जिल्हयामधील शेतकऱ्यांना त्यांचा ऊस खाजगी कारखान्यांना घालण्याची सवय लागली होती. आपण तेव्हा विसरून गेलो होतो की, आपले शोषण करणारे हे खाजगी भांडवलदार आहेत. या भांडवलदारांना विरोध करण्याची ताकद देखील त्यावेळी समाजातील लहान लहान शेतकऱ्यांना नव्हती. काळाच्या ओघामध्ये प्रवरा सहकारी साखर कारखान्याचा उदय झाला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही कल्पना पंडीत जवाहरलाल नेहरू, यशवंतराव चव्हाण, काकासाहेब गाडगीळ या सर्व जुन्या व मातब्बर लोकांनी प्रायोगीक तत्वावर स्वीकारण्याचे ठरविले.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार हे बाहेर जात आहेत, ते गेले तर माझी बोलण्याची प्रेरणा थांबेल. ॲड.आशिष शेलार हे जोपर्यंत सभागृहात आहेत तोपर्यंतच मी बोलू शकतो. ॲड.आशिष शेलार गेले तर आपणास 10 मिनिटात सभागृह संपवावे लागेल. असे आपले मघाशी ठरलेले आहे.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांनी वाचलेला रेफरन्सचा अभ्यास करण्यासाठी ते जात आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, ज्यावेळी प्रवरा सहकारी साखर कारखाना स्थापन झाला. त्यावेळी अहमदनगर जिल्हयातील आसपासच्या खाजगी साखर कारखान्यांच्या पोटात थोडासा गोळा आला.

तालिका सभाध्यक्ष : कोणाच्या पोटात गोळा आले ते मंत्री महोदय श्री.रामदास कदम यांनी विचारु नये.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सहकारी साखर कारखानदारी कशी सुरु झाली ? अजून 1904 पर्यत आपणास जायचे आहे. मी यासाठी हा मुददा मांडतो की, तेव्हापासून अनेक खाजगी कारखाने हे सहकारी तत्वावर कन्र्व्हट झाले. नगर जिल्हयातील कारखाने आपण बारकाईने बघितले तर शेतकऱ्यांनी एकत्र येऊन खाजगी कारखानदारीचे सहकारी साखर कारखानदारीमध्ये कन्व्हर्शन करण्याचे धोरण स्वीकारले. याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे लहान शेतकऱ्याला त्यातून न्याय मिळतो ही भावना सर्वदूर पसरली. ब्रिटीशांच्या कालखंडामध्ये 1904 साली ही चळवळ सुरु झाली.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी माझ्याकडे पाहून भाषण करावे. तुम्ही माझ्याकडे पाहून भाषण केले तर तुम्हाला हसू येणार नाही याची मला खात्री आहे.

श्री.जयंत पाटील : माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, तालिका सभाध्यक्षकांनी माझ्यावर हेत्वारोप केला आहे की, त्यांच्याकडे पाहिले तर मला हसू येणार नाही.

अध्यक्ष महोदय, 1904 साली ही चळवळ सुरु होताना हीच भूमिका होती की, ब्रिटीशांनीही या चळवळीला खतपाणी घालण्याचे धोरण स्वीकारले. महाराष्ट्रात लहान लहान शेतकऱ्यांनी एकत्र येऊन अनेक पध्दतीच्या संस्था काढल्या. एका बाजूने आता आपल्या सरकारने बंद पडलेल्या ज्या संस्था आहेत, त्या संस्था एका कायद्यान्वये रद्द करण्याचेही धोरण स्वीकारलेले आहे. 1904 साली चळवळ सुरु झाली. 2016 पर्यत या चळवळीच्या माध्यमातून ज्या संस्था उभारण्यात आल्या त्यातील काही संस्था ज्या चालू झाल्या, परंतु पुढे गेल्याच नाहीत, ज्या संस्था बंद पडल्या आहेत त्या रद्द करण्याची पाळीही आपल्यावर आलेली आहे. या सहकारी चळवळीने जेव्हा सुरुवात केली, त्यावेळी फार मोठया प्रमाणात लोकांना देखील या चळवळीबद्दल आकर्षण होते. आमच्या भागात अलिकडे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

विकास सोसायटीने 100 वर्षे पूर्ण केली, 125 वर्षे पूर्ण केली अशा स्वरूपाचे कार्यक्रम आम्ही मागील 8-10 वर्षात अनेक वेळा केलेले आहेत. ज्या संस्था 1910 साली सुरु झाल्या, 2010 साली त्यांचे 100 वर्षे पूर्ण करताना त्यांचा आढावा आम्ही घ्यायला लागलो तेव्हा त्या कार्यक्रमात चेअरमनने दिलेल्या अहवालात असे दिसले की, अनेक लहान लहान गरीब घरातील माणसांनी त्या संस्था चालविल्या, जगविल्या. जगलेल्या संस्था प्रगतीपथावर आणण्याचे काम कधी झाले. हा सर्व इतिहास सांगत असताना एक सर्वसाधारण बाब आम्हा सर्वांसमोर आली. ती म्हणजे सहकारी चळवळीने लोकांच्या विश्वासावर या महाराष्ट्रामध्ये काम करण्याचा प्रयत्न केला. ज्यांनी लोकांचा विश्वास संपादन केला त्यांनी सहकारी चळवळीचे नेतृत्व केले हे आपणास मान्यच करावे लागेल. विकास सोसायटी, गृहनिर्माण संस्था, सहकारी सूतगिरी असो, कोणत्याही प्रकारच्या फॉरमॅटमध्ये सहकारी संस्था असतो, जोपर्यंत त्या समुहाचा विश्वास संपादन करीत नाही, तोपर्यंत त्याला त्या संस्थेचे नेतृत्व कधीही करता आलेले नाही. तो समुहाचे नेतृत्व कधी करु शकतो तर त्या संस्थेच्या मेजॉरीटीने त्याच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला तर तो नेतृत्व करु शकतो. त्यामुळे सहकारी चळवळीतील कार्यकर्त्याला पदोपदी आपल्या साधनसुचितेला न विसरता काम करावे लागते. आपली संस्था प्रामाणिकपणे चाललेली आहे हे पहावे लागते. त्या संस्थेमधील कर्मचाऱ्यांना सभासदांना योग्य न्यायीक दृष्टीने पाहण्याचा दृष्टीकोन त्या संस्थेच्या नेतृत्वाला कायम दाखवावा लागतो. काही वर्षापूर्वी 1960 ते 1980 सालाच्या दरम्यानची वर्तमानपत्रे आपण उघडली तर या सहकारी साखर कारखानदारी व सहकारी चळवळीबाबत आसुया निर्माण होणारा वर्ग महाराष्ट्रात हळूहळू तयार झाला. पण त्यांचा प्रभाव एवढा वाढला नाही. सहकारी संस्थांचा प्रभाव जनमाणसांवर एवढा मोठा होता की, सहकारी चळवळीबाबत कोणी काही बोलले तरी लोकांचा विश्वास असायचा की, बोलणारा माणूस आपल्या हिताच्या विरोधी बोलत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर 3M-1

श्री.जयंत पाटील.....

काळाच्या ओघात सहकार चळवळीतील नावे बदलत गेली. या चळवळीमध्ये काही चुका घडल्या. त्या चुकांवर बोट ठेवून समाजातील लोक बोलायला लागली. यामुळे सहकार चळवळीतील लोकांनाही असे वाटायला लागले की, आपल्या सहकार चळवळीत हे असे काही चुकीचे चालू आहे. अशा पध्दतीचे जर काही होत असेल तर आपल्या सहकार चळवळीचे प्रमुखांवर शंका घ्यावयाला वाव आहे, असे लोकांना कळू लागले. या सहकार चळवळीचा पाया म्हणजे त्यावरील विश्वास हाच होता. सरकारने या सहकार चळवळीवर जरी विश्वास ठेवला असला तरीही त्यात काही चुका केल्या तर त्यांच्या चौकशीची व्यवस्था कायद्याच्या तरतुदीच्या माध्यमातून करुन ठेवली होती. या सरकारने आजचे हे जे बिल आणलेले आहे, ते बिल याच विश्वासाला तडा देणारे बिल आहे. या बिलाच्या माध्यमातून सहकार चळवळीच्या बोर्डावर आपला माणूस ठेवण्याचा आग्रह या सरकारच्या माध्यमातून होत आहे. सहकार चळवळ ही सामान्य व लहान माणसाने एकत्र येऊन सुरु केलेली आहे. सहकार चळवळी निर्माण करण्याचा इतिहास महाराष्ट्रात निर्माण झाला. या सहकार चळवळीवरील विश्वासाला तडा देण्याचे काम हे सरकार या बिलाच्या माध्यमातून करीत आहे. माननीय राज्यमंत्री श्री.दादाजी भुसे हे नाशिक जिल्हयातून येतात. त्यांच्या आसपास देखील सहकार चळवळ होती. श्री.भाऊसाहेब हिरे यांनी अनेक संस्था निर्माण केलेल्या आहेत. ....(अडथळा).... आज आमच्या पक्षाची बैठक होती. तरीही केवळ माननीय अध्यक्ष महोदय यांनी या बिलाकरिता आग्रह केल्यामुळे घटनेची पायमल्ली होत असतानाही आम्ही सभागृहात बसलेलो आहोत.

श्री.धैर्यशील पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे कामकाज चालू ठेवण्याकरिता 29 सन्माननीय सदस्यांची आवश्यकता असते. 29 सन्माननीय सदस्यांची संख्या होईलपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी.

(कोरमची बेल वाजविण्यात येते.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर): सभागृहामध्ये आवश्यक गणपूर्ती नसल्याकारणाने सभागृहाचे कामकाज आता स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार,दिनांक 06 एप्रिल,2016 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10 ते 10.45 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यानंतर सकाळी 11.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 09 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 06 एप्रिल,2016 च्या सकाळी 10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION